# शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शिक्षक
# व
# अधिकारी/कर्मचारी
# स्पर्धा मार्गदर्शिका




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका


- प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रेरणा : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- मार्गदर्शन : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. संजय यादव (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- संपादक : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सहसंपादक : **डॉ. कमलादेवी आवटे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी संपादक : **श्रीम. ज्योती शिंदे**
  उपसंचालक, मानव संसाधन विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी सहसंपादक : **डॉ. दत्तात्रय थिटे**
  सहायक संचालक, संशोधन व सीपीडी विभाग,
  रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- संपादन साहाय्य : **राजेश्वरी संधानशिवे**
  कार्यक्रम अधिकारी, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **सुषमा कोंडूसकर**
  अधिव्याख्याता, बालशिक्षण व संशोधन विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **शैलेश दखने**
  विषय सहायक, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- तांत्रिक साहाय्य : **स्वाती वनारसे**
  लघुलेखक, सीपीडी विभाग, रा. शै. सं. व प्र. परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रथम आवृत्ती : सप्टेंबर, २०२५
- प्रती : ५००
- मुद्रक : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

नमस्कार,

शिक्षणातील गुणवत्ता संवर्धनासाठी आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र (SCERTM), पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तसेच पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्याचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात येत आहे. सदर उपक्रम केवळ एक स्पर्धा नसून शिक्षण क्षेत्रातील सर्वांसाठी एक संधी आहे. यातून त्यांना आपले कौशल्य आणि नवकल्पना विकसित व प्रदर्शित करता येतील.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० (NEP-2020) हे शिक्षणाच्या पारंपरिक चौकटीला मोडून एक समग्र, लवचीक आणि बहुआयामी शिक्षण पद्धतीचा पाया रचते. या धोरणानुसार, शिक्षकांचे सर्वांगीण व्यावसायिक सक्षमीकरण हे शिक्षणाच्या गुणवत्तेचा केंद्रबिंदू आहे. प्रस्तावित स्पर्धात्मक कार्यक्रम NEP-2020 च्या तत्वांना मूर्त स्वरूप देतील. या स्पर्धांद्वारे शिक्षकांना नवीन अध्यापन पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल.

शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरण, चिकित्सक विचार आणि सर्जनशीलता यांसारख्या कौशल्यांची वाढ करणारे असणे आवश्यक आहे. या स्पर्धा शिक्षकांना अशा प्रकारच्या शैक्षणिक बदलांशी जुळवून घेण्यास आणि ते प्रत्यक्षात आणण्यास मदत करतील.

शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला प्रोत्साहन देऊन आणि त्यांच्या कार्याची ओळख निर्माण करून कार्यमान प्रतवारी निर्देशांक (PGI) मध्ये समाविष्ट असलेल्या विविध मापदंडांमध्ये आपण सकारात्मक बदल घडवून आणू शकतो. उदा. शिक्षकांची तयारी, व्यावसायिक विकास, शालेय वातावरणातील सुधारणा इ. सदर उपक्रम शिक्षकांना अशा २१ व्या शतकातील कौशल्यांसाठी सुसज्ज करील. सर्जनशीलता, सहयोग, संप्रेषण आणि चिकित्सक विचार. आजच्या जगात, शिक्षकांनी ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांना भावी जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी मार्गदर्शक होणे आवश्यक आहे.

या स्पर्धांच्या माध्यमातून, आपण शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला सक्रियपणे सहभागी करून एक उत्साहवर्धक, सकारात्मक व प्रेरणादायी वातावरण निर्माण करू शकतो. या उपक्रमांतर्गत समाविष्ट विविध स्पर्धांना मिळणारे यश हे राज्यातील शिक्षण व्यवस्थेच्या उज्ज्वल भविष्याची ग्वाही देईल. आपल्या सर्वांकडून सदर स्पर्धांना उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सदर स्पर्धांमधून शिक्षकांच्या सेवाविषयक कामगिरी उंचावेल आणि वर्गातील अध्ययन-अध्यापनाचा दर्जा सुधारेल. प्रस्तुत मार्गदर्शिकेत समाविष्ट स्पर्धांमध्ये भविष्यात वाढ होऊन सर्वांना अधिक संधी मिळू शकते. प्रत्येक केंद्रातून किमान एक शिक्षक सहभागी होईल याची खात्री करावी. सर्वांनी सहभाग घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विजेत्यांसाठी प्रोत्साहनपर भरपूर पारितोषिकांची तरतूद करण्यात येईल. सदर स्पर्धांच्या यशस्वी नियोजन, कार्यवाहीसाठी व शिक्षक, अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सक्रीय सहभागासाठी खूप खूप शुभेच्छा!

**राहूल रेखावार** भा.प्र.से.
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| • | मार्गदर्शक सूचना : स्पर्धा उपक्रमाची माहिती | १ |
| १. | स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धा | ३ |
| २. | मानसिक क्षमता व माहिती विश्लेषण स्पर्धा | ९ |
| ३. | एम एस वर्ड आणि एक्सेल स्पर्धा | २० |
| ४. | फोटोग्राफी स्पर्धा | ३३ |
| ५. | पुस्तक परीक्षण स्पर्धा | ३९ |
| ६. | पॉवर पॉइंट सादरीकरण स्पर्धा | ४५ |
| ७. | लोकनृत्य व रांगोळी स्पर्धा | ४८ |
| ८. | शाळांमधील विविध क्लब सादरीकरण स्पर्धा | ५१ |
| ९. | क्रीडा स्पर्धा | ५५ |
| १०. | विज्ञान व गणिताचा जादूगार | ६२ |
| ११. | आशयज्ञान स्पर्धा | ६७ |
| १२. | पोस्टर्स बनविणे (Poster Making) | ७० |
| १३. | वक्तृत्व स्पर्धा | ७३ |
| १४. | प्रवासवर्णन लेखन स्पर्धा | ७७ |
| १५. | संगीत वाद्य वादन स्पर्धा | ८१ |
| १६. | सुलेखन स्पर्धा (Calligraphy Competition) | ८९ |
| १७. | कथालेखन स्पर्धा | ९३ |
| १८. | शोधनिबंध स्पर्धा | ९९ |
| १९. | सुडोकू, शब्दकोडे व प्रश्नमंजूषा स्पर्धा | १०२ |
| २०. | समजपूर्वक वाचन स्पर्धा | ११२ |
| २१. | ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धा | ११५ |

| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २२. | कथाकथन स्पर्धा | १२० |
| २३. | वादविवाद स्पर्धा | १२२ |
| २४. | शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धा | १२८ |
| २५. | नाट्य/नाटक, भूमिका अभिनय व मूकाभिनय स्पर्धा | १३२ |
| २६. | हॅकेथॉन स्पर्धा | १३७ |
| २७. | परकीय भाषा स्पर्धा | १४५ |
| २८. | बोर्ड स्पर्धापरीक्षा | १५४ |
| २९. | बालमानसशास्त्र (child psychology) केस स्टडी स्पर्धा | १५९ |
| ३०. | व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन (Career Guidance and Counselling) स्पर्धा | १६४ |
| ३१. | योगासन स्पर्धा | १६८ |
| ३२. | शैक्षणिक व्हिडिओनिर्मिती स्पर्धा | १७३ |
| ३३. | डॉक्युमेंटरी स्पर्धा | १७६ |
| ३४. | आत्मचरित्र (Autobiography) लेखन स्पर्धा | १८८ |
| ३५. | सुगम गायन स्पर्धा | १९२ |
| ३६. | व्यक्ती अभ्यास स्पर्धा (Case-Study) | १९६ |
| ३७. | ऑलिंपियाड | २०१ |
| | १. मराठी ऑलिंपियाड | २०१ |
| | २. गणित ऑलिंपियाड | २०४ |
| | ३. इंग्रजी ऑलिंपियाड | २०६ |
| | ४. विज्ञान ऑलिंपियाड | २०९ |
| | ५. सामाजिक शास्त्र ऑलिंपियाड | २१३ |
| | ६. बुद्धिमत्ता चाचणी ऑलिंपियाड | २१५ |

# मार्गदर्शक सूचना

## शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धा

(तालुका, जिल्हा व राज्य स्तर आयोजनाकरिता)

**उद्दिष्टे :**

१) शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे.

२) कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे.

३) डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देणे.

४) अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांना एकविसाव्या शतकातील आव्हाने स्वीकारण्यास सक्षम बनविणे.

५) रोजच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाच्या तणावातून अधिकारी व कर्मचारी यांना काही काळ दिलासा देणे.

**स्पर्धांचे स्वरूप आणि स्तर :**

स्पर्धा तीन स्तरांवर आयोजित केल्या जातील.

**१) तालुका स्तर :** तालुक्यामधील सर्व शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकारी-कर्मचारी तालुका स्तरावरील स्पर्धेत सहभागी होतील.

**२) जिल्हा स्तर :** तालुका स्तरावरून जिल्हा स्तरासाठी नामनिर्देशित विजेते जिल्हा स्तरावरील स्पर्धेत सहभागी होतील.

**३) राज्य स्तर :** जिल्हा स्तरावरून राज्य स्तरासाठी नामनिर्देशित विजेते राज्य स्तरावरील अंतिम स्पर्धेत सहभागी होतील.

**स्पर्धांसाठी पात्रता :**

**१) शिक्षकेतर कर्मचारी** : लिपिक, ग्रंथपाल, शिपाई, प्रयोगशाळा सहायक आणि इतर सर्व शिक्षकेतर कर्मचारी स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात.

**२) शिक्षक :** सर्व शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक) स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात.

**३) अधिकारी-कर्मचारी :** प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता आणि इतर सर्व कर्मचारी स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात. शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तारअधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख व कर्मचारी या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात.

**नोंदणी प्रक्रिया :**

१) सर्व स्पर्धकांनी दिलेल्या वेळेत नोंदणी पूर्ण करणे अनिवार्य राहील.

२) नोंदणीची अंतिम तारीख/आयोजकांकडून जाहीर केली जाईल.

**स्पर्धांचे स्तर आणि वेळापत्रक :**

स्पर्धा खालील स्तरांवर आयोजित केल्या जातील.

| अनु. क्र. | स्तर | आयोजन करणारी यंत्रणा | आयोजन कालावधी |
|---|---|---|---|
| १) | तालुका | गटशिक्षणाधिकारी कार्यालय | ऑक्टोबर |
| २) | जिल्हा | शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) कार्यालय | नोव्हेंबर |
| ३) | राज्य | शिक्षण संचालक (प्राथ./माध्य.) कार्यालय | डिसेंबर |

**स्पर्धा आयोजनासाठी मार्गदर्शक सूचना :**

१) सर्व स्पर्धा आयोजनाबाबतचा आदेश किमान एक महिना आधी शिक्षक व अधिकारी यांना देण्यात आला. सर्व शिक्षक व अधिकारी यांचेसाठी स्पर्धांची पूर्वतयारी म्हणून प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत. तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांनी नियोजन करावे.

२) स्पर्धेसाठी आवश्यक तेथे वैद्यकीय टीम उपलब्ध करावी. कोव्हिड/आरोग्य प्रोटोकॉल पाळावा. महिलांसाठी सुरक्षित व्यवस्था करावी. प्रत्येक स्तरावर (तालुका, जिल्हा, राज्य) स्पर्धांच्या आयोजनासाठी एक समन्वय समिती तयार करावी. या समितीत शिक्षक प्रतिनिधी, शिक्षकेतर प्रतिनिधी आणि डायट अधिकारी व पर्यवेक्षिय यंत्रणेतील अधिकारी यांचा समावेश असावा. शिक्षक प्रतिनिधींची निवड करताना कला, क्रीडा व संगीत शिक्षकांना प्राधान्य देण्यात यावे.

३) प्रत्येक स्पर्धेसाठी स्पष्ट नियम, मूल्यमापनाचे निकष आणि गुणदान पद्धती निश्चित करावी. हे नियम सर्व सहभागींना स्पर्धेच्या आधीच कळवावेत. यासाठी प्रस्तुत मार्गदर्शिकेचा सुलभ संदर्भासाठी उपयोग करावा.

४) प्रत्येक स्तरावरील विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह आणि रोख रक्कम स्वरूपात पारितोषिक दिले जाईल.

५) स्पर्धांसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल. बक्षिसे, प्रमाणपत्रे व इतर आनुषंगिक खर्च यांचा यात समावेश असेल.

६) प्रत्येक स्तरावरील स्पर्धेचा निकाल वेळेवर जाहीर करावा आणि नियमानुसार विहित केलेल्या संख्येएवढ्या विजेत्यांची नावे पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी विहित मुदतीत कळवावी.

७) आयोजन समितीने तक्रारी हाताळाव्यात. शासकीय नियम पाळावेत व सर्व स्तरावरील स्पर्धा निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाव्यात.

**नियोजन व अंमलबजावणी :**

१) शिक्षण संचालक (राज्य स्तर), शिक्षणाधिकारी (जिल्हा स्तर) व गटशिक्षणाधिकारी (तालुका स्तर) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक पातळीवर समिती गठीत करावी.

२) कमीत कमी १५ दिवस आधी सर्व संबंधितांना स्पर्धेचे वेळापत्रक कळवावे.

३) शासकीय परिपत्रकानुसार सर्व शाळांना सूचना देण्यात याव्यात.

**सर्वसाधारण सूचना :**

१) स्पर्धेच्या आयोजनात पारदर्शकता ठेवावी. निवड झालेल्या स्पर्धकांची यादी प्रसिद्ध करावी.

२) विशेष आवश्यकता असलेल्या (दिव्यांग) कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुविधा द्याव्यात.

३) कोविडसदृश परिस्थितीत आवश्यकतेनुसार ऑनलाइन स्पर्धांचा पर्याय ठेवावा.

४) सहभागी सर्व कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात यावे.

- सर्व स्पर्धा शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी राहतील.
- अधिकाऱ्यांची स्पर्धा जिल्हा स्तरावर घेण्यात येईल.
- स्पर्धेत सहभागी अधिकारी/कर्मचारी यांची निवड परीक्षण/आयोजन समितीवर करता येणार नाही.
- राज्य/जिल्हा/तालुका समितीने अंतिम केलेले निकष व नियमावली लागू राहतील.

# १) स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धा

**स्पर्धेचा उद्‌देश :**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी तसेच शालेय शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यातील सर्जनशीलता आणि काव्यलेखन कलेस प्रोत्साहन देणे.

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्रता, नियम व अटी :**

१) स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी तसेच शालेय शिक्षण विभाग सक्षमीकरण व प्रशासन शाखेत कार्यरत अधिकारी, कर्मचारी स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

२) विषय निवडीचे स्वातंत्र्य स्पर्धकाला असेल. कविता कोणत्याही प्रकारची (प्रेरणादायी, विनोदी, शैक्षणिक सामाजिक) असू शकेल, परंतु ती मूळ स्वरचित असावी.

३) कविता राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारी नसावी. कवितेत अश्लील, विघातक किंवा कोणत्याही प्रकारचे वादग्रस्त विषय तसेच शब्द नसावेत.

४) कविता सादरीकरणासाठी योग्य असावी.

५) कवितेसाठी ओळींची मर्यादा कमाल १० ते १२ काव्यपंक्ती व शब्दमर्यादा कमाल ५० ते ७० शब्द असावी.

६) प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धेपूर्वी कवितेची लिखित प्रत संयोजकांकडे सादर करावी.

७) स्पर्धकाला कार्यालयाचे अधिकृत ओळखपत्र बंधनकारक असेल.

८) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

९) एका स्पर्धकाला केवळ एकच कविता सादर करता येईल.

१०) प्रत्येक स्तरातून निवड झालेल्या प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाला पुढील स्तरामध्ये सहभाग घेण्याची संधी मिळेल.

**स्पर्धेचे स्वरूप/पद्धती :**

**सदर स्पर्धा खालीलप्रमाणे पाच स्तरांवर आयोजित करण्यात येईल :**

| अ. क्र. | स्तर | क्रमांक | पुढील स्तरासाठी निवडीची पद्धत |
|---|---|---|---|
| १) | केंद्र | प्रथम | प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धक बीट स्तरीय स्पर्धेसाठी पात्र राहील. |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| २) | बीट | प्रथम | प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धक तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पात्र राहील. |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ३) | तालुका | प्रथम | प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धक जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र राहील. |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ४) | जिल्हा | प्रथम | प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धक राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र राहील. |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ५) | राज्य | प्रथम | |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |

**मूल्यांकन धोरण :**

**मूल्यांकन निकष प्रपत्र : सदर स्पर्धेचे मूल्यांकन खालील निकष प्रपत्राच्या आधारे करण्यात येईल :**

| कवितेचा आशय | भाषेचे सौंदर्य आणि काव्यशैली | सादरीकरण कौशल्य | भावगर्भता आणि प्रभाव | तात्पर्य व सामाजिक संदेश | एकूण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|
| १) कवितेचा विषय स्पष्ट आणि प्रभावी आहे का? | १) भाषा समृद्ध, प्रभावी आणि प्रवाही आहे का? | १) आवाजातील स्पष्टता, चढउतार व भावनांचा योग्य समन्वय आहे का? | १) कवीने भावनांची गुंफण प्रभावीपणे केली आहे का? | १) कवितेचा अर्थ स्पष्ट आणि विचारप्रवर्तक आहे का? | |

| कवितेचा आशय | भाषेचे सौंदर्य आणि काव्यशैली | सादरीकरण कौशल्य | भावगर्भता आणि प्रभाव | तात्पर्य व सामाजिक संदेश | एकूण प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|
| २) विषयामध्ये सुसंगतता आणि नावीन्य आहे का? | २) नादमयता, रचनेतील गेयता, लय व अलंकारांचा योग्य वापर आहे का? | २) सादरीकरणा – मध्ये आत्मविश्वास व श्रोत्यांशी संवाद आहे का? | २) श्रोत्यांच्या मनावर कवितेचा दीर्घकालीन प्रभाव पडतो का? | २) काव्याचे तात्पर्य सामाजिक जाणिवांना प्रोत्साहन देते का? | |
| | ३) शब्दांची निवड आशयाला पूरक आहे का? | ३) शरीराची हालचाल (देहबोली) व अभिव्यक्ती प्रभावी आहे का? | | ३) श्रोत्यांना कवितेचा संदेश अंतर्मुख करतो का? | |
| **२० गुण** | **२० गुण** | **२० गुण** | **२० गुण** | **२० गुण** | **१०० गुण** |

**परीक्षण समिती :**

सदर स्पर्धेचे मूल्यांकन खालीलप्रमाणे प्रत्येक स्तरावरील गठीत परीक्षण समितीमार्फत करण्यात येईल. स्पर्धेत सहभागी असलेल्या व्यक्तीला परीक्षण समितीमध्ये घेण्यात येऊ नये.

**१) केंद्र स्तर :**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | केंद्रप्रमुख | अध्यक्ष |
| २) | माध्यमिक/ उच्च माध्यमिक विद्यालयातील मराठी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ३) | माध्यमिक विद्यालयातील मराठी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ४) | केंद्र शाळा मुख्याध्यापक | सदस्य सचिव |

**२) बीट स्तर**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | विस्तार अधिकारी | अध्यक्ष |
| २) | माध्यमिक विद्यालयातील मराठी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ३) | प्राथमिक शाळेतील भाषा विषयाचे पदवीधर शिक्षक | सदस्य |
| ४) | केंद्रप्रमुख | सदस्य सचिव |

**३) तालुका स्तर**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता/वरिष्ठ अधिव्याख्याता (जि. शि. प्र. स) | सदस्य |
| ३) | वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ४) | तालुक्यातील मान्यवर साहित्यिक/कवी | सदस्य |
| ५) | विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**४) जिल्हा स्तर**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य (जि. शि. प्र. सं) | अध्यक्ष |
| २) | शिक्षण अधिकारी प्राथमिक/माध्यमिक | सदस्य |
| ३) | जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिक/कवी | सदस्य |
| ४) | वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ५) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य सचिव |

**५) राज्य स्तर**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | संचालक, रा.शै.सं.व प्र.प. महारष्ट्र पुणे. | अध्यक्ष |
| २) | विद्यापीठातील मराठी भाषा विभागप्रमुख | सदस्य |
| ३) | नामवंत मराठी कवी/साहित्यिक | सदस्य |
| ४) | मराठी भाषा विभागप्रमुख, पुणे | सदस्य |
| ५) | उपसंचालक, भाषा विभाग, पुणे | सदस्य सचिव |

**पारितोषिके स्वरूप :**

| अ. क्र. | स्तर | क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | केंद्र | प्रथम | शासकीय नियमानुसार रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |

| अ. क्र. | स्तर | क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| २) | बीट | प्रथम | शासकीय नियमानुसार रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ३) | तालुका | प्रथम | |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ४) | जिल्हा | प्रथम | |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ५) | राज्य | प्रथम | |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |

**अंदाजे खर्च :**

| अ. क्र. | खर्चाची बाब | अंदाजे खर्च | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्तर | संख्या | बक्षीस | | | एकूण |
| | | | | प्रथम | द्वितीय | तृतीय | |
| १) | रोख बक्षिसे | राज्य | १ | शासकीय नियमानुसार रक्कम | | | शासकीय नियमानुसार रक्कम |
| | | जिल्हा | ३६ | | | | |
| | | **एकूण** | | | | | |
| | | **स्तर** | **संख्या** | **परीक्षक संख्या** | **प्रति परीक्षक मानधन** | | |
| २) | परीक्षक मानधन | राज्य | १ | ३ | शासकीय नियमानुसार रक्कम | | शासकीय नियमानुसार रक्कम |
| | | जिल्हा | ३६ | ३ | | | |
| | | **एकूण** | | | | | |

| अ. क्र. | खर्चाची बाब | अंदाजे खर्च | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | **स्तर** | **संख्या** | | | |
| ३) | स्पर्धा आयोजन व पुरस्कार वितरण कार्यक्रम | तालुका | ३५८ | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| | | जिल्हा | ३६ | | | |
| | | **एकूण** | | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| | | **एकूण खर्च** | | | | |

**स्पर्धेचे स्तर व अंदाजे वेळापत्रक :**

| अ. क्र. | स्तर | अंदाजे कालावधी |
| --- | --- | --- |
| १) | केंद्र स्तर | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) | बीट स्तर | |
| ३) | तालुका स्तर | |
| ४) | जिल्हा स्तर | |
| ५) | राज्य स्तर | |

◈◈◈

# २) मानसिक क्षमता व माहिती विश्लेषण स्पर्धा

**प्रस्तावना :**

शालेय शिक्षकांसाठी मानसिक क्षमता आणि माहिती विश्लेषणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या स्पर्धेत शिक्षकांच्या बोधात्मक कौशल्यांचे, विश्लेषणात्मक क्षमतांचे आणि समस्या सोडवण्याच्या तंत्रांचे मूल्यमापन करणे समाविष्ट असेल, ज्यामध्ये माहितीचा अर्थ लावणे आणि कल्पनाचित्रण (व्हिज्युअलायझेशन) वर विशेष भर दिला जाईल. स्पर्धेत बहुपर्यायी प्रश्न, समस्या निराकरण, माहिती विश्लेषण आणि अन्वयार्थ लावणे, प्राप्त परिस्थितीत उपयोजन करता येते का? या सर्वांचा समावेश असेल.

**सदर स्पर्धा मानसिक क्षमता व माहिती विश्लेषणामधील खालील काही प्रमुख पैलूंवर आधारित असेल :**

- **शाब्दिक आकलन :** शब्द आणि संकल्पनांमधील आकलन, शब्दसंग्रह आणि तार्किक संबंधांची चाचणी करणारे प्रश्न.
- **तर्क व अनुमान :** अनुमानात्मक आणि निगमनात्मक तर्क कौशल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी समस्या निराकरण उदाहरणे.
- **गणित :** गणितीय कौशल्ये आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी गणितीय समस्या, संख्यात्मक माहिती आणि माहितीचा अर्थ लावणे.
- **अवकाशीय आकलन :** भूमितीय आकार, अवकाशीय संबोध आणि अवकाशीय कौशल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी कल्पनाचित्रणावर प्रश्न. नकाशावर आधारित प्रश्न.
- **माहितीचे सादरीकरण :** माहितीचा अर्थ लावण्याची आणि अन्वयार्थ लावण्याची क्षमता मूल्यांकन करण्यासाठी चार्ट, आलेख, सारण्या आणि इतर माहितीवर आधारित स्वरूपांसह प्रश्न.
- **माहिती विश्लेषण व अन्वयार्थ :** माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यासाठी आवश्यक असलेली उदाहरणे.
- **माहितीवर आधारित निर्णय घेणे :** परिस्थिती–आधारित प्रश्न जिथे शिक्षकांना माहितीचे विश्लेषण करावे लागेल आणि मिळवलेल्या अन्वयार्थाच्या आधारे माहितीवर निर्णय घ्यावे लागतील असे प्रश्न.

**स्पर्धेची उद्दिष्टे व महत्त्व :**

१) **बोधात्मक कौशल्ये विकास :** मानसिक क्षमता आणि माहिती विश्लेषण स्पर्धेत भाग घेतल्याने शिक्षकांना त्यांच्या बोधात्मक क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि तार्किक विचार यामध्ये प्रावीण्य संपादित करता येईल ज्याचा विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकेल.

२) **माहिती विश्लेषण कौशल्ये सुधारणा :** या स्पर्धेमुळे शिक्षकांना माहिती विश्लेषण तंत्रांची अधिक

चांगली समज विकसित करण्यास आणि त्यांच्या अध्यापन पद्धतीमध्ये माहितीचा अर्थ लावण्याची आणि उपयोजन करण्याची क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते.

३) **शिक्षकांचा वैयक्तिक, व्यावसायिक विकास :** स्पर्धेत भाग घेणे ही व्यावसायिक विकासासाठी एक महत्त्वाची संधी असेल, ज्यामुळे शिक्षकांना माहिती विश्लेषण आणि शिक्षणातील सध्याचे नवीन प्रवाह आणि सर्वोत्तम पद्धतींबद्दल अद्ययावत राहण्यास मदत होऊ शकते.

४) **अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुधारणा :** बोधात्मक आणि विश्लेषणात्मक कौशल्यांमध्ये अद्ययावत, शिक्षक पाठनियोजन करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यांच्या वर्गात माहिती आधारित निर्णय घेण्यासाठी अधिक प्रभावी मदत होईल.

**स्पर्धेची कार्यपद्धती :**

**प्रत्यक्ष संमिश्र (Blended)**

**राज्य स्तरावरून स्तरनिहाय व काठिण्यपातळीनुसार प्रश्नसंचाची निर्मिती :**

१) **स्पर्धेचे स्तर :**

**स्पर्धा ४ स्तरांवर होतील.**

**केंद्र स्तर** : प्रत्येक केंद्रामधील इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षक भाग घेतील.

**तालुका स्तर** : केंद्र स्तरामधील प्रथम क्रमांक मिळवणारे शिक्षक तालुका स्तरावर सहभागी होतील.

**जिल्हा स्तर** : तालुका स्तरावरील विजेते जिल्हा स्तरावर सहभागी होतील.

**राज्य स्तर** : जिल्हा स्तरावरील विजेते राज्य पातळीवरील स्पर्धेस पात्र राहतील.

२) **नियोजन :**

**केंद्र स्तरासाठी :**

१) प्रत्येक केंद्रामध्ये स्पर्धेचे माहिती व प्रसारासाठी केंद्रप्रमुख व विषय साधनव्यक्ती यांच्यावर जबाबदारी सोपविणे.

२) केंद्र स्तरावरील स्पर्धेचे नियोजन वेळापत्रक ठरविणे.

**तालुका व जिल्हा स्तरांसाठी :**

१) गटशिक्षणाधिकारी (BEO) आणि शिक्षणाधिकारी (EO) यांची जबाबदारी ठरविणे.

२) आवश्यकतेनुसार परीक्षकांची निवड करणे.

**राज्य स्तरासाठी :**

१) रा.शै.सं.व प्र.परिषदेच्या मार्गदर्शनाखाली नामवंत तज्ज्ञ मंडळ नियुक्त करणे.

**स्पर्धेचे स्वरूप :**

**१) विषयाच्या प्रकारानुसार/स्तरनिहाय व काठिण्यपातळीनुसार फेऱ्या :**

**मानसिक क्षमता (Mental Ability) :**

- अंकगणितीय तर्क (Numerical Reasoning)
- आकृतीमधून विश्लेषण (Pattern Recognition)
- तार्किक प्रश्न (Logical Thinking)

**माहिती विश्लेषण (Data Analysis) :**

- ग्राफ व तक्ते यांचे विश्लेषण (Graph and Table Interpretation)
- सरासरी, टक्केवारी आणि प्रमाण/गुणोत्तर (Average, Percentage, Ratio)
- डेटाचे व्यवस्थापन (Data Handling)

**समस्या निराकरण (Problem Solving) :**

- तार्किक विश्लेषण करून समस्या निराकरण.
- समस्येला सर्जनशील पर्याय शोधणे.
- कोडी इ.

**२) प्रश्नांचा प्रकार :**

- बहुपर्यायी प्रश्न (MCQ's)
- लघुत्तरी प्रश्न (Short Answers)
- समस्या सोडवणे (Problem Solving)
- केस स्टडीज (Case Studies)

**३) वेळेचे नियोजन :**

- प्रत्येक टप्प्यासाठी ६० ते १२० मिनिटांची स्पर्धा असेल.
- प्रश्नपत्रिकेचा दर्जा टप्प्यानुसार स्तरनिहाय वाढत जाईल.

**नियम व अटी :**

- **पात्रता :**
  - ➢ पहिली ते बारावीला शिकवणारे शिक्षक सहभागी होऊ शकतात.
  - ➢ शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

- **स्पर्धेचे टप्पे :**
  - ➢ प्रत्येक टप्प्यात प्रथम क्रमांक पटकावणारेच पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी जातील.
- **केंद्र स्तर स्पर्धा (ऑनलाइन) व पुढील टप्प्याची स्पर्धा प्रत्यक्ष स्वरूपात आयोजित केली जाईल.**
  - ➢ प्रश्नपत्रिका गोपनीय ठेवली जाईल.
- **प्रश्नांचा दर्जा :**
  - ➢ टप्प्यागणिक स्पर्धा अधिक कठीण होत जाईल.
- **गैरप्रकार टाळण्यासाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती केली जाईल.**

**पुरस्कार व सन्मान :**

- **केंद्र स्तर विजेते :** सन्मानपत्र – प्रथम व द्वितीय विजेते.
- **तालुका स्तर विजेते :** सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह (प्रथम व द्वितीय विजेते) व सहभागींकरिता प्रमाणपत्र.
- **जिल्हा स्तर विजेते :** रोख पारितोषिक व सन्मानपत्र (प्रथम व द्वितीय क्रमांकाचे विजेते) रक्कम शासकिय नियमांनुसार व सहभागींकरिता प्रमाणपत्र.
- **राज्यस्तर विजेते :** सन्मान समारंभ आयोजन व रोख पारितोषिक (प्रथम, द्वितीय व तृतीय), सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह, सहभागींकरिता प्रमाणपत्र. (रक्कम शासकीय नियमानूसार)

**स्पर्धेसाठी तयारी :**

**१) मार्गदर्शक पुस्तिका :**

मानसिक क्षमता व माहिती विश्लेषण व समस्या निराकरण यावरील नमुना सरावसंच पुरविणे.

## प्रत्येक स्तरासाठी सविस्तर नियोजन

**१) केंद्र स्तर (Cluster Level)**

**१.१ स्पर्धेची जाहिरात :**

**माध्यम :**

- ➢ कार्यालयामार्फत पत्र व जाहिरात.
- ➢ शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉट्सअॅप ग्रुप व ई–मेल.

**सूचना :**

- ➢ वेळ व ठिकाण निश्चित करणे.

- शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवण्यासाठी ऑनलाइन गुगल फॉर्म भरणे.

**१.२ प्रश्नपत्रिका तयार करणे :**

**प्रश्नांचे प्रकार :**

- ५० MCQ's [३० मानसिक क्षमता (Mental Ability),१० माहिती विश्लेषण (Data Analysis), १० समस्या निराकरण यावर आधारित प्रश्न (Problem Solving) यावर आधारित प्रश्न]

**प्रश्नांचे स्तर :**

- सोप्या ते मध्यम काठिण्यपातळीचे प्रश्न.

**वेळ : ६० मिनिटे**

**१.३ एकूण गुण : ५०**

**१.४ आयोजन :**

- **ठिकाण :** स्पर्धेचे आयोजन हे केंद्र स्तरावर ऑनलाइन स्वरूपात केले जात असल्याने सर्व सहभागींना सोयीस्कर, ठिकाणावरून सहभागी होता येईल.
- **व्यवस्थापन :** प्रश्नपत्रिकेची लिंक नोंदणी केलेल्या सहभागींना त्यांच्या ई-मेलवर स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार पाठविण्यात येतील.

**१.५ मूल्यमापन व निकाल :**

- केंद्र स्तर स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने घेणे. केंद्रनिहाय ऑनलाइन निकाल जाहीर करणे व संबंधित जिल्ह्यांना व सहभागींना कळविणे.
- प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास तालुका स्तरासाठी पात्र घोषित करणे व संबंधितांस कळविणे.

**१.६ पुरस्कार व प्रोत्साहन :**

- उच्च गुण मिळवणाऱ्यांना सन्मानपत्र व सहभागींना प्रमाणपत्र.

## २) तालुका स्तर (Block Level)

**२.१ स्पर्धेची जाहिरात :**

**माध्यम :**

- केंद्र स्तरावरील विजेत्यांना अधिकृत सूचनापत्र.

**सूचना :**

- स्पर्धेची तारीख, वेळ व ठिकाण कळवणे.

२.२ **प्रश्नपत्रिका तयार करणे :**

**प्रश्नांचे प्रकार :**

- ५० MCQ's (३० मानसिक क्षमता, १० माहिती विश्लेषण, १० समस्या निराकरण)

**प्रश्नांचा स्तर :**

- मध्यम ते कठीण.

**वेळ : १२० मिनिटे.**

२.३ **एकूण गुण : १००**

२.४ **आयोजन :**

- ठिकाण : तालुकास्तर मुख्यालयातील शाळा/तालुका समूह संसाधन केंद्र (BRC) / शहर संसाधन केंद्र (URC)
- व्यवस्थापन : १ पर्यवेक्षक, १ मुख्य परीक्षक.
- BEO व्यवस्थापनासाठी.

२.५ **मूल्यमापन व निकाल :**

**निकाल जाहीर करण्यासाठी :**

- उत्तरपत्रिका नमुना उत्तरांच्या आधारावर पडताळणे.
- प्रथम क्रमांक विजेत्यास जिल्हा स्तरासाठी पात्र घोषित करणे.

२.६ **पुरस्कार व प्रोत्साहन :**

- उच्च गुण मिळवणाऱ्या स्पर्धकांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व सहभागींना प्रमाणपत्र.

३) **जिल्हा स्तर (District Level)**

३.१ **स्पर्धेची जाहिरात :**

**माध्यम :**

- तालुका स्तरावरील विजेत्यांना ई-मेल व पत्राद्वारे सूचना.

३.२ **प्रश्नपत्रिका तयार करणे :**

**प्रश्नांचे प्रकार :**

- ४० MCQ's (२० मानसिक क्षमता,  माहिती विश्लेषण Data Analysis).
- १० प्रश्न समस्या निराकरणावर आधारित.
- १० केस स्टडी आधारित प्रश्न.

**प्रश्नांचा स्तर :**

- कठीण

**वेळ : १५० मिनिटे**

**३.३ एकूण गुण : १२०**

**३.४ आयोजन :**

- ठिकाण : DIET
- व्यवस्थापन : १ पर्यवेक्षक, १ मुख्य परीक्षक.
  जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचा समन्वय.

**३.५ मूल्यमापन व निकाल :**

- उत्तरपत्रिकांचे तज्ज्ञांमार्फत मूल्यमापन.
- विजेत्यास राज्य स्तरासाठी नामांकित करणे.

**३.६ पुरस्कार व प्रोत्साहन :**

- उच्च गुण मिळवणाऱ्यांना (प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक) यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक, सर्व सहभागींना प्रमाणपत्र.

**४) राज्य स्तर (State Level)**

**४.१ स्पर्धेची जाहिरात :**

**माध्यम :**

- जिल्हा स्तरावरील विजेत्यांना रा.शै.सं.व प्र.प महाराष्ट्र, पुणे मार्फत सूचना निर्गमीत करणे.

**४.२ प्रश्नपत्रिका तयार करणे :**

**प्रश्नांचे प्रकार :**

- ५० बहुपर्यायी प्रश्न (MCQ's), २० मानसिक क्षमता (Mental Ability), १० माहिती विश्लेषण. (Data Analysis)
- १० समस्या निराकरण (Problem Solving.) क्षमतेवर १० प्रश्न
- १० केस स्टडी आधारित प्रश्न.

**प्रश्नांचा स्तर :**

- अत्यंत कठीण

**वेळ : १५० मिनिटे**

**४.३ एकूण गुण : १५०**

**४.४ आयोजन :**

- **ठिकाण :** जि.शि.प्र.सं. अमरावती/प्रबोधिनी/नामांकित शैक्षणिक संस्था.
- **व्यवस्थापन :** २ पर्यवेक्षक, १ मुख्य परीक्षक.

  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे, समन्वयकांची उपस्थिती.

**४.५ मूल्यमापन व निकाल :**

- तज्ज्ञ परीक्षक मंडळातर्फे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन.

**४.६ पुरस्कार व प्रोत्साहन :**

- सन्मान समारंभ आयोजन, उच्च गुण मिळवणाऱ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व २ प्रोत्साहनपर यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक व उर्वरित राज्य स्तरावर सर्व सहभागींना प्रमाणपत्र.

**स्पर्धेसंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे :**

**१) गुणांकन पद्धती :**

- प्रत्येक प्रश्नाचे गुण निश्चित करणे व अचूकतेनुसार गुणांकन करणे.

**२) स्पर्धेची वेळ :**

- प्रश्नांची संख्या आणि जटिलतेनुसार ६० ते १५० मिनिटे (स्तरनिहाय वेगळी)

**३) पुरस्कार व प्रोत्साहन :**

- उच्च गुण मिळवणाऱ्यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिके, तसेच जिल्हा व राज्य स्तरांवर सर्व सहभागींना प्रमाणपत्र.

**स्पर्धेकरिताचे एकंदरीत निकष व अटी :**

- स्पर्धा ४ स्तरांवर होईल : केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर.
- सदर स्पर्धा ही शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित व अंशतः अनुदानित विद्यालयांच्या शिक्षकांकरिता राहील, तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारीसुद्धा सहभागी होऊ शकतील.
- सदर स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते बारावीला शिकवणारे शिक्षक पात्र असतील.
- चाचणीचा कालावधी हा स्तरनिहाय वेगळा असेल. ६० ते १५० मिनिटे इतका असेल.

  (केंद्र स्तर – ६० मिनिटे, तालुका स्तर – १२० मिनिटे, जिल्हा स्तर – १५० मिनिटे व राज्य स्तर – १५० मिनिटे)

- प्रत्येक शिक्षक, अधिकारी व कर्मचारी वैयक्तिकरीत्या सहभागी होतील. सूचनेप्रमाणे ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे स्वतः नोंदणी करतील.
- प्रत्येक स्तरावर प्रथम क्रमांक पटकावणारेच पुढील स्तरासाठी पात्र होतील.
- रोख पारितोषिके पुढीलप्रमाणे असतील :

| | | | |
|---|---|---|---|
| **जिल्हा स्तर :** | प्रथम क्रमांक | – | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | द्वितीय क्रमांक | – | |
| | तृतीय क्रमांक | – | |
| **राज्य स्तर :** | प्रथम क्रमांक | – | |
| | द्वितीय क्रमांक | – | |
| | तृतीय क्रमांक | – | |
| | प्रोत्साहनपर क्रमांक | – | |

- सदर स्पर्धा केंद्र स्तरावर ऑनलाइन व इतर स्तरांसाठी ऑफलाइन स्वरूपात आयोजित केली जाईल.
- स्पर्धेकरिता सर्व स्तरांवरील चाचणी प्रश्ननिर्मिती राज्याद्वारे व संबंधित डायटद्वारे करण्यात येईल.
- केंद्र स्तरावरील चाचणीचे आयोजन राज्यात एकाच वेळी जि. शि. प्र. सं. अमरावती द्वारा करण्यात येईल.
- तालुका व जिल्हा स्तरांवरील स्पर्धेच्या आयोजनाविषयी सर्व जि. शि. प्र. सं. प्राचार्य यांची ऑनलाइन सभा घेऊन पुढील आयोजनाविषयीच्या सूचना देण्यात येतील.
- मात्र तालुका व जिल्हा स्तरांवरील चाचणीचे आयोजन निर्धारित केलेल्या दिवशी प्रत्येक जिल्ह्यातील जि. शि. प्र. सं. मार्फत सनियंत्रित केले जाईल. त्यासाठी चाचणीच्या प्रश्नपत्रिका स्पर्धेच्या दिवशी एक तास आधी डायटद्वारे पाठविण्यात येतील. स्पर्धकांच्या संख्येप्रमाणे आवश्यक तेवढ्या छायाप्रती (झेरॉक्स) काढून चाचणी डायट मार्फत घेतली जाईल.
- स्तरागणिक चाचणीची काठिण्यपातळी अधिक वाढत जाईल.
- गैरप्रकार टाळण्यासाठी चाचणी स्थळी पर्यवेक्षकांची नियुक्ती केली जाईल.
- केंद्र स्तरावरील स्पर्धेत नोंदणी केलेल्या सहभागींना त्यांच्या ई–मेलवर चाचणीची लिंक पाठविली जाईल. वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी व दिलेल्या वेळेतच चाचणी सोडविणे अनिवार्य असेल.
- प्रत्येक स्तराचा निकाल सार्वजनिकरीत्या जाहीर करण्यात येईल.
- स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

- केंद्र, तालुका व जिल्हा स्तरांवर सारखे गुण असणारे स्पर्धक त्याच्या पुढील स्तराच्या चाचणीसाठी पात्र असतील.
- परीक्षा समितीचा निर्णय अंतिम राहील.

**स्पर्धेचे वेळापत्रक व नियोजनाचे मुद्दे. (अंदाजे)**

- स्पर्धेकरिता नोंदणी
- केंद्र स्तरावरील चाचणी
- केंद्र स्तरावरील निकाल जाहीर करणे
- तालुका व जिल्हा स्पर्धा नियोजन सभा
- तालुका स्तरावरील चाचणी
- जिल्हा स्तरावरील चाचणी
- राज्य स्तरावरील चाचणी :

} शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन (चाचणी प्रती काढणे) | बक्षीस रक्कम | सादिल खर्च (उदा. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र व इतर) रु. प्रति तालुका व रु. प्रति जिल्हा | परीक्षक मानधन रु. प्रति तालुका | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन व निवास | प्रश्ननिर्मिती (सर्व सत्रांसाठी) कार्यशाळा (एकूण ३), सहभागी मानधन, भोजन, चहा व T.A. ऑनलाइन चाचणी घेण्यासाठी सॉफ्टवेअर उपलब्धता | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**शिक्षक स्पर्धा घेण्यासाठी पर्याय क्रमांक २ (पूर्णतः ऑनलाइन)**

- सदर संपूर्ण स्पर्धा स्तरनिहाय स्वरूपात घेता येईल.
- स्तरनिहाय पात्रता फेऱ्या घेण्यात येतील. प्रत्येक फेरीनुसार ठरावीक शिक्षक ठरविलेल्या गुणांच्या निकषानुसार पुढील फेरीसाठी पात्र होतील.
- स्तर - 1 : सोपा (चाळणी परीक्षा), स्तर - 2 : मध्यम, स्तर - 3 : प्रगत (राज्य स्तर)
- अंतिम राज्यस्तरीय विजेत्यास पारितोषिक देण्यात येईल.
- सदर स्पर्धा घेण्यासाठी प्रश्नसंच निर्मिती करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करण्यात यावी. त्याद्वारे प्रश्नसंच राज्य स्तरावर निर्मित करण्यात यावेत.
- सदर परीक्षा घेण्यासाठी AI BASED ऑनलाइन पोर्टल विकसित करणे किंवा यापूर्वी विकसित केलेल्या इतर संस्था उदा. MKCL किंवा स्वयंसेवी संस्था यांची निःशुल्क मदत घेता येईल. यामुळे परीक्षेची गुणवत्ता व गोपनीयता निश्चित करणे शक्य होईल.

- सदर सर्व प्रक्रियेकरिता शासकीय नियमानुसार खर्च अपेक्षित आहे. (AI BASED ऑनलाइन पोर्टल विकसित करणे वगळता.)

**स्पर्धेसाठी अंदाजे खर्च (बजेट) = रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन (चाचणी प्रती काढणे) | बक्षीस रक्कम | सादिल खर्च (उदा. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र व इतर) रु. प्रति तालुका व रु. प्रति जिल्हा | परीक्षक मानधन रु. प्रति तालुका | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन व निवास | प्रश्ननिर्मिती (सर्व सत्रांसाठी) कार्यशाळा (एकूण ३), सहभागी मानधन, भोजन, चहा व T.A. ऑनलाइन चाचणी घेण्यासाठी सॉफ्टवेअर उपलब्धता | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**मूल्यांकन समित्या**

**तालुकास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता (जि.शि.प्र.सं.) | सदस्य |
| ३) | तंत्रस्नेही केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डायट | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, डायट | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | संचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | अध्यक्ष |
| २) | सहसंचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ३) | वरिष्ठ अधिव्याख्याता, शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ४) | अधिव्याख्याता, शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ५) | उपसंचालक, शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य सचिव |

◈◈◈

# ३) एम एस वर्ड आणि एक्सेल स्पर्धा

## अ) एम एस वर्ड स्पर्धा

**प्रस्तावना :**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना केवळ ज्ञानदानाचे कार्य पुरेसे नाही, तर विविध सॉफ्टवेअर्स आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणे देखील महत्त्वाचे आहे. एम. एस. वर्ड (MS Word) हे असेच एक अत्यावश्यक सॉफ्टवेअर आहे, जे शिक्षकांना त्यांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्य अधिक सुलभ आणि प्रभावी बनविण्यात मदत करते. शिक्षकांना नोट्स तयार करणे, प्रश्नपत्रिका बनवणे, विद्यार्थ्यांसाठी अभ्यास साहित्य तयार करणे, अहवाल लेखन करणे आणि विविध शैक्षणिक कागदपत्रे व्यवस्थितपणे तयार करण्यासाठी एम. एस. वर्डचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे, शिक्षकांमध्ये एम. एस. वर्डच्या विविध फंक्शन्स आणि टूल्सचे योग्य ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे.

याच विचारातून, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना एका विशेष एम. एस. वर्ड स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश एम एस वर्डच्या क्षमतांची जाणीव करून देणे, त्यांच्यातील कौशल्यांना वाव मिळवून देणे आणि त्यांना या सॉफ्टवेअरचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धक एम एस वर्डच्या मूलभूत तसेच प्रगत फीचर्सचा जसे की– फॉरमॅटिंग, टेबल आणि चार्टचा वापर, मेल मर्ज, टेम्पलेट्स आणि डिझाइनिंग टूल्सचा योग्य वापर कसा करायचा हे शिकू शकतील. वेळेच्या व्यवस्थापनासोबत उत्कृष्ट आणि आकर्षक डॉक्युमेंट कसे तयार करायचे, याचे प्रत्यक्ष अनुभव त्यांना मिळतील. या स्पर्धेच्या माध्यमातून, शिक्षक व अधिकाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये अधिक कार्यक्षमता आणि व्यावसायिकता आणण्यास मदत होईल. तसेच उत्कृष्ट क्षमता दर्शविणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य पद्धतीने सन्मानित केले जाईल, ज्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल.

**स्पर्धेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :**

१) शिक्षकांना दैनंदिन शालेय कामकाजात एम एस वर्ड वापरण्यास प्रोत्साहित करणे.

२) संगणकाचा वापर करून शाळा आणि विद्यार्थी संबंधित दस्तऐवज यांचे संवर्धन करणे.

३) **पात्रता निकष :** महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षक ज्यांचा सेवार्थ/शालार्थ आयडी उपलब्ध आहे; पात्र असतील.

एक शिक्षक – एकच सादरीकरण तयार करू शकतील.

यासोबतच शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनाही सहभागी होता येईल.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक :**

**त्रिस्तरीय प्रक्रिया – गट, जिल्हा आणि राज्य स्तर :**

**१) गट स्तर :**

- ➢ प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक नाव नोंदवेल. एकापेक्षा अधिक इच्छुक असल्यास केंद्रप्रमुख निवड करतील.

**२) तालुका स्तर :**

- ➢ ठिकाण, दिनांक व वेळ ठरवून स्पर्धा.
- ➢ शिक्षकांनी स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे.
- ➢ सॉफ्टकॉपी जमा करणे.
- ➢ निवड समितीमार्फत मूल्यमापन होऊन एक विजेता जिल्हा स्तरावर पुढे जाईल.

**३) जिल्हा स्तर :**

- ➢ तालुका स्तरावरील विजेत्यांची जिल्हा स्तरावर स्पर्धा.
- ➢ तालुक्याप्रमाणेच सादरीकरणाची प्रक्रिया, मूल्यांकन, एक विजेता राज्य स्तरावर पुढे जाईल.

**४) राज्य स्तर :**

- ➢ जिल्हा स्तरावरील विजेत्यांचे सादरीकरण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे पाठवले जाईल.
- ➢ राज्य स्तर समिती २० विजेते निवडेल.
- ➢ कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल; पुनरावृत्ती/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**महत्त्वाचे नियम :**

- प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी स्वतः सादरीकरण करणे आवश्यक.
- **सहभागी शिक्षकांनी आपल्या सादरीकरणात सुरुवातीला खालील माहिती नोंदवावी :**
  - ➢ नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, युडायस कोड, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक.
- **भाषेचा पर्याय :** मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.
- **सादरीकरणासाठी आवश्यक माहिती (DATA) :** स्पर्धेच्या वेळी पुरविण्यात येईल.
- **वेळेची मर्यादा :** स्पर्धेसाठी एक निश्चित वेळ मर्यादा असेल. या वेळेतच आपले कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.

- **विषय किंवा सूचना :**

  स्पर्धेसाठी एक विशिष्ट विषय किंवा काही सूचना दिल्या जातील. आपले डॉक्युमेंट त्या विषयाला धरून आणि सूचनांनुसार असावे.

- **मूल्यांकनाचे निकष :**

  आपले डॉक्युमेंट कोणत्या आधारावर तपासले जाईल याचे निकष स्पष्ट केले जातील. उदाहरणार्थ, फॉरमॅटिंग, अचूकता, डिझाइन, टेबल आणि चार्टचा वापर, मेल मर्ज, इत्यादी.

- **फॉन्ट आणि आकार :**

  डॉक्युमेंटमधील अक्षरांचा फॉन्ट (उदा. Times New Roman, Arial) आणि आकार (उदा. १२) निश्चित केला जाऊ शकतो.

- **मार्जिन आणि स्पेसिंग :**

  पानांचे मार्जिन (उदा. Top, Bottom, Left, Right) आणि ओळींमधील अंतर (Line Spacing) किती असावे हे सांगितले जाऊ शकते.

- **हेडर आणि फुटर :**

  डॉक्युमेंटमध्ये हेडर (Header) आणि फुटरचा (Footer) वापर कसा करायचा, याबाबत नियम असू शकतात. उदा. पेज नंबर, संस्थेचे नाव.

- **स्पेलिंग आणि व्याकरण :**

  डॉक्युमेंटमध्ये स्पेलिंगची (Spelling) आणि व्याकरणाची (Grammar) कोणतीही चूक नसावी.

- **टेबल आणि चार्ट :**

  आवश्यकतेनुसार टेबल (Table) आणि चार्टचा (Chart) योग्य वापर करणे अपेक्षित असू शकते.

- **इमेजचा वापर :**

  डॉक्युमेंटमध्ये इमेज (Image) वापरायची असल्यास त्याचे नियम आणि आकार निश्चित केले जाऊ शकतात.

- **फाइल फॉरमॅट :**

  तयार केलेली फाईल कोणत्या फॉरमॅटमध्ये (उदा. docx) सेव्ह करायची आहे, याचे निर्देश दिले जाऊ शकतात.

- **निकाल आणि पारितोषिक :**

  निकालाची प्रक्रिया आणि विजेत्यांसाठी पारितोषिके काय असतील, याची माहिती दिली जाईल.

- कोणत्याही गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद.

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)**

- **मूल्यांकन निकष (एकूण गुण : १००)**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | डॉक्युमेंट फॉर्मेटिंग (Document Formatting) | २० |
| २) | आशयाची अचूकता आणि सुसंगतता (Accuracy and consistency of content) | २० |
| ३) | MS-Word Features चा प्रभावी वापर (Effective Use of MS -Word Feature) | २० |
| ४) | वेळेचे व्यवस्थापन (Time Management) | २० |
| ५) | एकूण सादरीकरण (Overall Presentation) | २० |

**सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)**

**१) डॉक्युमेंट फॉरमॅटिंग (Document Formatting) : एकूण गुण २०**

➢ **फॉन्ट आणि आकार (Font and Size) :**

दिलेल्या सूचनांनुसार योग्य फॉन्ट (उदा. Times New Roman, Arial) आणि आकार (उदा. १२) वापरला आहे का?

➢ **मार्जिन आणि स्पेसिंग (Margins and Spacing) :**

योग्य मार्जिन (उदा. Normal, Narrow) आणि ओळींमधील अंतर (उदा. Single, 1.5 lines) राखले आहे का?

➢ **पॅरेग्राफ फॉरमॅटिंग (Paragraph Formatting) :**

योग्य इंडेंटेशन (Indentation), अलाइनमेंट (Alignment - Left, Center, Right, Justify) वापरले आहे का?

➢ **बुलेट्स आणि नंबरिंग (Bullets and Numbering) :**

आवश्यक ठिकाणी बुलेट्स (Bullets) आणि नंबरिंगचा (Numbering) योग्य वापर केला आहे का?

➢ **हेडिंग आणि सबहेडिंग (Headings and Subheadings) :**

डॉक्युमेंटमध्ये योग्य हेडिंग **(Heading 1, Heading 2)** आणि सब हेडिंगचा वापर केला आहे का आणि त्यांची फॉरमॅटिंग सुसंगत आहे का?

➢ **टेबल आणि चार्ट (Tables and Charts) :**

आवश्यकतेनुसार टेबल (Table) आणि चार्ट (Chart) तयार केले आहेत का आणि ते स्पष्ट तसेच व्यवस्थित फॉरमॅट केलेले आहेत का? डेटा अचूकपणे सादर केला आहे का?

- **इमेज आणि ग्राफिक्स (Images and Graphics) :**

  डॉक्युमेंटमध्ये इमेज (Image) किंवा ग्राफिक्सचा वापर केला असल्यास ते योग्य ठिकाणी आणि योग्य आकारात आहेत का? त्यांची मांडणी चांगली आहे का?

- **पेज लेआउट (Page Layout) :**

  पेज ओरिएंटेशन (Page Orientation - Portrait, Landscape), कॉलम (Columns) यांचा योग्य वापर केला आहे का?

- **हेडर आणि फुटर (Header and Footer) :**

  हेडर (Header) आणि फुटरमध्ये (Footer) आवश्यक माहिती (उदा. पेज नंबर, शीर्षक) योग्यरीत्या समाविष्ट केली आहे का?

**२) आशयाची अचूकता आणि सुसंगतता (Accuracy and Consistency of Content) : एकूण गुण २०**

- **विषय सुसंगतता (Accuracy and Consistency of Content) :**

  दिलेला विषय किंवा सूचनेनुसार डॉक्युमेंट तयार केले आहे का?

- **माहितीची अचूकता (Accuracy of Information) :**

  डॉक्युमेंटमधील माहिती अचूक आहे का?

- **सुसंगतता (Consistency) :**

  संपूर्ण डॉक्युमेंटमध्ये फॉरमॅटिंग, शैली आणि भाषेची सुसंगतता आहे का?

**३) एमएस वर्ड फीचर्सचा प्रभावी वापर (Effective Use of MS Word Features) : एकूण गुण ३०**

- **मेल मर्ज (Mail Merge) :**

  आवश्यक असल्यास मेल मर्जचा (Mail Merge) योग्य वापर केला आहे का?

- **स्टाईल्सचा वापर (Use of Styles) :**

  फॉरमॅटिंगसाठी स्टाईल्सचा (Styles) वापर केला आहे का? (यामुळे डॉक्युमेंटमध्ये सुसंगतता राखण्यास मदत होते.)

- **टेम्प्लेट्सचा वापर (Use of Templates) :**

  दिलेल्या सूचनांनुसार योग्य टेम्प्लेटचा (Template) वापर केला आहे का? (जर परवानगी असेल तर)

- **स्मार्ट आर्ट आणि इतर ऑब्जेक्ट्स (SmartArt and Other Objects) :**

  माहिती प्रभावीपणे सादर करण्यासाठी स्मार्ट आर्ट (Accuracy) किंवा इतर ऑब्जेक्ट्सचा वापर केला आहे का?

➢ **संदर्भ आणि फुटनोट्स (References and Footnotes) :**

आवश्यक असल्यास संदर्भ (References) आणि फुटनोट्सचा (Footnotes) योग्य वापर केला आहे का?

➢ **ट्रॅक बदल आणि टिपण्या (Track Changes and Comments) :**

(जर आवश्यक असेल तर) ट्रॅक बदल (Track Changes) आणि टिप्पण्यांचा (Comments) वापर केला आहे का?

**४) वेळेचे व्यवस्थापन (Time Management) : एकूण गुण १०**

➢ दिलेल्या वेळेत कार्य पूर्ण केले आहे का?

**५) एकूण सादरीकरण (Overall Presentation) : एकूण गुण १०**

➢ डॉक्युमेंट वाचायला आकर्षक आणि सुटसुटीत वाटते का?

**स्पर्धेसाठी अंदाजे खर्च (बजेट) = रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १) | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रकमेचे पारितोषिक वितरण | रक्कम शासकिय नियमानुसार |
| २) | इतर खर्च – स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ. | |

**मूल्यांकन समित्या**

**तालुकास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता (जि. शि. प्र. सं.) | सदस्य |
| ३) | तंत्रस्नेही केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य (जि. शि. प्र. सं.) | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, (जि. शि. प्र. सं.) | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | संचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | अध्यक्ष |
| २) | सहसंचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ३) | वरिष्ठ अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ४) | अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ५) | उपसंचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य सचिव |

◈◈◈

## ब) एम एस एक्सेल स्पर्धा

**प्रस्तावना :**

शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर आजकाल अत्यंत महत्त्वाचा झाला आहे. माहितीचे व्यवस्थापन, विश्लेषण आणि सादरीकरण यासाठी एम.एस.एक्सेल (MS Excel) हे एक शक्तिशाली आणि उपयुक्त साधन आहे. शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये, जसे की, विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद ठेवणे, त्यांची प्रगती आलेखरूपात दर्शवणे, विविध शैक्षणिक अहवाल तयार करणे आणि प्रशासकीय कामांसाठी एक्सेलचा प्रभावी वापर करता येणे आवश्यक आहे.

याच उद्देशाने, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी एका विशेष एम.एस.एक्सेल स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धचा मुख्य उद्देश स्पर्धकांना एम.एस.एक्सेलच्या विविध क्षमतांची ओळख करून देणे, त्यांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना अधिक कार्यक्षम बनण्यास मदत करणे हा आहे. आजच्या डिजिटल युगात, शिक्षकांनी केवळ अध्यापनातच नव्हे, तर तंत्रज्ञानाच्या वापरातही कुशल असणे गरजेचे आहे. एम.एस.एक्सेल स्पर्धा हे स्पर्धकांना त्यांच्यातील या कौशल्यांची चाचणी करण्याची आणि इतरांकडून शिकण्याची एक उत्तम संधी आहे. या स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धक एक्सेलच्या मूलभूत आणि प्रगत फंक्शन्सचा प्रभावी वापर कसा करायचा हे शिकतील, डेटाचे विश्लेषण कसे करायचे आणि माहिती आकर्षक पद्धतीने कशी सादर करायची याचे ज्ञान मिळवतील.

या स्पर्धेच्या माध्यमातून, स्पर्धकांना त्यांच्या कामामध्ये अधिक सुलभता आणि अचूकता आणण्यास मदत होईल, ज्यामुळे ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील. तसेच या स्पर्धेतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना गौरविण्यात येईल, ज्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल. आपल्या सर्वांचे या ज्ञानवर्धक आणि कौशल्य विकासाच्या स्पर्धेत हार्दिक स्वागत आहे! चला तर मग, एम.एस.एक्सेलच्या जादूने आपल्या कार्याला अधिक प्रभावी बनवूया!

**स्पर्धेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :**

१) शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या अध्यापन आणि प्रशासकीय कामांमध्ये एमएस एक्सेलचा प्रभावीपणे वापर करण्यास प्रोत्साहित करणे.

२) मोठ्या प्रमाणात डेटा व्यवस्थितपणे संग्रहित करणे, व्यवस्थापित करणे आणि त्याचे विश्लेषण करण्याची कौशल्ये आत्मसात करण्यास मदत करणे.

३) डेटाचे विश्लेषण करून त्यातून उपयुक्त माहिती काढणे आणि त्या आधारावर योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे.

४) डेटा आकर्षक आणि समजायला सोप्या पद्धतीने ग्राफ (Charts) आणि आकृत्यांच्या (Diagrams) माध्यमातून सादर करण्याची क्षमता वाढवणे.

५) एक्सेलच्या विविध टूल्स आणि फंक्शन्सचा वापर करून शिक्षकांना त्यांचे दैनंदिन कार्य अधिक जलद आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्यास मदत करणे.

६) विद्यार्थ्यांची उपस्थिती, गुण, प्रगती इत्यादी शैक्षणिक डेटाचे विश्लेषण करून शिक्षकांना त्यांच्या अध्यापन पद्धती विविध योजना सुधारणा करण्यास मदत करणे.

७) विविध अहवाल, बजेट, विद्यार्थी डेटा इत्यादी तयार करण्यासाठी एक्सेलचा प्रभावी वापर करण्यास, शिकण्यास प्रोत्साहित करणे.

८) एक्सेलच्या मदतीने शिक्षक त्यांच्या कामांमध्ये नवीन आणि प्रभावी पद्धतींचा अवलंब करू शकतील, ज्यामुळे शिक्षण प्रक्रिया अधिक रोचक आणि प्रभावी होईल.

९) स्पर्धेच्या वातावरणात सहभागी होऊन शिक्षक एकमेकांकडून कौशल्ये शिकू शकतील आणि स्वतःच्या ज्ञानात भर घालू शकतील.

१०) एक्सेलच्या प्रभावी वापरामध्ये प्रावीण्य मिळवलेल्या शिक्षकांना, अधिकारी व कर्मचारी यांना ओळखणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे.

**३) पात्रता निकष :**

महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षक ज्यांचा सेवार्थ/शालार्थ आयडी उपलब्ध आहे; तसेच शालेय शिक्षण सक्षमीकरण व प्रशासन शाखेतील कर्मचारी/अधिकारी.

एक स्पर्धक – एकच सादरीकरण तयार करू शकतील.

**४) स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक :**

**त्रिस्तरीय प्रक्रिया – गट, जिल्हा आणि राज्य स्तर :**

**१) गट स्तर :**

- ➢ प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक नाव नोंदवेल. एकापेक्षा अधिक इच्छुक असल्यास केंद्रप्रमुख निवड करतील.

**२) तालुका स्तर :**

- ➢ ठिकाण, दिनांक व वेळ ठरवून स्पर्धा.
- ➢ स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे. तालुकास्तरीय अधिकारी–कर्मचारी यांना स्पर्धेत सहभागी होता येईल.
- ➢ सॉफ्ट कॉपी जमा करणे.
- ➢ निवड समितीमार्फत मूल्यमापन होऊन एक विजेता जिल्हा स्तरावर पुढे जाईल.

**३) जिल्हा स्तर :**

- ➢ तालुका स्तरावरील विजेत्यांची जिल्हा स्तरावर स्पर्धा होईल. जिल्हास्तरीय अधिकारी कर्मचारी यांची स्पर्धा होईल.
- ➢ तालुक्याप्रमाणेच सादरीकरणाची प्रक्रिया, मूल्यांकन, एक विजेता राज्य स्तरावर पुढे जाईल.

**४) राज्य स्तर :**

- ➢ जिल्हा स्तरावरील विजेत्यांचे सादरीकरण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडे पाठवले जाईल.
- ➢ राज्य स्तर समिती २० विजेते निवडेल.
- ➢ कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल; पुनरावृत्ती/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**महत्त्वाचे नियम :**

- प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी स्वतः सादरीकरण करणे आवश्यक.
- **सहभागी शिक्षकाने आपल्या सादरीकरणात सुरुवातीला खालील माहिती नोंदवावी :**
  - ➢ नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, युडायस कोड, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक.
- **भाषेचा पर्याय :** मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.
- **सादरीकरणासाठी आवश्यक माहिती (DATA) :** स्पर्धेच्या वेळी पुरविण्यात येईल.

- **वेळेची मर्यादा :** स्पर्धेसाठी एक निश्चित वेळ मर्यादा असेल. या वेळेतच आपले कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.
- **विषय किंवा सूचना :** स्पर्धेसाठी एक विशिष्ट विषय किंवा काही सूचना दिल्या जातील. आपले डॉक्युमेंट त्या विषयाला धरून आणि सूचनांनुसार असावे.
- **निकाल आणि पारितोषिक :** निकालाची प्रक्रिया आणि विजेत्यांसाठी पारितोषिके काय असतील, याची माहिती दिली जाईल.
- कोणत्याही गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद केले जाईल.

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)**

- **मूल्यांकन निकष (एकूण गुण : १००)**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | डेटा एंट्री आणि व्यवस्थापन (Data Entry and Management) | २० |
| २) | फॉर्म्युले आणि फंक्शन्सचा वापर (Use of Formulas and Functions) | २० |
| ३) | डेटा विश्लेषण आणि व्हिज्युअलायझेशन (Data Analysis and Visualization) | १५ |
| ४) | ऑटोमेशन आणि कार्यक्षमता (Automation and Efficiency) | १५ |
| ५) | समस्या सोडवण्याची क्षमता (Problem-Solving Ability) | १५ |
| ६) | सादरीकरण आणि सुस्पष्टता (Presentation and Clarity) | १० |
| ७) | वेळेचे व्यवस्थापन (Time Management) | ०५ |

**सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)**

**१) डेटा एंट्री आणि व्यवस्थापन (Data Entry and Management) : एकूण गुण २०**

➢ **अचूकता (Accuracy) :**

डेटा अचूकपणे एंटर केला आहे का? टायपिंगमधील चुका आणि इतर त्रुटी टाळल्या आहेत का?

➢ **डेटा प्रकारांचा योग्य वापर (Correct Use of Data Types) :**

टेक्स्ट (Text), नंबर (Number), तारीख (Date) इत्यादी डेटा प्रकार योग्यरीत्या वापरले आहेत का?

➢ **डेटा व्हॅलिडेशन (Data Validation) :**

डेटाची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी डेटा व्हॅलिडेशन (Data Validation) तंत्राचा वापर केला आहे का? उदा. विशिष्ट श्रेणीतील आकडे किंवा तारखा स्वीकारणे.

➢ **डेटा फॉरमॅटिंग (Data Formatting) :**

डेटा वाचायला सोपा आणि आकर्षक बनवण्यासाठी योग्य फॉरमॅटिंग (उदा. आकडेवारीसाठी कॉमा सेपरेटर, चलनासाठी योग्य चिन्ह, तारखांसाठी योग्य स्वरूप) वापरले आहे का?

➢ **टेबल आणि रेंजचा योग्य वापर (Correct Use of Tables and Ranges) :**

डेटा व्यवस्थित ठेवण्यासाठी टेबल (Table) फीचरचा आणि विशिष्ट भागांना नाव देण्यासाठी रेंजचा (Range) योग्य वापर केला आहे का?

**२) फॉर्म्युले आणि फंक्शन्सचा वापर (Use of Formulas and Functions) : एकूण गुण २०**

➢ **अचूकता (Accuracy) :**

वापरलेले फॉर्म्युले (Formulas) आणि फंक्शन्स (Functions) अपेक्षित परिणाम देत आहेत का? त्यांमध्ये कोणतीही लॉजिकल चूक नाही ना?

➢ **प्रभावी वापर (Effective Use) :**

दिलेल्या समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य आणि कार्यक्षम फॉर्म्युले आणि फंक्शन्स वापरले आहेत का? उदा. SUM, AVERAGE, COUNT, IF, VLOOKUP इत्यादींचा योग्य वापर.

➢ **नेस्टेड फंक्शन्सचा वापर (Use of Nested Functions) :**

अधिक जटिल गणनांसाठी नेस्टेड फंक्शन्सचा (एका फंक्शनच्या आत दुसरे फंक्शन वापरणे) योग्य वापर केला आहे का?

➢ **लॉजिकल विचारसरणी (Logical Thinking) :**

समस्या सोडवण्यासाठी लॉजिकल विचारसरणीचा वापर करून योग्य फॉर्म्युले तयार केले आहेत का?

**३) डेटा विश्लेषण आणि व्हिज्युअलायझेशन (Data Analysis and Visualization) : एकूण गुण १५**

➢ **डेटा सॉर्टिंग आणि फिल्टरिंग (Data Sorting and Filtering) :**

माहिती काढण्यासाठी डेटा सॉर्ट (Sort) आणि फिल्टर (Filter) करण्याची क्षमता दर्शविली आहे का?

➢ **पिव्होट टेबल्स (Pivot Tables) :**

मोठ्या डेटासेटमधून उपयुक्त माहिती सारांशित करण्यासाठी पिव्हट टेबल्सचा (Pivot Tables) प्रभावी वापर केला आहे का?

➢ **चार्ट आणि ग्राफ (Charts and Graphs) :**

डेटा आकर्षक आणि समजायला सोप्या पद्धतीने दर्शवण्यासाठी योग्य चार्ट आणि ग्राफ (उदा. बार चार्ट, लाइन चार्ट, पाय चार्ट) तयार केले आहेत का?

➢ **चार्ट फॉरमॅटिंग (Chart Formatting) :**

तयार केलेले चार्ट स्पष्ट, वाचायला सोपे आणि योग्य लेबल्स (Labels) असलेले आहेत का?

**४) ऑटोमेशन आणि कार्यक्षमता (Automation and Efficiency) : एकूण गुण १५**

➢ **मॅक्रोजचा वापर (Use of Macros) :**

वारंवार करावी लागणारी कार्ये ऑटोमेट (Automate) करण्यासाठी मॅक्रोजचा (Macros) वापर केला आहे का? (जर स्पर्धेत याची परवानगी असेल तर)

➢ **शॉर्टकट कीजचा वापर (Use of Shortcut Keys) :**

एक्सेलमध्ये जलद काम करण्यासाठी शॉर्टकट कीज चा (Shortcut Keys) प्रभावी वापर केला आहे का?

➢ **कार्यक्षम फॉर्म्युले (Efficient Formulas) :**

कमी वेळेत अचूक परिणाम देणारे कार्यक्षम फॉर्म्युले वापरले आहेत का?

**५) समस्या सोडवण्याची क्षमता (Problem-Solving Ability) : एकूण गुण १५**

➢ **दिलेल्या समस्येचे योग्य निराकरण (Correct Solution to the Given Problem) :**

स्पर्धेत दिलेली समस्या अचूकपणे सोडवली आहे का?

➢ **पर्यायी उपाय (Alternative Solutions) :**

समस्येचे निराकरण करण्यासाठी विविध पद्धतींचा विचार केला आहे का?

**६) सादरीकरण आणि सुस्पष्टता (Presentation and Clarity) : एकूण गुण १०**

➢ **शीटचे व्यवस्थापन (Sheet Management) :**

वर्कशीटला (Worksheet) योग्यरीत्या नावे दिली आहेत का आणि त्या व्यवस्थितपणे आयोजित केल्या आहेत का?

➢ **स्पष्ट सूचना (Clear Instructions/Comments) :**

आवश्यक ठिकाणी स्पष्ट सूचना किंवा टिप्पण्या (Comments) दिल्या आहेत का, ज्यामुळे कार्य समजायला सोपे जाईल?

➢ **व्यावसायिक स्वरूप (Professional Appearance) :**

संपूर्ण स्प्रेडशीट व्यावसायिक आणि वापरण्यास सोपी दिसते का?

**७) वेळेचे व्यवस्थापन (Time Management) : एकूण गुण ०५**

➢ दिलेल्या वेळेत कार्य पूर्ण केले आहे का?

**स्पर्धेसाठी अंदाजे खर्च (बजेट) = रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १) | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रकमेचे पारितोषिक वितरण | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | इतर खर्च – स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ. | |

**मूल्यांकन समित्या**

**तालुकास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता डायट | सदस्य |
| ३) | तंत्रस्नेही केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य जि. शि. प्र. सं. (संबंधित जिल्हा) | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, जि. शि. प्र. सं. | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | संचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | अध्यक्ष |
| २) | सहसंचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ३) | वरिष्ठ अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ४) | अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ५) | उपसंचालक, रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य सचिव |

◈◈◈

## ४) फोटोग्राफी स्पर्धा

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020) व राष्ट्रीय व राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या (NCF/SCF) पार्श्वभूमीवर दृश्य माध्यमांचा शिक्षणात प्रभावी वापर आवश्यक ठरत आहे. फोटोग्राफीसारख्या अभिव्यक्ती माध्यमातून शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सर्जनशीलता व अभिव्यक्तीपणा विकसित होतो, त्याचबरोबर शिक्षण अधिक प्रभावी, आनंददायी व विद्यार्थिनिष्ठ होण्यास मदत होते. याशिवाय भारतीय संस्कृती, मूल्य, संवेदनशीलता यांचे दृश्यमाध्यमातून प्रस्तुतीकरण शक्य होते.

**स्पर्धेचे शीर्षक :**

फोटोग्राफी स्पर्धा (शालेय शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांच्यासाठी)

**सहभागी स्पर्धक :**

महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

**विषय :**

१) भारतीय संस्कृती

२) शिक्षण आणि संवेदनशीलता

३) आनंददायी शिक्षण

**स्पर्धेचे नियम :**

१) महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी, तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

२) प्रत्येक सहभागी फक्त एक छायाचित्र सादर करू शकतो.

३) छायाचित्राचा आकार ८ × १२ असावा.

४) स्पर्धकाने छायाचित्र स्वतः काढलेले असावे.

५) छायाचित्रण स्पर्धेत सहभागी झालेल्यांनी वापरलेल्या कॅमेरा व Settings चे तपशील द्यावे.

६) स्पर्धकांना कुठलाही कॅमेरा वापरण्याची मुभा आहे तसेच सहभागींना त्यांच्या सेलफोन किंवा मोबाइल फोनचा वापर करून छायाचित्रण करण्याचे स्वातंत्र्य आहे.

७) शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

८) छायाचित्राचे शीर्षक, छायाचित्र कुठे काढले याचे ठिकाण, छायाचित्रकाराचे नाव शीर्षकात नमूद करावे.

९) छायाचित्र पुनर्वापराचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राखीव असतील.

१०) स्पर्धक एकच छायाचित्र स्पर्धेसाठी पाठवू शकतात.

११) सादर केलेले छायाचित्र या पूर्वी कोठेही प्रकाशित झालेले नसावे.

१२) छायाचित्राला शीर्षक देणे बंधनकारक आहे.

१३) पिकासा, फोटोशॉप किंवा तत्सम छायाचित्र एडिटींग सॉफ्टवेअर वापरण्यास परवानगी आहे.

१४) स्पर्धेत भाग घेण्यासाठी शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

१५) सदर स्पर्धा ही केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर होणार आहे.

१६) प्रत्येक स्तरावरील प्रथम क्रमांक पुढील स्तरासाठी पात्र ठरणार आहेत.

१७) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

१८) कोणत्याही कॉपीराइटचे उल्लंघन अपात्रतेस कारणीभूत ठरेल आणि बक्षीस रक्कम जप्त होईल. याबाबत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

१९) निवड समिती आणि मूल्यमापन समितीचे निर्णय अंतिम आणि सर्व अर्जदारांसाठी बंधनकारक असतील. मूल्यमापन समिती अर्जदाराकडून प्रवेशाच्या कोणत्याही पैलूवर स्पष्टीकरण मागू शकते आणि दिलेल्या वेळेत ते सादर न केल्यास, प्रवेश अपात्र ठरवला जाऊ शकतो.

२०) अयोग्य किंवा आक्षेपार्ह सामग्री समाविष्ट असलेले फोटो, ज्यामध्ये उत्तेजक नग्नता, हिंसाचार, मानवी हक्क किंवा पर्यावरण उल्लंघन, कायदा, धार्मिक, भारताची सांस्कृतिक आणि नैतिक परंपरा आणि प्रथा यांच्या विरोधातील इतर कोणत्याही सामग्री यांचा समावेश आहे असे फोटो काटेकोरपणे प्रतिबंधित आहेत आणि ते ताबडतोब अपात्र ठरवले जातील. मूल्यमापन समिती वरील निकषांव्यतिरिक्त अयोग्य आणि आक्षेपार्ह ठरवेल अशा इतर प्रवेशिकांना अपात्र करण्याचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना आहे.

२१) स्पर्धा परीक्षणाच्या दिवशी त्या–त्या पातळीवर निवड झालेल्या स्पर्धकाला स्वतः उपस्थित राहून आपला फोटो प्रदर्शनात लावून आपल्या फोटोविषयी समिती सदस्यांना माहिती सांगणे आवश्यक आहे.

२२) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

२३) पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी आपल्या लगतच्या किंवा कार्यक्षेत्रातील कोणत्याही एका केंद्रातून आपला सहभाग निश्चित करू शकतात.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक :**

**१) त्रिस्तरीय प्रक्रिया :**

- गट (केंद्र), तालुका, जिल्हा आणि राज्य स्तर

**२) गट स्तर (केंद्र) :**

- कालावधी : शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.
- प्रत्येक केंद्रातून १ फोटो निवड.
- फोटो प्रत्यक्ष सादर करणे.

**३) तालुका स्तर :**

- कालावधी : शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.
- केंद्र स्तरावरील निवडक १ फोटोमधून तालुका स्तर स्पर्धा आयोजन.
- पुन्हा निवड : तालुका स्तरावरून १ फोटो जिल्हा स्तर स्पर्धेसाठी पाठवणे.

**४) जिल्हा स्तर :**

- कालावधी : शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.
- तालुका स्तर विजेत्यांमधून जिल्हा स्तरावर निवड.
- प्रत्येक जिल्ह्यांतून १ फोटो राज्य स्तरासाठी पाठवला जाईल.

**५) राज्य स्तर :**

- कालावधी : शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.
- सर्व जिल्ह्यांमधून आलेल्या विजेत्यांपैकी २० विजेत्यांची निवड.

**परीक्षण निकष :**

१) स्पर्धेच्या परीक्षणासाठी फोटोग्राफीतील तज्ज्ञ, जाणकार व अनुभवी व्यक्तींची निवड करावी.

२) स्पर्धा परीक्षणासाठी ३ सदस्यांची समिती असावी.

३) स्पर्धा परीक्षण पुढील मुद्द्यांच्या आधारे करावे. समितीतील तीनही सदस्यांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीनुसार अंतिम निकाल घोषित करावा.

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | फोटोसाठी योग्य शीर्षक | १० |
| २) | छायाचित्राची गुणवत्ता (रंग, प्रकाश, प्रदर्शन आणि फोकस) | १० |
| ३) | सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती स्पष्टता | १० |
| ४) | छायाचित्राची पार्श्वभूमी | १० |
| ५) | छायाचित्र सौंदर्य व रचना | १० |
| ६) | आशय सुसंगतता | १० |
| ७) | मौलिकता आणि सत्यता | १० |
| ८) | तांत्रिक कौशल्य व तज्ञता | १० |
| ९) | फोटो आशय संदेश व शैक्षणिक महत्त्व | १० |
| १०) | एकूण प्रभाव | १० |
| | **एकूण कमाल गुण** | **१००** |

ही फोटोग्राफी स्पर्धा शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या दृष्टीने सर्जनशीलता, सौंदर्यदृष्टी आणि मूल्यवर्धन यांचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी करण्यास प्रेरणा देईल.

**स्वयं-घोषणा प्रमाणपत्र नमुना :**

**सहभागी स्पर्धक स्वयंघोषणा प्रमाणपत्र**

मी श्री./श्रीम.................................................................................

याद्वारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेसाठी मी स्वतः फोटो सादर करत आहे आणि फोटोतील विषय माझाच आहे. अर्जात मी दिलेली माहिती खरी आहे. स्पर्धा जिंकल्यास, जर माझ्याकडून पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती खोटी ठरली किंवा छायाचित्रात कॉपीराइटचे उल्लंघन झालेले आढळले, तर मला स्पर्धेतून अपात्र ठरवले जाऊ शकते आणि मूल्यमापन समितीने घेतलेल्या निर्णयावर माझा कोणताही अधिकार नाही किंवा त्याबाबत मला काहीही म्हणता येणार नाही याची मला जाणीव आहे. भविष्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना या छायाचित्राचा वापर करण्यास मी संमती देत आहे.

**प्रवेश अर्ज नमुना :**

**सहभागी स्पर्धक प्रवेश अर्ज**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्पर्धकाचे नाव व फोटो | : | ........................................................ |
| २) | शाळेचे नाव व पत्ता | : | ........................................................ |
| ३) | केंद्राचे नाव | : | ........................................................ |
| ४) | तालुक्याचे नाव | : | ........................................................ |
| ५) | जिल्ह्याचे नाव | : | ........................................................ |
| ६) | संपर्क क्रमांक | : | ........................................................ |
| ७) | ई-मेल | : | ........................................................ |
| ८) | स्पर्धेसाठी निवडलेला विषय | : | ........................................................ |
| ९) | फोटो शीर्षक | : | ........................................................ |
| १०) | कॅमेरा / Settings तपशील | : | ........................................................ |
| ११) | स्वयं-घोषणा प्रमाणपत्र | : | जमा केले आहे/नाही. |

**स्पर्धेसाठी अंदाजित खर्च (बजेट) = रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १) | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रकमेचे पारितोषिक वितरण | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | इतर खर्च - स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ. | |

**मूल्यांकन समित्या**

**तालुकास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता जि. शि. व प्र. सं. | सदस्य |
| ३) | तंत्रस्नेही केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डायट | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, जि. शि. व प्र. सं. | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | संचालक, रा. शै. सं. व प्र. व महाराष्ट्र, पुणे | अध्यक्ष |
| २) | सहसंचालक, रा. शै. सं. व प्र. महाराष्ट्र, पुणे | सदस्य |
| ३) | वरिष्ठ अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. महाराष्ट्र, पुणे | सदस्य |
| ४) | अधिव्याख्याता, रा. शै. सं. व प्र. महाराष्ट्र, पुणे | सदस्य |
| ५) | उपसंचालक, रा. शै. सं. व प्र. महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव |

◈◈◈

# ५) पुस्तक परीक्षण

**प्रस्तावना :**

आजच्या युगात डिजिटल क्रांतीने आपल्या जीवनात मोठे बदल घडवून आणले आहेत या बदलांचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे मुले पुस्तकांपासून दूर जात आहेत. स्मार्ट फोन, टॅबलेट आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांनी मुलांचे मन वेधून घेतले आहे, यामुळे मुले पुस्तके वाचण्याऐवजी गेम्स खेळणे, व्हिडिओ पाहणे याकरिता समाजमाध्यमांवर (Social Media) वेळ घालविणे पसंत करतात. यासाठी अनेक घटक जबाबदार आहेत. त्यात पालकांची उदासिनता, शालेय अभ्यासक्रमातील बदल इत्यादी, तसेच शालेय अभ्यासक्रमातसुद्‌धा पुस्तकांऐवजी इतर माध्यमांचा अधिक वापर होत असल्याने मुले पुस्तकांपासून दूर जात आहेत.

**शालेय वातावरणातील बदल :**

शाळेतसुद्‌धा डिजिटल तंत्रज्ञानाचा अत्याधिक वापर वाढल्याने मुले वाचनापासून दूर जात आहेत. विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृतीबाबत परिणाम करणारा मुख्य घटक म्हणजे, विद्यार्थ्यांसमोर सर्वांत मोठा आदर्श असणार आहेत त्यांचे शिक्षक. आजच्या या काळात सगळे डिजिटल तंत्रज्ञानाच्या इतके आहारी गेले आहेत की, मुलांसमोर पुस्तक वाचणारे कोणी राहिलेच नाही. मुलांना जर एखादी सवय लावायची असेल, तर त्यांच्या समोर ती गोष्ट वारंवार घडावी व ती त्यांच्यासाठी किती महत्त्वाची आणि उपयोगी आहे हे समजायला हवे. म्हणूनच मुलांना जर पुस्तक वाचनाची सवय लावायची असेल, तर मुलांसमोरील सर्वांत मोठा आदर्श शिक्षक असतील. त्यामुळे स्वतः शिक्षक ज्या वेळी मुलांसमोर पुस्तके वाचतील, त्या वेळी मुले पुस्तकांकडे वळतील.

म्हणून राज्य शासनाने पुस्तक परीक्षण हा ध्येयदर्शी उपक्रम समोर आणला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पर्यवेक्षीय यंत्रणेतील कर्मचारी व अधिकारी यांनी अधिकाधिक पुस्तके वाचून त्यावर चिकित्सक पद्‌धतीने विचार करावा.

**उद्‌देश :**

१) शिक्षक व मुलांमध्ये वाचनाची सवय वृद्‌धिंगत करून मुले चिकित्सक बनावी व डिजिटल साधनांपासून दूर जावीत.

२) एकविसाव्या शतकाच्या कौशल्यातील चिकित्सक विचार कौशल्य विकसित करावयाचे असेल, तर वाचन हा खूप प्रभावी उपाय आणि त्यासाठी सर्वप्रथम शिक्षकांनी उत्कृष्ट वाचक असावे.

३) लोप पावत चाललेली वाचनसंस्कृती पुन्हा जिवंत करण्यासाठी सदर उपक्रम गरजेचा आहे.

४) शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया वाचनसंस्कृतीतून वाढीस लागणे.

पुस्तक परीक्षण ही स्पर्धा महाराष्ट्र राज्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी यांच्यासाठी आयोजित केली जाणार आहे. सदर स्पर्धा केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर या स्तरांवर आयोजित करण्यात येईल.

**स्पर्धेसाठीचे नियम :**

- पुस्तक परीक्षणासाठी किमान १०० पृष्ठ संख्या असलेले पुस्तक असावे.
- स्पर्धा आयोजन करणारे पुस्तक उपलब्ध करून देतील.
- प्रत्यक्ष नियंत्रित वातावरणातच स्पर्धा होईल.
- स्पर्धेमध्ये AI चा उपयोग करता येणार नाही, निदर्शनास आल्यास प्रवेश बाद ठरवला जाईल.
- मोबाइल, इंटरनेट किवा तंत्रज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष स्पर्धेमध्ये करता येणार नाही.
- पुस्तक परीक्षणासाठीचे पुस्तक ऐनवेळी देण्यात येईल.
- वेळेचे बंधन पाळावे लागेल.
- परीक्षणासाठी संपूर्ण दिवसभराची वेळ देण्यात येईल.
- केंद्र स्तरावरील स्पर्धा केंद्रांतर्गत होईल.

**केंद्र स्तरावरील स्पर्धेचे निकष व जबाबदाऱ्या :**

- केंद्रस्तरावरील स्पर्धा घेण्याची संपूर्ण जबाबदारी केंद्रप्रमुखांची राहील.
- परीक्षक हे परीक्षणाविषयी जाण असणारे व केंद्राबाहेरील असतील.
- परीक्षणात कुठल्याही तंत्रज्ञानाचा उपयोग चालणार नाही (AI, Net, Google Crome इ.)
- वेळेचे बंधन पाळण्यात यावे.
- एकाच दिवसात वाचन, परीक्षण व सादरीकरण करावे लागेल.
- अंतिम केलेल्या पुस्तकांतून लॉटरी पद्धतीने पुस्तक देण्यात येईल.
- केंद्रस्तरीय स्पर्धेमध्ये तीन बक्षिसे देण्यात येतील. त्यापैकी तालुकास्तरीय स्पर्धेसाठी प्रत्येक केंद्रातून प्रथम क्रमांकाचा एकच स्पर्धक निवडला जाईल.
- तीनही परीक्षकांच्या दिलेल्या गुणांच्या सरासरी गुणांमधून क्रमांक निवडण्यात येईल.
- केंद्रात प्रत्यक्ष स्पर्धा घेऊनच विजेता निवडण्यात यावा.
- स्पर्धेपूर्वी स्पर्धकांना स्पर्धेचे निकष, नियम व अटी समजावून देण्यात याव्यात.
- पुस्तक परीक्षणासाठीचे पुस्तक स्पर्धकांना परीक्षकांसमोर देण्यात यावे.
- पुस्तक परीक्षणासाठी नियोजित स्थळी स्पर्धकाने प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षण करणे आवश्यक राहील.

- पुस्तकांमध्ये विविधता असावी. (उदा. कथा, कादंबरी, कविता संग्रह, चरित्र इ.)
- स्पर्धेच्या दिवशी पुस्तक या विषयावरील कविता असलेले बॅनर लावण्यात यावे.
- पुस्तक परीक्षण व सादरीकरण एकूण १०० गुणांचे राहील.
- पुस्तक परीक्षणाची शब्द मर्यादा ५०० ते १००० शब्दांची राहील.

**तालुकास्तरीय स्पर्धेचे निकष व जबाबदाऱ्या :**

- तालुकास्तरीय स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी गट शिक्षणाधिकारी यांची राहील.
- तालुका स्तरावर विस्तार अधिकारी (शिक्षण) यांना समन्वयक म्हणून नेमण्यात यावे.
- परीक्षक हे परीक्षणाविषयी जाण असणारे व तालुक्याबाहेरील असतील.
- परीक्षणात कुठल्याही तंत्रज्ञानाचा उपयोग चालणार नाही. (AI, Net, Google Crome इ.)
- वेळेचे बंधन पाळण्यात यावे.
- एकाच दिवसात वाचन, परीक्षण व सादरीकरण करावे लागेल.
- उपलब्ध पुस्तकांतून लॉटरी पद्धतीने पुस्तक देण्यात येईल.
- तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये तीन बक्षिसे देण्यात येतील. त्यापैकी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी प्रत्येक तालुक्यातून प्रथम क्रमांकाचा एकच स्पर्धक निवडला जाईल.
- तीनही परीक्षकांच्या दिलेल्या गुणांच्या सरासरी गुणांमधून क्रमांक निवडण्यात येईल.
- तालुक्यात प्रत्यक्ष स्पर्धा घेऊनच स्पर्धक निवडण्यात यावा.
- स्पर्धेपूर्वी स्पर्धकांना स्पर्धेचे निकष, नियम व अटी समजावून देण्यात याव्यात.
- पुस्तक परीक्षणासाठीचे पुस्तक स्पर्धकांना परीक्षकांसमोर देण्यात यावे.
- पुस्तक परीक्षणासाठी नियोजित स्थळी स्पर्धकाने प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षण करणे आवश्यक राहील.
- पुस्तकांमध्ये विविधता असावी. (उदा. कथा, कादंबरी, कवितासंग्रह, चरित्र इ.)
- स्पर्धेच्या दिवशी पुस्तक याविषयावरील कविता असलेले बॅनर लावण्यात यावे.
- पुस्तक परीक्षण व सादरीकरण एकूण १०० गुणांचे राहील.
- पुस्तक परीक्षणाची शब्द मर्यादा ५०० ते १००० शब्दांची राहील.

**जिल्हास्तरीय स्पर्धेचे निकष व जबाबदाऱ्या :**

- जिल्हास्तरीय स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य, डायट/शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांची राहील.
- जिल्हा स्तरावर वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता/उपशिक्षणाधिकारी यांना समन्वयक म्हणून नेमण्यात यावे.

- परीक्षक हे परीक्षणाविषयी जाण असणारे असतील.
- परीक्षणात कुठल्याही तंत्रज्ञानाचा उपयोग चालणार नाही (AI, Net, Google Crome इ.)
- वेळेचे बंधन पाळण्यात यावे.
- एकाच दिवसात वाचन, परीक्षण व सादरीकरण करावे लागेल.
- उपलब्ध पुस्तकांतून लॉटरी पद्धतीने पुस्तक देण्यात येईल.
- जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तीन बक्षिसे देण्यात येतील, त्यापैकी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचा एकच स्पर्धक निवडला जाईल.
- तीनही परीक्षकांच्या दिलेल्या गुणांच्या सरासरी गुणांमधून क्रमांक निवडण्यात येईल.
- जिल्ह्यात प्रत्यक्ष स्पर्धा घेऊनच स्पर्धक निवडण्यात यावा.
- स्पर्धेपूर्वी स्पर्धकांना स्पर्धेचे निकष, नियम व अटी समजावून देण्यात याव्यात.
- पुस्तक परीक्षणासाठीचे पुस्तक स्पर्धकांना परीक्षकांसमोर देण्यात यावे.
- पुस्तक परीक्षणासाठी नियोजित स्थळी स्पर्धकाने प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षण करणे आवश्यक राहील.
- पुस्तकांमध्ये विविधता असावी. (उदा. कथा, कादंबरी, कवितासंग्रह, चरित्र इ.)
- स्पर्धेच्या दिवशी पुस्तक या विषयावरील कविता असलेले बॅनर लावण्यात यावे.
- पुस्तक परीक्षण व सादरीकरण एकूण १०० गुणांचे राहील.
- पुस्तक परीक्षणाची शब्द मर्यादा ५०० ते १००० शब्दांची राहील.

**राज्यस्तरीय स्पर्धेचे निकष व जबाबदाऱ्या :**

- राज्यस्तरीय स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य, डायट, बुलढाणा यांची राहील.
- राज्यस्तरीय स्पर्धेसाठी वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता यांना समन्वयक म्हणून नेमण्यात यावे.
- परीक्षक परीक्षणाविषयी जाण असणारे असतील.
- परीक्षणात कुठल्याही तंत्रज्ञानाचा उपयोग चालणार नाही (AI, Net, Google Crome इ.)
- वेळेचे बंधन पाळण्यात यावे.
- राज्य स्तरावर पुस्तक वाचन, परीक्षण लेखन व सादरीकरण याचा कालावधी दोन दिवसांचा असेल (प्रथम दिवस– परोक्षण, द्वितीय दिवस सादरीकरण.)
- उपलब्ध पुस्तकांतून लॉटरी पद्धतीने पुस्तक देण्यात येईल.
- राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये तीन बक्षिसे देण्यात येतील, त्यापैकी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचा एकच स्पर्धक निवडला जाईल.

- तीनही परीक्षकांच्या दिलेल्या गुणांच्या सरासरी गुणांमधून क्रमांक निवडण्यात येईल.
- जिल्ह्यात प्रत्यक्ष स्पर्धा घेऊनच स्पर्धक निवडण्यात यावा.
- स्पर्धेपूर्वी स्पर्धकांना स्पर्धेचे निकष, नियम व अटी समजावून देण्यात याव्यात.
- पुस्तक परीक्षणासाठीचे पुस्तक स्पर्धकांना परीक्षकांसमोर देण्यात यावे.
- पुस्तक परीक्षणासाठी नियोजित स्थळी स्पर्धकाने प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षण करणे आवश्यक राहील.
- पुस्तकांमध्ये विविधता असावी. (उदा. कथा, कादंबरी, कवितासंग्रह, चरित्र इ.)
- पुस्तक परीक्षण व सादरीकरण एकूण १०० गुणांचे राहील.
- पुस्तक परीक्षणाची शब्द मर्यादा ५०० ते १००० शब्दांची राहील.

**पुस्तक परीक्षण मूल्यांकनाचे निकष :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | **विषय वस्तू :**<br>• विषय किती मनोरंजक आहे याचे केलेले विश्लेषण. (२)<br>• विषय नवीन आहे का याविषयी केलेले विवेचन.(२)<br>• माहिती किती अचूक आणि विश्वासार्ह आहे याविषयी केलेले विश्लेषण. (२)<br>• माहिती किती स्पष्ट आणि सोप्या भाषेत दिली आहे, याविषयी केलेले परीक्षण. (२) | ०८ |
| २) | **भाषाशैली :**<br>• परीक्षणाची भाषा साधी आणि सोपी आहे का? (२)<br>• परीक्षकांचा शब्दसंग्रह समृद्ध आहे का? (२)<br>• परीक्षकांची सुसंगत वाक्यरचना आहे का? (२)<br>• परीक्षकांनी लेखकांचे विचार योग्य शब्दात मांडलेले आहेत का? (२) | ०८ |
| ३) | **पुस्तकाचे सार व उद्देश :**<br>• परीक्षणात पुस्तकाचा विषय योग्य प्रकारे मांडलेला आहे. (२)<br>• लेखकाने मांडलेला मुख्य मुददा परीक्षणामध्ये आलेला आहे. (३)<br>• परीक्षणात पुस्तकाचा उद्देश स्पष्टपणे करण्यात आलेला आहे. (३) | ०८ |
| ४) | **शोध संकल्पना व सुसंगती :**<br>• परीक्षकाने विषयाचा अभ्यासपूर्ण व समर्पक पद्धतीने आढावा घेतला आहे का? (२)<br>• विषयाशी संबंधित संकल्पना किंवा मांडणी स्पष्ट आहे का? (३)<br>• पुस्तकातील माहिती सुसंगत आणि अचूक आहे का? (३) | ०८ |

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| ५) | **भाषा आणि शैली :**<br>• पुस्तक परीक्षणाची भाषा प्रवाही, सुगम आणि आकर्षक आहे का? (४)<br>• लिखाणाची शैली परिणामकारक आहे का? (४) | ०८ |
| ६) | **पुस्तकाचा प्रभाव आणि उपयुक्तता :**<br>• परीक्षणामध्ये पुस्तक वाचकावर काय परिणाम करते याचे योग्य प्रकारे विश्लेषण केले आहे का? (२)<br>• शिक्षक किंवा अधिकाऱ्यांसाठी पुस्तक किती उपयुक्त आहे याबद्दलचे वर्णन आहे का? (३)<br>• पुस्तकातून मिळणारे शैक्षणिक आणि व्यावसायिक फायदे परीक्षणामध्ये योग्य प्रकारे आले आहेत का? (३) | ०८ |
| ७) | **समीक्षकाचे मत :**<br>• परीक्षणकर्त्याने आपले मत स्पष्ट, वस्तुनिष्ठ आणि तथ्यावर आधारित दिले आहे का? (४)<br>• सकारात्मक व नकारात्मक बाजूंचा सुस्पष्ट उल्लेख आहे का? (४) | ०८ |
| ८) | **नावीन्य आणि मौलिकता :**<br>• पुस्तकाने कोणते नवीन दृष्टिकोन दिले आहेत याबद्दल परीक्षणकर्त्याचे मत. (४)<br>• लेखकाने दिलेले मौलिक योगदान याबद्दल परीक्षणकर्त्याचे मत. (४) | ०८ |
| ९) | **उत्कृष्ट संक्षेप :**<br>• पुस्तकाचे परीक्षण प्रभावी, थोडक्यात आणि समग्र पद्धतीने पूर्ण झाले आहे का? (८) | ०८ |
| १०) | **आधार व संदर्भ :**<br>• पुस्तकात दिलेले संदर्भ विश्वसनीय आणि उपयुक्त आहेत का? याविषयी परीक्षणकर्त्याचे मत. (४)<br>• पुस्तकात दिलेली माहिती विद्यमान ज्ञानाशी कितपत जुळते याविषयी परीक्षणात आलेली माहिती. (४) | ०८ |
| | **एकूण कमाल गुण** | ८० |

◈◈◈

## ६) पॉवर पॉइंट सादरीकरण स्पर्धा

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या (NCF/SCF) पार्श्वभूमीवर शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रभावी वापर आवश्यक ठरतो आहे. शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी कामात डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून उपयुक्त, विद्यार्थिकेंद्रित सादरीकरण कौशल्ये विकसित करावीत, यासाठी राज्यस्तरीय खुल्या पॉवरपॉइंट सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**स्पर्धेचे उद्दिष्ट :**

शिक्षकांच्या सर्जनशील सादरीकरण कौशल्यांना व नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, जेणेकरून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थिकेंद्रित होईल.

**पात्रता निकष :**

- महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावी चे शिक्षक (ज्यांचा सेवार्थ/शालार्थ आयडी उपलब्ध आहे) तसेच शालेय शिक्षण विभाग प्रशासन व सक्षमीकरण शाखेतील अधिकारी/कर्मचारी पात्र असतील.
- एक शिक्षक फक्त एकच सादरीकरण तयार करू शकेल.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक :**

**त्रिस्तरीय प्रक्रिया गट, जिल्हा आणि राज्य स्तर :**

**गट स्तर :**

- प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक नाव नोंदवेल.
- एकापेक्षा अधिक इच्छुक असल्यास केंद्रप्रमुख निवड करतील.

**तालुका स्तर :**

- ठिकाण, दिनांक व वेळ निश्चित करून स्पर्धा घेण्यात येईल.
- शिक्षकाने ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे आवश्यक आहे.
- सॉफ्ट कॉपी जमा करावी लागेल.
- निवड समितीमार्फत मूल्यमापन करून एक विजेता जिल्हा स्तरावर पाठवला जाईल.

**जिल्हा स्तर :**

- तालुका विजेत्यांमध्ये जिल्हा स्तरावर स्पर्धा.
- यामध्येही तशीच सादरीकरण प्रक्रिया, मूल्यांकन होईल आणि एक विजेता राज्य स्तरावर पुढे जाईल.

**राज्य स्तर :**

- जिल्हा विजेत्यांचे सादरीकरण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे पाठवले जाईल.
- राज्य स्तर समिती २० विजेते निवडेल.
- कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. पुनरावृत्ती/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**महत्त्वाचे नियम :**

- PPT मध्ये वापरलेला मजकूर व आशय आदर्श व दर्जेदार असावा.
- प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून स्वतः सादरीकरण तयार करणे आवश्यक आहे.
- सादरीकरणामध्ये खालील माहिती असावी :
  नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, UDISE कोड, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक.
- सादरीकरणाची भाषा : मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.
- सादरीकरणाचा कालावधी २० मिनिटे. (प्रत्यक्ष सादरीकरण केल्यासारखे.)
- स्लाइड्स किमान १० व कमाल १५ (Title आणि Thank You स्लाईडसह).
- सादरीकरण फाईल प्रकार : PPT / PPTX / Google Slides.
- स्लाईडवर व्हिडीओ किंवा ऑडिओ मजकूर असू नये.
- सादरीकरणाचा विषय शालेय अध्ययन/अध्यापन विषयाशी संबंधित असावा.
- निवड समिती सदस्य शिक्षकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
- Slide Ratio – 16 : 9 असावा.
- कोणतीही सामाजिक माध्यमे किंवा व्यावसायिक जाहिरात सादरीकरणात नसावी.
- मजकूर व चित्रे कॉपीराईटमुक्त (Creative Commons) असावीत.
- मराठी मजकुरासाठी Unicode font वापरावा; इंग्रजीसाठी Arial किंवा Times New Roman.
- सर्व नियमानुसार कालमर्यादा आणि सादरीकरण मर्यादा पाळणे आवश्यक आहे.
- नियमभंग, कॉपीराईट उल्लंघन किंवा गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

**मूल्यांकन निकष व रुब्रिक्स : (एकूण गुण १००)**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | २५ |
| २) | शैक्षणिक उपयुक्तता (Pedagogical Value) | २० |

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| ३) | दृश्य रचना व सौंदर्य (Visual Design and Aesthetics) | १५ |
| ४) | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity and Originality) | १५ |
| ५) | तांत्रिक बाजू (Technical Execution) | १५ |
| ६) | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | १० |

(प्रत्येक निकषाचे तपशीलवार गुणांकन दस्तऐवजात दिले आहेत.)

**अंदाजे खर्च (बजेट) = रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | अंदाजे खर्च | |
|---|---|---|---|
| १) | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम | | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | इतर खर्च – स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ. | | |

**मूल्यांकन समित्या**

**तालुकास्तरीय समिती :**

१) गटशिक्षणाधिकारी — अध्यक्ष
२) अधिव्याख्याता डायट — सदस्य
३) तंत्रस्नेही केंद्रप्रमुख — सदस्य
४) शिक्षण विस्तार अधिकारी — सदस्य सचिव

**जिल्हास्तरीय समिती :**

१) प्राचार्य डायट — अध्यक्ष
२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) — सदस्य
३) शिक्षणाधिकारी (माध्य.) — सदस्य
४) वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, डायट — सदस्य सचिव

**राज्यस्तरीय समिती :**

१) संचालक, एससीइआरटी, महाराष्ट्र — अध्यक्ष
२) सहसंचालक, एससीइआरटी, महाराष्ट्र — सदस्य
३) वरिष्ठ अधिव्याख्याता, एससीइआरटी, महाराष्ट्र — सदस्य
४) अधिव्याख्याता, एससीइआरटी, महाराष्ट्र — सदस्य
५) उपसंचालक, एससीइआरटी, महाराष्ट्र — सदस्य सचिव

## (७) लोकनृत्य व रांगोळी स्पर्धा

**अ) लोकनृत्य स्पर्धा :** सामूहिक व सांस्कृतिक कौशल्यांच्या विकसनासाठी सदर स्पर्धा ओयजित केली जाईल. स्पर्धेबाबत सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

**गुणदान तक्ता निकष :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | पदन्यास – मुद्राभिनय | २० |
| २) | ताल | १० |
| ३) | गती | १० |
| ४) | सांघिक सादरीकरण | २० |
| ५) | लोकनृत्य असणाऱ्या प्रांत/जमात अनुरूप वेशभूषा | २० |
| ६) | प्रश्नोत्तरे | ०५ |
| ७) | प्रेक्षकांचा प्रतिसाद | ०५ |
| ८) | पारंपरिकता | १० |
| | **एकूण गुण** | **१००** |

**नियम व अटी :**

१) सहभागी संघात प्रत्येकी अधिकतम आठ (८) स्पर्धक असावेत.

२) संघांनी वेळेत सहभागाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

३) नोंदणी न करणाऱ्या संघांना ऐन वेळी प्रवेश दिला जाणार नाही.

४) सादरीकरणासाठी वेळ किमान ६ मिनिटे व कमाल ८ मिनिटे असेल.

५) सादरीकरण होत असलेल्या नृत्यात अश्लील व आक्षेपार्ह हावभाव नसावेत. असे आढळल्यास संघ बाद केला जाईल.

६) ज्या गीतावर लोकनृत्य सादर होणार आहे ते गीत संघाने स्वतः पेनड्राईव्हमध्ये आणावे.

७) लोकनृत्य सादरीकरणातून कोणतीही व्यक्ती/जमाती/समाज यांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी व विहित संकेत पाळावेत.

८) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**वेळापत्रक :**

स्पर्धेच्या तारखा यथावकाश जाहीर केल्या जातील.

**पारितोषिकासाठीचा खर्च :**

केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर लोकनृत्य स्पर्धेसाठी पारितोषिकाची रक्कम शासकीय नियमानुसार देणेत येईल.

**इतर आनुषंगिक खर्च :**

| अ. क्र. | स्तर | | अपेक्षित खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाजे स्पर्धक | प्रवास खर्च | भोजन व निवास खर्च | तज्ज्ञ परीक्षक मानधन | स्टेशनरी व भौतिक सुविधा |
| १) | केंद्र | १,०२० | रक्कम शासकीय नियमानुसार | | | |
| २) | तालुका | ७० | | | | |
| ३) | जिल्हा | १५ | | | | |
| ४) | राज्य | ३६ | | | | |
| | | | | | | |
| | | **एकूण** | रक्कम शासकीय नियमानुसार | | | |

**ब) रांगोळी स्पर्धा :** हस्तकौशल्यांच्या व अभिव्यक्ती कौशल्यांना वाव देण्यासाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.

**गुणदान तक्ता निकष :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | कल्पकता | २० |
| २) | रंगसंगती | २० |
| ३) | मांडणी | २० |
| ४) | सफाईदारपणा | २० |
| ५) | एकूण प्रभाव | २० |
| | **एकूण** | **१००** |

**नियम व अटी :**

१) स्पर्धकांनी वेळेत सहभागाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) नोंदणी न करणाऱ्या स्पर्धकास ऐन वेळी प्रवेश दिला जाणार नाही.

३) ठिपक्यांच्या रांगोळीला परवानगी नसेल.

४) दिलेल्या जागेतच रांगोळी काढावी.

५) रांगोळी काढण्यासाठी आवश्यक साहित्य जसे, रांगोळी, रंग स्पर्धकाने स्वतः घेऊन येणे गरजेचे आहे.

६) रांगोळी काढण्यासाठी रांगोळीचे रंग, रांगोळी याशिवाय इतर कोणतेही साहित्य वापरता येणार नाही.

७) दिलेल्या वेळेतच रांगोळी काढून पूर्ण करावी लागेल.

८) दिलेल्या विषयांवरच रांगोळी काढणे बंधनकारक आहे.

९) काढलेल्या रांगोळीतून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी.

१०) सहभागी संघांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता देय असणार नाही.

११) चाळणी, साचे याचा वापर करता येणार नाही.

१२) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**वेळापत्रक :**

स्पर्धेच्या तारखा यथावकाश जाहीर केल्या जातील.

**पारितोषिकासाठीचा खर्च :**

केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर रांगोळी स्पर्धेसाठी पारितोषिकाची रक्कम माननीय संचालक महोदय यांच्या आदेशान्वये जाहीर करण्यात येईल.

**इतर आनुषंगिक खर्च :**

| अ. क्र. | स्तर | अपेक्षित खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाजे स्पर्धक | प्रवास खर्च | भोजन व निवास खर्च | तज्ज्ञ परीक्षक मानधन | स्टेशनरी व भौतिक सुविधा |
| १) | केंद्र | १,०२० | रक्कम शासकीय नियमानुसार | | | |
| २) | तालुका | ७० | | | | |
| ३) | जिल्हा | १५ | | | | |
| ४) | राज्य | ३६ | | | | |
| | | | | | | |
| | | **एकूण** | **रक्कम शासकीय नियमानुसार** | | | |

◈◈◈

# ८) शाळांमधील विविध क्लब व त्यांच्या स्पर्धा

**स्पर्धेसाठी विविध समित्या :**

**तालुका स्तर मूल्यांकन समिती :**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती | अध्यक्ष |
| २) | अधिव्याख्याता, डायट (तालुका संपर्क अधिकारी) | सदस्य |
| ३) | कृतिशील केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | कृतिशील शिक्षक | सदस्य |
| ५) | विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

**जिल्हा स्तर मूल्यांकन समिती :**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ४) | राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केंद्रप्रमुख/शिक्षक | सदस्य |
| ५) | उपशिक्षणाधिकारी | सदस्य |
| ६) | वरिष्ठ अधिव्याख्याता, जि.शि.प्र.सं | सदस्य सचिव |

**जिल्हा स्तर मूल्यांकन समिती :**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | संबंधित विभाग प्रमुख, एससीइआरटी, महाराष्ट्र, पुणे | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य,शासकीय अध्यापक विद्यालय/महाविद्यालय | सदस्य |
| ३) | संबंधित विषयातील तज्ज्ञ | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य |
| ५) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (आयोजक जिल्हा) | सदस्य सचिव |

**पारितोषिकाचे स्वरूप :**

**तालुका स्तर :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रथम क्रमांक | रक्कम शासकीय नियमानुसार | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| २) | द्वितीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| ३) | तृतीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |

**जिल्हा स्तर :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रथम क्रमांक | रक्कम शासकीय नियमानुसार | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| २) | द्वितीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| ३) | तृतीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |

**राज्य स्तर :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रथम क्रमांक | रक्कम शासकीय नियमानुसार | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| २) | द्वितीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |
| ३) | तृतीय क्रमांक | | सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र |

**स्पर्धेचे ठिकाण व कालावधी :**

| अ. क्र. | स्तर | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १) | तालुका स्तर | संबंधित तालुका | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) | जिल्हा स्तर | संबंधित जिल्हा (डायट) | |
| ३) | राज्य स्तर | यथावकाश कळविले जाईल. | |

**मूल्यांकनाचे निकष : (एकूण गुण १००)**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | क्लबची उद्दिष्टे | १० |
| २) | क्लबमधील विद्यार्थ्यांचा सहभाग (किमान १५ किंवा त्यापेक्षा जास्त) | १० |
| ३) | क्लब अंतर्गत मूल्यमापन कालावधीत राबवलेले उपक्रम/कृती (किती व कोणते) | १५ |
| ४) | क्लबमधील उपक्रमांचा/कृतींचा विद्यार्थ्यांच्या शिकण्यात झालेला परिणाम | १५ |
| ५) | नावीन्यपूर्णता आणि उपक्रमशीलता | १५ |

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| ६) | क्लबमधील कृतींचा दैनंदिन जीवनातील उपयोग | १० |
| ७) | क्लब अंतर्गत झालेले उल्लेखनीय कार्य | १० |
| ८) | एकंदरीत परिणाम | १५ |
| | **एकूण गुण** | **१००** |

**पारितोषिक खर्च :**

**तालुका स्तर :**

| अ. क्र. | | तपशील | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व स्पर्धा आयोजन खर्च | प्रथम क्रमांक | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | | द्वितीय क्रमांक | |
| | | तृतीय क्रमांक | |
| | | स्पर्धा आयोजन खर्च | |
| | | **एकूण** | |

**जिल्हा स्तर :**

| अ. क्र. | | तपशील | तालुके | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १) | पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व स्पर्धा आयोजन खर्च | प्रथम क्रमांक | ३६ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | | द्वितीय क्रमांक | ३६ | |
| | | तृतीय क्रमांक | ३६ | |
| | | स्पर्धा आयोजन खर्च | ३६ | |
| २) | जेवण व प्रवास भत्ता | प्रति तालुका १ व्यक्ती × ३५९ तालुके | – | |
| | | **एकूण** | | |

**राज्य स्तर :**

| अ. क्र. | | तपशील | एकूण खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १) | पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व स्पर्धा आयोजन खर्च | प्रथम क्रमांक | रक्कम शासकीय नियमानुसार | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | | द्वितीय क्रमांक | | |
| | | तृतीय क्रमांक | | |
| | | स्पर्धा आयोजन खर्च | | |
| २) | निवास, जेवण व प्रवास भत्ता | | | |

◈◈◈

# १) क्रीडा स्पर्धा

**प्रस्तावना :**

शिक्षक हा समाजातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांचे कार्य केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणे एवढेच मर्यादित नाही, तर ते विद्यार्थ्यांमध्ये जीवनाच्या विविध पैलूंना समजून घेण्याची क्षमता निर्माण करतात. यासाठी शिक्षकांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्यदेखील महत्त्वाचे आहे, कारण विद्यार्थ्यांना शिक्षक हे आदर्शवत असण्यासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असले पाहिजेत. त्याचबरोबर शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे सुद्धा शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असले पाहिजेत. यासाठी शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी क्रीडा स्पर्धा आयोजन करणे महत्त्वाचे आहे. अशा स्पर्धामधून त्यांच्यामध्ये खिलाडू वृत्ती, सांघिक वृत्ती, नेतृत्वगुण, समन्वयाची भावना निर्माण करता येईल. यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे संकल्पनेतून शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी तालुका ते राज्य स्तरावर क्रीडा स्पर्धा घेण्याबाबत प्रस्ताव सादर करीत आहे.

**क्रीडा स्पर्धा उद्देश :**

१) कर्मचाऱ्याचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचे संवर्धन करणे.

२) शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना सहभागी करून त्यांच्यामध्ये खिलाडू वृत्ती, सांघिक वृत्ती, नेतृत्वगुण, समन्वयाची भावना निर्माण करणे.

३) कर्मचाऱ्यांमध्ये एकता व सामाजिक भावना निर्माण करणे.

४) कर्मचाऱ्यांमध्ये क्रीडा कौशल्य आत्मसात करण्यास मदत करणे.

**क्रीडा स्पर्धेचे महत्त्व :**

**१) शारीरिक स्वास्थ्य :** दैनंदिन कामकाजामुळे शिक्षकांचे काही वेळा शारीरिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन शिक्षक आपल्या शारीरिक क्षमतेला सुधारू शकतात आणि आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल करू शकतात.

**२) शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम :** शिक्षकांना शालेय दैनंदिन कामकाजामुळे शिक्षकांवर ताण येण्याची शक्यात असते. क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतल्यामुळे शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते.

**३) टीमवर्क आणि सहकार्य :** शिक्षक क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन ते एकत्र काम करण्याची आणि एकमेकांना मदत करण्याची भावना विकसित करतात. यामुळे शालेय जीवनात असलेल्या सहकार्याची भावना अधिक दृढ होते.

**४) नेतृत्व कौशल्ये :** क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणारे शिक्षक आपली नेतृत्वक्षमता वाढवू शकतात. हे कौशल्य त्यांच्या शालेय कार्यप्रणालीत उपयोगी पडते.

५) **आदर आणि प्रेरणा :** शिक्षक क्रीडा स्पर्धा शिक्षण क्षेत्रात असलेल्या शिक्षकांमध्ये एक आदर आणि प्रेरणा निर्माण करतात. हे शिक्षकांना त्यांच्या कार्यात अधिक उत्कृष्ट बनवते.

**क्रीडा स्पर्धांचे प्रकार :**

शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धा वैयक्तिक व सांघिक स्वरूपात घेण्याचे नियोजित आहे.

**क्रीडा स्पर्धांचे स्तर :** शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी खालील स्तरावर क्रीडा स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे.

१) तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक व सांघिक)

२) जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक व सांघिक)

३) विभागस्तरीय क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक व सांघिक)

४) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक व सांघिक)

**क्रीडा स्पर्धेमध्ये खालील कर्मचारी यांना सहभागी होता येईल :**

१) राज्य अभ्यासक्रम (State Board) राबविणाऱ्या मान्यता प्राप्त सर्व शाळांमधील सर्व कर्मचारी.

२) शालेय शिक्षण विभागाच्या सर्व संस्थामधील अधिकारी व कर्मचारी

३) शिक्षण सेवक यांनासुद्धा या स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल.

**क्रीडा स्पर्धेमध्ये खालील क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होता येईल :**

| वैयक्तिक स्पर्धा | | |
|---|---|---|
| अ. क्र. | महिला क्रीडा प्रकार | पुरुष क्रीडा प्रकार |
| १) | धावणे (१०० मीटर) | धावणे (१०० मीटर) |
| २) | धावणे (४०० मीटर) | धावणे (४०० मीटर) |
| ३) | गोळा फेक | गोळा फेक |
| ४) | थाळी फेक | थाळी फेक |
| ५) | भाला फेक | भाला फेक |
| ६) | उंच उडी | उंच उडी |
| ७) | लांब उडी | लांब उडी |
| ८) | बॅडमिंटन | बॅडमिंटन |
| ९) | पोहणे | पोहणे |

| सांघिक स्पर्धा | | |
|---|---|---|
| अ. क्र. | महिला क्रीडा प्रकार | पुरुष क्रीडा प्रकार |
| १) | खोखो | खोखो |
| २) | कबड्डी | कबड्डी |
| ३) | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल |
| ४) | रस्सीखेच | रस्सीखेच |
| ५) | रिल | रिल |

## विविध क्रीडा समित्या :

### तालुका/मनपा स्तर क्रीडा समिती :

| अ. क्र. | समितीमधील व्यक्ती | समितीमधील पद |
|---|---|---|
| १) | तालुका क्रीडा अधिकारी | अध्यक्ष |
| २) | विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य |
| ३) | केंद्रप्रमुख – १ | सदस्य |
| ४) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (प्राथमिक) – १ | सदस्य |
| ५) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (माध्यमिक) – १ | सदस्य |
| ६) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी (प्राथमिक) – १ | सदस्य |
| ७) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी (माध्यमिक) – १ | सदस्य |
| ८) | गटशिक्षणाधिकारी | सदस्य सचिव |

### जिल्हा स्तर क्रीडा समिती :

| अ. क्र. | समितीमधील व्यक्ती | समितीमधील पद |
|---|---|---|
| १) | जिल्हा क्रीडा अधिकारी | अध्यक्ष |
| २) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ५) | उपशिक्षणाधिकारी – १ | सदस्य |
| ६) | गटशिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी (सर्व) | सदस्य |
| ७) | तालुका क्रीडा अधिकारी (सर्व) | सदस्य |
| ८) | विस्तार अधिकारी (शिक्षण) १ | सदस्य |
| ९) | केंद्रप्रमुख – १ | सदस्य |
| १०) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (प्राथमिक) – १ | सदस्य |
| ११) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (माध्यमिक) – १ | सदस्य |
| १२) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी (प्राथमिक ) – १ | सदस्य |
| १३) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी (माध्यमिक) – १ | सदस्य |
| १४) | साधनव्यक्ती/(BRC/URC) - १ | सदस्य |
| १५) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (संबंधित जिल्हा), ज्या जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नाहीत त्या ठिकाणी उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण. | सदस्य सचिव |

**विभाग स्तर क्रीडा समिती :**

| अ. क्र. | समितीमधील व्यक्ती | समितीमधील पद |
|---|---|---|
| १) | विभागीय शिक्षण उपसंचालक (संबधित विभाग) | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (संबधित विभागाचे) | उपाध्यक्ष |
| ३) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता सर्व (संबधित विभाग) | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी प्राथमिक - सर्व (संबधित विभाग) | सदस्य |
| ५) | शिक्षणाधिकारी माध्यमिक (संबधित विभाग) | सदस्य |
| ६) | उपशिक्षणाधिकारी (संबधित विभाग प्रत्येक जिल्ह्यातून १) | सदस्य |
| ७) | गट शिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी - २ | सदस्य |
| ८) | तालुका क्रीडा अधिकारी (सर्व) - २ | सदस्य |
| ९) | विस्तार अधिकारी (शिक्षण) - १ | सदस्य |
| १०) | केंद्रप्रमुख - १ | सदस्य |
| ११) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (प्राथमिक) १ | सदस्य |
| १२) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (माध्यमिक) १ | सदस्य |
| १३) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी १ (प्राथमिक) | सदस्य |
| १४) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी १ (माध्यमिक) | सदस्य |
| १५) | साधन व्यक्ती (BRC/URC) १ | सदस्य |
| १६) | जिल्हा क्रीडा अधिकारी (संबधित विभाग जिल्हा) | सदस्य सचिव |

**राज्य स्तर क्रीडा समिती :**

| अ. क्र. | समितीमधील व्यक्ती | समितीमधील पद |
|---|---|---|
| १) | क्रीडा आयुक्त | अध्यक्ष |
| २) | सहसंचालक, क्रीडा संचालनालय | उपाध्यक्ष |
| ३) | उपसंचालक, कला व क्रीडा विभाग , पुणे | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, पुणे | सदस्य |
| ५) | शिक्षणाधिकारी माध्यमिक,जिल्हा परिषद, पुणे | सदस्य |
| ६) | उपशिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक, जिल्हा परिषद, पुणे | सदस्य |
| ७) | गट शिक्षणाधिकारी / प्रशासनाधिकारी (२ संख्या) पुणे जिल्हा | सदस्य |

| अ. क्र. | समितीमधील व्यक्ती | समितीमधील पद |
|---|---|---|
| ८) | तालुका क्रीडा अधिकारी (सर्व) – २ (पुणे जिल्हा) | सदस्य |
| ९) | विस्तार अधिकारी (शिक्षण) – १ (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १०) | केंद्रप्रमुख – १ (पुणे जिल्हा) | सदस्य |
| ११) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (प्राथमिक) – १ (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १२) | मुख्याध्यापक प्रतिनिधी (माध्यमिक) – १ (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १३) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी – १ (प्राथमिक) (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १४) | क्रीडा शिक्षक प्रतिनिधी – १ (माध्यमिक) (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १५) | साधन व्यक्ती (BRC/URC-1) (पुणे जिल्हा) | सदस्य |
| १६) | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे. | सदस्य सचिव |

**स्तरनिहाय सर्वसाधारण सूचना, नियम व अटी :**

**तालुका स्तर क्रीडा स्पर्धा :**

१) तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी केंद्रप्रमुख अथवा केंद्र समन्वयक यांचेकडे अधिकारी/ कर्मचारी यांनी नोंदणी करणे आवश्यक राहील.

२) तालुका स्तरावर स्पर्धा घेऊन प्रत्येक खेळ प्रकारामधून ३ क्रमांक काढण्यात येतील.

३) तालुका स्तरावर प्रथम क्रमांक आलेल्या खेळाडूला/खेळाडूंना जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धेसाठी पात्र समजण्यात येईल.

४) तालुका क्रीडा समिती ही तालुका स्तरावरील सर्व क्रीडा स्पर्धांचे नियोजन व आयोजन करेल.

५) स्पर्धा कालावधी दोन दिवसांचा असेल. सदर कालावधीमध्ये बक्षीस वितरण करण्यात यावे.

**जिल्हा स्तर क्रीडा स्पर्धा :**

१) कर्मचाऱ्याला कोणत्याही एकाच क्रीडा प्रकारात सहभागी होता येईल.

२) जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी संबंधित क्रीडा प्रकारात तालुक्यातून प्रथम क्रमांक येणे आवश्यक राहील.

३) जिल्हा स्तरावर स्पर्धा घेऊन प्रत्येक खेळ प्रकारामधून ३ क्रमांक काढण्यात येतील.

४) जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक आलेल्या खेळाडूला/खेळाडूंना विभाग स्तरावरील क्रीडा स्पर्धेसाठी पात्र समजण्यात येईल.

५) जिल्हा स्तर क्रीडा समिती ही जिल्हा स्तरावरील सर्व क्रीडा स्पर्धांचे नियोजन व आयोजन करेल.

६) स्पर्धा कालावधी दोन दिवसांचा असेल. सदर कालावधीमध्ये बक्षीस वितरण करण्यात यावे.

७) ज्या खेळाडूंना निवासाची आवश्यकता आहे, अशा खेळाडूंची सोय क्रीडा समितीने करावी.

**विभाग स्तर क्रीडा स्पर्धा :**

१) विभाग स्तर क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी संबधित क्रीडा प्रकारात जिल्ह्यातून प्रथम क्रमांक येणे आवश्यक राहील.

२) विभाग स्तर स्पर्धा घेऊन, प्रत्येक खेळ प्रकारामधून ३ क्रमांक काढण्यात येतील.

३) विभाग स्तर प्रथम क्रमांक आलेल्या खेळाडूला/खेळाडूंना राज्य स्तरावरील क्रीडा स्पर्धेसाठी पात्र समजण्यात येईल.

४) विभाग स्तर क्रीडा समिती ही विभाग स्तरावरील सर्व क्रीडा स्पर्धांचे नियोजन व आयोजन करेल.

५) ज्या खेळाडूंना निवासाची आवश्यकता आहे, अशा खेळाडूंची सोय क्रीडा समितीने करावी.

**राज्य स्तर क्रीडा स्पर्धा :**

१) राज्य स्तर क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी संबधित क्रीडा प्रकारात जिल्ह्यातून प्रथम क्रमांक येणे आवश्यक राहील.

२) राज्य स्तर स्पर्धा घेऊन प्रत्येक खेळ प्रकारामधून ३ क्रमांक काढण्यात येतील.

३) विभाग स्तर प्रथम क्रमांक आलेल्या खेळाडूला/खेळाडूंना राज्य स्तरावरील क्रीडा स्पर्धेसाठी पात्र समजण्यात येईल.

४) राज्य स्तर क्रीडा समिती सर्व क्रीडा स्पर्धांचे नियोजन व आयोजन करेल.

५) ज्या खेळाडूंना निवासाची आवश्यकता आहे, अशा खेळाडूंची सोय क्रीडा समितीने करावी.

**क्रीडा स्पर्धा खर्च (संभाव्य) –**

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर | तालुका/जिल्हा/विभाग संख्या | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १) | तालुका स्तर | ४०८ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हा स्तर | ३६ | |
| ३) | विभाग स्तर | ६ | |
| ४) | राज्य स्तर | १ | |

**शिक्षण विभाग कर्मचारी क्रीडा स्पर्धा - जिल्हा स्तर संख्या व संभाव्य खर्च :**

| अ. क्र. | तपशील | खेळाडू संख्या |
|---|---|---|
| १) | जिल्हा स्तर महिला व पुरुष | तालुका स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धक |
| २) | जिल्हा स्तर महिला व पुरुष | |

| अ. क्र. | तपशील | संभाव्य खर्च |
|---|---|---|
| १) | प्रमाणपत्र व ट्रॉफी खर्च (अंदाजे) | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जेवण | |
| ३) | चहापान | |
| **अ. क्र.** | **तपशील** | **खर्च रक्कम** |
| ४) | क्रीडांगण आखणी | रक्कम शासकीय नियमानुसार |
| ५) | पंच मानधन | |
| ६) | बक्षीस | |
| ७) | क्रीडांगण भाडे/खर्च | |
| ८) | प्रवास भत्ता | |
| ९) | स्टेशनरी खर्च | |
| १०) | वैद्यकीय सुविधा खर्च | |
| ११) | Flag / PIPE | |
| १२) | ध्वनिक्षेपक | |
| १३) | इतर खर्च | |
| **एकूण** | | |

❖❖❖

## १०) विज्ञान व गणिताचा जादूगार

**प्रस्तावना :**

आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असून माहितीच्या या युगात आपल्याला माहिती इंटरनेटवर सहज उपलब्ध होते. माहिती सहज उपलब्ध होत असल्याने मेंदूला फारसा ताण दिला जात नाही.

अध्ययन-अध्यापन ही शैक्षणिक प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, केवळ विद्यार्थ्यांना ज्ञानदान करून उपयोग नाही, तर विद्यार्थ्यांना क्रियाशील व कृतिशील अध्ययनाकडे नेण्यासाठी शिक्षकांनीही स्वतःला अद्ययावत ठेवणे अत्यंत गरजेचे असून नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार अनुभवाधारित अध्ययनासाठी विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनाही अध्ययन समृद्ध, सर्जनशील होणे अत्यावश्यक झाले आहे.

यासाठी राज्यातील शिक्षकांना विज्ञान व गणित या विषयांसारख्या संकल्पनात्मक व अवघड वाटणाऱ्या विषयांतील संकल्पना सर्जनशील, नवोपक्रम पद्धतीने सोप्या व मनोरंजनात्मक पद्धतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांसमोर मांडून विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रियेला चालना दिल्यास अनुभवाधारित अध्ययनाला प्रोत्साहन देता येईल.

**स्पर्धेचा हेतू :**

आधुनिक युगात केवळ प्रयोगातून विज्ञान व गणित विषयांतील एखादे यंत्र कसे चालते किंवा एखादी प्रतिकृती तयार करून त्याचे स्पष्टीकरण अपेक्षित नाही, तर प्रयोगाबरोबर तर्क, अनुमान या अनोख्या व जादूई प्रयोगातूनही विद्यार्थ्यांना आकर्षित करता येते. यामध्ये एखादी उत्सुकता वाढवणारी कृती/प्रयोग त्यांचेसमोर सादर करून त्यानंतर त्यामागील वैज्ञानिक किंवा गणितीय तत्त्व कोणते आहे याचे स्पष्टीकरण देणे महत्त्वाचे आहे. यासाठी शिक्षकांनी नवोपक्रम, नवनवीन कल्पना, युक्त्या स्वतःच्या प्रतिभेने विकसित करणे गरजेचे आहे. यासाठी अनुभवाधारित अध्ययनाबरोबरच अध्ययनात कुतूहल, जिज्ञासा वाढविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना या विषयाबाबत अभिरुची विकसनासाठी शिक्षकांना त्यांच्या प्रतिभाशक्तीचा वापर करून नावीन्यपूर्ण कृती विकसित करणे हा यामागील हेतू आहे.

**स्पर्धेत कोण सहभागी होऊ शकते?**

- स्पर्धेत भाग घेणारे स्पर्धक हे जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शिक्षकांसाठी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ही स्पर्धा असेल.
- शिक्षणक्षेत्रातील पर्यवेक्षकीय अधिकारी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी व शिक्षण क्षेत्रातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी तसेच अधिव्याख्याता, ज्येष्ठ अधिव्याख्याता या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.

**स्पर्धेचे निकष :**

- सर्व माध्यमांसाठी व सर्व व्यवस्थापनासाठी ही स्पर्धा आहे.
- प्रामुख्याने विज्ञान व गणित विषयांसाठी ही स्पर्धा लागू असेल.
- सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठी मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांचे संमतिपत्र असणे आवश्यक आहे.
- स्पर्धेमध्ये सादरीकरण करणे बंधनकारक आहे.
- सादरीकरणाची भाषा मराठी/हिंदी/इंग्रजी असावी. यांपैकी कोणत्याही एका भाषेतून स्पर्धकाला सादरीकरण करता येईल. मात्र विजेता सर्व भाषांमधून एकच निवडला जाईल.
- सर्व माध्यमांतून व सर्व व्यवस्थापनांतून अनुक्रमे एक, दोन, तीन पारितोषिके वितरित केली जातील.
- स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**स्पर्धेचे नियम :**

- सादर केल्या जाणाऱ्या प्रयोग किंवा कृतींमध्ये नावीन्यता असणे आवश्यक आहे.
- कमीत कमी ५ ते १० मिनिटात सादरीकरण करणे आवश्यक आहे.
- सदर सादरीकरण करत असताना कोणत्याही समुदायाच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता सादरकर्त्याने घेणे आवश्यक राहील.
- अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे कोणतेही विधान अथवा मुद्दा नसावा.
- सादरीकरणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकाने सोबत आणणे बंधनकारक राहील.
- प्रयोगातून अध्ययन निष्पत्ती साध्य होणे आवश्यक आहे.
- सादरीकरणातून विषयातील संकल्पना स्पष्ट करणे, कृतीमागील वैज्ञानिक तत्त्व स्पष्ट करणे आणि कार्यकारणभाव स्पष्ट करणे आवश्यक आहे.
- सदर सादरीकरण हे विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेशी निगडित असावे. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्मिती, आशय स्पष्टीकरण आणि अभिरुची विकसित होण्यावर भर असावा.
- सादरीकरण झाल्यानंतर स्पर्धेच्या निकालाबाबत परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
- सादरीकरणासाठी निवडलेली संकल्पना ही सादरकर्त्याने स्वतः तयार केलेली असावी. बाजारामध्ये उपलब्ध असणारे तयार साहित्य वापरता येणार नाही.
- सादरीकरणासाठी निवडलेली संकल्पना ही स्वनिर्मित असावी. कॉपीराईट नसावी.
- स्पर्धेसाठी स्पर्धकाकडे मुख्याध्यापकांचे किंवा कार्यालय प्रमुखांचे संमतिपत्र असणे आवश्यक आहे.

**स्पर्धेचे सादरीकरणाचे मुद्दे :**

- नवनिर्मिती
- उपयोगिता
- संकल्पना स्पष्टीकरण
- सादरीकरण कौशल्य
- चिकित्सक विचार
- कल्पकता
- कार्यकारणभाव

**स्पर्धेचे मूल्यांकन :**

१) प्रत्येक स्तरावर सादरीकरणाच्या व निकषांच्या आधारावर मूल्यांकन केले जाईल.

२) प्रत्येक स्तरावर तीन क्रमांक काढले जातील व पुढील स्तरासाठी प्रथम क्रमांक पात्र असेल.

३) निवड झालेल्या स्पर्धकाला पुढील स्तरावरसुद्धा सादरीकरण करणे बंधनकारक आहे.

४) प्रत्येक स्तरावर सादरीकरण केलेला प्रयोग एकच असावा.

**मूल्यांकनाचा तक्ता खालीलप्रमाणे :**

| **अ. क्र.** | **निकष** | **गुण** |
|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांवरील परिणामकारकता | १५ |
| २) | प्रस्तुतिकरणाचा दर्जा | २० |
| ३) | प्रत्यक्ष उपयोगिता | १५ |
| ४) | सर्जनशीलता | १५ |
| ५) | नावीन्यता | १५ |
| ६) | संकल्पनेचे स्पष्टीकरण | २० |
| **एकूण गुण** | | **१००** |

**स्पर्धेची कार्यपद्धती :**

**१) पहिला टप्पा – केंद्र स्तर :**

केंद्रातील एक उत्कृष्ट पहिल्या क्रमांकाचा स्पर्धक पुढील स्तरासाठी पात्र असेल व उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्याला सन्मानित करण्यात येईल.

**२) दुसरा टप्पा – तालुका स्तर :**

तालुका स्तरावरील एका उत्कृष्ट पहिल्या क्रमांकाचा स्पर्धक पुढील स्तरासाठी पात्र असेल. उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्याला सन्मानित करण्यात येईल.

**३) तिसरा टप्पा – जिल्हा स्तर :**

जिल्हा स्तरावरील एका उत्कृष्ट पहिल्या क्रमांकाचा स्पर्धक पुढील स्तरासाठी पात्र असेल. उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्याला सन्मानित करण्यात येईल. तसेच राज्यासाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकाने आपल्या सादरीकरणाचा व्हिडिओ करणे बंधनकारक आहे.

**४) चौथा टप्पा – राज्य स्तर :**

पहिल्या अनुक्रमे तीन उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

**अंदाजित वेळापत्रक :**

- केंद्र स्तर –
- तालुका स्तर –
- जिल्हा स्तर –
- राज्य स्तर –
- पारितोषिक वितरण –

} शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल.

**आर्थिक खर्चाचा तपशील :**

**तालुका स्तर :**

| अ. क्र. | तपशील | खर्च रक्कम |
|---|---|---|
| १) | पारितोषिक | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | प्रमाणपत्र व ट्रॉफी खर्च | |
| ३) | परीक्षक मानधन | |
| ४) | स्पर्धा आयोजन | |
| **एकूण** | | |

**जिल्हा स्तर :**

| अ. क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १) | पारितोषिक | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | प्रमाणपत्र व ट्रॉफी खर्च | |
| ३) | परीक्षक मानधन | |
| ४) | स्पर्धा आयोजन | |
| **एकूण** | | |

**राज्य स्तर :**

| अ. क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १) | पारितोषिक | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | प्रमाणपत्र व ट्रॉफी खर्च | |
| ३) | परीक्षक मानधन | |
| ४) | स्पर्धा आयोजन | |
| ५) | स्पर्धकांसाठी TA / DA | |
| ६) | स्पर्धकांसाठी निवास व्यवस्था | |
| **एकूण** | | |

**संकलित खर्चाचा तपशील :**

| अ. क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १) | तालुका स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हा स्तर | |
| ३) | राज्य स्तर | |
| **एकूण** | | |

◈◈◈

# ११) आशयज्ञान स्पर्धा

**स्पर्धेची उद्दिष्टे :**

१) शिक्षकांच्या आशयज्ञानाची पडताळणी करणे.

२) शिक्षकांच्या अध्ययन-अध्यापनात समाविष्ट असणाऱ्या शिक्षणशास्त्रातील मूलभूत संकल्पनांबाबतची उपयोगिता अभ्यासणे.

३) शिक्षकांना दैनंदिन अध्यापनात येणाऱ्या अडचणींचा मागोवा घेणे.

४) शिक्षकांमध्ये नवनवीन शैक्षणिक पद्धतींबद्दल जागरूकता वाढविणे.

५) शिक्षकांची विविध शैक्षणिक तंत्रज्ञानाबाबतची जागरूकता वाढविणे.

६) शिक्षकांच्या विद्यार्थ्यांसोबत होणाऱ्या आंतरक्रियांबाबत माहिती घेणे.

**स्पर्धेचे स्वरूप :** वैयक्तिक

**स्पर्धेचा स्तर :**

१) तालुका स्तर २) जिल्हा स्तर ३) विभाग स्तर ४) राज्य स्तर

**स्पर्धेचा आशय :**

१) बी. एड. अभ्यासक्रमावर (शिक्षणशास्त्रावर) आधारित प्रश्न.

२) शिक्षकांच्या दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर आधारित प्रश्न.

३) शिक्षणक्षेत्रात अंतर्भूत झालेल्या नवनवीन संकल्पना, शासन निर्णय, चालू घडामोडी इ. वर आधारित प्रश्न.

**स्पर्धेचे नियम व कार्यपद्धती :**

- सदर स्पर्धचे आयोजन हे वैयक्तिक स्वरूपात करण्यात येईल.
- राज्यातील सर्व शिक्षकांना या स्पर्धेबाबत अवगत करण्यात येईल.

**तालुकास्तरीय स्पर्धा :**

१) तालुका स्तरावरून स्पर्धा आयोजनाबाबत सर्व शिक्षकांना अवगत करण्यात येईल.

२) सदर स्पर्धेत भागघेण्यासाठी इच्छुक शिक्षकांसाठी तालुका स्तरावर एक लिंक तयार केली जाईल.

३) या स्पर्धेचे आयोजन हे लेखी स्वरूपात केले जाईल.

४) ही परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल.

५) एकूण १५० प्रश्न प्रत्येकी १ गुण : एकूण गुण - १५०. वेळ ९० मिनिटे.

६) गुणानुक्रमे पहिले ३ शिक्षक जिल्हा स्तरासाठी पात्र असतील.

**जिल्हास्तरीय स्पर्धा :**

१) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल.

२) एकूण १५० प्रश्न – प्रत्येकी १ गुण : एकूण गुण – १५०. वेळ ९० मिनिटे.

३) उणे गुणदान पद्धत (Negative Marking System) असेल.

एखाद्या प्रश्नाचे उत्तर चुकल्यास १ गुण कमी करणे, याशिवाय एकूण चुकलेल्या प्रश्नांच्या संख्येनुसार प्रत्येकी ४ चुकीच्या उत्तरांसाठी १ गुण कमी करणे.

४) गुणानुक्रमे पहिले ३ शिक्षक विभाग स्तरासाठी पात्र असतील.

**विभागस्तरीय स्पर्धा :**

१) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल.

२) एकूण १०० प्रश्न – प्रत्येकी १ गुण : एकूण गुण – १००. वेळ ६० मिनिटे.

३) उणे गुणदान पद्धत (Negative Marking System) असेल.

एखाद्या प्रश्नाचे उत्तर चुकल्यास १ गुण कमी करणे, याशिवाय एकूण चुकलेल्या प्रश्नांच्या संख्येनुसार प्रत्येकी ४ चुकीच्या उत्तरांसाठी १ गुण कमी करणे.

४) पाठ निरीक्षण ५० गुण.

५) मुलाखत ५० गुण.

६) एकूण गुण २०० पैकी जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ३ शिक्षकांची निवड राज्य स्तरासाठी केली जाईल.

**राज्यस्तरीय स्पर्धा :**

१) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल.

२) एकूण १०० प्रश्न प्रत्येकी १ गुण : एकूण गुण – १००. वेळ ६० मिनिटे.

३) उणे गुणदान पद्धत (Negative Marking System) असेल.

एखाद्या प्रश्नाचे उत्तर चुकल्यास १ गुण कमी करणे, याशिवाय एकूण चुकलेल्या प्रश्नांच्या संख्येनुसार प्रत्येकी २ चुकीच्या उत्तरांसाठी १ गुण कमी करणे.

४) पाठ निरीक्षण ५० गुण.

५) मुलाखत ५० गुण.

६) एकूण गुण २०० पैकी जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ३ शिक्षकांची निवड राज्य स्तरासाठी केली जाईल.

**स्पर्धेचे वेळापत्रक :**

१) तालुका स्तर आयोजन

२) जिल्हा स्तर आयोजन

३) विभाग स्तर आयोजन

४) राज्य स्तर आयोजन

} शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल.

**आर्थिक तरतूद :**

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | स्तर | तपशील | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | प्रश्नपेढी निर्मिती कार्यशाळा | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक | एकूण २ कार्यशाळा प्रत्येकी ३ दिवस २० शिक्षक × ६ दिवस × रक्कम शासकीय नियमानुसार | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | प्रश्नपत्रिका छपाई | तालुका स्तर | अंदाजे १००० शिक्षक × ३५८ तालुके × रक्कम शासकीय नियमानुसार | |
| | | जिल्हा स्तर | अंदाजे ६० शिक्षक × ३६ जिल्हे × रक्कम शासकीय नियमानुसार | |
| | | विभाग स्तर | अंदाजे २४ शिक्षक × ८ विभाग × रक्कम शासकीय नियमानुसार | |
| ३) | मुलाखत तज्ज्ञ मानधन | विभाग स्तर | ८ विभाग × ३ तज्ज्ञ × रक्कम शासकीय नियमानुसार | |
| | | राज्य स्तर | ३ तज्ज्ञ × रक्कम शासकीय नियमानुसार | |

| ४) | विजेत्यांना पारितोषिके | स्तर | एकूण | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हा | ३६ | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| | | विभाग | ०८ | | | |
| | | राज्य | ०१ | | | |
| **एकूण** | | | | | | |

◈◈◈

# १२) पोस्टर्स बनविणे (Poster Making)

**पोस्टर्स बनविणे (Poster Making) स्पर्धा :** राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी आहे.

**स्पर्धेचे नियम :**

१) प्रत्येक जिल्ह्याने जास्तीत जास्त दोन स्पर्धक पाठवावेत.

२) स्पर्धेसाठी एक दिवस अगोदर विषय दिले जातील.

३) स्पर्धेसाठी वेळ २.३० तासांचा असेल.

४) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे.

५) आयोजकांतर्फे फक्त कागद दिला जाईल.

६) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**स्पर्धेची गुणदान योजना :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | कल्पकता | १० |
| २) | रंगसंगती | १० |
| ३) | मांडणी | १० |
| ४) | सफाईदारपणा | १० |
| ५) | एकूण प्रभाव | १० |
| **एकूण गुण** | | **५०** |

**जिल्हास्तरीय स्पर्धा – अपेक्षित खर्च योजना :**

| अ. क्र. | तपशील | सहभागी संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर स्पर्धा | प्रतिशाळा १ स्पर्धक प्रमाणे | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | तालुका स्तर स्पर्धा | २५८(प्रति केंद्र ३ स्पर्धकप्रमाणे) | |
| ३) | सहभागी प्रवास भत्ता | २५८ | |
| ४) | सभागृह | १ | |
| ५) | परीक्षक मानधन | ३ | |
| ६) | ध्वनिक्षेपक व विद्युत व्यवस्था | १ | |

| अ. क्र. | तपशील | | एकूण |
|---|---|---|---|
| ७) | स्टेशनरी | | रक्कम शासकीय नियमानुसार |
| ८) | प्रमाणपत्र | | |
| ९) | पारितोषिक | | |
| १०) | इतर आनुषंगिक खर्च– पाणी, बॅनर, बुके इत्यादी. | | |
| एकूण | | | |

**टीप :** १) स्पर्धा एकदिवसीय असेल याप्रमाणे नियोजन केले आहे.

२) व्यवस्थापनासाठी ५ अधिकारी व कर्मचारी अधिकचे असतील.

**राज्यस्तरीय स्पर्धा : अपेक्षित खर्च योजना**

| अ. क्र. | तपशील | सहभागी संख्या | दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | निवास व्यवस्था | ७२ | – | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | भोजन, अल्पोहार व चहा | ७२ + ५ = ७७ | – | |
| ३) | सहभागी प्रवास भत्ता | ७२ | – | |
| ४) | सभागृह | १ | – | |
| ५) | परीक्षक मानधन | ३ | – | |
| ६) | ध्वनिक्षेपक व विद्युत व्यवस्था | १ | – | |
| ७) | स्टेशनरी | ७२ | – | |
| ८) | प्रमाणपत्र | ७२ प्रमाणपत्र | – | |
| ९) | पारितोषिक | ५ | – | |
| १०) | इतर आनुषंगिक खर्च – पाणी, बॅनर, बुके इ. | | – | |
| एकूण | | | | |

**टीप :** १) स्पर्धा एकदिवसीय असेल याप्रमाणे नियोजन केले आहे.

२) व्यवस्थापनासाठी अधिकारी व कर्मचारी ५ अधिकचे असतील.

**संभाव्य विषय :**

१) पर्यावरण संरक्षण

२) लिंगसमभाव

३) शाश्वत विकासाची ध्येये

४) आत्मनिर्भर भारत

५) करो योग, रहो निरोग

६) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)

७) एक भारत, श्रेष्ठ भारत!

८) लोकशाहीचा आधारस्तंभ प्रसारमाध्यमे

९) विषमुक्त आधुनिक शेती

१०) सायबर सुरक्षा

**टीप :** वरील विषयांपैकी कोणतेही पाच विषय निवडता येतील.

◈◈◈

# १३) वक्तृत्व स्पर्धा

**प्रस्तावना :**

राज्यातील सत्र शिक्षक व अधिकारी हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्न करत असतात, गुणवत्तेचा ध्यास घेतलेले शिक्षक अधिकारी अनेक पुस्तकांचे व नवनवीन योजनांचे वाचन करत असतात. वाचनातून ते प्रगल्भ बनतात. हेच प्रगल्भ विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत शिक्षक व अधिकाऱ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी गट :**

अंगणवाडी कार्यकर्त्या/सेविका, प्राथमिक शाळेत अध्यापन करणारे उपशिक्षक, पदवीवर शिक्षक व मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक व मुख्याध्यापक तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमध्ये कार्यरत असलेले साधन व्यक्ती व अधिकारी या सर्वांसाठी एकाच गटामध्ये स्पर्धा घेण्यात येईल. सदर स्पर्धा सर्व व्यवस्थापन सर्व माध्यमांच्या शाळांच्या शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी खुली आहे.

**प्रस्तुत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे टप्पे पुढीलप्रमाणे :**

१) **केंद्र स्तर :**

प्रत्येक केंद्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक व मुख्याध्यापकांचा या स्तरात समावेश असेल. केंद्र स्तरावर स्पर्धा घेऊन सदर स्पर्धेमधून एका स्पर्धकाची निवड तालुका स्तरासाठी केली जाईल.

२) **तालुका स्तर :**

प्रत्येक केंद्रातून निवड झालेल्या स्पर्धकांची तालुका स्तरावर स्पर्धा घेण्यात येईल. प्रत्येक तालुक्यातून तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतून एक याप्रमाणे जिल्ह्यासाठी स्पर्धकांची निवड केली जाईल.

३) **जिल्हा स्तर :**

जिल्हा स्तरावर प्रत्येक तालुक्यातून व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतून आलेल्या स्पर्धकांची स्पर्धा घेण्यात येईल व एका स्पर्धकाची निवड राज्य पातळीसाठी करण्यात येईल.

४) **राज्य स्तर :**

प्रत्येक जिल्ह्यातून आलेल्या स्पर्धकांची राज्य स्तरावर स्पर्धा घेऊन प्रथम पाच क्रमांक घोषित केले जातील.

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेची उद्दिष्टे :**

१) पूर्वप्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरांवरील तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील कर्मचारी व अधिकारी यांना वाचन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

२) शिक्षक व अधिकाऱ्यांना आपले विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

३) शिक्षक व अधिकारी यांना सतत नावीन्याचा शोध येणे, विश्लेषण करणे, सर्जनशील विचार करणे, शिक्षण क्षेत्रातील नवनवीन संकल्पना आत्मसात करणे इत्यादी बाबींसाठी उत्तेजन देणे.

४) शिक्षक व अधिकाऱ्यांच्या मौलिक विचारांचा शिक्षणप्रवाहात समावेश करणे.

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी काही नमुना विषय :**

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२०.

२) पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञानाची (FLN) गरज

३) शिक्षणाची ध्येय गाठण्यासाठी सद्यःस्थितीतील अडथळे

४) शाश्वत विकासात शाळेची भूमिका

५) मातृभाषा आणि शिक्षण

६) स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व शिक्षणव्यवस्थेसमोरील आव्हाने

७) ऑनलाइन, ऑफलाईन शिक्षण वास्तव व भविष्य

८) माझे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठीचे प्रयत्न

९) शिक्षणातील नवप्रवाह.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी नियमावली :**

१) स्पर्धेसाठी वेळ ही ०७ मिनिटांची असेल.

२) वक्तृत्वामुळे कोणताही सामाजिक वाद निर्माण होणार नाही याची खबरदारी स्पर्धकाने घ्यावी.

३) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबत कोठेही आणि कोणत्याही प्रकारचे आक्षेप घेता येणार नाहीत.

**परीक्षणाचे निकष :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | आशयाची मांडणी | ३० |
| २) | विचारांची स्पष्टता | ३० |
| ३) | उच्चार व आत्मविश्वास | २० |
| ४) | देहबोली/हावभाव/ डोळ्यांचा संपर्क | १० |
| ५) | एकूण प्रभाव | १० |
| **एकूण गुण** | | **१००** |

**स्पर्धेचे वेळापत्रक :**

| अ. क्र. | स्तर | संभाव्य दिनांक |
|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) | तालुका स्तर | |
| ३) | जिल्हा स्तर | |
| ४) | राज्य स्तर | |
| ५) | बक्षीस वितरण | |

**बक्षिसे व इतर आनुषंगिक बाबींसाठी खर्च :**

| अ. क्र. | स्तर | क्रमांक | बक्षिसाची रक्कम रु. | परीक्षकांसाठी मानधन (तीन परीक्षकांसाठी एकत्र) | स्पर्धांचे आयोजनासाठी (चहापान, स्वागत समारंभ, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह) मंजूर रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| | | द्वितीय | | | |
| | | तृतीय | | | |
| २) | तालुका स्तर | प्रथम | | | |
| | | द्वितीय | | | |
| | | तृतीय | | | |
| ३) | जिल्हा स्तर | प्रथम | | | |
| | | द्वितीय | | | |
| | | तृतीय | | | |
| ४) | राज्य स्तर | प्रथम | | | |
| | | द्वितीय | | | |
| | | तृतीय | | | |

**राज्यासाठी अंदाजे खर्च :**

| अ. क्र. | स्तर | सहभागी स्पर्धकांची संख्या | स्पर्धा आयोजन व सादील, भोजन, प्रवास खर्च व इतर | बक्षिसाची रक्कम रु. | परीक्षक मानधन | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र | | रक्कम शासकीय नियमानुसार | | | |
| २) | तालुका | | | | | |
| ३) | जिल्हा | | | | | |
| ४) | राज्य | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

◈◈◈

## १४) प्रवासवर्णन लेखन स्पर्धा

**स्पर्धेचे उद्दिष्टे** :

१) भारतीय सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी प्रवासाची आवड निर्माण करणे.

२) प्रवासवर्णन संदर्भात लेखन कौशल्य विकसित करणे.

**स्पर्धेसाठी पात्रता** :

स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित शाळांतील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी, तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

१) प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, कर्मचारी

२) कर्मचारी (शिक्षण विभाग)

३) पर्यवेक्षकीय अधिकारी (शिक्षण विभाग)

**नावनोंदणी प्रक्रिया :**

प्रत्येक केंद्रामधून वरील विभागातून स्पर्धकांनी सहभागी होता येईल.

**स्पर्धेची पद्धत :**

केंद्र, बीट, तालुका, जिल्हा विभाग व राज्य स्तर अशा प्रकारे स्पर्धेची अंमलबजावणी होईल.

मूल्यांकन धोरण, निवडीची संख्या आणि प्रत्येक टप्प्यावर नियुक्त केलेल्या मूल्यांकन कर्त्याची पात्रता.

१) मूल्यांकन धोरण व निवडीची संख्या – प्रत्येक टप्प्यावर परीक्षण करून तीन क्रमांक काढले जातील.

२) मूल्यांकनकर्त्याची पात्रता – तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात येईल.

३) जिल्हा स्तरावर प्राचार्य (डायट) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल.

स्पर्धा परीक्षणासाठी सदस्य संख्या पाच राहील. यामध्ये साहित्यिक व अधिकारी यांचा समावेश राहील. एकूण गुणांकन ५० गुणांचे राहील.

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | व्याकरण शुद्धता | १० |
| २) | भाषाशैली | १० |
| ३) | निसर्ग व संस्कृती निरीक्षणे | १० |

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| ४) | वाङ्मयीन मूल्य | १० |
| ५) | परिणामकारकता | १० |
| | **एकूण कमाल गुण** | ५० |

**बक्षिसाचे स्वरूप :**

केंद्र स्तर : प्रमाणपत्र, सन्मानचित्र, रोख रक्कम

तालुका स्तर : प्रमाणपत्र, सन्मानचित्र, रोख रक्कम

जिल्हा स्तर : प्रमाणपत्र, सन्मानचित्र, रोख रक्कम

विभाग स्तर : प्रमाणपत्र, सन्मानचित्र, रोख रक्कम

राज्य स्तर : प्रमाणपत्र, सन्मानचित्र, रोख रक्कम

**तपशिलासह एकूण खर्च : (अंदाजपत्रक)**

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | तालुका स्तर | | |
| ३) | जिल्हा स्तर | | |
| ४) | विभाग स्तर | | |
| ५) | राज्य स्तर | | |

**वेळापत्रक :**

१) नावनोंदणी

२) केंद्र स्तर मूल्यांकन

३) तालुका स्तर मूल्यांकन

४) विभाग स्तर मूल्यांकन

५) राज्य स्तर मूल्यांकन

(३ ते ५ : शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल.)

एकूण स्पर्धा अंदाजपत्रक रक्कम रु.

वरील रकमेमध्ये सर्व स्तरांवर बक्षीस, भोजन, खर्च, स्टेशनरी खर्च व जिल्हा विभाग राज्य स्तरावर प्रवास खर्च व राज्य विभाग स्तरावर निवासव्यवस्था इ. साठी वरील रक्कम आर्थिक निकषाचा आधारे खर्च करणे.)

**इतर तपशील :**

राज्यस्तरीय प्रवासवर्णन लेखन स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे निकष आहेत.

१) ही स्पर्धा केंद्र स्तर ते राज्य स्तर अशी आयोजित करण्यात आली आहे.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासनअंतर्गत कार्यरत असणाऱ्या नियमित अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांना स्पर्धेत सहभागी होता येईल.

३) शब्दमर्यादा १२०० ते १५०० असावी.

४) लेखन युनिकोडमध्ये टाईप करून MS word file व PDF स्वरूपात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे इमेलद्वारे पाठविण्यात यावे.

५) प्रवास पर्यटन विशिष्ट हेतूने केलेले असावे व त्यावर वस्तुनिष्ठ लेखन असावे.

६) प्रवासवर्णन हे उत्कंठा वाढवणारे व अस्सल अनुभव व लेखनात क्रमबद्धता असावी.

७) प्रवासवर्णन सांस्कृतिक, पारंपरिक, सामाजिक व साहित्यिक मूल्य जोपासणार असावे.

८) प्रवासवर्णन साध्या-सोप्या भाषेत असावे.

९) प्रवासवर्णन सूक्ष्म निरीक्षणातून करून आवश्यक तेथे छायाचित्रांचा उपयोग केला तरी चालेल.

१०) लेखन सर्जनशील व वाचकाला पर्यटनासाठी उद्युक्त करणारे असावे.

११) संस्मरणीय प्रसंगाची नोंद असावी.

१२) वादग्रस्त/आक्षेपार्ह मजकूर टाळून प्रवासवर्णन लेखन हे स्वनिर्मित असावे.

१३) केंद्र, बीट, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरांवर तीन क्रमांक काढले जातील.

१४) मराठी व उर्दू माध्यमासाठी स्वतंत्र निवडप्रक्रिया असेल.

१५) अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांचे एकच प्रवासवर्णन स्वीकारले जाईल.

१६) राज्य स्तरावर प्रवासवर्णन लेखकांची निवड होईल त्या लेखकांना सर्व हक्क परिषदेच्या स्वाधीन केल्याबद्दलचे शपथपत्र देणे बंधनकारक राहील, तसेच लिहिलेला मजकूर कॉपी-राईट मुक्त असल्याचे शपथपत्र द्यावे लागेल.

## लेखकांचे हमीपत्र

दिनांक :

मी ........................................................ पद : .......................... कार्यालय : ....................

मु.पो. : .................................... ता. : .................................... जि. : ................................

हमीपत्र लिहून देतो की, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे द्वाऱ्रे सन २०२५–२६ साठी प्रवास वर्णन लेखन स्पर्धा उपक्रमामध्ये लेखक म्हणून मी सहभाग घेतलेला आहे.

मी ................................................................ नावाचे प्रवासवर्णन लेखन हे स्वतः लिहिले असून यामधील सर्व मजकूर ,आशय, चित्रे इ. कॉपीराईट मुक्त आहेत तसेच राज्य स्तरावर माझ्या प्रवासलेखनाची निवड झाल्यास माझ्या लेखनविषयक सर्व प्रकारचे सर्व हक्क राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे विनामूल्य, विना तक्रार व संस्थेस आवश्यक अशा कार्यपद्धतीने या योजनेचा भाग म्हणून व विद्यार्थ्यांच्या हितार्थ स्वाधीन करण्यास तयार आहे.

◈◈◈

# १५) संगीत वाद्य वादन स्पर्धा

**प्रस्तावना :**

संगीत ही मानवी मनाला स्पर्श करणारी एक अद्‌वितीय कला आहे. ही कला म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भावना व्यक्त करण्याचे आणि मनाला शांतता देण्याचे सर्वोत्तम माध्यम आहे. वाद्य वादन हा संगीताचा एक अविभाज्य भाग असून, त्यामधून कलाकारांचे कौशल्य, निष्ठा आणि त्याच्या आत्म्याचा आवाज अनुभवायला मिळतो. ही स्पर्धा ही केवळ एक स्पर्धा नसून, ती शिक्षण क्षेत्रात कार्यरत कलाकारांना आपले कौशल्य सादर करण्याची आणि आपली कला पुढे नेण्याची एक सुवर्णसंधी आहे. ही स्पर्धा शिक्षण क्षेत्रात नवचैतन्य तर निर्माण करेलच त्याबरोबर संगीत वाद्याची जाण देऊन यातून भविष्यात उत्तम वादक तयार करण्यास प्रेरणा देणारी आणि अनुभवी कलाकारांना आपले स्थान सिद्‌ध करण्याची संधी प्रदान करणारी आहे.

**मुख्य उद्‌देश :**

संगीत वाद्य स्पर्धेचा मुख्य उद्‌देश शिक्षण क्षेत्रात कार्यरत प्रत्येक मानवी घटकामधील संगीतविषयक आवड व कौशल्य विकसित करणे आणि त्यांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी मंच उपलब्ध करून देणे हा आहे.

**सर्वसाधारण उद्‌दिष्टे :**

१) **संगीत प्रेमाला प्रोत्साहन :** संगीतविषयक आवड निर्माण करून सांस्कृतिक जाणीव वाढवणे. भारतीय संगीत कलेचा प्रचार व प्रसार करणे.

२) **प्रतिभेचा शोध :** वाद्य वादनामध्ये कुशलतेने पारंगत होणाऱ्या कलाकाराला ओळखणे आणि प्रोत्साहन देणे.

३) **सांस्कृतिक वारसा जपणे :** भारतीय पारंपरिक व आधुनिक वाद्यांचे महत्त्व समजावून देऊन त्यांचा प्रसार करणे.

५) **स्वतःचा आत्मविश्वास वाढवणे :** स्पर्धेतून सादरीकरण कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यासपीठावर वावरण्याचा अनुभव देणे.

६) **सामाजिक एकात्मता :** विविध प्रकारच्या संगीत वाद्यांच्या माध्यमातून सांस्कृतिक आदानप्रदान व एकोप्याची भावना निर्माण करणे.

७) **सर्जनशीलता वाढविणे :** या स्पर्धेच्या माध्यमातून सर्जनशीलतेला चालना देणे व याची बीजे विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.

ही स्पर्धा जरी शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्यासाठी असली तरी या माध्यमातून कलागुणाविषयी जाणीव जागृती होऊन पुढे विद्यार्थ्यांना नव्या गोष्टी शिकण्याची आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळणार आहे.

**स्पर्धेचे स्वरूप** :

संगीत वाद्य वादन स्पर्धा

**स्पर्धेचे प्रकार** :

**स्पर्धा दोन प्रकारात घेण्यात येतील.**

१) तालवाद्य वादन स्पर्धा (एकल)

२) स्वरवाद्य वादन स्पर्धा (एकल)

यांपैकी कोणत्याही एका प्रकारात स्पर्धक सहभागी होऊ शकतील.

**१) तालवाद्य वादन :** यामध्ये मृदंग, तबला, ढोल ही भारतीय तालवाद्ये असतील.

**२) स्वरवाद्य वादन :** यामध्ये व्हायोलिन, बासरी, सतार, हार्मोनियम, वीणा, सनई, संतूर ही भारतीय स्वरवाद्ये असतील.

**सहभागी स्पर्धक** :

१) शालेय शिक्षण विभागातील पूर्वप्राथमिक ते उच्च माध्यमिक व अध्यापक स्तरांवरील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित व विना अनुदानित शाळेतील शिक्षक.

२) शालेय शिक्षण विभागातील पूर्वशाळेतील कर्मचारी प्राथमिक ते उच्च माध्यमिक व अध्यापक स्तरांवरील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित व विना अनुदानित शाळेतील कर्मचारी.

३) शालेय शिक्षण विभागातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्व केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, प्रशासन अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व योजना), अधिव्याख्याता, वरिष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य, विभागीय उपसंचालक इत्यादी पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी.

**स्पर्धेचे स्तर :**

१) केंद्र स्तर संगीतवाद्य वादन स्पर्धा

२) तालुका स्तर संगीतवाद्य वादन स्पर्धा

३) जिल्हा स्तर संगीतवाद्य वादन स्पर्धा

४) राज्य स्तर संगीतवाद्य वादन स्पर्धा

➢ प्रत्येक केंद्रातून प्रथम क्रमांकाचा स्पर्धक तालुका स्तरावर भाग घेईल.

- प्रत्येक तालुक्यातून प्रथम क्रमांकाचा स्पर्धक जिल्हा स्तरावर भाग घेईल.
- प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचा स्पर्धक राज्य स्तरावर भाग घेईल.

**स्पर्धेचे सर्वसाधारण नियम** :

१) सादरीकरणाचा कालावधी ७ ते १० मिनिटांचा असेल.

२) सूर, ताल, शैलीची प्रमाणबद्धता, सादरीकरणाचे तंत्र व एकूण परिणाम या मुद्द्यांना अनुसरून गुणदान करण्यात येईल.

३) स्पर्धकाने स्वखर्चाने स्वतःला लागणारी वाद्ये व आवश्यकता असेल तर जास्तीत जास्त दोन साथीदार स्वखर्चाने स्वतः आणावेत.

४) स्पर्धकासोबत स्वतःचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.

५) स्पर्धेच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहण्याची जबाबदारी स्पर्धकाची असेल.

६) वेशभूषा, रंगमंच सजावट सादरीकरणाशी सुसंगत असावी.

७) इलेक्ट्रॉनिक वाद्य वापरता येणार नाहीत.

८) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया** :

शैक्षणिक वर्षात वरील स्पर्धा नोंदणी करता ऑनलाइन नोंदणी लिंक उपलब्ध करून देण्यात येईल. सदर गुगल लिंकवर इच्छुक स्पर्धकाला तालवाद्य किंवा स्वरवाद्य वादन स्पर्धेतील एका स्पर्धेत नाव नोंदणी करता येईल. स्पर्धकाला मिळालेल्या नोंदणी क्रमांकानेच पुढील स्तरावर स्पर्धेसाठी सहभागी होता येईल.

**संगीतवाद्य वादन (तालवाद्य व स्वरवाद्य-एकल) स्पर्धा मूल्यमापन** :

संगीत वाद्य वादन अंतर्गत तालवाद्य व स्वरवाद्य वादन स्पर्धेचे मूल्यमापन एकूण ५० गुणांचे होईल.

मूल्यमापन खालील मुद्द्यांनुसार होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सूर | – | १० गुण |
| २) | ताल | – | १० गुण |
| ३) | शैलीची प्रमाणबद्धता | – | १० गुण |
| ४) | सादरीकरणाचे तंत्र | – | १० गुण |
| ५) | एकूण परिणाम | – | १० गुण |
| ६) | एकूण मूल्यमापन गुण | – | ५० गुण |

- तालवाद्य (एकल) स्पर्धा – एक दिवस
- स्वरवाद्य (एकल) स्पर्धा – एक दिवस

**संगीत वाद्य वादन (तालवाद्य व स्वरवाद्य-एकल) स्पर्धा परीक्षक नियोजन** :

**१) केंद्र स्तर** : तालवाद्य परिक्षक ३, स्वरवाद्य परिक्षक ३

**२) तालुका स्तर** : तालवाद्य परिक्षक ३, स्वरवाद्य परिक्षक ३

**३) जिल्हा स्तर** : तालवाद्य परिक्षक ३, स्वरवाद्य परिक्षक ३

**४) राज्य स्तर** : तालवाद्य परिक्षक ३, स्वरवाद्य परिक्षक ३

**परीक्षक निवड पात्रता** :

१) परीक्षक संगीत वाद्य वादनातील तज्ज्ञ असावेत.

२) संगीतवाद्य वादन क्षेत्रातील किमान ७ वर्षांचा अनुभव असावा.

३) वाद्य वादन, कला क्षेत्रातील पदवी/प्रमाणपत्र धारक असल्यास प्राधान्य द्यावे.

४) स्वतः स्पर्धक नसावा.

**स्पर्धेचे बक्षीस नियोजन** :

**केंद्र स्तर** : १) तालवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी
२) स्वरवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी

**तालुका स्तर** : १) तालवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी
२) स्वरवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी

**जिल्हा स्तर** : १) तालवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी
२) स्वरवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी

**राज्य स्तर** : १) तालवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी
२) स्वरवाद्य स्पर्धा १ ते ३ क्रमांक रोख रक्कम प्रमाणपत्र व ट्रॉफी

**संगीतवाद्य वादन स्पर्धा : वेळापत्रक**

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर | स्पर्धा प्रकार | दिवस | स्पर्धेचा कालावधी | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | केंद्र स्तर | तालवाद्य स्पर्धा | पहिला दिवस | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| | | स्वरवाद्य स्पर्धा | दुसरा दिवस | | |

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर | स्पर्धा प्रकार | दिवस | स्पर्धेचा कालावधी | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| २ | तालुका स्तर | तालवाद्य स्पर्धा | पहिला दिवस | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| | | स्वरवाद्य स्पर्धा | दुसरा दिवस | | |
| ३ | जिल्हा स्तर | तालवाद्य स्पर्धा | पहिला दिवस | | |
| | | स्वरवाद्य स्पर्धा | दुसरा दिवस | | |
| ४ | राज्य स्तर | तालवाद्य स्पर्धा | पहिला दिवस | | |
| | | स्वरवाद्य स्पर्धा | दुसरा दिवस | | |

**संगीतवाद्य वादन (तालवाद्य व स्वरवाद्य – एकल) स्पर्धा अपेक्षित खर्च अंदाजपत्रक** :

**केंद्र स्तर**

**१) हॉल भाडे व साऊंड सिस्टीम :**

**२) बॅनर छपाई :**

**३) तज्ज्ञ परीक्षक मानधन :** तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा ६

**४) तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा :** बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी

| अ. क्र. | क्रमांक | रोख रक्कम | बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| २) | द्वितीय | | | |
| ३) | तृतीय | | | |
| **एकूण रक्कम** | | | | |

**५) इतर स्टेशनरी व आनुषंगिक खर्च :** रक्कम शासकीय नियमानुसार

**तालुका स्तर**

**१) भोजन, चहा व पाणी :**

**२) हॉल भाडे व साऊंड सिस्टीम :**

**३) बॅनर छपाई :**

**४) तज्ज्ञ परीक्षक मानधन :** ताल वाद्य व स्वर वाद्य स्पर्धा (रक्कम शासकीय नियमानुसार)

**५) तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा :** बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी

| अ. क्र. | क्रमांक | रोख रक्कम | बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| २) | द्वितीय | | | |
| ३) | तृतीय | | | |
| **एकूण रक्कम** | | | | |

**६) इतर स्टेशनरी व आनुषंगिक खर्च :** रक्कम शासकीय नियमानुसार

**जिल्हा स्तर**

**१) भोजन, चहा व पाणी :**
**२) हॉल भाडे व साऊंड सिस्टीम :**
**३) बॅनर छपाई :**
} रक्कम शासकीय नियमानुसार.

**४) तज्ज्ञ परीक्षक मानधन :** तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा ६

**५) तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा :** बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी

| अ. क्र. | क्रमांक | रोख रक्कम | बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| २) | द्वितीय | | | |
| ३) | तृतीय | | | |
| **एकूण रक्कम** | | | | |

**६) इतर स्टेशनरी व आनुषंगिक खर्च :** रक्कम शासकीय नियमानुसार

**राज्य स्तर**

**१) भोजन, चहा व पाणी :**
**२) हॉल भाडे व साऊंड सिस्टीम :**
} रक्कम शासकीय नियमानुसार.

**३) बॅनर छपाई :**

**४) तज्ज्ञ परीक्षक मानधन :** तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा ६

**५) तालवाद्य व स्वरवाद्य स्पर्धा :** बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी

} रक्कम शासकीय नियमानुसार.

| अ. क्र. | क्रमांक | रोख रक्कम | बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार | | |
| २) | द्वितीय | | | |
| ३) | तृतीय | | | |
| **एकूण रक्कम** | | | | |

**६) इतर स्टेशनरी व आनुषंगिक खर्च :** रक्कम शासकीय नियमानुसार

**संगीतवाद्य वादन अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक (Budget):**

**एक केंद्र स्तर, एक तालुका स्तर, एक जिल्हा स्तर व राज्य स्तर आनुषंगाने खर्च देण्यात आलेला आहे.**

| अ. क्र. | तपशील | एकूण संख्या | बक्षिस | सादील | परीक्षक मानधन | भोजन, चहा व पाणी | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | १ | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | |
| २) | तालुका स्तर | १ | | | | | |
| ३) | जिल्हा स्तर | १ | | | | | |
| ४) | राज्य स्तर | १ | | | | | |
| **एकूण** | | | | | | | |

**टीप :** सदरचे अंदाजपत्रक हे एका केंद्राचे, एका तालुक्याचे, एका जिल्ह्याचे व राज्य स्तराचे असे एकत्र तयार केलेले आहे.

- राज्यातील एकूण केंद्र : ४८६०
- राज्यातील एकूण तालुके : ३८७
- राज्यातील एकूण जिल्हे : ३६

यानुसार संगीतवाद्य वादन स्पर्धेचे खर्चाचे अंदाजपत्रक वाढीव होईल.

## संगीत वाद्य वादन (तालवाद्य व स्वरवाद्य) स्पर्धा मूल्यमापन प्रपत्र

**स्पर्धेचा स्तर : केंद्र/तालुका/जिल्हा/राज्य**

| दिनांक व अ. क्र. | स्पर्धकाचे नाव | वाद्याचा प्रकार ताल/स्वर वाद्य | सूर १० गुण | ताल १० गुण | शैलीची प्रमाणबद्धता १० गुण | सादरी-करणाचे तंत्र १० गुण | एकूण परिणाम १० गुण | एकूण ५० गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| परीक्षक क्र. १ | परीक्षक क्र. २ | परीक्षक क्र. ३ |
| स्वाक्षरी : | स्वाक्षरी : | स्वाक्षरी : |
| परीक्षकाचे नाव : | परीक्षकाचे नाव : | परीक्षकाचे नाव : |

**फलनिष्पत्ती** :

- संगीत कलेला प्रोत्साहन मिळेल. शिक्षण क्षेत्रातील घटकांमध्ये संगीताविषयी आवड निर्माण होऊन सांस्कृतिक जाणीव वाढेल. भारतीय संगीत कलेचा प्रचार व प्रसार होईल.
- वाद्यवादनामध्ये कुशलतेने पारंगत होणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन मिळेल.
- भारतीय पारंपरिक व आधुनिक वाद्यांचे महत्त्व समजावून देऊन त्यांचा प्रसार होईल.
- स्पर्धेतून सादरीकरण कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यासपीठावर वावरण्याचा अनुभव मिळेल.
- विविध प्रकारच्या संगीत वाद्यांच्या माध्यमातून सांस्कृतिक आदानप्रदान व एकोप्याची भावना निर्माण होईल.
- स्पर्धेच्या माध्यमातून सर्जनशीलतेला चालना मिळेल व याची बीजे विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे सोपे होईल.

◈◈◈

## १६) सुलेखन स्पर्धा (Calligraphy Competition)

**स्पर्धेचा उद्देश (Aim of the competition) :**

कलात्मकता आणि सुलेखन कौशल्याला प्रोत्साहन देणे.

**स्पर्धेसाठी पात्रता (Eligibility of the teachers for the competition if applicable) :**

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत अध्यापन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच शिक्षण विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

- वयोमर्यादा : १८ ते ५८ वर्षे
- कलात्मक लेखन : अक्षर आकार व डिझाइन
- लेखनातील सुस्पष्टता : सुलभ व वाचनीय

**स्पर्धेची नोंदणी (Process of enrolment one from each cluster) :**

सदर स्पर्धेची नोंदणी किमान एक महिना आधी सुरू होईल.

**स्पर्धेचे स्वरूप (Syllabus of the competition) :**

- स्पर्धा देवनागरी, हिंदी व इंग्रजी या भाषांमध्ये होईल.
- मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्यातील गद्य, पद, अभंग, ओव्या, उतारा इ. प्रकारात लेखन करणे आवश्यक आहे.
- स्पर्धेचा कालावधी ३० मिनिटे असेल.

**लेखन साहित्य :**

सुलेखनासाठी आवश्यक असणारे साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे. उदा. पेन्सिल, ब्रश, टीप पेन, इंक (काळी व रंगीत), व्हाईट पेपर, कटर, खोडरबर इत्यादी.

**स्पर्धेचे स्तर :**

१) **तालुका स्तर** : तालुक्यातील सर्व केंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी सदर स्पर्धेसाठी पात्र असतील.

२) **जिल्हा स्तर** : प्रत्येक तालुक्यातून पहिले ०३ स्पर्धक जिल्हा स्तरासाठी पात्र असतील.

३) **राज्य स्तर** : जिल्हा स्तरावरील पहिला (एक) स्पर्धक राज्य स्तरासाठी पात्र असेल.

**परीक्षकांची पात्रता व मानधन:**

**परीक्षकांची पात्रता :**

- साक्षरता सुलेखन क्षेत्रात तज्ज्ञ असावा.
- कॅलिग्राफी किंवा कला क्षेत्रात मान्यता प्राप्त संस्थेतून शैक्षणिक अर्हता संपादित केलेली असावी (मास्टर डिग्री).

**मानधन :**

- परीक्षकांना मानधन तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तरावर शासकीय नियमानुसार असेल.

**पुरस्कार आणि प्रमाणपत्रे (Nature of recommended prizes) :**

शासन आदेशानुसार विजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र दिले जाईल.

**पारितोषिक स्वरूप :**

| अ. क्र. | स्तर | क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | तालुका | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| २) | जिल्हा | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |
| ३) | राज्य | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व विशेष पुरस्कार |
| | | द्वितीय | |
| | | तृतीय | |

**अंदाजे खर्च (Total cost needed at each stage and overall cost with all minute details) :**

| अ. क्र. | खर्चाची बाब | अंदाजे खर्च | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रोख बक्षिसे व ट्रॉफी, प्रमाणपत्र | | **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** | **विशेष पुरस्कार** | **एकूण** |
| | | राज्य स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | |
| | | जिल्हा स्तर | | | | | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>खर्चाची बाब</th><th colspan="6">अंदाजे खर्च</th></tr>
<tr><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td>तालुका स्तर</td><td colspan="5">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td colspan="4">एकूण</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="5">२)</td><td rowspan="5">परीक्षक मानधन</td><td colspan="2"></td><td>परीक्षक संख्या</td><td colspan="2">प्रति परीक्षक मानधन</td><td>एकूण</td></tr>
<tr><td>राज्य स्तर</td><td></td><td>६</td><td colspan="2" rowspan="3">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td rowspan="3">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>जिल्हा स्तर</td><td>३६</td><td>३</td></tr>
<tr><td>तालुका स्तर</td><td>३५८</td><td>३</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण</td><td></td></tr>
<tr><td rowspan="4">३)</td><td rowspan="4">स्पर्धा आयोजन व पुरस्कार वितरण कार्यक्रम</td><td>तालुका स्तर</td><td colspan="4" rowspan="3">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td rowspan="3">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>जिल्हा स्तर</td></tr>
<tr><td>राज्य स्तर</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण</td><td></td></tr>
<tr><td colspan="8">एकूण खर्च अक्षरी –</td></tr>
</table>

**खर्चाचे निकष :**

हॉल भाडे, स्टेशनरी खर्च, जाहिरात खर्च, वैद्यकीय सुविधा खर्च, ध्वनिक्षेपक, आकस्मित व आनुषंगिक खर्च

**स्पर्धेचे वेळापत्रक** :

<table>
<tr><th>कालावधी</th><th>स्तर</th></tr>
<tr><td rowspan="3">शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.</td><td>तालुका स्तर</td></tr>
<tr><td>जिल्हा स्तर</td></tr>
<tr><td>राज्य स्तर</td></tr>
</table>

**सर्वसाधारण सूचना** :

१) दिलेल्या कालावधीमध्ये लेखन पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) अनुकरणात्मक लिखाण केल्यास स्पर्धकास स्पर्धेतून बाद केले जाईल.

३) एक स्पर्धक एकाच भाषेतून स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकतो.

४) स्पर्धकांसाठी ओळखपत्र आवश्यक असेल.

५) स्पर्धेसाठी दिलेल्या कागदावरच स्पर्धकाने सुलेखन करणे आवश्यक आहे.

६) सुलेखन हे केवळ सुंदर हस्ताक्षर नसून आपण निवड केलेल्या साहित्य प्रकाराला न्याय देणारे असावे.

७) स्पर्धकांचे अभिप्राय घेतले जातील. या अभिप्रायाचा उपयोग भविष्यात सुधारणा करण्यासाठी होऊ शकेल.

८) मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषांतील एकाच भाषेत गद्य, पद्य, अभंग, ओव्या किंवा उतारा या प्रकारातील एकच लेखन निवडणे आवश्यक आहे.

९) चारोळ्या, सुभाषिते, सुविचार, म्हणी हे साहित्य सुलेखनामध्ये ग्राह्य धरले जाणार नाही.

१०) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**गुणदान निकष** :

**१) अक्षराची शुद्धता :**

अक्षर प्रमाणबद्ध, योग्य आकाराचे वळणदार, सुंदर व रेखीव असावे.

**२) वाक्यरचना :**

वाक्यरचनेत प्रमाणबद्धता, दोन शब्दांत योग्य अंतर आणि सुसूत्रता असावी.

**३) शुद्धलेखन :**

व्याकरणदृष्ट्या योग्य विरामचिन्हासह लेखन केलले असावे.

**४) लेखन टापटीपपणा :**

लेखनामध्ये टापटीपपणा, स्वच्छपणा व आकर्षकपणा असावा.

**५) समय पालन :**

ठरवून दिलेल्या वेळेतच लेखन पूर्ण करणे आवश्यक आहे.

◈◈◈

# १७) कथालेखन स्पर्धा

**स्पर्धेचा हेतू (Aim of the competition) :**

कथा ही एक लघु साहित्यकृती आहे, ज्यात एक विशिष्ट घटना, पात्रे आणि प्रसंगांचे वर्णन असते. कथेमध्ये कथानक (घटना), पात्रे, संवाद आणि भावनात्मक प्रवाह असतो. कथा मुख्यतः मनोरंजन, शिकवण, किंवा विचारप्रवर्तनासाठी लिहिली जाते. कथालेखन म्हणजे कल्पनेतील किंवा सत्यघटनेवर आधारित कथा तयार करणे. यामध्ये लेखक आपल्या अनुभवांना, कल्पनांना किंवा निरीक्षणांना एक सुसंगत आणि रसाळ स्वरूप देतो. कथालेखनात वर्णन, संवाद, भावनांचे चित्रण आणि गोष्टीचा संदेश यांचा विचार केला जातो.

**कथांचे प्रकार :**

१) **लघुकथा :** छोटी, साधारणपणे एका घटनेवर आधारित कथा.

२) **दंतकथा :** प्राचीन किंवा पौराणिक कथा, ज्या ऐतिहासिक असतात, पण त्यात अद्भुत घटक असतात.

३) **प्रेरणादायी कथा :** वाचकाला प्रेरित करते, सकारात्मक विचार देते.

४) **विनोदी कथा :** वाचकांना हसवते, आनंद देते.

५) **प्रेमकथा :** प्रेमाच्या भावनेवर आधारित कथा.

६) **बालकथा :** मुलांसाठी लिहिलेली साधी, समजण्यास सोपी परंतु बालरंजन करणारी कथा.

कथा ही विद्यार्थ्यांमध्ये भावनिक आणि मानसिक विकास घडवून आणू शकते. कथेच्या माध्यमातून नैतिकमूल्ये, शैक्षणिक संकल्पना आणि जीवन कौशल्ये शिकवणे सोपे होते. तसेच कथा विद्यार्थ्यांचे सर्जनशीलतेला चालना देते आणि विचार करण्याची क्षमता वाढवते. म्हणून कथालेखनाला खूप महत्त्व आहे.

**स्पर्धेसाठी नोंदणी :**

कथालेखन स्पर्धेसाठी प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक सहभागी होऊ शकतो. त्या शिक्षकाची निवड केंद्रप्रमुखांनी स्पर्धा न घेता करायची आहे. प्रत्येक केंद्रातून एक याप्रमाणे निवड केलेल्या शिक्षकांची स्पर्धा जिल्हा स्तरावर होईल व जिल्हात प्रथम पाच क्रमांकावर आलेल्या शिक्षकांची स्पर्धा राज्य स्तरावर होईल. कथालेखनाची भाषा ही मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांत असावी. कथालेखनाची PDF Soft Copy च्या स्वरूपात शिक्षकांनी सादर करणे आवश्यक आहे. सदर कथा संबधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या ई-मेलवर पाठवावी. कथा स्वलिखित असावी. Soft copy स्वरूपातील कथा Plagiarized नसावी. (copy pasted नसावी.) जिल्हा स्तरावर मूल्यमापन केल्यावर प्रथम पाच क्रमांकांवर असलेल्या कथा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

**कथा Plagiarism Check करण्यासाठी पुढील tools चा वापर करावा.**

१) **Turnitin :** शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रासाठी एक लोकप्रिय plagiarism checker, जो विशेषतः शैक्षणिक संस्थांमध्ये वापरला जातो.

२) **Grammarly :** हे लिखाण तपासण्यासाठी उपयुक्त असून, यात plagiarism detection देखील आहे.

३) **Que text :** वापरण्यास सोपे असलेले plagiarism checker, जे विविध स्रोतांमधून मजकुराची तुलना करते.

४) **Copyscape :** वेब पृष्ठांवरील मजकूरासाठी एक प्रभावी साधन, ज्याद्वारे ऑनलाइन कथा किंवा लेखांतील कॉपीराइट उल्लंघन तपासले जाऊ शकते.

५) **Plagscan :** शैक्षणिक आणि व्यावसायिक संस्थांमध्ये वापरले जाणारे plagiarism checker, जे वेगवेगळ्या फाइल फॉरमॅट्समध्ये मजकूर तपासते.

६) **Small SEO Tools Plagiarism Checker :** ऑनलाइन उपलब्ध असलेले मोफत साधन, जे साहित्याची विविध स्रोतांशी तुलना करते.

७) **Unicheck :** शिक्षण संस्थांमध्ये वापरले जाणारे टूल, जे जलद आणि अचूक plagiarism तपासणीसाठी प्रसिद्ध आहे.

८) **DupliChecker :** हे साधन मोफत आणि प्रीमियम अशा दोन्ही स्वरूपात उपलब्ध आहे, जे विविध प्रकारच्या फाईल्स आणि मजकुरासाठी तपासणी करते.

९) **Scribbr** : हे विशेषतः विद्यार्थी आणि संशोधकांसाठी वापरण्यात येते, जे साहित्याचा plagiarism तपासते आणि साहित्य सुधारणा सूचनाही देते.

१०) **Plagiarism Checker X :** हे साधन जलद आणि अचूक plagiarism तपासणीसाठी लोकप्रिय आहे आणि विविध फॉरमॅट्समध्ये काम करते.

**स्पर्धेचा अभ्यासक्रम (Syllabus of the competition) :**

**कथालेखनासाठी विषयांचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील. :**

१) निसर्ग आणि पर्यावरण
२) नैतिकमूल्ये आणि जीवन कौशल्ये
३) साहस आणि रोमांचक घटना
४) विज्ञान आणि तंत्रज्ञान
५) ऐतिहासिक घटना किंवा व्यक्तिरेखा
६) मैत्री, कुटुंब, समाजातील घटना
७) बालविवाह, स्त्री-शिक्षण, पर्यावरण रक्षण असे सामाजिक मुद्दे.

कथालेखनाचे विषय फक्त शैक्षणिक असावेत असे नाही. त्यात सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि कलात्मक विषयदेखील समाविष्ट करणे गरजेचे आहे. विविध विषयांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळते आणि त्यांचे विचार विस्तार होतो.

**राज्य व जिल्हा स्तरांवरील स्पर्धांची पद्धत (Mode of the competition at District and State level) :**

जिल्हास्तरीय कथालेखन स्पर्धा जाहीर केल्यानंतर प्राप्त झालेल्या कथा स्पर्धेस पात्र असतील. कथा पूर्णतः स्वलिखित असाव्यात तसेच पूर्व प्रकाशित नसाव्यात. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांना न्याय देणाऱ्या असाव्यात. जिल्हास्तरीय मूल्यमापन पूर्ण करून प्रथम पाच क्रमांकांच्या कथांना राज्य स्तरावर नामांकन करावे. यासाठी प्रथम पाच कथा SCERT महाराष्ट्र, पुणे यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. परिषदेमार्फत राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेचे मूल्यमापन पूर्ण करून राज्य स्तरावर प्रथम पाच कथांना पारितोषिक जाहीर करण्यात येईल.

राज्यस्तरीय विजेत्यांच्या कथांचे संकलन करून प्रकाशित करण्यात येईल. यासाठी पुढीलपैकी पर्याय अलबंबण्यात येईल. १) विजेत्या कथांचे स्वतंत्र पुस्तक प्रकाशन किंवा २) जीवन शिक्षण/किशोर, दिवाळी अंक आदींसारख्या मासिकांमधून प्रकाशित करणे.

**कथालेखन निकष व गुणदान :**

मूल्यमापनासाठी रुब्रिक (rubric) सारख्या साधनांचा वापर करण्यात येईल. रुब्रिकमध्ये प्रत्येक निकषासाठी विशिष्ट गुण आणि त्याच्या विवरणांची सविस्तर यादी दिली जाते. यामुळे मूल्यमापन करताना पारदर्शकता आणि एकसारखेपणा राहतो.

**कथालेखन निकष व गुणदान**

| अ. क्र. | निकष | गुण | तपशील |
|---|---|---|---|
| १) | कथा विषयाची सुसंगती | १० | दिलेल्या विषयाशी कथा किती सुसंगत आहे. विषयाचे योग्य व प्रभावीपणे पालन केले आहे का? |
| २) | सर्जनशीलता व कल्पकता | १० | कथेत नवीन, सर्जनशील विचार आणि कल्पनांचा वापर. कथा किती वेगळी, नवीन आणि कल्पक वाटते, पुढे काय याची उत्सुकता वाढवणारी आहे का? |
| ३) | भाषा आणि शैली | १० | कथा लिहिण्याची भाषा किती ओघवती आणि स्पष्ट आहे. शैलीची सातत्यता आणि वाचनीयता. |
| ४) | पात्रांची निर्मिती व त्यांचा विकास | १० | पात्रे किती प्रभावी आणि यथार्थ आहेत? त्यांच्या भावना आणि व्यक्तिमत्त्वांचा विकास कसा झाला आहे? |

| अ. क्र. | निकष | गुण | तपशील |
|---|---|---|---|
| ५) | संवाद व वर्णनशैली | १० | संवाद नैसर्गिक आणि कथानकाच्या गरजेनुसार आहेत का? वर्णन शैली प्रभावी आहे का? |
| ६) | कथानकाची रचना | १० | कथा सुरुवात, मध्य आणि शेवट अशा रचनांनुसार बांधली आहे का? कथेत कुठेही अनियमितता किंवा विस्कळीतपणा नसावा. |
| ७) | भावनिक गुंतवणूक | १० | कथा वाचकांना भावनिक स्तरावर गुंतवून ठेवते? कथा वाचून प्रेरणा, संवेदनशीलता किंवा विचार निर्माण करते का? |
| ८) | नीतिमूल्ये आणि सामाजिक संदेश | १० | कथेत काही नीतिमूल्ये किंवा सामाजिक संदेश दिले आहेत का? संदेश प्रभावीपणे मांडले आहेत का? |
| ९) | मौलिकता | १० | कथा स्वतःची मौलिक आहे का? कुठेही अनुकरण किंवा नकल केलेली नसावी, पूर्वप्रकाशित नसावी. |
| १०) | शब्दमर्यादा | १० | स्पर्धेच्या नियमांनुसार दिलेल्या शब्दमर्यादेचे पालन केले आहे का? |
| | **एकूण** | **१००** | |

**टीप :** वरील अ. क्र. १ ते ९ निकषांना गुण देताना तपशिलामध्ये दिलेल्या मुद्द्यांचा विचार करून पुढील पदनिश्चयन श्रेणीचा वापर करावा. अतिउत्कृष्ट–१०, उत्कृष्ट–८, चांगला–६, मध्यम– ४, बरा– २, असमाधानकारक–० याप्रमाणे गुण द्यावेत. उदा. कथा विषयाची सुसंगती तपशिलानुसार अतिउत्कृष्ट असेल तर १० गुण द्यावे.

कथालेखनासाठी शब्दमर्यादा ५०० ते ७०० पर्यंत असावी. यासाठी एकच विषय असेल, की ज्यामुळे नावीन्यता, सर्जनशीलता इत्यादी कौशल्ये तपासता येतील, तसेच कथेला समर्पक आणि नावीन्यपूर्ण शीर्षक द्यावे.

परीक्षक लेखक, कथा कथनकार, नाट्य कलाकार, पत्रकार, निवेदक अशा क्षेत्रातील नामवंत व्यक्ती असावेत. जिल्हा आणि राज्य स्तरावर तीन तज्ज्ञ परीक्षक असावेत. जिल्हास्तरीय परीक्षक त्यांच्या वेळेनुसार ऑनलाइन स्वरूपात कथा वाचून मूल्यमापन निकषानुसार मूल्यमापन करून त्यांनी केलेले गुणदान जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेस पाठवतील. राज्यस्तरीय परीक्षक त्यांच्या वेळेनुसार ऑनलाइन स्वरूपात कथा वाचून मूल्यमापन निकषानुसार मूल्यमापन करून त्यांनी केलेले गुणदान SCERT महाराष्ट्र, पुणे या संस्थेस पाठवतील. SCERT मधील भाषा विभाग हा राज्य स्तरावरील कामकाज पाहील.

**Nature of recommended prizes :**

### जिल्हा व राज्य स्तरांवर बक्षिसांची तरतूद

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर | पारितोषिक क्रमांक | पारितोषिक रक्कम | जबाबदार संस्था |
|---|---|---|---|---|
| १) | राज्य स्तर | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार व ई–प्रमाणपत्र | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे |
| | | द्वितीय | | |
| | | तृतीय | | |
| | | उत्तेजनार्थ दोन पारितोषिक | ई–प्रमाणपत्र | |
| २) | जिल्हा स्तर | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार व ई–प्रमाणपत्र | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
| | | द्वितीय | | |
| | | तृतीय | | |
| | | उत्तेजनार्थ दोन पारितोषिक | ई–प्रमाणपत्र | |

**अधिकारी व शिक्षकांद्वारे लिहिल्या जाणाऱ्या कथांचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंध कसा जोडता येईल?**

१) परिपाठावेळी या कथांचे वाचन ठेवता येईल.

२) किशोर मासिकांमधून प्रकाशित झाल्यास वाचनासाठी उपलब्ध करून देता येतील.

३) प्रत्येक शाळेला साहित्यपेटी, वाचनपेटी यांमधून उपलब्ध करून देता येतील.

४) रेडिओवर या कथांचे वाचन कार्यक्रम आयोजित करून ते विद्यार्थी, पालकांना ऐकवता येईल.

५) फेसबुक लाईव्ह किंवा इतर कार्यक्रमांमधून (विविध जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांचे विविध उपक्रमांमधून ऐकवता येईल.)

६) मराठी भाषा दिन/हिंदी दिन यावेळी कथावाचन सादरीकरण घेता येईल.

**कथालेखन स्पर्धेसाठी एकूण अपेक्षित खर्च**

- **राज्य स्तर पारितोषिक :** प्रथम, द्वितीय, तृतीय एकूण = रक्कम शासकीय नियमानुसार
- **जिल्हा स्तर पारितोषिक :** प्रथम, द्वितीय, तृतीय एकूण = रक्कम शासकीय नियमानुसार एकूण ३६ जिल्हे
- **एकूण पारितोषिक रक्कम** : रक्कम शासकीय नियमानुसार

### तज्ज्ञ परीक्षक मानधन खर्च

जिल्हा आणि राज्य स्तरांवर तीन तज्ज्ञ परीक्षक असावेत आणि तज्ज्ञ परीक्षकास प्रत्येकी रक्कम शासकीय नियमानुसार मानधन असेल.

- **जिल्हा तज्ज्ञ परीक्षक मानधन खर्च** : एकूण ३६ जिल्हे × रक्कम शासकीय नियमानुसार
- **राज्य तज्ज्ञ परीक्षक मानधन खर्च** : रक्कम शासकीय नियमानुसार
- **एकूण मानधन खर्च** : रक्कम शासकीय नियमानुसार
- **एकूण पारितोषिक आणि मानधन खर्च** : रक्कम शासकीय नियमानुसार

**स्पर्धेचे प्रस्तावित टप्पे व सविस्तर वेळापत्रक**

| | |
|---|---|
| जिल्हास्तरीय कथालेखन स्पर्धेसाठी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाची निवड करणे. | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धा जाहीर करणे. | |
| जिल्हास्तरीय कथालेखन स्पर्धा – ऑनलाइन कथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मेलवर पाठवून सहभाग घेणे. | |
| जिल्हास्तरीय मूल्यमापन पूर्ण करणे, जिल्हास्तरावर प्रथम पाच क्रमांकाच्या कथा राज्य स्तरावर ई–मेल पाठविणे आणि जिल्हास्तरीय कथालेखन स्पर्धेचे निकाल घोषित करणे. | |
| राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेचे मूल्यमापन करणे. | |
| राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेचे निकाल घोषित करणे. | |

◈◈◈

# १८) शोधनिबंध स्पर्धा

**प्रस्तावना**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० हे एकविसाव्या शतकातील पहिले शिक्षण धोरण आहे. सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभांवर उभारलेले हे धोरण सांविधानिक मूल्यांवर आधारित आहे. प्रत्येक गावात, शाळेत, जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक समस्या असतात. पटनोंदणी, उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन अनुभव देण्याची पद्धती (अध्ययन पद्धती), मूल्यमापन यासंदर्भात अडचणी असतात. या अडचणी स्वतःच्या स्तरावर सोडविण्याची क्षमता अधिकारी व शिक्षकांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन शोधनिबंध स्पर्धा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा तालुका स्तर, जिल्हा स्तर, राज्य स्तरांवर आयोजित करण्यात येईल. याबाबत सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

**उद्दिष्टे :**

१) जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या समजून घेणे.

२) शैक्षणिक समस्या सोडविण्याची क्षमता अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांमध्ये विकसित करणे.

३) शिक्षकांचा संशोधनविषयक दृष्टिकोन विकसित करणे.

४) जिल्ह्यातील शिक्षकांना व अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**शोधनिबंध स्पर्धेकरिता शिक्षकांची निवडप्रक्रिया :**

१) शोधनिबंध स्पर्धा ही प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, अधिकारी व कर्मचारी अशा गटांत असेल.

२) यामध्ये नमूद केलेल्या विषयावर आधारित शोधनिबंधांचा विषय असावा.

३) स्पर्धा ही तीन स्तरांवर होईल

४) तालुकास्तरीय स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी गटशिक्षणाधिकारी यांचे राहील.

५) प्रत्येक तालुक्यातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

६) प्रत्येक तालुक्यातून तीन याप्रमाणे ३ तालुक्यांची संख्या याप्रमाणे शोधनिबंध जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

७) प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हा स्तर स्पर्धेमधून एक उत्कृष्ट शोधनिबंध निवडावा. त्याला प्रथम क्रमांक द्यावा. हा एक शोधनिबंध राज्यात स्तरावरील स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र ठरेल.

९) जिल्हा स्तरावरील स्पर्धा आयोजन व इतर सर्व जबाबदारी प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची राहील.

**शोधनिबंध स्पर्धेचे निकष** :

१) शोधनिबंधाचा विषय शैक्षणिक समस्यांची निगडित असावा.

२) शोधनिबंध लेखन २००० ते ३००० शब्दमर्यादेपर्यंत असावे.

३) शोधनिबंध लेखनाचा फॉन्ट युनिकोड असावा. फॉन्ट आकार १४ असावा.

४) शोधनिबंधाचे लेखन करून त्यांचे सादरीकरण करणे प्रत्येक स्पर्धकाला अनिवार्य राहील.

५) स्पर्धकांनी दिलेल्या कालावधीत सादरीकरण करावे, यासाठी ५ ते ७ मिनिटांचा वेळ असेल.

६) दिलेल्या नियमांचे पालन न केल्यास कोणत्याही स्तरावर स्पर्धकाला बाद ठरविण्याचा अधिकार आयोजकांना राहील.

७) प्रत्येक स्तरावर शोधनिबंधाचे लेखन तपासणी व सादरीकरणाचे मूल्यांकन करण्यासाठी परीक्षक नेमण्यात येतील.

८) शोधनिबंध स्पर्धेचे राज्य स्तराचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व SCERT महाराष्ट्र, पुणे यांच्या समन्वयाने करण्यात येईल. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

९) प्रत्येक जिल्हा सर्वोत्कृष्ट ठरलेला स्पर्धक राज्य स्तरावर आयोजित स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास पात्र ठरेल.

१०) या स्पर्धेचे आयोजन प्रत्येक जिल्ह्याने करावे.

**शोधनिबंध स्पर्धा अंदाजपत्रक** :

**तालुका स्तर**

- एकूण सहभागी व्यक्ती – ५०
- प्रति व्यक्ती खर्च – रक्कम शासकीय नियमानुसार
- राज्यातील एकूण तालुके – ३५८
- रक्कम शासकीय नियमानुसार

**राज्य स्तर**

- एकूण सहभागी व्यक्ती ३६ प्रति व्यक्ती खर्च – रक्कम शासकीय नियमानुसार
- रक्कम शासकीय नियमानुसार

### जिल्हा स्तर

- एकूण सहभागी व्यक्ती सरासरी : ५०
- प्रत्येक तालुक्यातून तीन क्रमांक : (३ व्यक्ती)
- प्रति व्यक्ती खर्च : रक्कम शासकीय नियमानुसार
- राज्यातील एकूण जिल्हे : ३६
- तालुका स्तर + जिल्हा स्तर + राज्य स्तर = एकूण रक्कम शासकीय नियमानुसार
- स्पर्धेसाठी एकूण अंदाजे रक्कम : रक्कम शासकीय नियमानुसार

**वेळापत्रक :**

| अ. क्र. | स्तर | कालावधी |
|---|---|---|
| १) | केंद्र स्तर शोधनिबंध स्पर्धा | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) | तालुका स्तर शोधनिबंध स्पर्धा | |
| ३) | जिल्हा स्तर शोधनिबंध स्पर्धा | |
| ४) | राज्य स्तर शोधनिबंध स्पर्धा | |

### बक्षिसांचे स्वरूप

प्रत्येक स्तरावर विजेत्या स्पर्धक शिक्षकाला प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येईल.

◈◈◈

# १९) सुडोकू, शब्दकोडे व प्रश्नमंजूषा

## १९.१ : सुडोकू स्पर्धा

**प्रारूप**

**अ) स्पर्धेचे प्रकार :** सुडोकू सोडविणे

**आ) स्पर्धा आयोजन स्तर :**

१) केंद्र स्तर : प्रथम क्रमांक

२) तालुका स्तर : प्रथम, द्वितीय, तृतीय

३) जिल्हा स्तर : प्रथम

४) विभाग स्तर : प्रथम, द्वितीय

५) राज्य स्तर : प्रथम, द्वितीय, तृतीय

**स्पर्धेसाठी गट :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**नियमावली :**

१) सुडोकू सोडविणे ही स्पर्धा अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी खुली असेल.

२) सुडोकू सोडविण्यासाठी दिलेला कालावधी ३० मिनिटे असेल.

३) जिल्हा, विभाग व राज्य स्तरांवर सुडोकूची काठिण्यपातळी केंद्र व तालुका स्तरांपेक्षा जास्त असेल.

४) सुडोकू स्पर्धेदरम्यान कोणतेही इलेक्ट्रॉनिक गॅझेट अथवा साहाय्य होईल असे साहित्य सोबत बाळगता येणार नाही.

५) स्पर्धेची जबाबदारी

- केंद्र स्तर : केंद्रप्रमुख/विस्तार अधिकारी (शिक्षण)
- तालुका स्तर : गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (अधिव्याख्याता), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
- जिल्हा स्तर : प्राचार्य/वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
- राज्य स्तर : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

६) स्पर्धा आयोजनाची जबाबदारी दिलेल्या व्यक्ती/संस्थेने पर्यवेक्षक व परीक्षक नेमावेत.

७) आयोजकांनी नियुक्त केलेला पर्यवेक्षक प्रत्यक्ष स्पर्धेचे पर्यवेक्षण करतील.

८) स्पर्धा आयोजक प्रत्येक स्पर्धकाची हजेरी हजेरीपत्रकावर नोंदवतील.

९) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सुडोकू सोडविण्याचा कागद पुरविण्यात येईल.

१०) पर्यवेक्षक स्पर्धा सुरू झाल्यानंतर सुडोकू सोडविण्यास सुरुवात केल्याची वेळेची नोंद करतील व स्पर्धकाने सुडोकू सोडविल्याचे घोषित केल्याची वेळ पर्यवेक्षक नोंदवतील. दोन्ही नोंदी बरोबर असल्याची खात्री आयोजक घेतील. त्यानंतर स्पर्धक व पर्यवेक्षक यांची सही घेतील व आयोजकही आपली सही करतील.

११) स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक स्तरावरील स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी त्या त्या स्तरावरील आयोजकांची असेल.

१२) केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) किंवा गट 'क' मधील अधिकारी व हे तालुका स्तर स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

१३) जिल्हा परिषद गटशिक्षण अधिकारी, उपशिक्षणअधिकारी, शालेय पोषण आहार अधीक्षक तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, कार्यालयीन अधीक्षक हे जिल्हा स्तरावरील स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

१४) परीक्षकाचा निर्णय अंतिम असेल.

१५) कमीत कमी वेळेत अचूक सुडोकू सोडविणाऱ्या स्पर्धकाला परीक्षक विजेता घोषित करतील.

१६) स्पर्धा आयोजन पूर्ण झाल्यानंतर पुढील स्तरावर निकालपत्रक देण्यात येईल.

- **केंद्र स्तर** : केंद्रप्रमुख/विस्तार अधिकारी (शिक्षण) हे केंद्र स्तरावरील निकाल तालुका स्तर आयोजक गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (डायट अधिकारी) यांच्याकडे देतील.
- **तालुका स्तर** : गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (डायट अधिकारी) तालुका स्तरावरील निकाल जिल्हा स्तर आयोजक प्राचार्य/वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे देतील.
- **जिल्हा स्तर** : प्राचार्य/वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था हे जिल्हा स्तरावरील निकाल राज्य स्तर आयोजक विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना देतील.

**१७) परीक्षक व पर्यवेक्षक यांचे मानधन**

| तपशील | परीक्षक | पर्यवेक्षक |
|---|---|---|
| जिल्हा स्तर | (रक्कम शासकीय नियमानुसार) | |
| राज्य स्तर | | |

## १८) बक्षीस

<table>
<tr><th>तपशील</th><th>प्रथम</th><th>द्वितीय</th><th>तृतीय</th><th>पुढील स्तरासाठी पात्र</th></tr>
<tr><td>केंद्र स्तर</td><td>प्रशस्तिपत्र</td><td>प्रशस्तिपत्र</td><td>प्रशस्तिपत्र</td><td>केंद्र स्तरावरील प्रथम क्रमांकाचा स्पर्धक तालुका स्तरासाठी पात्र</td></tr>
<tr><td>तालुका स्तर</td><td colspan="3" rowspan="2">(रक्कम शासकीय नियमानुसार)<br>पुस्तके व प्रशस्तिपत्र</td><td>तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाचा स्पर्धक जिल्हा स्तर स्पर्धेसाठी पात्र</td></tr>
<tr><td>जिल्हा स्तर</td><td>जिल्हा स्तरावरील प्रथम क्रमांकाचा स्पर्धक राज्य स्तरासाठी पात्र</td></tr>
<tr><td>राज्य स्तर</td><td colspan="3">(रक्कम शासकीय नियमानुसार)<br>रकमेची पुस्तके, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह</td><td>---</td></tr>
</table>

### स्पर्धा खर्च अंदाजपत्रक

<table>
<tr><th>तपशील</th><th>परीक्षक मानधन</th><th>पर्यवेक्षक मानधन</th><th>सहभाग प्रमाणपत्र</th><th>विजेते स्पर्धक बक्षीस</th><th colspan="2">अल्पोपहार/भोजन, प्रवास भत्ता, सादील, निवास</th></tr>
<tr><td>केंद्र स्तर</td><td colspan="2">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td>प्रति स्पर्धक व विजेते स्पर्धक साठी</td><td>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय</td><td>प्रति स्पर्धक<br>(चहापान)</td><td>रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>तालुका स्तर</td><td colspan="2">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td>प्रति स्पर्धक व विजेते स्पर्धक साठी</td><td>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय</td><td>प्रति स्पर्धक<br>(चहापान, भोजन)</td><td>रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>जिल्हा स्तर</td><td colspan="2">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td>प्रती स्पर्धक व विजेते स्पर्धक साठी</td><td>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय</td><td>प्रति स्पर्धक<br>(चहापान, भोजन)</td><td>रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>राज्य स्तर</td><td colspan="2">रक्कम शासकीय नियमानुसार</td><td>प्रति स्पर्धक व विजेते स्पर्धक साठी</td><td>प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय</td><td>प्रति स्पर्धक<br>(चहापान, भोजन)</td><td>रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
</table>

## १९.२ शब्दकोडे/क्रॉसवर्ड स्पर्धा

**प्रारूप** :

**अ) स्पर्धेचे प्रकार :**

१) शब्दकोडे निर्मिती

२) शब्दकोडे सोडविणे

**आ) स्पर्धा आयोजन स्तर :**

१) केंद्र स्तर : प्रथम क्रमांक

२) तालुका स्तर : प्रथम, द्वितीय, तृतीय

३) जिल्हा स्तर : प्रथम, द्वितीय

४) विभाग स्तर : प्रथम, द्वितीय

५) राज्य स्तर : प्रथम, द्वितीय, तृतीय

प्रत्येक स्तरावरील निवड झालेला प्रथम क्रमांकाचा स्पर्धक पुढील स्तरासाठी पात्र राहील.

**स्पर्धेसाठी गट :**

१) शिक्षक गट : स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांतील इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावीला अध्यापन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

२) अधिकारी गट : शिक्षण विभाग अधिकारी व कर्मचारी

**नियमावली :**

**शब्दकोडे निर्मितीसाठी नियमावली** :

१) शब्दकोडे सोडविणे ही स्पर्धा उपरोक्त स्पर्धकांसाठी खुली असेल.

२) शब्दकोडे निर्मिती स्पर्धा ही खालीलप्रमाणे गटासाठी देण्यात आलेल्या विषयासाठी असेल.

| अ. क्र. | गट | विषय |
|---|---|---|
| १) | शिक्षक गट – इयत्ता पहिली ते पाचवी | भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामान्यज्ञान |
| २) | शिक्षक गट – इयत्ता सहावी ते आठवी | भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र सामान्यज्ञान |
| ३) | शिक्षक गट – इयत्ता नववी ते बारावी | भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र वाणिज्य, सामान्यज्ञान |

३) शिक्षकांना कोणत्याही एकाच गटात सहभागी होता येईल.

४) प्रत्येक गटातील सहभागी शिक्षकास एकापेक्षा अधिक विषयांवर शब्दकोडी तयार करता येतील.

५) शब्दकोडे निर्मितीसाठी ६० मिनिटांचा वेळ असेल.

६) शब्दकोडे हे विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार, विषय व अभ्यासक्रमाशी सुसंगत असावे.

७) शब्दकोडे निर्मिती मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषांतून करावी.

८) शब्दकोडे हे आकाराने जास्तीत जास्त एका A-४ आकाराच्या कागदावर येईल एवढेच असावे.

९) शब्दकोडे निर्मिती सोबतच त्याची उत्तरसूची देखील द्यावी लागेल.

१०) शब्दकोडे निर्मितीनंतर स्तरनिहाय निवडीसाठी खालील निकषानुसार अंतिम विजेत्यांची निवड करण्यात येईल.

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी वयोगटानुसार योग्य | १० |
| २) | विषय व अभ्यासक्रमाशी सुसंगत | १० |
| ३) | नावीन्यपूर्ण | १० |
| ४) | विद्यार्थी विचारप्रक्रियेस चालना देणारे | १० |
| ५) | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता निर्माण करणारे | १० |
| **एकूण** | | **५०** |

**शब्दकोडे सोडविणे नियमावली :**

१) शब्दकोडे सोडविणे ही स्पर्धा स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचेसाठी खुली असेल.

२) स्पर्धा खालीलप्रमाणे ४ गटांमध्ये आयोजित करण्यात येईल.

| अ. क्र. | गट |
|---|---|
| १) | शिक्षक गट - इयत्ता पहिली ते पाचवी |
| २) | शिक्षक गट - इयत्ता सहावी ते सातवी |
| ३) | शिक्षक गट - इयत्ता नववी ते बारावी |
| ४) | शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी गट |

३) स्पर्धकांना कोणत्याही एकाच गटात सहभागी होता येईल.

४) शब्दकोडे सोडविण्यासाठी ४५ मिनिटांचा वेळ असेल.

५) कमी वेळेत अचूक शब्दकोडे सोडविणाऱ्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

६) खाडाखोड असलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

७) जिल्हा, विभाग व राज्य स्तरांवर शब्दकोड्याची काठिण्यपातळी केंद्र व तालुका स्तरांपेक्षा जास्त असेल.

८) शब्दकोडे स्पर्धेदरम्यान कोणतेही इलेक्ट्रॉनिक गॅझेट अथवा साहाय्य होईल असे साहित्य सोबत बाळगता येणार नाही.

९) स्पर्धेची जबाबदारी

- **केंद्र स्तर :** केंद्रप्रमुख/विस्तार अधिकारी (शिक्षण)
- **तालुका स्तर :** गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (अधिव्याख्याता), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
- **जिल्हा स्तर :** प्राचार्य/वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
- **राज्य स्तर :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

१०) स्पर्धा आयोजनाची जबाबदारी दिलेल्या व्यक्ती/संस्थेने पर्यवेक्षक व परीक्षक नेमावेत.

११) आयोजकांनी नियुक्त केलेला पर्यवेक्षक प्रत्यक्ष स्पर्धेचे पर्यवेक्षण करतील.

१२) स्पर्धा आयोजक प्रत्येक स्पर्धकाची हजेरी हजेरीपत्रकावर नोंदवतील.

१३) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला शब्दकोडे सोडविण्याचा कागद पुरविण्यात येईल.

१४) पर्यवेक्षक स्पर्धा सुरू झाल्यानंतर शब्दकोडे सोडविण्यास सुरुवात केल्याची वेळेची नोंद करतील व स्पर्धकाने शब्दकोडे सोडविल्याचे घोषित केल्याची वेळ पर्यवेक्षक नोंदवतील. दोन्ही नोंदी बरोबर असल्याची खात्री आयोजक घेतील. त्यानंतर स्पर्धक व पर्यवेक्षक यांची सही घेतील व आयोजकही आपली सही करतील.

१५) स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक स्तरावरील स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी त्या त्या स्तरावरील आयोजकांची असेल.

१६) केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) किंवा गट 'क' मधील कर्मचारी, अधिकारी हे तालुका स्तर स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

१७) जिल्हा परिषद गटशिक्षण अधिकारी, उपशिक्षण अधिकारी, शालेय पोषण आहार अधीक्षक तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, कार्यालयीन अधीक्षक हे जिल्हा स्तरावरील स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

१८) जिल्हा स्तरासाठी व राज्य स्तरासाठी सहभाग घेणाऱ्या स्पर्धकाला नियमानुसार प्रवासभत्ता देय राहील.

१९) परीक्षकाचा निर्णय अंतिम असेल.

२०) कमीत कमी वेळेत अचूक शब्दकोडे सोडविणाऱ्या स्पर्धकाला परीक्षक विजेता घोषित करतील.

२१) स्पर्धा आयोजन पूर्ण झाल्यानंतर पुढील स्तरावर निकालपत्रक देण्यात येईल.

- **केंद्र स्तर :** केंद्रप्रमुख/विस्तार अधिकारी (शिक्षण) हे केंद्र स्तरावरील निकाल तालुका स्तर आयोजक गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (डायट अधिकारी) यांच्याकडे देतील.
- **तालुका स्तर :** गटशिक्षणाधिकारी/संपर्क अधिकारी (डायट अधिकारी) तालुकास्तरावरील निकाल जिल्हा स्तर आयोजक प्राचार्य/वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे देतील.
- **जिल्हा स्तर :** प्राचार्य/जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था हे जिल्हा स्तरावरील निकाल राज्य स्तर आयोजक विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना देतील.

**अंदाजपत्रक** :

| अ. क्र. | स्तर | तपशील | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, अल्पोपहार, सादिल खर्च | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | तालुका स्तर | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, अल्पोपहार, सादिल खर्च | |
| ३) | जिल्हा स्तर | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, भोजन, प्रवास देयक, सादिल खर्च | |
| ४) | राज्य स्तर | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, भोजन, प्रवास देयक, सादिल खर्च | |

तालुका स्तर व जिल्हा स्तर अंदाजित खर्च हा त्या जिल्ह्यातील केंद्र व तालुका संख्येनुसार कमी जास्त होईल.

## १९.३ प्रश्नमंजूषा स्पर्धा

**अ) स्पर्धेचे प्रकार :**

१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी प्रश्नमंजूषा स्पर्धा.

**आ) स्पर्धेचे स्तर :**

१) केंद्र स्तर २) तालुका स्तर ३) जिल्हा स्तर ४) राज्य स्तर

**१) केंद्र स्तर :**

केंद्र स्तरावर प्रश्नमंजूषा स्पर्धा ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे घेण्यात येईल. स्पर्धेसाठी नोंदणी केलेल्या शिक्षकांना स्पर्धेसाठी तयार केलेल्या व्हॉट्सॲप गटात सहभागी होणे बंधनकारक राहील. स्पर्धेची लिंक व्हॉट्सॲप गटातच देण्यात येईल. केंद्र स्तरावरील स्पर्धेत ५० बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न असतील व त्यासाठी ३५ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. प्रत्येक केंद्रातील सहभागी स्पर्धकांमधून सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ३ स्पर्धकांना गुणानुक्रमे बक्षीस दिले जाईल.

केंद्र स्तरावर प्रथम क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकास तालुका स्तराच्या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल.

**२) तालुका स्तर :**

तालुका स्तरावरसुद्धा सदर स्पर्धा ऑनलाइन स्वरूपात गुगल फॉर्मद्वारेच घेण्यात येईल. यात ६० बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न असतील व ४० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. प्रत्येक तालुक्यातील सहभागी स्पर्धकांमधून सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ५ स्पर्धकांना गुणानुक्रमे बक्षीस दिले जाईल.

तालुका स्तरावर प्रथम क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकास जिल्हा स्तराच्या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल.

**३) जिल्हा स्तर :**

तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाचे विजेते स्पर्धक जिल्हा स्तराच्या स्पर्धेत सहभागी होतील. जिल्हा स्तरावरील स्पर्धेत, प्रत्येक तालुक्यातील सहभागी स्पर्धकांमधून सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ३ स्पर्धकांना गुणानुक्रमे बक्षीस दिले जाईल व जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक विजेत्या स्पर्धकाचे राज्य स्तरावर स्पर्धेसाठी नामनिर्देशन पाठविले जाईल. जिल्हा स्तरावर सर्व सहभागी स्पर्धकांसाठी सदर स्पर्धा खालीलप्रमाणे एकूण तीन फेरीत घेण्यात येईल.

**फेरी क्रमांक १ (सामान्य फेरी)** : सदर फेरीत प्रत्येक स्पर्धकाला ५ प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नासाठी ६० सेकंदाचा वेळ असेल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ४ गुण व चुकीच्या उत्तरासाठी १ गुण वजा करण्यात येईल.

**फेरी क्रमांक २ (बझर फेरी)** : सदर फेरीत एकूण १० प्रश्न विचारण्यात येतील. जो स्पर्धक सर्वात आधी बजर देईल, त्या स्पर्धकास प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संधी देण्यात येईल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ५ गुण देण्यात येतील व चुकीचे उत्तर दिल्यास २ गुण वजा करण्यात येतील. प्रथम संधी मिळालेल्या स्पर्धकाने उत्तर चुकीचे दिल्यास, दुसऱ्या स्पर्धकास की ज्याने दुसऱ्या क्रमांकावर बजर दिला होता फक्त त्याला संधी देण्यात येईल. स्पर्धकाने बजर दिल्यास प्रश्नाचे उत्तर द्यावेच लागेल.

**फेरी क्रमांक ३ (रॅपिड फायर राऊंड)** : सदर फेरीत प्रत्येक स्पर्धकाला ५ प्रश्न विचारण्यात येतील. या ५ प्रश्नांसाठी एकूण ६० सेंकदाचा अवधी असेल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ६ गुण. उत्तर येत नसल्यास प्रश्न पास करता येईल. या फेरीतील प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे असतील व प्रत्येक प्रश्नास चार पर्याय असतील. प्रश्न स्क्रीनवर दाखविण्यात येतील.

**४) राज्य स्तर** :

जिल्हा स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळालेल्या स्पर्धकास राज्य स्तरावर पाठविण्यात येईल. राज्य स्तरावर सदर स्पर्धा जिल्हा स्तरानुसार उपरोक्त प्रमाणे एकूण ३ फेरीत घेण्यात येईल. राज्य स्तरावर सहभागी स्पर्धकांमधून सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ५ स्पर्धकांना गुणानुक्रमे बक्षीस दिले जाईल व इतर सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्पर्धेचा गट** :

१) इयत्ता पहिली ते बारावीला अध्यापन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व तालुका ते जिल्हास्तरावरील अधिकारी व कर्मचारी

**नियमावली** :

१) प्रश्नमंजूषा स्पर्धेसाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सर्व प्रथम नोंदणी करावी लागेल. सदर नोंदणी ही गुगल फॉर्मद्वारे घेण्यात येईल. विहित मुदतीत नोंदणी केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाच सदर स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल.

२) केंद्र आणि तालुका स्तरांवर स्पर्धकांना समान गुण असल्यास, ज्या स्पर्धकाने सर्वांत आधी प्रश्नमंजूषा सोडवून सादर केली असेल, त्यांना प्राधान्य देण्यात येईल व बक्षिसासाठी विचारात घेतले जाईल.

३) केंद्र स्तरावर प्रत्येक केंद्रातून किमान ५ शिक्षक स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक राहील. एखाद्या केंद्रातून सहभाग कमी असल्यास, दोन केंद्र एकत्र करून केंद्र स्तर निकाल घोषित केला जाईल.

४) सदर स्पर्धा ही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी असेल.

५) सदर स्पर्धा ही सामान्यज्ञान, इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे इतिहास, भूगोल, विज्ञान, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयांचे विषयज्ञान, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, अध्यापन पद्धती, बालमानसशास्त्र, शैक्षणिक कृतिसंशोधन, ज्ञानरचनावाद, शालेय शिक्षण विभागातील कायदे व नियम, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (पहिली ते आठवीसाठी), चालू घडामोडी इत्यादी विषयांवर असेल.

६) सदर स्पर्धा मराठी माध्यमात असेल.

७) स्पर्धेबाबत अंतिम निर्णय हा आयोजकांचा असेल.

## प्रश्नमंजूषा स्पर्धा खर्च अंदाजपत्रक

| अ. क्र. | स्पर्धेचा स्तर | बक्षिस | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | १) प्रथम : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | | २) द्वितीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ३) तृतीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| २) | तालुका स्तर | १) प्रथम : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | २) द्वितीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ३) तृतीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ४) चतुर्थ : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ५) पाचवे : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| ३) | जिल्हा स्तर | १) प्रथम : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | २) द्वितीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ३) तृतीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| ४) | राज्य स्तर | १) प्रथम : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | २) द्वितीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ३) तृतीय : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ४) चतुर्थ : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | ५) पाचवे : बक्षीस रक्कम व प्रमाणपत्र | |
| | | उर्वरीत स्पर्धकांना प्रमाणपत्र | |
| ५) | इतर खर्च | सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, कार्यशाळा व इतर अनुषंगीक बाबी. | |
| **एकूण खर्च** | | | |

◈◈◈

# २०) समजपूर्वक (आकलनयुक्त) वाचन

**विभाग : इंग्रजी भाषा विभाग**

**समजपूर्वक (आकलनयुक्त) वाचनस्पर्धा नियम व अटी :**

**सामान्य नियम :**

१) **पात्रता** : ही स्पर्धा शिक्षक कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी आहे.

२) **भाषा** : स्पर्धा मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या भाषांमध्ये घेतली जाईल.

३) **कालावधी :** या स्पर्धेचा कालावधी ६० मिनिटांचा असेल.

**स्पर्धेचे स्वरूप :**

१) **गद्य भाग :** स्पर्धकांना वाचण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी उतारे किंवा गद्य भाग दिले जातील.

२) **प्रश्न :** उताऱ्यांशी संबंधित प्रश्नांची एक मालिका दिली जाईल.

३) **उत्तराचा प्रकार :** स्पर्धकांनी प्रश्नाच्या स्वरूपानुसार उत्तर द्यायचे आहे, उदा., लेखी उत्तरे, बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे.

४) **प्रश्न प्रकार :** प्रश्नांमध्ये बहुपर्यायी, लघुउत्तरे व निबंध प्रकारचे प्रश्न असू शकतात.

**स्पर्धकांसाठी नियम :**

१) **स्वतःहून सहभाग :** स्पर्धकांनी वैयक्तिक पातळीवर काम करणे आवश्यक आहे.

२) **बाह्य मदतीस मनाई :** स्पर्धकांना बाह्य स्रोतांकडून, त्यात इलेक्ट्रॉनिक उपकरणेही समाविष्ट आहेत, मदत घेण्याची परवानगी नाही.

३) **वेळ व्यवस्थापन :** स्पर्धकांनी दिलेल्या वेळेत सर्व प्रश्न पूर्ण करण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

४) **सहकार्य/गटबाजी निषिद्ध :** स्पर्धकांनी एकमेकांशी उत्तरे शेअर करू नयेत.

**मूल्यमापन निकष:**

१) **अचूकता :** गद्याच्या अनुषंगाने उत्तरे अचूक आणि सुसंगत लिहिली आहेत का हे तपासले जाईल.

२) **पूर्णता :** उत्तरे सर्व आवश्यक माहिती प्रदान करणारी असावीत.

३) **स्पष्टता :** उत्तरे स्पष्ट व संक्षिप्त असावीत.

४) **व्याकरण आणि शुद्धलेखन :** व्याकरण व शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असेल.

**इतर माहिती :**

१) **उशिरा सादर केलेली उत्तरे :** वेळमर्यादा पाळणे अनिवार्य असेल. उशिरा दिलेली उत्तरे स्वीकारली जाणार नाहीत.

२) **विवाद निवारण :** कोणताही वाद किंवा शंका या स्पर्धा आयोजकांकडून हाताळल्या जातील.

३) **छायाचित्रण व व्हिडिओग्राफी :** स्पर्धेदरम्यान स्पर्धकांचे छायाचित्रे आणि व्हिडिओ घेण्याचा अधिकार आयोजकांकडे राखून ठेवलेला आहे.

४) **वैयक्तिक वस्तू :** स्पर्धेदरम्यान आपल्या वैयक्तिक वस्तूंच्या सुरक्षततेसाठी स्पर्धक स्वतः जबाबदार असतील.

**समजपूर्वक (आकलनयुक्त) वाचनस्पर्धा मूल्यांकन (४० गुण) :**

**१) गद्य समज (१० गुण) :**

१) उताऱ्याचे उत्कृष्ट आकलन दर्शवणे. (८–१० गुण)

२) उताऱ्याचे चांगले आकलन दर्शवणे. (५–७ गुण)

३) उताऱ्याचे मध्यम आकलन दर्शवणे. (०–४ गुण)

**२) मुख्य कल्पना आणि पूरक माहिती ओळखण्याची क्षमता (१० गुण)**

१) मुख्य कल्पना व पूरक माहिती अचूकपणे ओळखणे. (८–१० गुण)

२) मुख्य कल्पना ओळखता येते, पण पूरक माहिती ओळखण्यात अडचण येते. (५–७ गुण)

**३) अनुमान काढण्याची क्षमता (१० गुण)**

१) उताऱ्यावर आधारित अचूक अनुमान काढणे. (८–१० गुण)

२) काही अनुमान अचूकपणे काढणे, पण काही चुका देखील राहणे. (५–७ गुण)

३) अचूक अनुमान काढण्यात अपयशी ठरणे. (०–४ गुण)

**४) विश्लेषण आणि मूल्यांकन करण्याची क्षमता (१० गुण)**

१) उत्कृष्ट विश्लेषण आणि मूल्यांकन कौशल्य दाखवणे. (८–१० गुण)

२) चांगले विश्लेषण आणि मूल्यांकन कौशल्य दाखवणे. (५–७ गुण)

३) समाधानकारक विश्लेषण आणि मूल्यांकन कौशल्य दाखवणे. (०–४ गुण)

**लेखन गुणवत्ता (३० गुण)**

**स्पष्टता आणि संक्षिप्तता (१० गुण)**

१) लेखन स्पष्ट, संक्षिप्त आणि समजण्यास सोपे आहे. (८–१० गुण)

२) लेखन बहुतेक स्पष्ट आणि संक्षिप्त आहे पण काही सुधारणा आवश्यक आहेत. (५–७ गुण)

३) लेखनात स्पष्टता आणि संक्षिप्ततेचा अभाव आहे. (०–४ गुण)

**रचना आणि सुसंगतता (१० गुण)**

१) लेखन व्यवस्थित आणि सुसंगत आहे. (८–१० गुण)

२) लेखन बऱ्यापैकी व्यवस्थित आणि सुसंगत आहे, पण काही सुधारणा आवश्यक आहेत. (५–७ गुण)

३) लेखनात रचना आणि सुसंगततेचा अभाव आहे. (०–४ गुण)

**व्याकरण आणि लेखन कौशल्य (१० गुण)**

१) लेखन उत्कृष्ट व्याकरण आणि लेखन कौशल्य दर्शवते. (८–१० गुण)

**लेखनात व्याकरण आणि लेखन कौशल्य (१० गुण)**

२) लेखनात चांगले व्याकरण आणि लेखन कौशल्य आहे, पण काही चुका आहेत. (५–७ गुण)

३) लेखनात कमकुवत व्याकरण आणि लेखन कौशल्य आहे. (०–४ गुण)

**वेळ व्यवस्थापन आणि पूर्णता (३० गुण)**

**१) प्रश्नांची पूर्णता (१५ गुण)**

१) सर्व प्रश्न वेळेच्या मर्यादेत पूर्ण करणे. (१३–१५ गुण)

२) बहुतेक प्रश्न वेळेच्या मर्यादेत पूर्ण करणे. (७–१२ गुण)

३) बहुतेक प्रश्न वेळेत पूर्ण करण्यात अपयशी ठरणे. (०–६ गुण)

**२) वेळेचे व्यवस्थापन (१५ गुण)**

१) उत्कृष्ट वेळ व्यवस्थापन कौशल्य दाखवणे. (१३–१५ गुण)

२) व्यवस्थापन कौशल्य आहे, परंतु सुधारण्याची गरज आहे. (७–१२ गुण)

३) वेळ व्यवस्थापनात कमकुवतपणा आहे. (०–६ गुण)

**समजपूर्वक (आकलनयुक्त) वाचन एकूण खर्चाचे अंदाजपत्रक :**

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन | बक्षीस रक्कम | सादिल खर्च | परिक्षक मानधन | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन एकूण रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र | ४,८६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २) | तालुका | ३८७ | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | | | |
| ३) | जिल्हा | ३६ | | | | | | | |
| ४) | राज्य | १ | | | | | | | |
| | **एकूण** | **५,२८४** | | | | | | | |

एकूण स्पर्धा अंदाजपत्रक रक्कम रु. – रक्कम शासकीय नियमानुसार

◈◈◈

# २१) ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धा

**प्रस्तावना**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० व राष्ट्रीय व राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या (NCF/SCF) पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर आवश्यक ठरत आहे. शिक्षकांनी अध्यापनात डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा, त्यातून उपयुक्त, विद्यार्थिकेंद्रित सादरीकरण कौशल्ये विकसित व्हावीत, तसेच अधिकाऱ्यांनी सुयोग्य ठिकाणी ॲनिमेशनचा वापर करावा. यासाठीच राज्यस्तरीय ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**स्पर्धेचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे असेल.**

१) शिक्षकांच्या सर्जनशील सादरीकरण कौशल्यांना व नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, जेणेकरून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थिकेंद्रित होईल.

**पात्रता निकष** :

महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यता प्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षक ज्याचा सेवार्थ/शालार्थ आयडी उपलब्ध आहे, पात्र असतील तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अधिकारी कर्मचारीदेखील या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. एक शिक्षक – एकच सादरीकरण तयार करू शकतील.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक** :

**त्रिस्तरीय प्रक्रिया – केंद्र, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तर :**

**१) केंद्र स्तर :**

प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक नाव नोंदवेल. एकापेक्षा अधिक इच्छुक असल्यास केंद्रप्रमुख निवड करतील.

**२) तालुका स्तर :**

- ठिकाण, दिनांक व वेळ ठरवून स्पर्धा घेण्यात येतील.
- स्पर्धकाने विहित ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे.
- सॉफ्ट कॉपी स्पर्धा आयोजकांकडे जमा करणे.
- निवड समितीमार्फत मूल्यमापन होऊन एक विजेता जिल्हा स्तरावर पुढे जाईल.

**३) जिल्हा स्तर :**

- तालुका स्तरावरील विजेत्यांची जिल्हा स्तरावर स्पर्धा होईल.

- तालुक्याप्रमाणेच सादरीकरणाची प्रक्रिया व मूल्यांकन होईल. प्रथम क्रमांकाचा विजेता राज्य स्तरावर पुढे जाईल.

**४) राज्य स्तर :**

- जिल्हा स्तरावरील विजेत्यांचे सादरीकरण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे पाठवले जाईल.
- राज्य स्तर समिती २० विजेते निवडेल.
- कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल, पुनरावृत्ती/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**५) महत्त्वाचे नियम :**

- प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी स्वतः सादरीकरण तयार करणे आवश्यक.
- सहभागी स्पर्धकाने पुढील माहिती असलेले सादरीकरण तयार करावे.
- नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, युडायस कोड, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक.
- भाषेचा पर्याय – मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.
- सादरीकरणाचा कालावधी ५ मिनिटांचा, जणू काही विद्यार्थ्यांसमोर, प्रेक्षकांसमोर प्रत्यक्ष सादर करत आहे असे गृहीत धरून सादरीकरण करणे.
- कोणत्याही निवड समिती सदस्य शिक्षकास स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही.
- सहभागी शिक्षक स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून सादरीकरण तयार करतील.
- इंटरनेटवरील संसाधनांचा वापर अनुमत, मात्र कॉपीराईट नियमांचे पालन आवश्यक.
- सादरीकरण कालमर्यादा व नियमांचे अचूक पालन आवश्यक.
- कॉपीराईटचे उल्लंघन झाल्यास स्पर्धेतून बाद.

- कोणत्याही गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

**६) मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)** **एकूण गुण : १००**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | २५ |
| २) | शैक्षणिक उपयुक्तता (Pedagogical Value) | २० |
| ३) | दृश्यरचना व सौंदर्य (Visual Design and Aesthetics) | १५ |
| ४) | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity and Originality) | १० |

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| ५) | तांत्रिक बाजू (Technical Execution) | १० |
| ६) | सादरीकरण कौशल्ये (Presentation Skills) | १० |
| ७) | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | १० |
| | **एकूण** | **१००** |

**रुब्रिक तपशिलानुसार मूल्यांकन श्रेणी :**

### १) सामग्रीची गुणवत्ता — २५ गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| २१-२५ | माहिती अत्यंत अचूक व सखोल, विषयाशी पूर्णतः सुसंगत, राष्ट्रीय शिक्षण धोरणांशी (NEP, NCF, SCF) सुसंगत |
| १६-२० | माहिती अचूक व विषयाशी सुसंगत, सखोलता थोडी कमी |
| ११-१५ | काही मुद्दे सामान्य किंवा अस्पष्ट, थोडे विषयांतर |
| ०-१० | माहिती अपूर्ण/चुकीची, विषयाच्या मुख्य मुद्द्यांपासून दूर |

### २) शैक्षणिक उपयुक्तता — २० गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १७-२० | शिकवण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त नावीन्यपूर्ण दृष्टिकोन व पद्धतींचा वापर व स्पष्ट उद्दिष्टे असणारी मांडणी |
| १३-१६ | उपयुक्तता चांगली; काही प्रमाणात नावीन्य |
| ९-१२ | काही प्रमाणात उपयुक्त, उद्दिष्ट थोडी अस्पष्ट |
| ०-८ | शैक्षणिक वापर स्पष्ट नाही, उद्दिष्टांचा अभाव |

### ३) दृश्यरचना व सौंदर्य — १५ गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १३-१५ | अत्यंत आकर्षक व संतुलित मांडणी, उत्कृष्ट फॉन्ट, रंग व ग्राफिक्स |
| १०-१२ | चांगली मांडणी, काही सुधारणा शक्य |
| ६-९ | सामान्य रचना, थोडी असमाधानकारक मांडणी |
| ०-५ | गोंधळलेली, असमंजस रचना, वाचन सुलभतेचा अभाव |

**४) सर्जनशीलता व मौलिकता :** **१० गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १३–१५ | अत्यंत सर्जनशील; पूर्णतः वेगळी व नावीन्यपूर्ण सादरीकरण पद्धत |
| १०–१२ | काही प्रमाणात मौलिकता व कल्पकता |
| ६–९ | सामान्य सादरीकरण, पूर्वानुभवावर आधारित |
| ०–५ | साचेबद्ध, कल्पकतेचा अभाव |

**५) तांत्रिक बाजू :** **१० गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | सर्व तांत्रिक घटक कार्यरत; ॲनिमेशन सहज व व्यवस्थित |
| ७–८ | अल्प तांत्रिक अडचण, सादरीकरणावर परिणाम नाही |
| ४–६ | काही तांत्रिक त्रुटी, अनुभवात व्यत्यय |
| ०–३ | अनेक तांत्रिक त्रुटी, सादरीकरणास अडथळा |

**६) सादरीकरण कौशल्ये** **१० गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | स्पष्ट संवाद, आत्मविश्वास, वेळेचे उत्तम नियोजन |
| ७–८ | संवाद चांगला, थोड्या वेळेच्या व्यवस्थापनाचा अभाव |
| ४–६ | संवाद साधारण; थोडा संकोच |
| ०–३ | अस्पष्ट संवाद, वेळेचे नियोजन नाही |

**७) सूचनांचे पालन** **१० गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | सर्व सूचनांचे अचूक पालन, स्वरूप व वेळेचे अचूक पालन |
| ७–८ | बहुतांश सूचनांचे पालन |
| ४–६ | काही महत्त्वाच्या सूचनांचे पालन नाही |
| ०–३ | बहुतेक सूचनांचे उल्लंघन; स्वरूप व वेळ चुकीचे |

**विजेते निवडीच्या संख्या :**

- तालुका स्तर – १
- जिल्हा स्तर – १
- राज्य स्तरीय – २०

**स्पर्धेसाठी अंदाजे खर्च (बजेट) : रक्कम शासकीय नियमानुसार**

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | उद्दिष्ट | युनिट खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पारितोषिक | २० | रक्कम शासकीय नियमानुसार | |
| २) | इतर खर्च – स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ. | १ | | |

**मूल्यांकन समित्या :**

**तालुकास्तरीय समिती**

| | |
|---|---|
| १) गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) अधिव्याख्याता जि. शि. प्र. सं. | सदस्य |
| ३) तंत्रस्नेही केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १) प्राचार्य जि. शि. प्र. सं. | अध्यक्ष |
| २) शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता, जि. शि. प्र. सं. | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समिती :**

| | |
|---|---|
| १) संचालक, श. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | अध्यक्ष |
| २) सहसंचालक, श. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ३) वरिष्ठ अधिव्याख्याता, श. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ४) अधिव्याख्याता, श. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य |
| ५) उपसंचालक, श. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य सचिव |

◈◈◈

## २२) कथाकथन स्पर्धा

**कथाकथन स्पर्धा नियम व अटी :**

१) कथाकथन स्पर्धा शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठीच असेल.

२) कथा स्वलिखित किंवा इतर लेखकांची अपेक्षित आहे. (इतर लेखकांची असल्यास मूळ लेखकाचे नाव व स्रोत स्पर्धेपूर्वी जाहीर करणे बंधनकारक राहील.)

३) कथा सादरीकरणासाठी ८ ते १० मिनिटांचा कालावधी राहील.

४) कथा जीवन कौशल्य, नैतिकमूल्य, गाभा घटक, सांविधानिक मूल्य, तसेच सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय उद्दिष्ट यांना अनुरूप असावी.

५) कथा व्यक्ती, समाज, लोकसमूह, व्यवसाय, श्रद्धा, विश्वास व उपासना पद्धती यांच्यावर टीका करणारी तसेच कोणाच्याही भावना दुखावणारी नसावी.

६) कथा मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांतून सादर करण्यास परवानगी असेल.

७) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

८) पहिली व दुसरी, तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी या स्तरांसाठी व त्यापुढील वयोगटासाठी खुला स्तर अशा ५ स्तरांतील वयोगटाच्या श्रोत्यांकरिता कथाकथन करणे अपेक्षित असून तसा स्पष्ट उल्लेख सादरीकरणापूर्वी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे.

९) कथाकथन स्पर्धा केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर अशी असेल.

१०) प्रत्येक स्तरावरील प्रथम क्रमांकाचा स्पर्धक त्याच्या पुढील स्तरावर सहभागी होईल.

११) कथाकथन स्पर्धेतील केंद्र स्तरावर केवळ प्रथम क्रमांक तसेच तालुका स्तर व त्यापुढील प्रत्येक स्तरावरील प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्पर्धकांना पारितोषिक म्हणून निश्चित रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह दिले जाईल.

**वेळापत्रक :**

| | | |
|---|---|---|
| १) केंद्र स्तरावरील कथाकथन स्पर्धा | : | शासनाकडून वेळापत्रक कळविण्यात येईल. |
| २) तालुका स्तरावरील कथाकथन स्पर्धा | : | |
| ३) जिल्हा स्तरावरील कथाकथन स्पर्धा | : | |
| ४) राज्य स्तरावरील कथाकथन स्पर्धा | : | |

**कथाकथन स्पर्धेचे निकष :**

| अ. क्र. | कथाकथन स्पर्धा मूल्यमापन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | कथेची निवड व आशय | १० |
| २) | आत्मविश्वास | १० |
| ३) | आवाजातील चढउतार | १० |
| ४) | अभिनय | १० |
| ५) | आशयानुरूप भाषेचा वापर | १० |
| ६) | कथनशैली | १० |
| ७) | कथेतील सुसूत्रता | १० |
| ८) | प्रेक्षकांचा प्रतिसाद | १० |
| ९) | कथेचा एकूण प्रभाव | २० |
| | **एकूण** | १०० |

**कथाकथन स्पर्धा एकूण खर्चाचे अंदाजपत्रक :**

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन | बक्षीस रक्कम | सादिल खर्च | परिक्षक मानधन | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन एकूण रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र | ४,८६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २) | तालुका | ३८७ | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | | | |
| ३) | जिल्हा | ३६ | | | | | | | |
| ४) | राज्य | १ | | | | | | | |
| | **एकूण** | ५,२८४ | | | | | | | |

◈◈◈

# २३) वादविवाद स्पर्धा

**स्पर्धेचा हेतू :**

वादविवाद ही एक संरचित चर्चा असते, ज्यामध्ये सहभागी व्यक्ती दिलेल्या विषयावर युक्तिवाद आणि प्रतिवाद करतात. वादविवाद यांमध्ये विचारांची देवाणघेवाण होते. ही एक गतिशील प्रक्रिया आहे. एकमेकांच्या युक्तिवादांना विरोध करण्याच्या उद्देशाने दोन प्रतिस्पर्धी त्यांच्या दृष्टिकोनातून मते व्यक्त करतात. आपले विचार मांडल्यानंतर निर्णय घेण्याची संधी त्यांना मिळते. वादविवादामुळे तार्किकता, संशोधनवृत्ती, आत्मविश्वास, विश्लेषण क्षमता, चिकित्सक वृत्ती, संवाद कौशल्य, निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते. या क्षमता व कौशल्य शिक्षणाशी संबधित असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षक अधिकारी–कर्मचारी यांचा बौद्धिक, शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकास होण्यास मदत होते. इतरांचा आदर करण्याची व ऐकून घेण्याची भावना विकसित होते.

**उद्देश :**

१) अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांची वक्तृत्वशैली विकसित व्हावी.

२) व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा व ज्ञानात भर पडावी.

३) एखाद्या विषयाकडे/घटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक व्हावा.

४) अभिव्यक्ती कौशल्याचा विकास व्हावा.

**स्पर्धेतील अपेक्षित गट :**

रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, जि. शि. प्र. प. आणि शिक्षण विभागातील पर्यवेक्षिय यंत्रणा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

**स्पर्धेची प्रक्रिया :**

१) वादविवाद स्पर्धा तालुका, जिल्हा व राज्य स्तर अशा तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येईल.

२) सदर स्पर्धा प्रत्येक तालुक्यात डायट व शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने घेण्यात येईल.

३) तालुक्यातील प्रत्येक केंद्रामधील एका स्पर्धकाची केंद्रप्रमुख निवड करून तालुका स्तरासाठी पाठवतील. तालुका स्तरावर झालेल्या वादविवाद स्पर्धेमधील विजेते पहिले तीन स्पर्धक हेच पुढे जिल्हा व राज्य स्तरावर पाठवण्यात येतील. स्पर्धेचे संपूर्ण नियंत्रण डायट करेल.

४) प्रत्येक तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढण्यात येतील. तीन स्पर्धक वादविवाद स्पर्धेसाठी जिल्हा स्तरावर पाठविले जातील. जिल्हा स्तरावरील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त स्पर्धक राज्य स्तरावर पाठविले जातील.

५) सदर स्पर्धेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षण विभागातील अधिकारी, डायटमधील अधिकारी, गटसाधन केंद्रामधील सर्व यंत्रणा, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख इत्यादी भाग घेण्यास पात्र असतील. यात जिल्हा स्तर सर्व शैक्षणिक यंत्रणा संबधित तालुक्यातूनच सहभागी होतील.

६) राज्यस्तरावरून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व दोन उत्तेजनार्थ क्रमांक काढले जातील.

**स्पर्धेचे विषय** :

**पुढीलप्रमाणे नमुना विषयावर स्पर्धेचे आयोजन करता येईल.**

१) शिक्षणातील समाजमाध्यमांचा वापर शाप की वरदान?

२) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर योग्य की अयोग्य?

३) ऑनलाइन शिक्षण तारक की मारक?

४) आजचे उच्च शिक्षण अपेक्षापूर्ती की अपेक्षाभंग?

५) आजची तरुणाई आणि उत्सवांचे स्वरूप योग्य की अयोग्य?

६) शिक्षणात तंत्रज्ञान तारक की मारक?

७) शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांचा उद्देश प्रबोधन की मनोरंजन?

**स्पर्धेची जिल्हा व राज्यस्तरिय कार्यपद्धती** :

वादविवाद स्पर्धा ही संपूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने सर्व स्तरांवर होईल. स्पर्धक प्रत्यक्षरीत्या उपस्थित राहतील.

१) वादविवाद स्पर्धेसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी यांपैकी कोणत्याही एका भाषेचा वापर करावा.

२) वादविवाद स्पर्धेत स्पर्धकाने वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर एका बाजूने म्हणणे मांडावे.

३) वादविवाद स्पर्धेतील मते तर्कावर आधारित असावीत.

४) श्रोत्यांना प्रत्येक वक्त्याला प्रश्न विचारण्याची संधी दिली जावी. त्याचे वक्त्याला उत्तर द्यावे लागेल.

५) वक्ते सरळ व शिष्ट संमत भाषेतच विचार व्यक्त करतील.

६) वाचून बोलणारी व्यक्ती अपात्र राहील.

७) प्रत्येक स्पर्धकास ५ + २ = ७ मिनिटे इतका वेळ मिळेल. (५ मिनिटे आपले विषयाच्या बाजूने मत मांडण्यासाठी व २ मिनिटे विरोधी मतांचा प्रतिवाद करण्यासाठी) पहिल्या स्पर्धकास शेवटी २ मिनिटे वेळ मिळेल.

८) वादविवाद स्पर्धेत कोणत्याही व्यक्तीच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक भावनांना ठेच पोहोचणार नाही व आक्षेपार्ह मते व्यक्त करता येणार नाहीत याची दक्षता स्पर्धकांनी घ्यावी.

९) वादविवाद स्पर्धेत वापरलेल्या संदर्भाचा योग्य त्या ठिकाणी उल्लेख करावा. संदर्भ मान्यताप्राप्त असावे. वादग्रस्त उदाहरणांचा वापर करता येणार नाही.

१०) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**गुणदान योजना :**

| अ. क्र. | तपशील | गुण |
|---|---|---|
| १) | विषयाची समज | १० |
| २) | संवाद कौशल्य (शब्दांची निवड, स्पष्टता, प्रभावी उच्चार) | १० |
| ३) | संदर्भाचा वापर | १० |
| ४) | मुद्द्यांची तार्किक मांडणी | १० |
| ५) | भावनिक आवाहन (अपिल) | १० |
| **एकूण** | | **५०** |

**पारितोषिकाचे स्वरूप :**

- **तालुका स्तर पारितोषिक रक्कम**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>क्रमांक</th><th>रक्कम</th></tr>
<tr><td>१)</td><td>प्रथम</td><td rowspan="7">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>२)</td><td>द्वितीय</td></tr>
<tr><td>३)</td><td>तृतीय</td></tr>
<tr><td>४)</td><td>परीक्षक मानधन</td></tr>
<tr><td>५)</td><td>पारितोषिक वितरण खर्च</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td></tr>
<tr><td colspan="2">तालुका स्तर एकूण खर्च</td></tr>
</table>

पारितोषिक वितरण खर्च – स्पर्धकांसाठी प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह (ट्रॉफी), चहा, नाश्ता, ध्वनिव्यवस्था, बैठकव्यवस्था, प्रवासभत्ता, स्टेशनरी इत्यादी.

- **जिल्हा स्तर पारितोषिक रक्कम**

| अ. क्र. | क्रमांक | रक्कम |
|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | द्वितीय | |
| ३) | तृतीय | |
| ४) | परीक्षक मानधन | |
| ५) | पारितोषिक वितरण खर्च | |
| **एकूण** | | |
| जिल्हा एकूण खर्च | | |

- **राज्य स्तर पारितोषिक रक्कम**

| अ. क्र. | क्रमांक | रक्कम |
|---|---|---|
| १) | प्रथम | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | द्वितीय | |
| ३) | तृतीय | |
| ४) | परीक्षक मानधन | |
| ५) | पारितोषिक वितरण खर्च | |
| **एकूण** | | |
| **राज्य स्तर खर्च** | | |

**स्पर्धेचे अपेक्षित वेळापत्रक :**

| अ. क्र. | स्पर्धा कालावधी | स्पर्धेचा स्तर | जबाबदार कार्यालय |
|---|---|---|---|
| १) | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. | तालुका स्तर | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व गटशिक्षणाधिकारी कार्यालय |
| २) | | जिल्हा स्तर | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व गटशिक्षणाधिकारी कार्यालय |
| ३) | | राज्य स्तर | रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र |

**टप्पानिहाय समिती :**

- **तालुका स्तरीय समिती**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | डायट संपर्क अधिकारी | सदस्य |
| ३) | केंद्रप्रमुख | सदस्य |
| ४) | विषय साधनव्यक्ती | सदस्य |
| ५) | मुख्याध्यापक | सदस्य |
| ६) | अनुभवी भाषा तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| ७) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

- **जिल्हा स्तरीय समिती**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डायट | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य |
| ५) | गटशिक्षणाधिकारी | सदस्य |
| ६) | मुख्याध्यापक | सदस्य |
| ७) | विषय साधनव्यक्ती | सदस्य |
| ८) | केंद्रप्रमुख | सदस्य |
| ९) | अनुभवी भाषा तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| १०) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य सचिव |

- **राज्य स्तरीय समिती**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | उपसंचालक | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य |
| ५) | भाषा विषयाचे प्राध्यापक | सदस्य |
| ६) | भाषा विषयाचे प्राध्यापक | सदस्य |
| ७) | विभागप्रमुख रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र | सदस्य सचिव |

◈◈◈

# २४) शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धा

**प्रस्तावना :**

स्पर्धेच्या युगात सर्वत्र धावपळ असताना व मोबाइलसारखे माहितीच्या महाजालाचे भले मोठे साधन प्रत्येकाच्या हातात आल्यावर सर्व अनायसे हातात मिळते. त्यामुळे मेंदूला फारसा ताण दिला जात नाही. अध्ययन–अध्यापन ही शैक्षणिक क्रिया अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ विद्यार्थ्यांना ज्ञानदान करून उपयोग नाही तर विद्यार्थ्यांना क्रियाशील, कृतिशील अध्ययनाकडे नेताना शिक्षकांना व अधिकाऱ्यांना स्वतःला अद्ययावत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनाही सज्ज, अत्याधुनिक होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना अध्यापनात गोडी वाटेल व ते क्रियाशीलतेकडे, नवनवीन शिकण्याकडे वळतील यासाठी शिक्षकांनी नवोपक्रम, नवनवीन कल्पना, युक्त्या स्वतःच्या प्रतिभेने विकसित करणे गरजेचे आहे.

**स्पर्धेचे स्वरूप :**

सदरची स्पर्धा ही अंगणवाडी तसेच सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील तसेच खाजगी (अनुदानित) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी, अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी तसेच शालेय शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असेल.

- ही स्पर्धा सर्व माध्यमांसाठी आहे.
- सर्व शिक्षक/शिक्षकेतर/पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांसाठी व अधिकाऱ्यांसाठी आहे.
- ही स्पर्धा सर्व विषयांसाठी लागू आहे.
- एका स्पर्धकास एकाच स्पर्धेत एकाच विषयासाठी एकाच गटात सहभागी होता येईल.
- मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांचे संमती पत्र असणे आवश्यक आहे.
- स्पर्धेचे सादरीकरण करणे बंधनकारक आहे.
- सादरीकरणाची भाषा मराठी/हिंदी/इंग्रजी असावी. यापैकी कोणत्याही एका भाषेतून स्पर्धकाला सादरीकरण करता येईल मात्र विजेता सर्व भाषांमधून पहिल्या तीन क्रमांकाचे काढले जातील.
- अनुक्रमे पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिके वितरित केली जातील.

**शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धेची उद्दिष्ट :**

१) शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांतील नवनिर्मिती क्षमता वृद्धिंगत करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन–अध्यापनाची आवड निर्माण करणे.

३) शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधित घटकांनी विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे.

४) विद्यार्थ्यांच्या अध्ययनात नवीन संकल्पनायुक्त शैक्षणिक साहित्याचा समावेश करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनाचे दृढीकरण करण्यासाठी.

६) विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी अध्ययन वातावरण निर्माण करणे.

**शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धेचे अपेक्षित सादरीकरणाचे मुद्दे :**

१) नवनिर्मिती

२) उपयोगिता

३) संकल्पना स्पष्टीकरण

४) सादरीकरण कौशल्य

५) चिकित्सक विचार

६) कल्पकता

**स्पर्धेचे नियम :**

- एका स्पर्धकास एका गटात/एका विषयासाठी सहभागी होता येईल.
- शैक्षणिक साहित्यात नावीन्यता असणे आवश्यक आहे.
- कोणत्याही समुदायाच्या भावना दुखावणारे शैक्षणिक साहित्य नसावे.
- स्पर्धेसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य स्वतः स्पर्धकाने सोबत आणावे.
- अध्ययन निष्पत्ती साध्य होणेसाठी साहित्य उपयुक्त असणे गरजेचे आहे.
- शैक्षणिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक साहित्य हे अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेशी निगडित असावे.
- परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
- शैक्षणिक साहित्य हे कॉपीराईट ॲक्टखाली मोडणारे नसावे.
- शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धेसाठी स्पर्धकाकडे शाळा/कार्यालय प्रमुखांचे संमतिपत्र असणे आवश्यक आहे.

**स्पर्धेचे मूल्यांकन** :

- प्रत्येक स्तरावर सादरीकरणाच्या आधारावर शैक्षणिक साहित्याच्या उपयुक्ततेवर व गुणवत्तेवर मूल्यांकन केले जाईल.

- प्रत्येक स्तरावर तीन क्रमांक काढले जातील व पुढील स्तरासाठी प्रथम तीन क्रमांक पात्र असतील.
- निवड झालेल्या स्पर्धकाला पुढील स्तरावरसुद्‌धा सादरीकरण करणे बंधनकारक आहे.
- प्रत्येक टप्प्यासाठी तेच शैक्षणिक साहित्य असणे आवश्यक आहे.

**मूल्यांकनाचा तक्ता खालीलप्रमाणे :**

| अ.क्र. | मूल्यांकनाचे निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सर्जनशीलता | १५ |
| २) | नावीन्यता | १५ |
| ३) | संकल्पनेचे स्पष्टीकरण | २० |
| ४) | प्रत्यक्ष उपयोगिता | १५ |
| ५) | सादरीकरणाचा दर्जा | २० |
| ६) | विद्यार्थ्यांवरील परिणामकारकता | १५ |
| | **एकूण गुण** | **१००** |

**स्पर्धेची कार्यवाही** :

- **पहिला टप्पा** :

  **केंद्र स्तर :** केंद्रातील पहिल्या तीन क्रमांकाचे शैक्षणिक साहित्य गट (पं.स./मनपा) स्तरासाठी पात्र असेल. उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

- **दुसरा टप्पा** :

  **तालुका स्तर :** गट (पं.स./मनपा) स्तरावरील पहिल्या तीन क्रमांकाचे शैक्षणिक साहित्य जिल्हा स्तरासाठी पात्र असेल. उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

- **तिसरा टप्पा** :

  **जिल्हा स्तर :** जिल्हा स्तरावरील प्रथम क्रमांकाचे शैक्षणिक साहित्य राज्य स्तरासाठी पात्र असेल. उत्कृष्ट सादरीकरणासाठी पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल. तसेच राज्यासाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकाने आपल्या सादरीकरणाचा व्हिडिओ करणे बंधनकारक आहे.

- **चौथा टप्पा :**

  राज्य स्तरावरील पहिल्या तीन क्रमांकाच्या शैक्षणिक साहित्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

**खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :**

| अ. क्र. | तपशील | केंद्र स्तर खर्च | तालुका स्तर खर्च | जिल्हा स्तर खर्च | राज्य स्तर खर्च | एकूण केंद्र ते राज्य खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पारितोषिक | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | |
| २) | प्रमाणपत्र छपाई व सन्मानचिन्ह | | | | | |
| ३) | परीक्षक मानधन | | | | | |
| ४) | स्पर्धा आयोजन खर्च | | | | | |
| ५) | स्पर्धकांसाठी भोजन/ चहापान व इतर खर्च | | | | | |
| एकूण रक्कम | | | | | | |

**संकलित खर्चाचा तपशील :**

| अ. क्र. | स्पर्धा स्तर | दर | स्पर्धा संख्या | खर्च रक्कम | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | ६२२१ | रक्कम शासकीय नियमानुसार | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | तालुका स्तर | | ४०८ | | |
| ३) | जिल्हा स्तर | | ३६ | | |
| ४) | राज्य स्तर | | १ | | |

**स्पर्धेचे अपेक्षित वेळापत्रक :**

- केंद्र स्तर :
- तालुका स्तर :
- जिल्हा स्तर :
- राज्य स्तर :

} शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळविण्यात येईल.

**स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया :**

प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेद्वारा नोंदणी लिंक तयार करून प्रसारित केली जाईल व स्पर्धेची माहिती दिली जाईल. तसेच स्पर्धकांची नोंदणी केली जाईल.

❖❖❖

# २५) नाट्य/नाटक, भूमिका अभिनय व मूकाभिनय स्पर्धा

**राज्यस्तरीय स्पर्धा :**

१) **नाट्य/नाटक** : नाटक हा शब्द अगदी बालपणापासूनच आपल्या कानावर पडतो, तो सोंग अथवा खोटेपणा या अर्थाने. पण हा खोटेपणासुद्धा खरा वाटावा असा असला तर त्याला नाटक म्हटले जाते. नाटक हा एक वाङ्मय प्रकार आहे; पण हा केवळ वाचनासाठी निर्माण झालेला नाही. हा दृक्श्राव्य (audio-visual) स्वरूपाचा वाङ्मय प्रकार आहे. नाटक म्हणजे शब्दांपासून तयार होणारी संहिता (script) आणि या संहितेचे सादरीकरण म्हणजे नाटक. हे सादरीकरण नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना अभिनय इत्यादी घटकांच्या मदतीने करता येते. पण या सर्वघटकांची सुप्त शक्ती शब्दांनी तयार झालेल्या संहितेत असावी लागते. नाटक हे मूलतः सादरीकरणासाठी लिहिले जाते. वाङ्मय कला आणि सादरीकरण या दोन्ही अंगाने नाटक या कलाप्रकाराच्या अनेक व्याख्या देता येतात. त्यातल्या त्यात नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारा व्यक्त होणारा संघर्षमय कथात्मक अनुभव अशी जास्तीत जास्त समावेशक व्याख्या आपणास सांगता येते. रचनेच्या दृष्टीने शोकात्मिका (Tragedy), सुखात्मिका (Comedy), प्रहसन (Farce) व मेलोड्रामा (Melodrama) हे नाटकाचे चार प्रकार पडतात.

२) **भूमिकाभिनय : (Role Playing) :** भाषा अध्यापनाचे अविभाज्य अंग भूमिका अभिनय होय. भाषेच्या शिक्षकात कलावंताचे गुण असले पाहिजे. तो एक चांगला नट असला पाहिजे. शिक्षकांचे वागणे बोलणे, लिहिणे-वाचणे इतके परिणामकारक असले पाहिजे की अधिकांश कौशल्य त्यांच्या वर्तन-कृतीतून विद्यार्थ्यात संक्रमित व्हावे. भावपूर्ण वाचन, स्पष्ट उच्चार, मुद्राभिनय, आवाजातील चढउतार, हालचाल हावभाव या बाबतीत परीपूर्ण कौशल्य भाषा शिक्षकात असावी. नाट्य वाचन, कविता वाचन, कथा आदर्श वाचन शिक्षकांने प्रभावीपणे करावे.

**भूमिकाभिनय पद्धतीचा अर्थ :** एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवत कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेव्हा भूमिका अभिनयाची जोड देतो, तेव्हा त्या पद्धतीला भूमिकाभिनय पद्धती असे म्हणतात.

**भूमिकाभिनय पद्धती :** भूमिकाभिनय पद्धतीत भूमिका व अभिनय या दोन तंत्राचा समावेश असतो. याला इंग्रजीत Role Play असे म्हणतात. नाटकाप्रमाणे भूमिकाभिनयात लिखित संवाद किंवा तयार संहिता नसते. भूमिकाभिनयात उत्स्फूर्त व समायोजित नाट्यीकरण असते. दुसऱ्याची भूमिका करणे म्हणजे भूमिकाभिनय करणे होय. या पद्धतीचा अध्ययन-अध्यापनात वापर करून अनेक प्रसंग जिवंत करता येतात. भातुकलीचा खेळ व विद्यार्थी दिन ही भूमिकाभिनयाचेच उदाहरण होय. इतिहासातील

विविध प्रसंग, मराठीतील कथानक याची निवड भूमिकाभिनयाकरिता करता येईल. पद्धतीचा योग्य वापर करून अध्ययन-अध्यापनाचे कार्य शिक्षकाला प्रभावी रीतीने करता येते. या पद्धतीत संवाद व अभिनयाला विशेष महत्त्व असते.

३) **मूकाभिनय** : मूकाभिनय म्हणजे शब्दांचा वापर न करता हातवारे आणि हावभावांतून संदेश पोहोचवणे. मुकाभिनयाला इंग्रजीत पैन्टोमाइम (Pantomime) म्हणतात. मूकाभिनयाची सुरुवात प्राचीन ग्रीसमध्ये झाली होती. पैन्टोमिमस नावाच्या एकल नकाबपोश कलाकारांच्या नावावरून या नावाची निर्मिती झाली होती. मूकाभिनय, मुखमुद्रा, नेत्रप्रक्षेप याद्वारेच भाव आणि अर्थ स्पष्ट केले जातात. याबरोबरच नृत्यातील पदांच्या सस्वर पठणासोबतच विविध हस्तमुद्रांचे सादरीकरण केले जाते. या शैलीमध्ये केवळ विदुषकालाच बोलण्याचे स्वातंत्र्य असते. तो विविध पदांच्या अर्थाचे स्पष्टीकरण दर्शकासमोर सहज सोप्या भाषेमध्ये करतो.

**जिल्हा स्तरीय स्पर्धा समिती :**

**जिल्हा स्तरीय समिती**

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य जि. शि. व प्र. सं. | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य |
| ५) | गटशिक्षणाधिकारी | सदस्य |
| ६) | मुख्याध्यापक | सदस्य |
| ७) | विषय साधनव्यक्ती | सदस्य |
| ८) | केंद्रप्रमुख | सदस्य |
| ९) | अनुभवी भाषा तज्ज्ञ शिक्षक | सदस्य |
| १०) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य सचिव |

**शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा**

१) **स्पर्धेतील अपेक्षित गट** : रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, जि. शि. प्र. प. आणि शिक्षण विभागातील पर्यवेक्षिय यंत्रणा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

२) सदर स्पर्धांच्या माध्यमातून शिक्षकांच्या कलागुणांना वाव देणे हा उद्‌देश आहे.

३) सदर स्पर्धा ह्या सर्वप्रथम केंद्र स्तरावर होतील.

४) केंद्र स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस/गटास तालुका स्तरीय स्पर्धेत सहभाग घेता येईल.

५) तालुका स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस/गटास जिल्हा स्तरीय स्पर्धेत भाग घेता येईल.

६) जिल्हा स्तरावरून प्रथम येणाऱ्या व्यक्तीस/गटात राज्य स्तरीय स्पर्धेत पाठवण्यात येईल.

**स्पर्धेचे नाव : नाटक/नाट्य स्पर्धा**

**स्पर्धेचा विषय :**

पुढीलप्रमाणे विविध विषयांवर सदर स्पर्धा आयोजित करता येतील.

१) मादकद्रव्यांचा गैरवापर व प्रतिबंध

२) तरुणांमधील वाढती व्यसनाधीनता

३) जल है तो कल है।

४) समाजमाध्यमांच्या विळख्यात तरुणाई

५) लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

६) आणखी किती निर्भया

**नियमावली :**

१) स्पर्धकांना सामूहिक नाट्य अभिनय सादर करावा लागेल.

२) सादरीकरणासाठी वेशभूषा, केशभूषा विषयास अनुसरून असावी.

३) सादरीकरणासाठी वेळ ५ ते १० मिनिट असा असेल.

४) सामूहिक सादरीकरण करण्यासाठी स्पर्धकांची संख्या ४ ते ६ या मर्यादेत असावी.

५) स्पर्धकांना मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू यांपैकी कोणतेही भाषेतून नाट्य अभिनय सादर करता येईल.

६) असंविधानिक शब्द व भाषेचा वापर टाळावा.

७) हिंसा व वादात्मक आशय टाळावा.

८) स्क्रिप्ट स्वलिखित असावी कॉपी–पेस्ट टाळावे. (कॉपी–पेस्ट असेल तर संबंधितास क्रेडिट द्यावे).

९) शारीरिक हानिकारक व जीवघेणे प्रसंग टाळावेत.

१०) परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

११) स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक राहील.

१२) स्पर्धा संकेत क्रमांकानुसार घेण्यात येतील.

१३) स्पर्धकाने स्पर्धेच्या वेळी स्वतःचे, शाळेचे, महाविद्यालयाचे, गावाचे, जिल्ह्याचे नाव सांगू नये.

१४) स्पर्धकासोबत स्वतःचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.

१५) स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहावे.

**स्पर्धेचे नाव : भूमिकाभिनय स्पर्धा**

**स्पर्धेचा विषय :**

१) लिंगसमभाव

२) व्यसनाधीनतेवर मात

३) पाणी म्हणजे जीवन

४) समाजमाध्यमांचा सुजाण वापर

५) लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

६) नारी का सम्मान करो।

**नियमावली :**

१) स्पर्धकांना वैयक्तिक/सामूहिक भूमिकाभिनय सादर करता येईल.

(**टीप** : नियम क्र. २ ते १५ हे नाटक/नाट्य स्पर्धेप्रमाणेच राहतील.)

**स्पर्धेचे नाव : मूकाभिनय स्पर्धा**

**स्पर्धेचा विषय :**

१) मादक द्रव्ये जीवनास बाधक

२) वृक्ष वाचवा, जीवन वाचवा

३) समाजमाध्यमांचे (Social media) दुष्परिणाम

४) सुरक्षित स्त्री, सुरक्षित समाज

**नियमावली :**

१) स्पर्धकांना वैयक्तिक/सामूहिक मूकाभिनय सादर करता येईल.

**(टीप : नियम क्र. २ ते १५ हे नाटक/नाट्य स्पर्धेप्रमाणेच राहतील.)**

**पारितोषिकाचे स्वरूप**

**स्पर्धा : नाट्य/नाटक, मूकाभिनय तसेच भूमिकाभिनय (वैयक्तिक व सामूहिक)**

| अ. क्र. | स्तर | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| २) | तालुका स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ३) | जिल्हा स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ४) | विभाग स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ५) | राज्य स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |

(**टीप** : उपरोक्त तीनही स्पर्धांसाठी पारितोषिक स्वरूप समान राहील.)

**परिक्षक मानधन स्वरूप**

**भूमिकाभिनय (वैयक्तिक व सामूहिक), मूकाभिनय**

प्रत्येक स्तरावर तीन परीक्षक नेमावेत.

**मूल्यांकन प्रपत्र :**

**नाट्य/नाटक व भूमिकाभिनय**

| अ. क्र. | नाव/गट/ संकेतांक क्र. | जिल्हा | विषय | भाषण/ बोली | संवाद कौशल्य/ अभिव्यक्ती | रंगमंच सजावट | वेशभूषा आणि रंगभूषा | एकूण परिणाम | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २० | २० | २० | १० | १० | २० | १०० |
| | | | | | | | | | |

**मूल्यांकन प्रपत्र :**

**मूकाभिनय**

| अ. क्र. | नाव/गट/ संकेतांक क्र. | जिल्हा | विषय | देहबोली | मूकाभिनय संवाद कौशल्य/ अभिव्यक्ती | रंगमंच सजावट | वेशभूषा आणि रंगभूषा | एकूण परिणाम | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २० | २० | २० | १० | १० | २० | १०० |
| | | | | | | | | | |

◈◈◈

# २४) हॅकेथॉन स्पर्धा

**प्रस्तावना** :

शिक्षणाच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे आणि शिक्षक व कर्मचारी हे या बदलाचे मुख्य केंद्रबिंदू आहेत. शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था अधिक परिणामकारक बनविण्यासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधणे ही काळाची गरज आहे, याच विचाराला केंद्रस्थानी ठेवून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करत आहे, यात अधिकारी शिक्षक आणि कर्मचारी एकत्र येऊन शैक्षणिक व सामाजिक प्रक्रियेतील आव्हाने सोडवण्यासाठी अभिनव उपाय शोधणार आहेत.

**उद्दिष्ट :**

१) शैक्षणिक व सामाजिक प्रक्रियेतील अडचणी सोडवण्यासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधणे.

२) अधिकारी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल साधनांचा वापर करण्यास प्रेरित करणे.

३) संस्थेच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक प्रक्रियांत सुधारणा घडवणे.

४) सहभागींना सर्जनशील दृष्टिकोन आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**प्रस्तावित लाभ :**

१) नवीन उपायांच्या अंमलबजावणीमुळे शिक्षण व प्रशासकीय प्रक्रिया सुधारतील.

२) सहभागींमध्ये तंत्रज्ञानाविषयी जागरूकता व तांत्रिक कौशल्ये वाढतील.

३) सहभागींच्या नवनवीन कल्पकतेला कौतुक व सन्मान मिळेल

४) शैक्षणिक संस्थांना नावीन्यपूर्ण दृष्टिकोन घेऊन काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल.

**सहभागी स्पर्धक :**

स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांतील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

**हॅकेथॉन स्पर्धेचे विषय :**

**१) पर्यावरण आणि शाश्वत विकास (Environment and Sustainability)**

- कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर तंत्रज्ञान

- पाण्याच्या बचतीसाठी स्मार्ट तंत्रज्ञान.
- पर्यावरण संवर्धनासाठी ड्रोनचा उपयोग.
- शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज व सूचनाप्रणाली.

**२) आरोग्य आणि वैद्यकीय सेवांचा सुधारणा (Healthcare and Wellness)**

- आरोग्य देखरेखेसाठी AI आधारित वैद्यकीय साहाय्य.
- ग्रामीण भागासाठी कमी खर्चातील टेलिमेडिसिन सोल्यूशन्स.
- मानसिक आरोग्य व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञान.
- आरोग्यासाठी पोषणतत्त्व ट्रॅकिंग ॲप्स.

**३) शिक्षण आणि कौशल्य विकास (Education and Skill Development)**

- विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक शैक्षणिक प्लॅटफॉर्म
- आभासी (VR) प्रशिक्षण मॉड्यूल.
- वंचित मुलांना शिक्षण पोहोचवण्यासाठी स्मार्ट ॲप्स.
- भाषा शिक्षणासाठी AI आधारित संवाद साधन.
- परीक्षांसाठी कागदविरहित व सुरक्षित प्रणाली.

**४) स्मार्ट शहर आणि ट्रान्सपोर्टेशन (Smart Cities and Transportation)**

- स्मार्ट वाहतूक नियोजनासाठी रिअल-टाइम डेटा ॲनालिटिक्स.
- सोलर-आधारित स्मार्ट स्ट्रीट लाइट सिस्टम.
- पार्किंग स्पेस व्यवस्थापन.
- सार्वजनिक वाहतूक सुधारण्यासाठी टोकनलेस पेमेंट सिस्टम.
- स्मार्ट कचरा संकलन.

**५) आर्थिक समावेशन आणि फिनटेक (Financial Inclusion and FinTech)**

- ग्रामीण भागातील आर्थिक साक्षरतेसाठी डिजिटल साधने.
- लहान व्यवसायांसाठी कर्ज साहाय्य व्यवस्थापन उपाय.
- वैयक्तिक आर्थिक नियोजनासाठी AI आधारित सहाय्य.
- सायबर सुरक्षा आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट तंत्रज्ञान.

**६) गेमिंग आणि मनोरंजन (Gaming and Entertainment)**

- वैयक्तिकृत अनुभवांसाठी AR/VR आधारित गेम्स.

- डिजिटल वाचनासाठी संवादात्मक प्लॅटफॉर्म.
- संगीत आणि कला सर्जनासाठी AI आधारित साधने.
- सामाजिक मुद्द्यांवर आधारित शैक्षणिक खेळांची निर्मिती.
- लाइव्ह इव्हेंट्ससाठी व्हर्चुअल अनुभव.

**७) सामाजिक समस्या आणि सक्षमीकरण (Social Issues and Empowerment)**

- महिलांच्या सुरक्षेसाठी स्मार्ट वियरेबल डिव्हाइस.
- दिव्यांगांसाठी सहाय्यक उपकरणे.
- ग्रामीण क्षेत्रासाठी जलद आपत्ती प्रतिसाद सिस्टीम.
- अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उत्पादन मार्केटिंग प्लॅटफॉर्म.
- मतदार जनजागृतीसाठी डिजिटल मोहिमेचे साधन.

**८) कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रमानव (AI and Robotics)**

- उद्योगांसाठी ऑटोमेशन प्लॅटफॉर्म तयार करणे.
- ग्राहक सेवा सुधारण्यासाठी चॅटबॉट्स.
- रोबोटिक्सवर आधारित स्मार्ट घरगुती उपकरणे.
- ड्रोन तंत्रज्ञानासाठी नवीन उपयोजन.
- डेटा गोपनीयतेसाठी AI साधन.

**९) ग्रामीण विकास (Rural Development)**

- स्थानिक रोजगार निर्मितीसाठी प्लॅटफॉर्म.
- ग्रामीण आरोग्य सेवा सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञान.
- गावांमधील मुलभूत सुविधा सुधारण्यासाठी स्मार्ट उपाय.
- पाणी वितरण आणि व्यवस्थापन.
- शेतीसाठी अचूकता-आधारित उपाय (Precision Farming).

**१०) क्रिएटिव्ह टेक आणि गॅझेट्स (Creative Tech and Gadgets)**

- स्मार्ट होम सोल्यूशन्स.
- वैयक्तिक तंदुरुस्ती ट्रॅकरसाठी नवीन उपकरणे.
- प्रोटोटायपिंगसाठी 3D प्रिंटिंग आधारित सोल्यूशन.
- मिनी रोबोट्स डिझाइन करणे.

**स्पर्धेचे नियम :**

१) स्पर्धेत शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

२) प्रतिकृती ही सर्जनशील, नवीन दृष्टिकोन निर्माण करणारी, नावीन्यपूर्ण व उपयोजनात्मक असावी.

३) प्रतिकृती सहभागींनी स्वतः तयार केलेली असावी.

४) कुठल्याही प्रसारमाध्यमामधून किंवा यापूर्वी ज्या प्रतिकृतींना कॉपीराइट्स प्राप्त झाले आहेत अशा प्रतिकृतींची नसावी.

५) प्रतिकृती कुटुंब, समाज, देश यांना विकासात्मक फायदा होईल अशी असावी.

६) सहभागी स्पर्धकाने यापूर्वी सदर प्रतिकृती इतर कुठल्याही स्पर्धेत सादर केलेली नसावी.

७) सदर प्रतिकृती तयार करण्यासाठी शासकीय स्तरावरून कुठलीही आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

८) प्रतिकृतीचे चित्रीकरण व माहितीचा चार्ट तयार करणे बंधनकारक असेल.

९) दिलेल्या विषयापैकी कोणत्याही एका विषयात स्पर्धक सहभागी होऊ शकतो.

१०) स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपली नोंदणी १० ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत करावी.

११) सदर स्पर्धा ही केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर होणार आहे.

१२) सदर स्पर्धेला कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

१३) प्रतिकृतीस क्रमांक प्राप्त झाल्यावरही ती कॉपीराइट्सची उल्लंघन करणारी आढळल्यास ती अपात्र ठरेल. प्राप्त बक्षीस रक्कम ही जप्त होईल. याबाबत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

१४) स्पर्धेमध्ये प्रतिकृतीसह स्वतः उपस्थित राहावे लागेल आपल्याऐवजी आपला प्रतिनिधी उपस्थित ठेवता येणार नाही.

१५) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

१६) स्पर्धेसाठी तालुका स्तरावर झालेल्या नोंदणीपैकी तालुका निवड समितीने योग्य १०० प्रतिकृतीची निवड करून तालुका स्तरावर प्रदर्शनीचे आयोजन करावे.

१७) तालुका स्तरावरील निवड करून ३ प्रतिकृतींना जिल्हा स्तरावर पाठवावे.

**वेळापत्रक :**

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा पातळीवर स्पर्धा प्रवेश नोंदणी | : | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) तालुका स्तरावर हॅकेथॉनचे आयोजन | : | |

३) जिल्हा स्तरावर ट्रॅकथॉनचे आयोजन : } शासनाकडून वेळापत्रक
४) राज्य स्तरावर हॅकथॉनचे आयोजन : } कळवण्यात येईल.

**परीक्षण निकष :**

१) स्पर्धेच्या परीक्षणासाठी अनुभती व तज्ज्ञ व्यक्तींची निवड करावी.

२) स्पर्धा परीक्षणासाठी तीन सदस्यांची समिती असावी.

३) स्पर्धा परीक्षण पुढील मुद्द्यांच्या आधारे करावे. समितीतील तिन्ही सदस्यांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीनुसार अंतिम निकाल घोषित करावा.

**१) संकल्पना आणि नावीन्यता (१० गुण)**

- प्रकल्पाची कल्पना किती नावीन्यपूर्ण आहे?
- संकल्पनेमध्ये सर्जनशीलता दिसून येते का?
- समस्या सोडवण्यासाठी प्रकल्पाची उपयुक्तता किती प्रभावी आहे?

**२) विषयाची सुसंगतता (१० गुण)**

- प्रकल्प निवडलेला विषय हॅकेथॉन प्रदर्शनीशी सुसंगत आहे का?
- सामाजिक, वैज्ञानिक किवा शैक्षणिक दृष्टिकोनातून त्याचा परिणाम होतो का?

**३) तांत्रिक अचूकता (१० गुण)**

- प्रकल्प वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित आहे का?
- गणितीय व तांत्रिक माहिती योग्य प्रमाणात वापरली आहे का?

**४) प्रदर्शन आणि सादरीकरण कौशल्य (१० गुण)**

- प्रकल्पाचे मॉडेल व्यवस्थित सादर केले आहे का?
- प्रकल्पाचे स्पष्टीकरण देताना आत्मविश्वास आणि स्पष्टता आहे का?
- प्रेक्षकांना प्रकल्पाचे महत्त्व समजावून देण्यात यशस्वी ठरतो का?

**५) कृतिक्षमतेचे मूल्यांकन (१० गुण)**

- प्रकल्प प्रत्यक्ष जीवनात उपयोगी ठरेल का?
- त्याच्या अंमलबजावणीची शक्यता किती आहे?

**६) साहित्याचा वापर आणि डिझाइन (१० गुण)**

- प्रकल्प तयार करताना वापरलेल्या साहित्याचा प्रभावीपणा आहे का?
- मॉडेलचे डिझाइन सौंदर्यपूर्ण, टिकाऊ आणि सुलभ आहे का?

**७) प्रकल्पाच्या परिणामाचा आवाका (१० गुण)**

- प्रकल्पाचा सामाजिक, आर्थिक किंवा पर्यावरणीय परिणाम किती सकारात्मक आहे?
- मोठ्या प्रमाणावर त्याची अंमलबजावणी करता येईल का?

**८) सहभाग आणि टीमवर्क (१० गुण)**

- प्रकल्प तयार करताना सहभागींनी केलेले प्रयत्न दिसून येतात का?
- गटातील सदस्यांमध्ये उत्तम समन्वय आहे का?

**९) प्रकल्पाचे दस्तऐवजीकरण (१० गुण)**

- प्रकल्पासाठी योग्य प्रकारे अहवाल तयार केला आहे का?
- आवश्यक डेटा, चार्टस, आणि आकडेवारी समाविष्ट केली आहे का?

**१०) प्रश्नोत्तर सत्रातील कामगिरी (१० गुण)**

- परीक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समाधानकारक उतरे दिली का?
- आपले म्हणणे पटवून देण्यात यशस्वी झालेत का?

**स्पर्धक प्रवेश अर्ज :**

सदर स्पर्धेत स्पर्धक स्वतः तयार केलेल्या प्रतिकृती स्पर्धेत मांडणार आहेत त्यामुळे या प्रतिकृती कॉपीराईट्स नियमात बसतात का हे बघण्यासाठी स्पर्धकाकडून माहिती भरून घेणे आवश्यक आहे. यासाठी दिलेल्या मुदतीत गुगल फॉर्मच्या मदतीने स्पर्धकांकडून माहिती संकलित करावी लागेल.

१) नाव
२) पद
३) कार्यालयाचे नाव
४) तालुका
५) प्रतिकृतीचा विषय किंवा थीम
६) प्रतिकृतीचा उपविषय
७) प्रतिकृतीचे उद्दिष्ट
८) प्रतिकृतीची आकृती
९) प्रतिकृतीचा व्हिडिओ
१०) प्रतिकृती चलित आहे काय?
११) प्रतिकृतीसाठी विद्युत सुविधा आवश्यक आहे काय?

१२) प्रतिकृतीची मांडणी कुठे कराल?

१३) प्रतिकृती आपण स्वतः तयार केली आहे काय?

१४) प्रतिकृती आपण स्वतः तयार केल्याचे घोषणा पत्र अपलोड केले आहे काय ?

१५) स्पर्धकाचा पूर्ण पत्ता

१६) संपर्क क्रमांक

**सहभागी स्पर्धकाचे स्वयंघोषणापत्र**

**दिनांक :**

मी श्री/श्रीमती/कुमारी ............................................... शाळा/कार्यालय ...................
पंचायत समिती/जिल्हा ............................................ याद्वारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेत मी स्वतः तयार केलेली प्रतिकृती असून मी तिची नक्कल कुठल्याही समाजमाध्यमाच्या ऑनलाइन माध्यमातून किंवा प्रिंट मीडियाच्या माध्यमातून केलेली नसून ही माझी स्वतःची निर्मिती आहे. माझ्याकडून पुरविण्यात आलेली माहिती जर कॉपीराईटचे उल्लंघन करणारी आढळली, तर मी स्पर्धा जिंकल्यावर सुद्धा अपात्र होईल व याबाबतीत मूल्यमापन समितीने घेतलेला निर्णय मला मान्य राहील.

**स्थळ**

**स्पर्धकाचे नाव व स्वाक्षरी**

## स्पर्धेचे आर्थिक अंदाजपत्रक

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन | बक्षीस रक्कम | स्टेशनरी खर्च | परीक्षक मानधन | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन व निवास | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | तालुका | ४०८ | रक्कम शासकीय नियमा–नुसार | | | | निरंक | व्यक्तींसाठी वर्किंग लंच<br>रक्कम शासकीय नियमानुसार | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हा | ३६ | | | | | निरंक | | |
| ३) | राज्य | १ | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | |

**एकूण स्पर्धा अंदाजपत्रक रक्कम** : रक्कम शासकीय नियमानुसार

◈◈◈

# २७) परकीय भाषा स्पर्धा

**प्रस्तावना :**

शिक्षणप्रणालीला अधिक विद्यार्थिकेंद्रित, समावेशक आणि समग्र बनविणे, तसेच विद्यार्थ्यांना आजन्म शिकण्यासाठी तयार करणे हे नवीन शिक्षण धोरण-२०२० (NEP 2020) चे उद्दिष्ट आहे. यामध्ये अनेक भाषा शिकण्याची संधी देण्यावर भर दिला आहे. यात प्रादेशिक भाषांबरोबरच परकीय भाषांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी, कोरियन, रशियन, चिनी यांसारख्या परकीय भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परकीय भाषा शिकल्याने विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर संवाद साधता येतो आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी, संशोधनासाठी तसेच नोकरीसाठी अधिक संधी उपलब्ध होतात. हे धोरण भारताच्या जागतिकीकरणाच्या वाटचालीला पूरक ठरते.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जागतिक युगात परकीय भाषांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. विविध देशांतील लोकांशी संवाद साधण्यासाठी, शिक्षण, व्यवसाय, तसेच सांस्कृतिक आदान-प्रदानासाठी परकीय भाषांचे ज्ञान अनिवार्य झाले आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात (NEP 2020) बहुभाषिकतेवर भर दिला आहे. शिक्षकांना परकीय भाषेचे ज्ञान असेल तर ते शिकवण्यास सक्षम ठरतील. म्हणजेच त्यांची व्यावसायिक त्याचबरोबर वैयक्तिक प्रगती होईल. अशा पार्श्वभूमीवर परकीय भाषा शिकण्याची आवड निर्माण व्हावी, त्यांना नव्या भाषा आत्मसात करण्याची संधी मिळावी, या दृष्टिकोनातून शिक्षकांसाठी परकीय भाषा स्पर्धेचे आयोजन केले आहे.

**परकीय भाषा स्पर्धेची उद्दिष्टे :**

१) नवीन शिक्षण धोरण-२०२० नुसार प्रादेशिक भाषांबरोबरच परकीय भाषा कौशल्यांचा विकास करणे.

२) शिक्षण क्षेत्रात विचारमंथन व कल्पकता वाढवणे.

३) सर्जनशीलता विकसित करणे.

४) सामाजिक संवाद कौशल्य विकसित करणे.

५) श्रवण, वाचन, लेखन, भाषण आणि संभाषण या भाषिक कौशल्यांचा विकास करणे.

६) सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवा विकसित करणे.

७) व्यक्तिमत्त्व विकास साधणे.

८) विचारांची सुसंगतता आणि स्पष्टता वृद्धिंगत करणे.

**शैक्षणिक निष्पत्ती :**

महाराष्ट्रातील आयटी, ऑटोमोबाइल आणि उत्पादन उद्योगांमुळे जपानी भाषेचे महत्त्व वाढले आहे. विशेषतः पुणे व संभाजीनगरमध्ये काही शाळा आणि प्रशिक्षण संस्था जपानी भाषा शिकवतात हे आपणास ज्ञातच आहे. Goethe-Institute सारख्या संस्थांमध्ये जर्मन भाषा शिकणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जर्मनीकडे वळतात. फ्रान्समध्ये शिक्षण आणि पर्यटनासाठी तयारी करणाऱ्याकडून फ्रेंच भाषा शिकण्याकडे कल वाढलेला आहे त्यामुळे CBSE, ICSE, काही SSC शाळांमध्ये शालेय अभ्यासक्रमात फ्रेंच शिकवले जाते. त्याचप्रमाणे स्पॅनिश (Spanish), चिनी या भाषा शिकणारेही आहेत, परंतु आपण येथे केवळ जर्मन आणि जपानी या दोनच भाषांपुरती स्पर्धा आयोजित करत आहोत. या स्पर्धेतून

१) व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो.

२) स्पर्धेच्या माध्यमातून मांडलेल्या विचारांद्वारे समाजपरिवर्तन घडू शकते.

३) विचारमंथन, कल्पकता, सर्जनशीलता इत्यादी गुणांचा विकास होतो.

४) भाषेचे आकलन व भाषेवरील प्रभुत्व यासाठी परकीय भाषेचा उपयोग केला जातो.

५) कौशल्य सुधारते, आत्मविश्वास वाढतो, व्यक्तिमत्त्व प्रगल्भ होते.

६) जागतिकीकरणाच्या वाटचालीला पूरक वातावरण निर्माण होते.

**व्याप्ती मर्यादा :**

**सहभागी पात्रता :**

१) सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक

२) शिक्षकेतर कर्मचारी

३) शिक्षण विभागातील सर्व अधिकारी

४) BRC तील सर्व यंत्रणा

५) केंद्रप्रमुख इत्यादी

**भाषा :** जर्मन आणि जपानी

**विषय :** १) सर्जनशील लेखनगट

२) सादरीकरण गट

**स्पर्धेचे स्वरूप :**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा</th><th colspan="4">तपशील/उदाहरण</th></tr>
<tr><td>१)</td><td>स्पर्धेचे नाव</td><td colspan="4">परकीय भाषा स्पर्धा</td></tr>
<tr><td>२)</td><td>आयोजक संस्था/ विभाग</td><td colspan="4">जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था</td></tr>
<tr><td>३)</td><td>स्पर्धेचे उद्दिष्ट</td><td colspan="4">नवीन शिक्षण धोरण–२०२० नुसार प्रादेशिक भाषांबरोबरच परकीय भाषाविकास करणे. जागतिकीकरणाच्या वाटचालीला पूरक वातावरण निर्माण करणे.</td></tr>
<tr><td>४)</td><td>दिनांक</td><td colspan="4">शासनाकडून वेळापत्रक कळविण्यात येईल.</td></tr>
<tr><td>५)</td><td>संपूर्ण स्पर्धेचे नियंत्रण</td><td colspan="4">जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था</td></tr>
<tr><td>६)</td><td>स्वरूप</td><th>अ. क्र.</th><th>स्तर</th><th>नियंत्रण अधिकारी</th><th></th></tr>
<tr><td colspan="2" rowspan="3"></td><td>१)</td><td>तालुका</td><td>गटशिक्षणाधिकारी, संपर्क अधिकारी</td><td>प्रत्येक तालुक्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय, असे क्रमांक काढणे. त्यातील प्रति विषय गट प्रथम क्रमांक जिल्हा स्तरावर पाठवणे.</td></tr>
<tr><td>२)</td><td>जिल्हा</td><td>जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था</td><td>जिल्ह्यातून प्रति विषय गट प्रथम आलेला क्रमांक राज्य स्तरावर पाठवणे.</td></tr>
<tr><td>३)</td><td>राज्य</td><td>जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था</td><td>राज्य स्तरावर सर्व जिल्ह्यातून आलेल्या प्रथम क्रमांकापैकी प्रथम, द्वितीय, तृतीय प्रति विषय गट असे क्रमांक काढणे.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा | तपशील/उदाहरण |
|---|---|---|
| ६) | स्पर्धेचे विषय | भाषण, वाचन, भाषांतर, संवाद सादरीकरण |
| ७) | भाषा निवड | जर्मन, जपानी |
| | स्पर्धा विषय गट | **जर्मन भाषा स्पर्धा :**<br>१) सर्जनशील लेखन गट : यामध्ये निबंध लेखन, कथा लेखन, कविता लेखन, पोस्टर/ जाहिरात लेखन इत्यादी<br>२) सादरीकरण गट : वक्तृत्व, नाटिका सादरीकरण, अनुभव कथन इत्यादी.<br>**जपानी भाषा स्पर्धा** :<br>१) सर्जनशील लेखन गट : यामध्ये निबंधलेखन, कथालेखन, कवितालेखन, पोस्टर/जाहिरात लेखन इत्यादी<br>२) सादरीकरण गट : वक्तृत्व, नाटिका सादरीकरण, अनुभव कथन इत्यादी. |
| ८) | सहभागी पात्रता | सर्व माध्यमांच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित व्यवस्थापनांच्या शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण विभागातील अधिकारी BRC तील सर्व यंत्रणा गटशिक्षण अधिकारी केंद्रप्रमुख इत्यादी. |
| ९) | नोंदणी प्रक्रिया | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| १०) | मूल्यांकन निकष | **सर्जनशील लेखनस्पर्धेसाठी निकष** |

| क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | भाषेची अचूकता (व्याकरण, शब्दलेखन, वाक्यरचना) | २० |
| २) | कल्पकता व सर्जनशीलता (आशयातील वैविध्य) | २० |
| ३) | विषयाशी सुसंगती | २० |
| ४) | योग्य शब्दांचा वापर असणारी प्रवाही भाषा | २० |
| ५) | एकूण परिणाम : सुरुवात, मध्य व शेवट या स्वरूपाची मांडणी. | २० |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th>तपशील/उदाहरण</th></tr>
<tr><td></td><td></td><td>सादरीकरणासाठी निकष
<table>
<tr><th>क्र.</th><th>मूल्यांकन निकष</th><th>गुण</th></tr>
<tr><td>१)</td><td>अचूक व योग्य भाषेचा वापर</td><td>२०</td></tr>
<tr><td>२)</td><td>सादरीकरण कौशल्य<br>– आत्मविश्वास, आवाजातील स्पष्टता</td><td>२०</td></tr>
<tr><td>३)</td><td>विषयाची मांडणी (सर्जनशील, प्रभावी)</td><td>२०</td></tr>
<tr><td>४)</td><td>उपयुक्तता</td><td>२०</td></tr>
<tr><td>५)</td><td>एकूण परिणाम (सुरुवात, मध्य व शेवट या स्वरूपाची मांडणी, तसेच वेळेचे व्यवस्थापन)</td><td>२०</td></tr>
<tr><td></td><td>एकूण गुण</td><td>१००</td></tr>
</table>
इतर निकष :<br>
१) लेखनासाठी १००० ते १२०० शब्दमर्यादा असावी.<br>
२) सादरीकरणासाठी ४ ते ५ मिनिटे इतका वेळ असेल.<br>
३) या स्पर्धेमध्ये राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.<br>
४) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.</td></tr>
<tr><td>११)</td><td>परीक्षक/तज्ज्ञ</td><td>भाषा शिक्षक/निमंत्रित परकीय भाषातज्ज्ञ</td></tr>
<tr><td>१२)</td><td>पारितोषिके व प्रमाणपत्रे</td><td>प्रथम, द्वितीय, तृतीय + सहभाग प्रमाणपत्र</td></tr>
<tr><td>१३)</td><td>कार्यक्रमानंतरची कृती</td><td>अहवाल, फोटो, वृत्तपत्र प्रसिद्धी</td></tr>
<tr><td>१४)</td><td>अन्य विशेष बाबी</td><td>मार्गदर्शन सत्र, प्रशिक्षण कार्यशाळा</td></tr>
</table>

## कार्ययोजना व अंदाजपत्रक

### तालुका स्तर

### लेखन स्पर्धा : जर्मन/जपानी

| अ. क्र. | तपशील | तालुका स्तर तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | शाळासंख्या | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | ४०८ × शाळासंख्या | |
| ३) | परीक्षक मानधन | ४०८ × २४ × शाळासंख्या | |
| ४) | अल्पोपाहार | ४०८ × शाळासंख्या | |
| ५) | प्रमाणपत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | ४०८ ×<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | | **एकूण** | |

### सादरीकरण गट : वक्तृत्व नाटिका सादरीकरण, अनुभव कथन

| अ. क्र. | तपशील | तपशील | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | ४०८ तालुके × | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | ४०८ × शाळासंख्या | |
| ३) | परीक्षक मानधन | ४०८ × शाळासंख्या | |
| ४) | अल्पोपाहार | ४०८ × शाळासंख्या | |
| ५) | प्रमाणपत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | ४०८ ×<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | | **एकूण** | |

## जिल्हा स्तर

### लेखन स्पर्धा : जर्मन/जपानी

| अ. क्र. | तपशील | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | ३६ जिल्हे × शाळासंख्या | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | ३६ जिल्हे × शाळासंख्या | |
| ३) | परीक्षक मानधन | ३६ जिल्हे × २४ परीक्षक × २ दिवस× | |
| ४) | अल्पोपाहार | ३६ जिल्हे × ३०० व्यक्ती × दराने | |
| ५) | प्रमाणपत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | ३६ जिल्हे × ×४ स्पर्धा<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | प्रचार | ३६× | |
| | | **एकूण** | |

### सादरीकरण गट : वक्तृत्व नाटिका सादरीकरण, अनुभव कथन

| अ. क्र. | तपशील | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | ३६ जिल्हे × शाळासंख्या | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | ३६ जिल्हे × शाळासंख्या | |
| ३) | परीक्षक मानधन | ३६ जिल्हे × २४ परीक्षक × २ दिवस × | |
| ४) | अल्पोपाहार | ३६ जिल्हे × ३०० व्यक्ती × रु. दराने | |
| ५) | प्रमाणपत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | ३६ जिल्हे × ×४ स्पर्धा<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | प्रचार | ३६ × | |
| | | **एकूण** | |

**राज्य स्तर**

**लेखन स्पर्धा : जर्मन/जपानी**

| अ. क्र. | तपशील | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | | |
| ३) | परीक्षक मानधन | २४ परीक्षक × २ दिवस × रक्कम | |
| ४) | अल्पोपाहार | १००० व्यक्ती ×<br>× २ दिवस | |
| ५) | ७२० विजयी सहभागींसाठी<br>प्रमाण पत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | × ४ स्पर्धा<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | प्रचार | | |
| | | **एकूण** | |

**सादरीकरण गट : वक्तृत्व नाटिका सादरीकरण, अनुभव कथन**

| अ. क्र. | तपशील | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सभागृह | | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी | | |
| ३) | परीक्षक मानधन | २४ परीक्षक × २ दिवस × रक्कम | |
| ४) | अल्पोपाहार | १००० व्यक्ती × रु. दराने ×<br>२ दिवस | |
| ५) | ७२० विजयी सहभागींसाठी<br>प्रमाणपत्रे व बक्षिसे<br>प्रमाणपत्र छापणे ट्रॉफी<br>रोख बक्षीस | रु × ४ स्पर्धा<br>• प्रथम क्र.<br>• द्वितीय क्र.<br>• तृतीय क्र. | |
| | प्रचार | | |
| | | **एकूण** | |

**एकूण खर्च** :

| अ. क्र. | **तपशील** | **तपशील** |
|---|---|---|
| १) | तालुका स्तर लेखन स्पर्धा | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | तालुका स्तर सादरीकरण स्पर्धा | |
| ३) | जिल्हा स्तर लेखनस्पर्धा | |
| ४) | जिल्हा स्तर सादरीकरण स्पर्धा | |
| ५) | राज्य स्तर लेखनस्पर्धा | |
| ६) | राज्य स्तर सादरीकरण स्पर्धा | |
| | **एकूण** | |

**स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया** :

SCERT, महाराष्ट्र, पुणे व प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारा नोंदणी लिंक तयार करून प्रसारित केली जाईल व स्पर्धेची माहिती दिली जाईल.

◈◈◈

# २८) बोर्ड स्पर्धापरीक्षा

**प्रस्तावना** :

बोर्ड स्पर्धापरीक्षा, विशेषतः महाराष्ट्र राज्यात, विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा टप्पा असतो. यामध्ये दहावी (एसएससी) आणि बारावी (एचएससी) या दोन परीक्षा प्रमुख आहेत. या परीक्षांसाठी अभ्यास, वेळेचे व्यवस्थापन आणि योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे असते. बोर्ड परीक्षेच्या धर्तीवर पूर्वपरीक्षा घेणे जेणेकरून विद्यार्थ्यांमधील भीती जाऊन बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने निकोप स्पर्धात्मक वातावरण निर्मिती होईल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (MSBSHSE) या परीक्षा आयोजित करते. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ज्ञान आणि कौशल्यांची परीक्षा घेतली जाते. परंतु, निकोप स्पर्धात्मक वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी बोर्ड पूर्वपरीक्षा महत्त्वाचा मार्ग ठरेल.

**दहावी (एसएससी)**

- आयोजन : साधारणपणे जानेवारी महिन्यात स्पर्धा जाहिर करण्यात येईल.
- विषय : विज्ञान, गणित, भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- उपयुक्तता : विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक दिशा ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण
- तयारी : शालेय अभ्यासक्रमाच्या आधारे

**बारावी (एचएससी)**

- आयोजन : साधारणपणे जानेवारी महिन्यात
- विभाग : कला, वाणिज्य, विज्ञान
- विषय : विज्ञान (जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र) गणित, भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- उपयुक्तता : उच्च शिक्षण, व्यावसायिक कोर्सेस आणि भविष्यकालीन करियरसाठी महत्त्वपूर्ण

**बोर्ड परीक्षांची उद्दिष्टे :**

**शैक्षणिक** :

**१) सर्वांगीण विकास :** विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांमध्ये असलेल्या क्षमतांचे परीक्षण.

**२) गुणवत्तेची प्रमाणीकरण :** विद्यार्थ्यांची गुणवत्ता मोजण्याचा एक प्रमाणीकृत परीक्षाप्रणाली.

**वर्तनात्मक आणि मानसिक :**

**३) स्वावलंबन :** बोर्ड पूर्वपरीक्षा विद्यार्थ्यांना स्वावलंबनाकडे नेईल, त्यामुळे अभ्यास करण्याची प्रेरणा मिळेल.

**४) संकल्पना स्पष्टता :** विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आणि त्यांच्या आकलनाची परीक्षा घेण्यासाठी.

**५) समन्वय :** वेळ आणि संसाधनांचा योग्य समन्वय शिकण्यासाठी

**भविष्यकालीन :**

**७) उच्च शिक्षण आणि करिअर :** बोर्ड परीक्षेचे गुण विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण संस्था आणि व्यावसायिक कोर्सेसमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण असतात. त्यादृष्टीने बोर्ड पूर्वपरीक्षेची तयारी महत्त्वाची ठरेल.

**८) कार्यक्षमता परीक्षण :** विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचे आणि कार्यक्षमतेचे परीक्षण करून त्यांच्या भविष्यकालीन प्रवासाचा मार्ग उघडतो.

**बोर्ड परीक्षांचे महत्त्व :**

**शैक्षणिकदृष्ट्या :**

**१) उच्च शिक्षणाची संधी :** परीक्षेतील गुण उच्च शिक्षणातील संख्या आणि व्यावसायिक कोर्सेसमध्ये प्रवेश करण्याच्या संधी ठरवतात.

**२) अष्टपैलू व्यक्तिमत्व विकास :** विद्यार्थी विविध विषयांमध्ये परीक्षा देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने काम करतात.

**३) आकलन आणि सद्यःस्थिती :** विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सद्यःस्थिती पडताळून त्यांना अजून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

**वर्तणूक आणि मानसिकदृष्ट्या :**

**४) स्वावलंबन आणि जबाबदारी :** परीक्षा विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवते आणि जबाबदारी घेण्यास शिकवते.

**५) आत्मविश्वास** : चांगली तयारी, नियमित अभ्यास आणि योग्य प्लॅनिंगमुळे आत्मविश्वास वाढतो.

**भविष्याच्या दृष्टीने** :

**६) करिअरच्या दिशेची निवड :** विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे गुण त्यांच्या भविष्यकालीन करियरची दिशा निश्चित करतात.

**७) प्रवेशिका परीक्षांची तयारी :** यामधील सहभाग विद्यार्थ्यांना प्रवेशिका परीक्षांसाठी (Entrance) तयारी करण्यास मदत करते.

**दहावी (एसएससी) परीक्षेचे स्वरूप** :

- विषय
- परीक्षा प्रकार
- लेखी परीक्षा (लेखन आणि गुणांकनासंबंधी)
- गुणांकन
- प्रत्येक विषयासाठी १०० गुण.

**बारावी (एचएससी) परीक्षेचे स्वरूप** :

- विभाग : कला, वाणिज्य, विज्ञान
- विषय : विभागानुसार वेगवेगळे विषय (जसे की : गणित, भौतिकशास्त्र, रासायनशास्त्र, जीवनशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, इंग्रजी, मराठी इ.)
- परीक्षा प्रकार
- लेखी परीक्षा
- गुणांकन
- प्रत्येक विषयासाठी १०० गुण.

**स्पर्धेचे निकष/नियम व अटी :**

बोर्ड परीक्षांसाठीच्या नियम आणि अटी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उच्च शैक्षणिक गुणवत्ता अखंडीत राहण्यासाठी लागू करण्यात येतील.

**बोर्ड परीक्षांचे नियम आणि अटी** :

**परीक्षेच्या आधी** :

१) **अधिकृत ओळखपत्र** : विद्यार्थ्यांनी अधिकृत ओळखपत्र (हॉल तिकीट) बरोबर ठेवणे अनिवार्य आहे.

२) **समिती मान्यता** : परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या सूचनेवरून तयार केले जाईल.

३) **नावनोंदणी** : विद्यार्थी नियमानुसार परीक्षेसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे.

**परीक्षेदरम्यान :**

४) **सूचनांचे पालन** : विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या सर्व सूचना आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

५) **शांतता** : परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांनी पूर्ण शांतता राखावी आणि एकमेकांशी संवाद टाळावा.

**परीक्षेनंतर** :

**७) उत्तरपत्रिका** : उत्तरपत्रिका अधिकृत परीक्षकांकडून तपासल्या जातील आणि योग्य गुणांकन केले जाईल.

**८) प्रसिद्धी** : परीक्षेचे निकाल तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर जाहीर केले जातील.

**बोर्ड परीक्षांची अंमलबजावणी**

**परीक्षेपूर्व तयारी** :

**१) अधिकाऱ्याची नियुक्ती** : परीक्षेसाठी अधिकाऱ्यांची निवड आणि त्यांची नियुक्ती केली जाईल. यामध्ये मुख्य परीक्षक, निरीक्षक, आणि साहाय्यक कर्मचारी यांचा समावेश असेल.

**२) परीक्षेचे केंद्र निश्चिती** : परीक्षेची केंद्रे निश्चित करून ती विद्यार्थ्यांना कळवली जावीत.

**३) सामग्री वितरण** : परीक्षेच्या उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका, आणि इतर संबंधित सामग्री परीक्षा केंद्रावर वितरण केली जाईल.

**परीक्षेच्या दरम्यान** :

**४) कडक निरीक्षण** : परीक्षेच्या हॉलमध्ये कडक निरीक्षण ठेवून अनुचित वर्तन, नकल करण्याच्या प्रयत्नांना आळा घातला जाईल.

**५) शिष्टाचारांचे पालन** : विद्यार्थी आणि परीक्षक यांच्यासाठी निश्चित केलेले शिष्टाचारांचे पालन आवश्यक आहे.

**परीक्षेनंतर** :

**७) उत्तरपत्रिका तपासणी** : उत्तरपत्रिकांची काटेकोर तपासणी करून त्यांचे योग्य मूल्यांकन केले जाईल.

**८) गुप्तता** : उत्तरपत्रिका आणि परीक्षेचे गुण निकाल जाहीर करेपर्यंत गोपनीय ठेवले जातील.

**९) निकाल प्रसिद्धी :** निश्चित केलेल्या तारखांना परीक्षेचे निकाल प्रसिद्ध करण्यात येईल.

**वेळापत्रक व नोंदणी**

- राज्य स्तर **:** शासनामार्फत कळविण्यात येईल.
- स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया : रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, पुणेच्या वेब पोर्टलवर मूल्यमापन विभागामार्फत रजिस्ट्रेशन करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

**बोर्ड पूर्वपरीक्षा खर्चाचा तपशील :**

- लेखनसाहित्य व इतर स्टेशनरी पेपर छपाई प्रती विषय प्रती तालुका विज्ञान, गणित, भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी)

  - ➢ विज्ञान पेपर
  - ➢ गणित पेपर
  - ➢ भाषा पेपर

  रक्कम शासकीय नियमानुसार

दोन परीक्षेच्या माध्यमातून शाळांच्या निकालाची सरासरी काढून तालुका, जिल्हा व राज्यावरून शाळांचे तीन क्रमांक काढण्यात येतील. परीक्षा जरी विद्यार्थ्यांची असली तरी निकाल हा शाळेचा एकत्रित निकाल विचार घेऊन शाळांचे क्रमांक काढण्यात येतील.

- तालुका स्तर प्रथम पारितोषिक
- तालुका स्तर द्वितीय पारितोषिक
- तालुका स्तर तृतीय पारितोषिक
- जिल्हा स्तर प्रथम पारितोषिक
- जिल्हा स्तर द्वितीय पारितोषिक
- जिल्हा स्तर तृतीय पारितोषिक
- राज्य स्तर प्रथम पारितोषिक
- राज्य स्तर द्वितीय पारितोषिक
- राज्य स्तर तृतीय पारितोषिक

रक्कम शासकीय नियमानुसार

**टीप :** खर्चाच्या नियोजनात बदल होऊ शकतो.

**संकलित खर्चाचा तपशील**

| **अ. क्र.** | **स्पर्धा स्तर** | **खर्च रक्कम** |
|---|---|---|
| १) | तालुका | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हा | |
| ३) | राज्य | |
| | **एकूण खर्च** | |

❖❖❖

## २९) बालमानसशास्त्र (child psychology) केस स्टडी स्पर्धा

दैनंदिन जीवनात विद्यार्थी अनेक समस्यांना सामोरे जात असतात. या समस्यांचा मानसशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून त्या कशा दूर करता येतील यासाठी शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी, अधिकारी प्रयत्न करताना दिसतात. त्यात अनेकांना यशदेखील प्राप्त झालेले आहे. अशा यशस्वी केस स्टडी सर्वांसमोर येण्यासाठी बालमानसशास्त्र (child psychology) विषयांतर्गत केस स्टडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांच्या विविध वर्तनविषयक समस्यांचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजना समजून घेणे.

२) समाजमाध्यमांचा मानसिक आरोग्यावरील परिणाम व त्यावरील उपाययोजना समजून घेणे.

३) विद्यार्थी सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाय योजना समजून घेणे.

४) भाषिक व गणितीय संबोध स्पष्ट न होण्यामागील मानसशास्त्रीय अडथळे शोधणे व त्यावर उपाय योजना करणे.

५) शिक्षण विभागातील शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांना बालमानसशास्त्रातील केस स्टडी संदर्भासाठी ऑनलाइन उपलब्ध करून देणे.

**यशस्विता :**

१) बालमानसशास्त्र लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या समस्येकडे बघण्याचा दृष्टिकोन विकसित होईल.

२) भाषिक व गणितीय संबोध आत्मसात करण्यातील अडथळे दूर करण्यामागचे मार्ग सापडतील.

३) विद्यार्थी सुरक्षिततेसाठी उपाययोजना करता येतील.

४) ऑनलाइन उपलब्ध केलेल्या केस स्टडीचा उपयोग विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याकरता करता येईल.

**सहभागी स्पर्धक :**

सर्व प्रकारचे व्यवस्थापन व माध्यमाच्या शाळांतील प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षक, मुख्याध्यापक, तसेच शिक्षण विभागातील प्रशासन व सक्षमीकरण शाखेतील अधिकारी व कर्मचारी.

**स्पर्धेचे विषय :**

१) विद्यार्थ्यांच्या वर्तनविषयक समस्या व त्यावरील उपाय.

२) समाजमाध्यमांचा मानसिक आरोग्यावरील परिणाम व त्यावरील उपाययोजना.

३) विद्यार्थी सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाययोजना.

४) भाषिक विकासातील मानसशास्त्रीय अडथळे व त्यावरील उपाय.

५) गणितीय संबोध विकासातील मानसशास्त्रीय अडथळे व त्यावरील उपाय.

**वेळापत्रक** :

- जिल्हा पातळीवर स्पर्धा प्रवेश नोंदणी –
- तालुका स्तरावरील स्पर्धेचे आयोजन –
- जिल्हा स्तरावर स्पर्धेचे आयोजन –
- राज्य स्तरावर स्पर्धेचे आयोजन –

} शासनाकडून वेळापत्रक कळविण्यात येईल.

**स्पर्धेचे नियम** :

१) स्पर्धेत शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

२) केस स्टडी सादर करताना ती स्वतः प्रत्यक्ष राबविलेली असावी. त्यासाठी स्पर्धकाने स्वघोषित प्रतिज्ञा पत्र सादर करावे. (प्रतिज्ञापत्र नमुना सोबत दिला आहे.)

३) स्पर्धकांना संबंधित विषयात नमूद केलेल्या कोणत्याही एका घटकासाठी सहभाग नोंदविता येईल.

४) सदर केस स्टडी ही यापूर्वी कुठेही सादर केलेली नसावी.

५) केस स्टडी ही गतवर्षी किंवा चालू शैक्षणिक वर्ष या कालावधीमध्ये केलेल्या कामावर आधारित असावी.

६) बालमानसशास्त्र विषयावरील स्पर्धेकरिता दिलेल्या घटकांपैकी कोणत्याही एका घटकावर २००० शब्दमर्यादेत केस स्टडी असावी.

७) केस स्टडी अहवाल टाईप केलेला असावा. टायपिंगसाठी Unicode या फॉन्टचाच वापर करावा. फॉन्ट साईज १२, पेज मार्जिन डावी बाजू १.५ इंच व उजवी बाजू तसेच खालच्या बाजूस प्रत्येकी एक इंच मार्जिन समास असावा. टंकलिखित केलेली केस स्टडी PDF व MS Word स्वरूपात जोडावी. PDF फाईल ५ MB पेक्षा जास्त नसावी.

८) स्पर्धेच्या २ दिवस आधी दिलेल्या लिंकवर लेखन पाठवावे. लिंक स्वतंत्रपणे जिल्ह्यांना कळविली जाईल. हस्तलिखित करून स्कॅन केलेली केस स्टडी स्पर्धेसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

९) केस स्टडीचे मराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत लेखन करावे.

१०) निवडलेल्या विषयावर १० ते १२ स्लाईडचे पीपीटी सादरीकरण तयार करावे. अधिकच्या माहितीसाठी स्पर्धक लिंक देऊ शकतात.

११) सादरीकरणाकरिता प्रत्येक स्पर्धकाला १० मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

१२) स्पर्धकाने केस स्टडीच्या ३ प्रती हार्ड कॉपी स्वरूपात सोबत आणाव्यात.

१३) सदर स्पर्धा ही तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर घेण्यात येणार आहे.

१४) तालुका स्तरावर ही स्पर्धा उपरोक्त सूचनांप्रमाणे घेऊन तीन क्रमांक काढावेत. प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांकाची केस स्टडी ही जिल्हास्तरीय केस स्टडी स्पर्धेसाठी सहभागी होण्यास पात्र ठरेल.

१५) प्रति तालुका एक याप्रमाणे जिल्हा स्तरावर स्पर्धा घेण्यात येतील. या स्पर्धेमधून तीन क्रमांक काढावेत. प्रथम क्रमांक प्राप्त केस स्टडी राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी पात्र ठरेल.

**केस स्टडी (व्यक्ती अभ्यास) लेखनाचे आवश्यक मुद्दे**

१) केस स्टडीचा विषय : नेमकेपणाने लिहीलेला असावा.

२) समस्येची पार्श्वभूमी : समस्या निवडण्यामागचे कारण स्पष्ट करावे. यापूर्वी यावर काही कार्य झाले असल्यास त्याचा उल्लेख यात करावा.

३) व्यक्ती अभ्यासाचे उद्दिष्ट : यामध्ये 'केस स्टडी करण्याचे कारण? या केस स्टडीचा कोणाला, कसा व कोणत्या स्वरूपात फायदा होणार?' याबाबी स्पष्ट करणारी ३ ते ५ विधानात्मक उद्दिष्टे मांडावीत.

४) कार्यवाहीचे टप्पे : १) समस्येची जाणीव, स्वरूप व निरीक्षणे २) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा ३) आवश्यक साधनांचा विचार ४) करावयाच्या कृतींचा क्रम ५) समस्या निराकरण नंतरचे निरीक्षण ५) कार्यवाहीचे वेळापत्रक ६) इतरांची मदत

५) केस स्टडीकरिता वापरलेले साधन : निरीक्षण, प्रयोग, संरचित मुलाखती, प्रश्नावली, माहितीपर विश्लेषण.

६) केस स्टडीचे वैशिष्ट्य/वेगळेपणा : विषयाशी संबंधित, नेमकेपणाने, नावीन्यतेला धरून मांडावा.

७) गोपनीय दस्ताऐवज : समस्या निराकरणाकरता उपयोगात आणलेल्या गोपनीय दस्तऐवजांचा समावेश यात असेल.

८) उपाय : समस्या निराकरणाकरिता केलेले उपाय ठळकपणे यात मांडावेत. सदर उपाय हे उद्दिष्ट साध्य करणारे असावेत.

९) विमर्शी चिंतन : व्यक्ती अभ्यास मधून आपण काय शिकलो? याबद्दल नेमकेपणाने माहिती लिहावी.

१०) आवश्यकतेनुसार चार ते पाच फोटोंचा समावेश केस स्टडीमध्ये योग्य ठिकाणी करता येईल.

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती ................................................................ प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या केस स्टडी स्पर्धेसाठी सादर केलेला ................................................................ व्यक्ती अभ्यास माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारित आहे. सदर केस स्टडी ही काल्पनिक नाही. भारतीय अथवा विदेशी लेखकाच्या ग्रंथातील अथवा संशोधनाच्या माहितीच्या आधारे ही केस स्टडी लिहिलेली नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा प्रत्यक्ष सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. ही केस स्टडी यापूर्वी कोणत्याही स्पर्धेसाठी सादर केलेली नाही; तसेच कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन ती माझ्या नावावर सादर केलेली नाही. तसे आढळून आल्यास सदर बाब कलम १९५७ खाली दाखल पात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

**स्थळ :**

**स्पर्धकाची स्वाक्षरी**

**शाळा/कार्यालयाचा शिक्का**

**नाव :** ........................................

**दिनांक :** ....................................

**परीक्षण निकष :**

१) स्पर्धेच्या परीक्षणासाठी अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींची निवड करावी.

२) स्पर्धा परीक्षणासाठी तीन सदस्यांची समिती असावी.

३) स्पर्धा परीक्षण पुढील मुद्द्यांच्या आधारे करावे. समितीतील सदस्यांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीनुसार अंतिम निकाल घोषित करावा.

**मूल्यमापन :**

**व्यक्ती अभ्यास (केस स्टडी)**

| अ. क्र. | केस स्टडी स्पर्धा मूल्यमापन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | अभ्यासाचे सादरीकरण | १५ |
| २) | उद्दिष्टातील स्पष्टता | १० |

| अ. क्र. | व्यक्ती अभ्यास मूल्यमापन निकष | गुण |
|---|---|---|
| ३) | उपायांमधील नावीन्यता | १० |
| ४) | नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही | २५ |
| ५) | मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण | १० |
| ६) | अभ्यासाचे वर्तमान काळातील महत्त्व | १० |
| ७) | अहवाल लेखन | २० |
| | **एकूण गुण** | **१००** |

◈◈◈

# ३०) व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन (Career Guidance And Counselling) स्पर्धा

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकात करिअरचे विविध पर्याय उपलब्ध आहेत, या सर्व पर्यायांमध्ये समाजाची गरज, विद्यार्थ्यांची क्षमता कौशल्य याला अनुषंगून व्यवसायाची निवड करणे महत्वाचे असते. हीच गरज ओळखून शिक्षक कर्मचारी अधिकारी यांना व्यवसाय मार्गदर्शन स्पर्धेत अभिव्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेतून करिअरच्या विश्वसनीय अशा विविध पर्यायांची माहिती उपलब्ध होईल. ज्याचा उपयोग भविष्यात शिक्षण क्षेत्रातील सर्व कर्मचारी अधिकारी व पर्यायाने विद्यार्थ्यांना होणार आहे.

**उद्दिष्टे :**

१) व्यवसाय मार्गदर्शनाची गरज स्पष्ट करणे.

२) आंतरविद्याशाखीय शिक्षणातून करिअरच्या विविध संधींची ओळख होणे.

३) व्यवसाय मार्गदर्शनामध्ये (करिअर गायडन्स) येणाऱ्या विविध पैलूंची माहिती देणे.

४) करिअर मार्गदर्शनासाठी विश्वसनीय अशा स्रोतांची माहिती व त्यांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

५) स्वयंरोजगार व उद्योजकता क्षेत्राचे सद्यःस्थितीतील महत्त्व स्पष्ट करणे.

**यशस्विता :**

१) स्पर्धकांमध्ये करियर मार्गदर्शनाबाबत जागरुकता निर्माण होईल.

२) आंतरविद्याशाखीय शिक्षणातून करिअरच्या नवीन संधींची ओळख होईल

३) करियर मार्गदर्शनाच्या विविध व विश्वसनीय स्त्रोतांची माहिती मिळेल.

**व्यवसाय मार्गदर्शन या विषयाच्या स्पर्धेचे निकष खालीलप्रमाणे राहतील :**

१) ही स्पर्धा पूर्णतः ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येईल.

२) या स्पर्धेसाठी लेखी व प्रत्यक्ष सादरीकरण असे दोन स्तर असतील.

३) सदर स्पर्धेमध्ये सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक तसेच शिक्षण विभागातील प्रशासन व सक्षमीकरण शाखेतील अधिकारी व कर्मचारी सहभागी होऊ शकतील.

४) इच्छुक स्पर्धकांनी गुगल लिंकमध्ये दिलेली स्वतःची संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे.

५) सदरील स्पर्धेसाठी सहभागी होणारे स्पर्धक हे कर्तव्यावर (ऑन ड्युटी) असे समजले जाईल.

**स्पर्धेसाठीची कार्यपद्धती** :

१) सदरील स्पर्धा ही जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या नियंत्रणाखाली जिल्हा स्तरावर पूर्ण करण्यात येईल.

२) स्पर्धेची नाव नोंदणी जुलै महिन्यात सुरू होईल.

३) राज्य स्तरीय स्पर्धेचे ठिकाण स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन (Career Guidance And Counselling)**

- **विषयाअंतर्गत सादरीकरण स्पर्धेचे विषय**

  १) करिअर समुपदेशनासाठी मानसशास्त्रीय कसोट्यांची उपयुक्तता.

  २) आंतरविद्याशाखीय शिक्षणातून करिअरच्या नव्या संधी

  ३) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करिअर संधी.

  ४) विविध शिष्यवृत्तीचा प्रचार प्रसार व त्यांची उपयुक्तता.

  ५) करिअर निवड प्रक्रियेतील येणारे अडथळे व त्यावरील उपाययोजना.

  ६) करिअर मार्गदर्शन करताना करिअरविषयक अद्ययावत माहितीचे विश्वसनीय विविध स्रोत व त्यांची उपयुक्तता.

  ७) स्वयंरोजगार व उद्योजकता विकासाची सद्यःस्थितीतील गरज.

  ८) विविध प्रवेश प्रक्रियांसाठी करावयाचे दस्तऐवजीकरण (Documentation)

  ९) दहावी/बारावी नापास विद्यार्थ्यांसाठी करिअर संधी.

- **वेळापत्रक** :

  १) जिल्हा पातळीवर स्पर्धा प्रवेश नोंदणी –

  २) तालुका स्तरावरील स्पर्धेचे आयोजन –

  ३) जिल्हा स्तरावर स्पर्धेचे आयोजन –

  ४) राज्य स्तरावर स्पर्धेचे आयोजन –

  } शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

- **स्पर्धेचे नियम** :

१) स्पर्धकांना संबंधित विषयात नमूद केलेल्या कोणत्याही एका घटकासाठी सहभाग नोंदविता येईल.

२) व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन (Career Guidance And Counselling)

विषयांतर्गत सादरीकरण स्पर्धा विषयाकरिता नमूद केलेल्या घटकांपैकी कोणत्याही एका घटकावर पीपीटी (१० ते १२ स्लाईड) व त्याची विस्तृत माहिती २००० शब्दमर्यादेत टंकलिखित करून पीडीएफ स्वरूपात मेल करावी.

**या स्पर्धेकरिता एकूण ५० गुण असतील.**

१) लेखन (२००० शब्दमर्यादा आशयाशी संबंधित लेखन असावे) – १० गुण

२) PPT – १० गुण

३) विषयाचे सादरीकरण –१० गुण

४) उपयुक्तता– १० गुण

५) प्रश्नोत्तरे सत्रातील कामगिरी – १० गुण

- प्रत्यक्ष सादरीकरण संपल्यानंतर निकाल घोषित करण्यात येईल.
- स्पर्धेच्या निकालाबाबतचा परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

<table>
<tr><th colspan="10">व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन विषयांतर्गत सादरीकरण स्पर्धेचे अंदाजपत्रक</th></tr>
<tr><th>अ. क्र.</th><th>स्तर</th><th>एकूण संख्या</th><th>स्पर्धा आयोजन</th><th>बक्षीस रक्कम</th><th>स्टेशनरी खर्च</th><th>परीक्षक मानधन</th><th>स्पर्धक प्रवास खर्च</th><th>स्पर्धक भोजन व निवास</th><th>एकूण खर्च</th></tr>
<tr><td rowspan="3">१)</td><td rowspan="3">तालुका</td><td rowspan="3">३५८+१९<br>३७७<br>३५८<br>तालुके +<br>मुंबई<br>URC<br>शहर ७<br>+<br>मुंबई<br>उपनगर</td><td rowspan="3">३७७<br>तालुके =</td><td>प्रथम<br>क्रमांक –</td><td rowspan="3"></td><td rowspan="3" colspan="4">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>द्वितीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td>तृतीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td rowspan="3">२)</td><td rowspan="3">जिल्हा</td><td rowspan="3">१३६ जिल्हे<br>URC</td><td rowspan="3">३६<br>जिल्हे</td><td>प्रथम<br>क्रमांक –</td><td rowspan="3"></td><td rowspan="3" colspan="4">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>द्वितीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td>तृतीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td rowspan="3">३)</td><td rowspan="3">राज्य</td><td rowspan="3">१</td><td rowspan="3">सभागृह<br>व सर्व<br>आवश्यक<br>खर्च</td><td>प्रथम<br>क्रमांक –</td><td rowspan="3"></td><td rowspan="3" colspan="4">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>द्वितीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td>तृतीय<br>क्रमांक –</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

◈◈◈

# ३१) योगासन स्पर्धा

## शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी

**स्पर्धेसाठी नियम व अटी :**

**सहभागी स्पर्धक**

प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा घेण्यात येईल. योगासन स्पर्धा पुरुष व स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे घेतल्या जातील.

**विषय :** पारंपरिक योगासन स्पर्धा

**स्पर्धेचे नियम व अटी** :

१) सदरहू स्पर्धेत वयोगट खालीलप्रमाणे राहतील.

अ) २५ वर्षे ते ४५ वर्षे (पुरुष)

ब) २५ वर्षे ते ४५ वर्षे (स्त्री)

क) ४६ वर्षे ते ५८ वर्षे (पुरुष)

ड) ४६ वर्षे ते ५८ वर्षे (स्त्री)

२) गट–अ, गट–ब आणि गट–क मधील आसनांचा स्पर्धेत समावेश असेल.

३) सर्व वयोगटासाठी व सर्व आसनासाठी, आसने टिकविण्याचा कालावधी २० सेकंद राहील.

४) गट–अ आणि गट–ब ची आसने स्पर्धेच्या आधी ऐनवेळी लॉटरी पद्धतीने काढली जातील. ग्रुप–सी मधील कोणतेही एक आसन स्पर्धकाला निवडता येईल.

५) गट–अ, गट–ब व गट–क मध्ये दिलेल्या १८ आसनांपैकी तीन आसने करावी लागतील व त्याबरोबरच स्पर्धकाच्या इच्छेनुसार अभ्यासक्रमात नसलेली कोणतीही दोन आसने करावी लागतील. याप्रमाणे स्पर्धकाला एकूण पाच आसने करावी लागतील. प्रत्येक आसनाला १० पैकी गुण देण्यात येतील.

६) स्पर्धेसाठी वेळेत नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी नसेल तर सहभागी होता येणार नाही.

७) स्पर्धेसाठी वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

८) स्पर्धेमधील सादरीकरणांमध्ये असांविधानिक शब्द व भाषेचा वापर टाळावा.

९) सादरीकरण मराठी/हिंदी/इंग्रजी यांपैकी कोणत्याही भाषेतून करता येईल.

१०) प्रत्येक स्तरावरील प्रथम स्पर्धक पुढील वरिष्ठ स्तरावरील स्पर्धेसाठी सहभागी होईल.

११) गुणप्रदान करताना आसन घेण्याची पद्धत, आसनाची स्थिरता, देहबोली, ड्रेसकोड इ. बाबी विचारात घेतल्या जातील.

१२) स्पर्धेसाठी ड्रेसकोड/पोशाख असावा.

१३) परीक्षक समितीमध्ये एकूण तीन परीक्षक, एक गुण मोजणीसाठी व एक वेळ मोजणीसाठी अशा पाच व्यक्ती असतील.

१४) पंचांचा निर्णय अंतिम राहील.

१५) जिवीताची जबाबदारी स्पर्धकावर राहील.

**शिक्षक – शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी योगासन स्पर्धा**

**योगासन स्पर्धा अभ्यासक्रम**

| अ. क्र. | गट – अ | गट – ब | गट – क |
|---|---|---|---|
| १) | पश्चिमोत्तानासन | चक्रासन | बकासन |
| २) | सर्वांगासन | हलासन | टिटिभासन |
| ३) | मत्स्यासन | वृक्षासन | अष्टवक्रासन |
| ४) | धनुरासन | शीर्षासन | नटराजासन |
| ५) | अर्धमच्छिंद्रासन | उष्ट्रासन | हनुमानासन/बजरंगासन |
| ६) | भुजंगासन | बद्धपद्मासन | पिंचमयूरासन/व्याघ्रासन |

**वेळापत्रक :**

१) केंद्र पातळीवर स्पर्धा प्रवेश नोंदणी :
२) प्रत्यक्ष स्पर्धा व मूल्यांकन :
३) तालुका स्तरावर स्पर्धा व मूल्यांकन :
४) जिल्हा स्तरावर स्पर्धा व मूल्यांकन :
५) राज्य स्तरावर छायाचित्र प्रदर्शन व मूल्यांकन :

} शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

**पारितोषिकांचे स्वरूप :**

**योग स्पर्धा**

| अ. क्र. | स्तर | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | | | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| २) | तालुका स्तर | | | | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३) | जिल्हा स्तर | | | | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| ४) | विभाग स्तर | | | | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| ५) | राज्य स्तर | | | | सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |

प्रत्येक स्तरावर पाच परीक्षक नेमावेत.

**परीक्षक मानधन स्वरूप** :

**योग स्पर्धा**

| अ. क्र. | स्तर | मानधन | प्रवासखर्च | बक्षिसाचे स्वरूप | |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | रक्कम शासकीय नियमानुसार | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| २) | तालुका स्तर | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ३) | जिल्हा स्तर | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ४) | विभाग स्तर | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ५) | राज्य स्तर | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |

**मूल्यमापन तक्ता**

| अ. क्र. | खेळाडूचे संपूर्ण नाव | Forward Bending | Balancing | Backward Bending | Twisting | Stretching | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १० | १० | १० | १० | १० | ५० |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

परीक्षकांचे पूर्ण नाव : ...............................................

स्वाक्षरी

## सहभागी स्पर्धक प्रवेश अर्ज/नोंदणी अर्ज

१) स्पर्धकाचे नाव : ..........................................................................

२) जन्मदिनांक : ..........................................................................

३) वयोगट : ..........................................................................

४) शाळेचे/कार्यालयाचे नाव व पत्ता :..........................................................................

५) केंद्राचे नाव (लागू असल्यास) : ..........................................................................

६) तालुक्याचे नाव : ..........................................................................

७) जिल्ह्याचे नाव : ..........................................................................

८) भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................................................................

९) ई-मेल आयडी : ..........................................................................

**दिनांक :** **स्पर्धकाची स्वाक्षरी :**

**स्थळ :** **स्पर्धकाचे नाव :**

## संकलित गुणपत्रक

**स्थळ :**

**वयोगट :** अ) २५ वर्ष ते ४५ वर्ष (पुरुष)

ब) २५ वर्ष ते ४५ वर्ष (स्त्री)

क) ४६ वर्ष ते ५८ वर्ष (पुरुष)

ड) ४६ वर्ष ते ५८ वर्ष (स्त्री)

| अ. क्र. | खेळाडूचे संपूर्ण नाव | पंच क्र. | | | एकूण प्राप्त गुण | निकाल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | | | |
| | | ५० | ५० | ५० | १५० | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

परीक्षकांचे पूर्ण नाव व स्वाक्षरी

१)

२)

३)

(सदर स्पर्धेसाठी स्पर्धा खर्च शासकीय नियमानुसार)

◈◈◈

# ३२) शैक्षणिक व्हिडिओनिर्मिती स्पर्धा

**प्रस्तावना**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP 2020), राष्ट्रीय (NCF) व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या (SCF) पार्श्वभूमीवर शिक्षकांनी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन अधिक प्रभावी, विद्यार्थिकेंद्रित व सर्जनशील करणे आवश्यक ठरत आहे. कोविडनंतरच्या काळात शैक्षणिक व्हिडिओ हा शिक्षणाचा महत्त्वाचा घटक बनला आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्यभरातील शिक्षकांना स्वतः तयार केलेल्या अध्यापन व्हिडिओच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्ये आणि विषयावरील पकड दाखवण्याची संधी देणारी ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. याबरोबरच या स्पर्धेत शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही सहभागी होता येईल.

**स्पर्धेची उद्दिष्टे :**

१) शिक्षकांच्या डिजिटल अध्यापन कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून सशक्त अध्यापनसामग्री निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांना दर्जेदार, उपयुक्त आणि प्रभावी शैक्षणिक व्हिडिओ सामग्री उपलब्ध करून देणे.

**पात्रता निकष** :

- **स्पर्धेतील अपेक्षित गट :** रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, जि. शि. प्र. प. आणि शिक्षण विभागातील पर्यवेक्षिय यंत्रणा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
- महाराष्ट्रातील शासकीय, निमशासकीय व खासगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीचे अध्यापन करणारे शिक्षक पात्र.
- सहभागींचा शालार्थ/सेवार्थ आयडी व शाळेचा युडायस कोड अनिवार्य आहे.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक** : (संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने)

स्पर्धकाने स्वतः अध्यापन व्हिडिओ तयार करून तो MP ४ फॉरमॅटमध्ये केंद्र प्रमुख (Cluster Head) यांच्याकडे निश्चित वेळेत सादर करावा.

**१) केंद्र स्तर :** सर्व व्हिडिओ तपासून त्यातील एक उत्कृष्ट व्हिडिओ ब्लॉक स्तरावर पाठवावा.

**२) तालुका स्तर :** ब्लॉक स्तरावरील सर्व व्हिडिओ एकत्र करून मूल्यांकनानंतर एक विजेता व्हिडिओ जिल्हा स्तरावर सादर करावा.

**३) जिल्हा स्तर :** जिल्हा स्तर समिती मूल्यांकन करून एक विजेता व्हिडिओ राज्य स्तरावर पाठवेल.

**४) राज्य स्तर :** रा. शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, पुणे येथे अंतिम मूल्यांकन होईल व २० राज्यस्तरीय विजेते निवडले जातील.

**टीप :** सर्व स्तरांवरील निवड समित्यांचा निर्णय अंतिम राहील.

**महत्त्वाचे नियम** :

१) सहभागी स्पर्धकाने कोणत्याही एका शालेय विषयातील कोणत्याही एका घटकावर आधारित अध्यापनाचा एक व्हिडिओ सादर करावा.

२) व्हिडिओमध्ये विद्यार्थी असणे ही अनिवार्य अट नाही/वैकल्पिक आहे.

३) व्हिडिओमध्ये सहभागी शिक्षकाचे दिसणे अनिवार्य आहे.

४) व्हिडिओ 'अध्यापन व्हिडिओ' असावा – म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या उद्‌देशाने बनवलेला असावा.

५) व्हिडिओ स्वतः तयार केलेला असावा.

६) फक्त MP ४ फॉरमॅट स्वीकारला जाईल. व्हिडिओ गुणवत्तापूर्ण असावा.

७) व्हिडिओमध्ये कोणताही जाहिरातीचा लोगो/सॉफ्टवेअरचा वॉटरमार्क दिसल्यास तो व्हिडिओ स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

८) व्हिडिओमधून अध्यापन घटक सोडून इतर कोणत्याही घटकाची जाहिरात, प्रचार व प्रसार आढळून आल्यास व्हिडिओ स्पर्धेतून बाद समजला जाईल.

९) व्हिडिओची कालमर्यादा – किमान ५ मिनिटे व कमाल ८ मिनिटे.

१०) व्हिडिओच्या पहिल्या १५ सेकंदात खालील माहिती असावी.

- व्हिडिओची माहिती – इयत्ता, विषय, पाठ्यघटक, अध्ययन निष्पत्ती
- शिक्षकाची माहिती – पूर्ण नाव, पदनाम, शालार्थ/सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक, शाळेचे/कार्यालयाचे नाव, शाळेचा युडायस कोड, केंद्र, तालुका, जिल्हा.

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | २५ |
| २) | अध्यापनशास्त्रीय उपयुक्तता (Pedagogical Value) | २० |
| ३) | दृश्य मांडणी व व्हिडिओ संपादन (Visual Design & Editing) | १५ |

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| ४) | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity & Originality) | १० |
| ५) | तांत्रिक बाजू (Technical Execution - Audio/Visual Quality) | १० |
| ६) | संवाद व सादरीकरण कौशल्ये | १० |
| ७) | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | १० |

**रुब्रिक तपशील :**

- **सामग्रीची गुणवत्ता :** माहिती सखोल, अचूक व विषयाशी सुसंगत आहे का? NEP /NCF/SCF शी सुसंगती आहे का?
- **शैक्षणिक उपयुक्तता :** व्हिडिओ विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे का? शिक्षणात वापरता येईल का?
- **दृश्य व संपादन :** व्हिडिओचे दृश्य सादरीकरण आकर्षक, संतुलित व नीटनेटके आहे का?
- **सर्जनशीलता :** शैली, संकल्पना व सादरीकरणातील मौलिकता किती आहे?
- **तांत्रिक बाजू :** ऑडिओ-व्हिडिओ गुणवत्ता, संपादन, सबटायटल्सची स्पष्टता (असल्यास) इ.
- **प्रस्तुतीकरण कौशल्ये :** संवादशैली, आवाज, आत्मविश्वास, स्पष्टता
- **सूचनांचे पालन :** कालावधी, फॉरमॅट, ओळख, कॉपीराईट यांचे पालन

**७) स्पर्धेसाठी अंदाजित खर्च** **खर्च (- लाख)**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>खर्चाचे स्वरूप</th><th>युनिट खर्च</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१)</td><td>प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख रकमेचे पारितोषिक</td><td colspan="2" rowspan="2">शासकीय नियमानुसार खर्च रक्कम</td></tr>
<tr><td>२)</td><td>इतर खर्च - स्पर्धेचे आयोजन, नोंदी ठेवणे, अहवाल लेखन, स्टेशनरी व इतर खर्च इ.</td></tr>
</table>

**निष्कर्ष** :

ही स्पर्धा शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांना अध्यापनामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी प्रोत्साहित करते. सर्जनशील दृष्टिकोन आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या विविध पद्धती यामुळे अध्यापनात नव्या शक्यता निर्माण होतील. अशा उपक्रमांमुळे राज्यातील शिक्षक, कर्मचारी, अधिकारी आपले कौशल्य आणि कल्पकता प्रभावी पद्धतीने सादर करू शकतात.

◈◈◈

# ३३) डॉक्युमेंटरी स्पर्धा

**सहभागी स्पर्धक** :

सर्व प्रकारचे व्यवस्थापन व माध्यमांच्या शाळेतील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

**शैक्षणिक डॉक्युमेंटरीचे विषय** :

१) शिक्षणासाठी नावीन्यपूर्ण दृष्टिकोन

२) शिक्षणातील आव्हाने व उपाय

३) शिक्षण आणि शिक्षक

४) शिक्षणातील प्रेरणादायी उपक्रम

५) भविष्यवेधी शिक्षण

६) अध्ययन–अध्यापन

७) डिजिटल अध्यापनाची यशस्विता

८) शिक्षणातील लोकसहभाग

९) अध्ययन–अध्यापनातील यशस्वी ज्ञानरचनावाद

१०) कला–क्रीडानुरूप शिक्षणप्रवाह

(वरील विषयांपैकी कोणत्याही एका विषयासंदर्भातील एका घटकावर डॉक्युमेंटरी बनवणे अपेक्षित आहे.)

**स्पर्धेचे नियम** :

१) स्पर्धा शालेय शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांचेसाठी खुली आहे.

२) डॉक्युमेंटरी ही १०–१२ मिनिटांची व्हिडिओ स्वरूपात HD Quality १०८०P मध्ये असावी.

३) स्पर्धकाने डॉक्युमेंटरी ही मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत स्वतः बनवलेली असावी.

४) डॉक्युमेंटरी स्पर्धेत सहभागी झालेल्यांनी वापरलेल्या साधनांचा तपशील द्यावे.

५) स्पर्धकांना कुठलाही कॅमेरा वापरण्याची मुभा आहे, तसेच सहभागींना त्यांच्या सेलफोन किंवा मोबाइल फोनचा वापर करून छायाचित्रण करण्याचे स्वातंत्र्य आहे.

६) डॉक्युमेंटरीच्या पुनर्वापराचे अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राखीव असतील.

७) सादर केलेली डॉक्युमेंटरी ही कोठेही पूर्व प्रकाशित झालेली नसावी.

८) डॉक्युमेंटरीला शीर्षक देणे बंधनकारक आहे.

९) सदर स्पर्धा ही केंद्र, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळ्यांवर होणार आहे.

१०) प्रत्येक स्तरावरील प्रथम ५ क्रमांक पुढील स्तरासाठी पात्र ठरणार आहेत.

११) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

१२) कोणत्याही कॉपीराइटचे उल्लंघन अपात्रतेस कारणीभूत ठरेल आणि बक्षीस रक्कम जप्त होईल. याबाबत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

१३) निवड समिती आणि मूल्यमापन समितीचे निर्णय अंतिम आणि सर्व स्पर्धकांसाठी बंधनकारक असतील. मूल्यमापन समिती अर्जदाराकडून प्रवेशाच्या कोणत्याही पैलूवर स्पष्टीकरण मागू शकते आणि दिलेल्या वेळेत ते सादर न केल्यास, प्रवेश अपात्र ठरवला जाऊ शकतो.

१४) अयोग्य किंवा आक्षेपार्ह सामग्री समाविष्ट असलेले फोटो व व्हिडिओ ज्यामध्ये उत्तेजकता, नग्नता, हिंसाचार, मानवी हक्क किंवा पर्यावरण कायद्यांचे उल्लंघन, कायदा, धार्मिक, भारताची सांस्कृतिक आणि नैतिक परंपरा यांच्या विरुद्धातील इतर कोणत्याही सामग्री यांचा समावेश आहे असे फोटो व व्हिडिओ काटेकोरपणे प्रतिबंधित आहेत आणि ते ताबडतोब अपात्र ठरवले जातील. मूल्यमापन समिती वरील निकषांव्यतिरिक्त अयोग्य आणि आक्षेपार्ह ठरवेल अशा इतर प्रवेशिकांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आहे.

१५) स्पर्धा परीक्षणासाठी विहित मुदतीच्या आत कळविलेल्या स्रोताद्वारे डॉक्युमेंटरी सादर करणे बंधनकारक असेल.

१६) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

१७) पर्यवेक्षीय अधिकारी व कर्मचारी आपल्या लगतच्या किंवा कार्यक्षेत्रातील कोणत्याही एका केंद्रातून आपला सहभाग निश्चित करू शकतात.

## डॉक्युमेंटरी स्पर्धा सहभागी स्पर्धक प्रवेश अर्ज

१) स्पर्धकाचे नाव व फोटो : ..................................................................

२) शाळेचे नाव व पत्ता : ..................................................................

..................................................................

३) केंद्राचे नाव : ..................................................................

४) तालुक्याचे नाव : ..................................................................

५) जिल्ह्याचे नाव : ..................................................................

६) संपर्क क्रमांक : ..................................................................

७) ई–मेल : ..................................................................

८) स्पर्धेसाठी निवडलेला विषय : ..................................................................

९) निवडलेल्या विषय संदर्भित उपविषय : ..................................................................

१०) उपयोगात आणलेली सामग्री : ..................................................................

**सहभागी स्पर्धक स्व–घोषणापत्र**

मी श्री/श्रीमती/कु. .................................................................. याद्वारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेसाठी मी स्वतः तयार केलेली डॉक्युमेंटरी सादर करत आहे आणि डॉक्युमेंटरीतील विषय माझा स्वतःचा आहे. अर्जात मी दिलेली माहिती खरी आहे. स्पर्धा जिंकल्यास, जर माझ्याकडून पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती खोटी ठरली किंवा डॉक्युमेंटरीत कॉपीराइटचे उल्लंघन झालेले आढळले तर मला स्पर्धेतून अपात्र ठरवले जाऊ शकते आणि मूल्यमापन समितीने घेतलेल्या निर्णयांवर कोणताही अधिकार नाही किंवा त्याबाबत मला काहीही म्हणता येणार नाही याची मला जाणीव आहे. भविष्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना या डॉक्युमेंटरीचा वापर करण्यास मी संमती देत आहे.

दिनांक : स्वाक्षरी :

स्थळ : स्पर्धकाचे नाव : ......................................

**डॉक्युमेंटरी बनविण्याचे प्रमुख उद्देश** :

- शैक्षणिक विषयांवरील समस्या व अन्य माहिती सोप्या व मनोरंजक पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचवणे.
- विशिष्ट संकल्पना, तत्त्वे, घटना किंवा कौशल्ये आत्मसात करणे.
- नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि त्यांच्यातील जिज्ञासेला चालना देणे.
- क्लिष्ट विषय समजावून सांगण्यासाठी दृश्य आणि श्राव्य साधनांचा उपयोग करणे.
- शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक विषयांवर विचारमंथन घडवून आणणे.
- कृतिशीलता, सर्जनशीलता व संशोधक वृत्तीला चालना देणे.

**डॉक्युमेंटरीची ध्येये** :

- गुणवत्तापूर्ण, प्रभावी व आकर्षक पद्धतीने ज्ञान व शिक्षण देणे.
- समस्यांची जाणीव निर्माण करून शैक्षणिक जनजागृती करणे.
- चिरस्थायी शिकण्याची व ज्ञान आत्मसात करण्याची सवय लावणे.
- स्वयंप्रेरित शिक्षणाची आवड निर्माण करणे.
- संवेदनशील, जबाबदार नागरिक म्हणून शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण करणे व सक्रिय बनवणे.
- ज्ञानाचा आवाका वाढवणे.

**डॉक्युमेंटरी बनवताना सहभागी स्पर्धकांनी लक्षात घ्यावयाच्या महत्त्वपूर्ण बाबी :**

**विषय निवड** :

- **महत्त्व :** निवडलेला विषय शैक्षणिक बाबीसंबंधित बहुउपयोगी, प्रेरक, आकर्षक आणि महत्त्वाचा असावा.
- **सुसंगतता :** विषय समाज, कला, इतिहास, विज्ञान किंवा सांस्कृतिक घटकांशी संबंधित असावा.
- **संपर्कता :** विषयात नवा दृष्टिकोन, नवी माहिती किंवा ताज्या घडामोडी असाव्यात.

**नावीन्यता** :

- विषयाविषयी सखोल अभ्यास करून अचूक माहिती गोळा करणे.
- प्रत्यक्ष मुलाखती, दस्तऐवज, फोटो, व्हिडिओ किंवा अधिकृत अहवालांचा समावेश असावा.
- माहितीला कोणत्याही पूर्वग्रहापासून मुक्त ठेवणे.

**विषयानुरूप माहितीची मांडणी** :

- प्रभावीपणे सांगण्यासाठी सुरुवात, मध्य आणि शेवट या तिन्ही टप्प्यांची आखणी करणे.

- अध्ययनार्थीची शैक्षणिक व सामाजिक पातळीवर गुंतवून ठेवणाऱ्या गोष्टींचा समावेश करणे.
- स्पष्ट आणि सोप्या पद्धतीने मुख्य संदेश पोहोचवणे.
- प्रभावी, सोपे आणि विषयाशी सुसंगत संवाद तयार करणे.
- कोणते दृश्य कसे आणि कुठे दाखवायचे याची आखणी करणे.

**व्हिज्युअल आणि ध्वनिप्रभाव** :

- चांगल्या दर्जाचा कॅमेरा आणि व्हिज्युअल अँगल्सचा वापर करणे.
- पार्श्व संगीत, नॅरेशन आणि ध्वनी परिणाम योग्य ठिकाणी समाविष्ट करणे.
- नैसर्गिक किंवा कृत्रिम प्रकाशाचा योग्य वापर.

**मुलाखती** :

- संबंधित तज्ज्ञ, साक्षीदार किंवा प्रभावित व्यक्तींच्या मुलाखतींचा समावेश करणे.
- स्पष्ट आणि सुसंगत प्रश्न तयार करणे.

**एडिटिंग :**

- दृश्ये आणि संवाद सुसंगत ठेवणे.
- डॉक्युमेंटरीची लांबी ६ ते १० मिनिटांची असणे अपेक्षित.
- डॉक्युमेंटरी प्रेक्षकांना रंजक वाटण्यासाठी गती संतुलित ठेवणे.

**अध्ययनकर्त्याचा विचार :**

- डॉक्युमेंटरी शैक्षणिक परिवर्तनासाठी बनवली जात आहे हे लक्षात घेणे (शिक्षण क्षेत्रातील घटकांसाठी).
- भाषा आणि शैली : प्रेक्षकांच्या सोयीसाठी सोपी भाषाशैली ठेवणे.

**बजेट आणि साधने :**

- स्वतःच्या उपलब्ध बजेटनुसार डॉक्युमेंटरीची आखणी करणे.
- योग्य साधनांचा आणि विद्यार्थ्यांचा वापर.

**सत्यता आणि जबाबदारी :**

- विषयासंदर्भातील माहिती आणि दृश्ये खऱ्या घटनेशी सुसंगत असावीत.
- संवेदनशील विषय हाताळताना सामाजिक जाण व भान ठेवणे.

**डॉक्युमेंटरी मूल्यांकनातील महत्त्वाच्या बाबी :**

**विषयाची निवड आणि महत्त्व :**

- निवडलेला विषय महत्त्वाचा आणि विषयाशी संबंधित आहे का?
- विषयावर नवीन माहिती, दृष्टिकोन किंवा विचार दिला गेला आहे का?
- विषय शैक्षणिक क्षेत्रासाठी उपयुक्त आहे का?

**माहितीची सखोलता :**

- डॉक्युमेंटरीमध्ये दिलेली माहिती विश्वसनीय स्रोतांवर आधारित आहे का?
- विषयावरील माहिती संदर्भात पुरावे आणि दस्तऐवज दिले आहेत का?
- कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय माहिती दिली आहे का?

**विषयाची प्रभाविता :**

- डॉक्युमेंटरीचा आरंभ, मध्य आणि शेवट सुसंगत आणि प्रभावी आहे का?
- विषय रंजकतेने आणि योग्य वेगाने पुढे जातो का?
- भावनिक किंवा बौद्धिक स्तरावर जोडून घेण्यात यशस्वी झाली आहे का?
- मुख्य संदेश अध्ययनार्थींपर्यंत स्पष्टपणे पोहोचतो का?

**दृश्य व तांत्रिक गुणवत्ता :**

- कॅमेरा अँगल्स, फ्रेमिंग, आणि प्रकाश योजनांचा योग्य वापर झाला आहे का?
- दृश्ये सुसंगत आहेत का? डॉक्युमेंटरीमध्ये अनावश्यक किंवा कंटाळवाणे भाग आहेत का?
- नॅरेशन, पार्श्वसंगीत आणि ध्वनी परिणाम यांचा योग्य समतोल साधला आहे का?
- संकल्पना स्पष्ट करण्यासाठी ग्राफिक्स किंवा ॲनिमेशन योग्य ठिकाणी वापरले आहेत का?

**मुलाखती आणि साक्षात्कार :**

- विषयाशी संबंधित तज्ज्ञ, साक्षीदार किंवा प्रभावित व्यक्तींच्या मुलाखतींचा समावेश आहे का?
- मुलाखतींमधील प्रश्न सखोल, विचार प्रवर्तक आणि विषयाशी सुसंगत आहेत का?
- मुलाखती प्रेक्षकांवर प्रभाव टाकण्यात यशस्वी आहेत का?

**अध्ययनार्थींवरील परिणाम :**

- डॉक्युमेंटरी अध्ययनार्थ्याला काही नवीन शिकवते का?
- अध्ययनार्थींमध्ये काही कृती करण्याची प्रेरणा निर्माण झाली का?
- अध्ययनार्थींवर शैक्षणिक व सामाजिक प्रभाव पडतो का?

- अध्ययनार्थी डॉक्युमेंटरीच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत गुंतून राहतात का?

**नॅरेशन आणि संवाद** :

- नॅरेशन सहज समजण्यासारखे आहे का?
- संवाद साधण्याची शैली विषयाशी सुसंगत आणि प्रभावी आहे का?
- भाषा अध्ययनार्थींच्या स्तराला अनुरूप आहे का?

**संदेशाची पोहोच :**

- **उद्देश :** डॉक्युमेंटरीचा उद्देश पूर्ण झाला आहे का?
- **प्रेरणा :** प्रेक्षकांना सकारात्मक संदेश किंवा बदलाची प्रेरणा मिळाली का?
- **मूलभूत मुद्दे** : डॉक्युमेंटरीमध्ये मूलभूत मुद्दे ठळकपणे सादर झाले आहेत का?

**सर्जनशीलता** :

- डॉक्युमेंटरीमध्ये सर्जनशील दृष्टिकोन, शैली किंवा स्वरूप आहे का?
- सामान्य विषयाला सादर करण्याचा अनोखा मार्ग वापरला आहे का?
- डॉक्युमेंटरीतील दृश्ये आणि मांडणी अध्ययनार्थींना आकर्षित करतात का?

**तांत्रिक मर्यादा व बजेटचा वापर** :

- कमी खर्चात डॉक्युमेंटरीची गुणवत्ता राखण्यात स्पर्धक यशस्वी झाला आहे का?
- मर्यादित साधने असूनही उच्च गुणवत्ता साधण्यात यश मिळाले आहे का?

**सामाजिक आणि सांस्कृतिक संवेदनशीलता** :

- संवेदनशील विषय तटस्थता आणि आदरपूर्वक हाताळले आहेत का?
- कोणत्याही समुदायाच्या भावनिकतेचे भान ठेवले आहे का?
- विषय मांडताना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवले आहे का?

**डॉक्युमेंटरीचा परिणाम आणि प्रतिसाद** :

- अध्ययनार्थी व गुणदानकर्ता यांचा डॉक्युमेंटरीला सकारात्मक प्रतिसाद मिळतो का?
- डॉक्युमेंटरीने अपेक्षित शैक्षणिक व सामाजिक बदल घडवले का?

**स्वतःचे मूल्यांकन** :

- निर्मात्याने स्वतःच्या उद्दिष्टांनुसार डॉक्युमेंटरीचे यश मोजले आहे का?
- निर्मितीप्रक्रियेत काय चांगले झाले आणि काय सुधारण्याची गरज आहे, याचा विचार केला आहे का?

**डॉक्युमेंटरीसाठी गुणदान तालिका :**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | कमाल गुण | गुणांकनाचे विवरण |
|---|---|---|---|
| १) | विषयाची निवड व महत्त्व | १० | विषय प्रासंगिक, महत्त्वाचा, आणि आकर्षक आहे का? |
| २) | विषयाच्या माहितीची आणि तथ्यांची अचूकता | १० | माहिती विषयावर आधारित आहे का? पुरावे आणि संदर्भ वापरले आहेत का? |
| ३) | सादरीकरण | १० | विषयानुरूप सादरीकरण रंजक, सुसंगत, शैक्षणिक किंवा बौद्धिक प्रभाव टाकणारी आहे का? |
| ४) | दृश्यकलात्मक गुणवत्ता | १० | छायाचित्रण, व्हिज्युअल्स, ग्राफिक्स आणि ॲनिमेशनचा योग्य वापर आहे का? |
| ५) | ध्वनीगुणवत्ता | १० | नॅरेशन, पार्श्वसंगीत, आणि ध्वनीप्रभाव संतुलित आणि स्पष्ट आहे का? |
| ६) | मुलाखत | १० | मुलाखती संबंधित, तर्कसंगत आणि माहिती पूर्ण आहेत का? |
| ७) | संवाद | १० | भाषा स्पष्ट, सहज समजण्यासारखी आणि विषयाशी सुसंगत आहे का? |
| ८) | सामाजिक आणि सांस्कृतिक संवेदनशीलता | १० | संवेदनशील विषयांचा तटस्थ आणि जबाबदार पद्धतीने विचार केला आहे का? |
| ९) | डॉक्युमेंटरीची परिणामकारकता | १० | डॉक्युमेंटरीने सकारात्मक प्रभाव टाकला का? प्रेरणा, माहिती किंवा कृतीसाठी उत्तेजन दिले का? |
| १०) | सर्जनशीलता आणि अभिनवता | १० | डॉक्युमेंटरीमध्ये नवीन दृष्टिकोन किंवा सर्जनशील सादरीकरण आहे का? |
| | **एकूण गुण** | **१००** | |

**गुणांकनाचे स्तर (Rating Scale) :**

- ९०–१०० गुण : उत्कृष्ट (Excellent)
- ७५–८९ गुण : खूप चांगले (Very Good)

- ६०-७४ गुण : चांगले (Good)
- ५०-५९ गुण : समाधानकारक (Satisfactory)
- ५० गुणांखाली : सुधारणा आवश्यक (Needs Improvement)

| अ. क्र. | स्तर | संख्या | आयोजन खर्च | बक्षीस रक्कम | सादिल खर्च | परीक्षक मानधन | स्पर्धक प्रवास खर्च | स्पर्धक भोजन व निवास | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र | ४८६० | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | | | |
| २) | तालुका | ३८७ | | | | | | | |
| ३) | जिल्हा | ३६ | | | | | | | |
| ४) | विभाग | ८ | | | | | | | |
| ५) | राज्य | १ | | | | | | | |
| | software व तदनुषंगिक बाबी | | | | | | | | |

**डॉक्युमेंटरी स्पर्धेचे टप्पे व अंतिम निवड स्पर्धक संख्या :**

| स्पर्धा स्तर | स्पर्धेतून पुढील स्तरासाठी निवडलेले स्पर्धक संख्या | निर्णायक समिती सदस्य |
|---|---|---|
| केंद्र स्तर | १ | ७ |
| तालुका स्तर | ३ | ११ |
| जिल्हा स्तर | ३ | ९ |
| विभाग स्तर | ३ | ९ |
| राज्य स्तर | ५ (बक्षीसे) | ९ |

**केंद्र स्तर निर्णायक व आयोजक समिती :**

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| विस्तार अधिकारी | अध्यक्ष |
| केंद्रप्रमुख | सदस्य सचिव |
| तंत्रस्नेही शिक्षक | २ सदस्य |

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| पुरस्कार प्राप्त शिक्षक | ०१ सदस्य |
| मुख्याध्यापक (शासकीय/जि.प./न.प. शाळा) ०१ | ०१ सदस्य |
| मुख्याध्यापक (खाजगी व्यवस्थापनाची शाळा) | ०१ सदस्य |

**तालुका स्तर निर्णायक समिती :**

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| जि. शि. प्र. सं. अधिव्याख्याता/वरिष्ठ अधिव्याख्याता | अध्यक्ष |
| गटशिक्षणाधिकारी | सदस्य सचिव |
| विस्तार अधिकारी | ०१ सदस्य |
| विषय साधनव्यक्ती | ०१ सदस्य |
| केंद्रप्रमुख | २ सदस्य |
| तंत्रस्नेही शिक्षक | ०२ सदस्य |
| राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक | ०१ सदस्य |

**जिल्हा स्तर निर्णायक समिती सदस्य :**

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| प्राचार्य डायट | अध्यक्ष |
| शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक | सदस्य |
| उपशिक्षणाधिकारी/गट शिक्षणाधिकारी | ०१ सदस्य |
| जि. शि. प्र. सं. वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | ०१ सदस्य |
| डॉक्यूमेंट्री बनविणारे ३ खाजगी सदस्य | ०३ सदस्य |
| तंत्रस्नेही शिक्षक ०३ सदस्य | ३ सदस्य |
| जिल्ह्यातील नामवंत लेखक ०२ | सदस्य |
| वरिष्ठ अधिव्याख्याता/शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक | सदस्य सचिव |

## विभाग स्तर निर्णायक समिती सदस्य

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| विभागीय शिक्षण उपसंचालक | अध्यक्ष |
| विभागीय विद्या प्राधिकरण उपसंचालक/प्राचार्य | सचिव |
| शिक्षणाधिकारी ०१ | सदस्य |
| वरिष्ठ अधिव्याख्याता ०१ | सदस्य |
| उपशिक्षणाधिकारी ०१ | सदस्य |
| अधिव्याख्याता ०१ | सदस्य |
| तंत्रस्नेही शिक्षक ०३ सदस्य | सदस्य |
| नामवंत लेखक ०२ | सदस्य |
| डॉक्युमेंट्री बनविणारे ३ खाजगी सदस्य | सदस्य |

## राज्य स्तर निर्णायक समिती सदस्य :

| निर्णायक समिती | पद |
|---|---|
| मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालनालय, पुणे | अध्यक्ष |
| मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | उपाध्यक्ष |
| मा. उपसंचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य |
| मा. विभागीय उपसंचालक (शिक्षण) ०३ | सदस्य |
| प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ०३ | सदस्य |
| मा. अध्यक्ष यांनी सुचविलेले ०५ डॉक्यूमेंट्री बनविणारे खाजगी सदस्य | सदस्य |
| मा. अध्यक्ष यांनी सुचविलेले ०५ नामवंत लेखक | सदस्य |
| मा. सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव |

## संभाव्य खर्च विवरण तक्ता :

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>स्तर</th><th>संख्या</th><th>आयोजन /बक्षीस वितरण खर्च</th><th>बक्षीस रक्कम</th><th>सादिल खर्च</th><th>परीक्षक मानधन</th><th>प्रवास खर्च</th><th>स्पर्धक/ परीक्षक भोजन व निवास</th><th>एकूण खर्च</th></tr>
<tr><td>१)</td><td>केंद्र</td><td>४,८६०</td><td rowspan="6" colspan="7">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>२)</td><td>तालुका</td><td>३८७</td></tr>
<tr><td>३)</td><td>जिल्हा</td><td>३६</td></tr>
<tr><td>४)</td><td>विभाग</td><td>८</td></tr>
<tr><td>५)</td><td>राज्य</td><td>१</td></tr>
<tr><td>६)</td><td>software व तदनुषंगिक बाबी</td><td>१</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td colspan="7">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
</table>

◈◈◈

## ३४) आत्मचरित्र (Autobiography)

**सहभागी स्पर्धक** :

सर्व व्यवस्थापनाच्या व माध्यमांच्या शाळेतील प्राथमिक, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सदर स्पर्धा खुली आहे.

**विषय :**

१) माझे जीवन एक आत्मचरित्र (आत्मकथन)

**स्पर्धेचे नियम :**

१) स्पर्धा शालेय शिक्षणातील सर्व माध्यमांच्या शाळेतील प्राथमिक, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी खुली आहे.

२) निवडलेल्या विषयावर ४००० शब्दमर्यादेपर्यंत लेखन असावे.

३) लेखन स्वतःचे असावे. या अगोदर कुठेही ते प्रकाशित झालेले नसावे.

४) लेखनातून कोणत्याही धर्म, व्यक्ती अथवा महान व्यक्ती अथवा समुदाय यांची प्रतिमा मलीन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

५) निवडलेल्या विषयावर लेखन करताना ते सुस्पष्ट, टापटीप व सुलभ पद्धतीने वाचता येईल याबाबत काळजी घेण्यात यावी.

६) लेखन हे मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत असावे.

७) लेखन हे A4 कागदावर लेखन करायचे आहे.

८) कागदावर लेखन करताना ते स्वतःच्या हस्ताक्षरात असावे.

९) कागदाच्या दोन्ही बाजूला डाव्या व उजव्या बाजूला १.५ इंच जागा सोडलेली असावी.

१०) लेखनाच्या अगोदर योग्य ते शीर्षक नमूद असावे.

११) सर्वांत शेवटी लेखन झाल्यानंतर खाली आपले पूर्ण नाव, पद, शाळेचे नाव, पत्ता, मोबाइल नंबर व ई-मेल आयडी व स्वतःचा पासपोर्ट साईजचा फोटो जोडावा.

१२) स्पर्धेत भाग घेण्यासाठी शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळवण्यात येईल.

१३) सदर स्पर्धा ही केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर होईल.

१४) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

१५) कोणत्याही कॉपीराइटचे उल्लंघन अपात्रतेस कारणीभूत ठरेल आणि बक्षीस रक्कम जप्त होईल. याबाबत निवड समिती आणि मूल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.

१६) निवड समिती आणि मूल्यमापन समितीचे निर्णय अंतिम आणि सर्व अर्जदारांसाठी बंधनकारक असतील. मूल्यमापन समिती अर्जदाराकडून प्रवेशाच्या कोणत्याही पैलूवर स्पष्टीकरण मागू शकते आणि दिलेल्या वेळेत ते सादर न केल्यास, प्रवेश अपात्र ठरवला जाऊ शकतो.

१७) अयोग्य किंवा आक्षेपार्ह सामग्री समाविष्ट असलेले लेखन, ज्यामध्ये मानवी हक्क किंवा पर्यावरण उल्लंघन, कायदा, धार्मिक, भारताची सांस्कृतिक आणि नैतिक परंपरा आणि प्रथा यांच्या विरुद्धातील इतर कोणत्याही सामग्री यांचा समावेश आहे असे लेखन प्रतिबंधित आहे. आणि ते ताबडतोब अपात्र ठरवले जाईल. मूल्यमापन समिती वरील निकषांव्यतिरिक्त अयोग्य आणि आक्षेपार्ह ठरवेल अशा इतर प्रवेशिकांना स्पर्धेत बाद करण्याचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना आहे.

१८) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला स्वयंघोषणा प्रमाणपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

१९) पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचारी आपल्या लगतच्या किंवा कार्यक्षेत्रातील कोणत्याही एका केंद्रातून आपला सहभाग निश्चित करू शकतात.

**स्पर्धा वेळापत्रक :**

१) केंद्रपातळीवर स्पर्धा प्रवेश नोंदणी
२) केंद्र स्तरावर मूल्यांकन
३) तालुका स्तरावर स्पर्धा मूल्यांकन
४) जिल्हा स्तरावर स्पर्धा
५) राज्य स्तरावर छायाचित्र प्रदर्शन व मूल्यांकन

} शासनाकडून वेळापत्रक कळविण्यात येईल.

**परीक्षण निकष** :

१) स्पर्धेच्या परीक्षणासाठी लेखन क्षेत्रातील तज्ज्ञ, जाणकार व अनुभवी व्यक्तींची निवड करावी.

२) स्पर्धा परीक्षणासाठी ३ सदस्यांची समिती असावी.

३) स्पर्धा परीक्षण पुढील मुद्द्यांच्याआधारे करावे. समितीतील तिन्ही सदस्यांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीनुसार अंतिम निकाल घोषित करावा.

**मूल्यांकन निकष :**

| अ. क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १) | विषयाची मांडणी | २० |
| २) | भाषेचा वापर व ओघवतेपणा | २० |
| ३) | सर्जनशीलता व अभिव्यक्ती | २० |
| ४) | लेखन कौशल्य व व्याकरणाची जाण | २० |
| ५) | सुसंगता आणि रचना | २० |
| | **एकूण** | **१००** |

## स्वयंघोषणा प्रमाणपत्र नमुना :

### सहभागी स्पर्धक स्वयंघोषणा प्रमाणपत्र

मी श्री./श्रीम ........................................................................................ यादवारे जाहीर करत आहे की, या स्पर्धेसाठी मी स्वतः केलेले लेखन सादर करत आहे आणि लेखनातील विषय माझाच आहे. अर्जात मी दिलेली माहिती खरी आहे. स्पर्धा जिंकल्यास, जर माझ्याकडून पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती खोटी ठरली किंवा लेखनास कॉपीराइटचे उल्लंघन झालेले आढळले तर मला स्पर्धेतून अपात्र ठरवले जाऊ शकते आणि मूल्यमापन समितीने घेतलेल्या निर्णयांवर कोणताही अधिकार नाही किंवा त्याबाबत मला काहीही म्हणता येणार नाही याची मला जाणीव आहे. भविष्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना या लेखनाचा वापर करण्यास मी संमती देत आहे.

**स्वाक्षरी**

**नाव :** ..........................................

**शाळेचे नाव व पत्ता :** ........................

..................................................

## प्रवेश अर्ज नमुना

**सहभागी स्पर्धक प्रवेश अर्ज :**

१) स्पर्धकाचे नाव व फोटो : ..........................................................

२) कार्यालयाचे/शाळेचे नाव व पत्ता : ..............................................

३) केंद्राचे नाव (लागू असल्यास) : ...................................................

४) तालुक्याचे नाव : ....................................................................

५) जिल्ह्याचे नाव : ....................................................................

६) संपर्क क्रमांक : ......................................................................

७) ई–मेल : ...............................................................................

८) स्पर्धेसाठी निवडलेला विषय : ......................................................

९) स्वयंघोषणा प्रमाणपत्र : ..............................................................

**स्पर्धा अंदाजपत्रक :**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>स्तर</th><th>एकूण संख्या</th><th>स्पर्धा आयोजन</th><th>बक्षीस रक्कम</th><th>सादिल खर्च</th><th>परीक्षक मानधन</th><th>स्पर्धक प्रवास खर्च</th><th>स्पर्धक भोजन व निवास</th><th>एकूण खर्च</th></tr>
<tr><td>१.</td><td>केंद्र</td><td>४८६०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>२.</td><td>तालुका</td><td>४०८</td><td rowspan="4" colspan="7">रक्कम शासकीय नियमानुसार</td></tr>
<tr><td>३.</td><td>जिल्हा</td><td>३६</td></tr>
<tr><td>४.</td><td>राज्य</td><td>१</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>५३०५</td></tr>
</table>

एकूण स्पर्धा अंदाजपत्रक रक्कम रु. रक्कम शासकीय नियमानुसार

◈◈◈

# ३५) सुगम गायन स्पर्धा

**स्पर्धेची उद्दिष्टे :**

अ) सांस्कृतिक कलाकौशल्यांचा विकास करणे.

ब) गायन कौशल्यास प्रोत्साहन देणे.

क) अधिकारी व शिक्षकांमधील कलागुणांना वाव देणे.

**स्पर्धेसाठी शिक्षकांची पात्रता (लागू असल्यास) :**

शासकीय (जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित, नगरपालिका, महानगरपालिका) तसेच सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात. तसेच प्रशासन व जि. शि. प्र. सं. मधील अधिकारी/कर्मचारीही स्पर्धेत भाग घेऊ शकतात.

**नाव नोंदणीची प्रक्रिया (प्रत्येक केंद्रामधून (क्लस्टर) एक) :**

गायन स्पर्धेमध्ये इच्छुक उमेदवारांनी आपली नावे केंद्र स्तर शाळेमध्ये केंद्रप्रमुखांनी संकलित करावीत.

**स्पर्धेचा अभ्यासक्रम :**

सुगम गायनांतर्गत येणारी सर्व गीते. (भावगीत, भक्तिगीत, अभंग, गवळण, ओवी, भारुड, पोवाडा इत्यादी.)

**तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरांवरील स्पर्धेची पद्धत :**

अ) प्रत्येक केंद्रामधून एक स्पर्धक स्पर्धेतून निवडप्रक्रियेद्वारे निश्चित करून तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी निवडले जातील.

ब) प्रत्येक तालुक्यामधून एक स्पर्धक स्पर्धेतून निवडप्रक्रियेद्वारे निश्चित करून जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी निवडले जातील.

क) प्रत्येक जिल्ह्यामधून एक स्पर्धक स्पर्धेतून निवडप्रक्रियेद्वारे निश्चित करून, राज्य स्तरावरील स्पर्धेसाठी निवडले जातील. राज्य स्तरावरील स्पर्धेद्वारे राज्यातील प्रथम क्रमांकाचा गायक निवडला जाईल.

**मूल्यांकन धोरण, निवडींची संख्या आणि प्रत्येक टप्प्यावर नियुक्त केलेल्या मूल्यांकनकर्त्यांची पात्रता** :

अ) गायन स्पर्धा केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर आयोजित करण्यात येईल.

ब) प्रत्येक टप्प्यावर प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक देण्यात येतील. प्रत्येक टप्प्यातील प्रथम क्रमांकाचा उमेदवार पुढील टप्प्यासाठी पात्र असेल.

## मूल्यांकन/गुणांकन योजना

| अ. क्र. | स्पर्धकाचे नाव | गीतप्रकार व गीताचे शब्द | स्वर | ताल | लय | शब्दोच्चार व भाव | एकूण परिणाम | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १० | १० | १० | १० | १० | ५० |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

## पारितोषिकाचे स्वरूप

| अ. क्र. | स्तर | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | | | प्रमाणपत्र | रक्कम शासकीय नियमा–नुसार |
| २) | तालुका स्तर | | | | प्रमाणपत्र | |
| ३) | जिल्हा स्तर | | | | प्रमाणपत्र | |
| ४) | राज्य स्तर | | | | प्रमाणपत्र | |

## प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असलेली एकूण रक्कम (तपशिलांसह एकूण खर्च)

### गायनस्पर्धा खर्च अंदाजपत्रक

| अ. क्र. | स्तर | एकूण संख्या | स्पर्धा आयोजन | बक्षीस रक्कम | परीक्षक मानधन व प्रवास खर्च | स्पर्धक भोजन व निवास | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र | ४,८६० | रक्कम शासकीय नियमानुसार | | | | |
| २) | तालुका | ३८७ | | | | | |
| ३) | जिल्हा | ३६ | | | | | |
| ४) | राज्य | १ | | | | | |
| | | | | | | एकूण | |

**स्पर्धेचे वेळापत्रक**

| अ. क्र. | स्तर | कालावधी |
|---|---|---|
| १) | केंद्र | शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल. |
| २) | तालुका | |
| ३) | जिल्हा | |
| ४) | राज्य | |

**स्पर्धेची नियमावली** :

१) एकल गीतगायन स्पर्धा.

२) भावगीत, भक्तिगीत, अभंग, गवळण, ओवी, भारुड, पोवाडा या प्रकारांमध्येच गीतगायन करावे.

३) चित्रपटांमधील भावगीत, भक्तिगीत, अभंग, सुगम संगीत चालेल.

४) कोणत्याही गीतगायन प्रकारासाठी कोरस घेता येणार नाही.

५) मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांतून गीत सादर करता येईल.

६) वेळेची मर्यादा तीन ते सहा मिनिटे आहे.

७) कराओके, इलेक्ट्रॉनिक तसेच पाश्चात्त्य वाद्यांचा वापर करता येणार नाही.

८) या स्पर्धेमध्ये शास्त्रीय तसेच उपशास्त्रीय गीतप्रकार (जसे नाट्यसंगीत) सादर करता येणार नाही.

९) स्पर्धकाने स्वखर्चाने स्वतःची वाद्ये व साथीदार आणावेत.

१०) ज्या स्पर्धकांना वाद्य व साथीदार आणणे शक्य नाही त्यासाठी संयोजकांमार्फत व्यवस्था केली जाईल तशी पूर्वसूचना संयोजकांना देणे आवश्यक आहे.

११) स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक राहील.

१२) स्पर्धेच्या प्रवेशिकेत स्पर्धकांनी निवडलेल्या तीन गीतांचे पर्याय द्यावेत.

१३) स्पर्धेच्या वेळी तुम्ही निवडलेल्या तीन गीतांपैकी एक गीत सादर करावे लागेल.

१४) स्पर्धा संकेत क्रमांकानुसार घेण्यात येतील.

१५) स्पर्धकाने स्पर्धेच्या वेळी स्वतःचे, शाळेचे/कार्यालयाचे, महाविद्यालयाचे, गावाचे, जिल्ह्याचे नाव सांगू नये.

१६) स्पर्धकासोबत स्वतःचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.

१७) स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहावे.

१८) जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकांना पुढील वर्षीच्या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

१९) परीक्षकांनी दिलेला निर्णय स्पर्धकास बंधनकारक राहील.

२०) स्पर्धा कालावधी : शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल.

## राज्यस्तरीय सुगम गायन स्पर्धा

## गायन स्पर्धा समिती

**अध्यक्ष : –**

**सदस्य मंडळ : एकूण [१२ सदस्य+१ (सदस्य सचिव) = १३]**

**पारितोषिकाचे स्वरूप**

| अ. क्र. | स्तर | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| २) | तालुका स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ३) | जिल्हा स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ४) | विभाग स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |
| ५) | राज्य स्तर | | | | प्रमाणपत्र | सन्मानचिन्ह |

**परीक्षक मानधन स्वरूप**

**प्रत्येक स्तरावर तीन परीक्षक नेमावेत.**

| अ. क्र. | स्तर | प्रत्येकी मानधन | इतर | |
|---|---|---|---|---|
| १) | केंद्र स्तर | रक्कम शासकीय नियमानुसार | प्रवासखर्च | प्रमाणपत्र |
| २) | तालुका स्तर | | प्रवासखर्च | प्रमाणपत्र |
| ३) | जिल्हा स्तर | | प्रवासखर्च | प्रमाणपत्र |
| ४) | विभाग स्तर | | प्रवासखर्च | प्रमाणपत्र |
| ५) | राज्य स्तर | | प्रवासखर्च | प्रमाणपत्र |

◈◈◈

# ३६) व्यक्ती अभ्यास स्पर्धा (Case-Study)

## शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, डायटचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता

**प्रस्तावना**

शिक्षक हा समाजाचा आरसा असतो. शिक्षकाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन हा अतिशय वेगळा आहे. शैक्षणिक प्रवाहात अनेक घटक असतात. त्यामध्ये शिक्षक, अधिकारी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाही महत्त्वपूर्ण समावेश असतो. यांच्याकडूनच विद्यार्थ्याला, पालकांना, समाजाला नवी ऊर्जा, चेतना, प्रेरणा मिळत असते, पण बरेचदा या समाविष्ट घटकांच्याही काही समस्या असतात. तरीसुद्धा या समस्यांवर मात करून हे घटक गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि गुणवत्ता विकास यासाठी प्रयत्नशील असतात. त्यांच्या प्रयत्नांना यश तर मिळतेच पण त्यांची दखल काही प्रमाणात घेतली जात नाही. याच मूळ हेतूने या संबंधित घटकांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. तेव्हा संबंधित घटकांना न्याय मिळणे अपेक्षित आहे. आणि म्हणूनच अशा स्पर्धांची गरज आहे.

**उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांच्या अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

२) विद्यार्थ्यांना अध्ययन–अध्यापनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करणे.

३) विद्यार्थ्यांना त्यांच्या कौटुंबिक/सामाजिक अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

४) अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणींचा/क्षमतांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

५) वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विशिष्ट क्षमता ओळखून त्यावर उपाययोजना करणे.

६) विद्यार्थ्यांच्या सामाजिक, कौटुंबिक, भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर योग्य ते उपाय करणे.

७) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन – अध्यापनात येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे.

८) विशिष्ट प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा गुणांचा वापर करून त्या गुणांचा वापर बाकीच्या विद्यार्थ्यांना वर्गात कशा प्रकारे करता येईल याचा अभ्यास करून तशा प्रकारच्या उपाययोजना करणे.

९) मुलींना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवणे.

१०) वर्गातील प्रतिभावान विद्यार्थी कशा प्रकारे अध्ययन–अध्यापन करतात हे समजून घेऊन बाकीच्या विद्यार्थ्यांना त्याबाबत कसे मार्गदर्शन करता येईल याबाबत उपाययोजना करणे.

**कार्यक्षेत्र/पात्रता :**

१) सदर स्पर्धेमध्ये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित संस्थेच्या शाळांमधील सर्वमान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राज्यातील सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी व सर्व कर्मचारी यांच्याकरीता खुली राहील. सदर स्पर्धेमध्ये तीन गट करण्यात येईल.

**गट क्र. १ :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील सर्व मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (इयत्ता पहिली ते बारावीमधील सर्व)

**गट क्र. २ :** खाजगी अनुदानित शाळेतील सर्व मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (इयत्ता पहिली ते बारावीमधील सर्व)

**गट क्र. ३ :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी. (इयत्ता पहिली ते बारावीमधील सर्व)

**कार्यपद्धती/निवडपद्धती :**

**अ) स्पर्धेचा स्तर :**

१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व खाजगी अनुदानित शाळांकरिता...

अ) केंद्र स्तर

ब) तालुका स्तर

क) जिल्हा स्तर

ड) राज्य स्तर

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता

अ) विभाग स्तर

ब) राज्य स्तर

**ब) निवडप्रक्रिया : प्रत्येक गटासाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात येईल.**

१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व खाजगी अनुदानित शाळांकरिता –

अ) प्रत्येक केंद्रातून प्रथम व द्वितीय क्रमांकाचा विजेता तालुका स्तरासाठी पात्र.

ब) प्रत्येक तालुका स्तरावरून प्रथम व द्वितीय क्रमांक जिल्हा स्तरासाठी पात्र.

क) प्रत्येक जिल्हा स्तरावरून प्रथम व द्वितीय क्रमांक राज्य स्तरासाठी पात्र.

(टीप : सदर स्पर्धेचे दोन गट – अ) शिक्षक ब) शिक्षकेतर कर्मचारी)

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व प्रशासनातील अधिकारी–कर्मचारी यांचेकरिता :

अ) प्रत्येक विभागातून प्रथम, द्वितीय व तृतीय राज्य स्तरासाठी पात्र

(टीप : सदर स्पर्धेचे दोन गट– अ) अधिकारी ब) कर्मचारी)

अ) प्रत्येक शाळेतून एक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होऊ शकतो.

ब) प्रत्येक डायटमधून दोन अधिकारी व दोन कर्मचारी स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

**व्यक्ती अभ्यास (Case Study) करीता विषय/स्पर्धेचा अभ्यासक्रम** :

१) समावेशित शिक्षण

२) उपक्रमशील शिक्षक/नवोपक्रम

३) बहुशास्त्रीय अध्यापन पद्धती

४) शैक्षणिक साहित्यनिर्मिती व उपयोग

५) प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण

६) तंत्रज्ञान आणि शिक्षण

**स्पर्धेचे वेळापत्रक :**

| **एक दिवसीय सभा** | **(सर्व स्तर)** | |
|---|---|---|
| **स्पर्धेचे आयोजन** | १) केंद्र स्तर | शासनाकडून यशावकाश वेळापत्रक कळविण्यात येईल. |
| | २) तालुका स्तर | |
| | ३) जिल्हा स्तर | |
| | ४) राज्य स्तर | |

वरील विषयावर प्रत्येक स्पर्धेकाने आपली माहिती सर्जनशील विचार आणि चिकित्सक विचार करून सादर करावी.

१) केंद्र स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी केंद्रप्रमुखांची असेल.

२) तालुका स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी यांची असेल.

३) जिल्हा स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची असेल.

४) विभाग स्तरीय स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी शिक्षण उपसंचालक/प्राचार्य यांची असेल.

**अंदाजे खर्च :**

- केंद्र संख्या – ४८६७
- तालुका संख्या – ३५८
- जिल्हा व उपनगर – ३९
- विभाग संख्या – ८

**एक दिवसीय सभा**

| | | |
|---|---|---|
| एक दिवसीय तालुका स्तरीय सभा | चहा + जेवण + प्रवासखर्च + व इतर = | रक्कम शासकीय नियमानुसार |
| एक दिवसीय जिल्हा स्तरीय सभा | चहा + जेवण + प्रवासखर्च + व इतर = | |
| एक दिवसीय विभागीय सभा | चहा + जेवण + प्रवासखर्च + व इतर = | |

**स्पर्धेच्या आयोजनाकरिता खर्च : (शिक्षक व शिक्षकेतर शाळा)**

**अ)**

| | | |
|---|---|---|
| एक दिवसीय केंद्र स्तर | ४८६७० × ......................... | रक्कम शासकीय नियमानुसार |
| एक दिवसीय तालुका स्तर | ४८६७ × ......................... | |
| एक दिवसीय जिल्हा स्तर | ३५८ × ......................... | |
| राज्य स्तर | ३९ × ......................... | |

**ब) डायट व प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी** :

| | | |
|---|---|---|
| विभाग स्तर | ३९ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| राज्य स्तर | ३९ | |

**प्रमाणपत्र व पारितोषिक खर्च/बक्षीस स्वरूप :**

**अ) सर्व प्रकारच्या शाळांकरिता :**

| | | |
|---|---|---|
| केंद्र स्तर प्रमाणपत्र, पारितोषिक | ४८६७ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| | ४८६७ | |
| तालुका स्तर प्रमाणपत्र, पारितोषिक | ४८६७ | |
| | ४८६७ | |
| जिल्हा स्तर प्रमाणपत्र, पारितोषिक | ३५८ | |
| | ३५८ | |
| राज्य स्तर प्रमाणपत्र, पारितोषिक | ३९ | |
| | ३९ | |

**ब) विभाग स्तर :**

| | | |
|---|---|---|
| प्रमाणपत्र | ३९ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| पारितोषिक | ३९ | |

**क) राज्य स्तर :**

| | | |
|---|---|---|
| प्रमाणपत्र | ३९ | रक्कम शासकीय नियमानुसार |
| पारितोषिक | ३९ | |

**एकूण खर्च :**

| अ. क्र. | बाबनिहाय खर्च विवरण | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १) | सभा खर्च | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | स्पर्धा आयोजन खर्च | |
| ३) | प्रमाणपत्र व पारितोषिक खर्च | |
| ४) | इतर खर्च | |
| | **एकूण खर्च** | |

◈◈◈

# ३७) ऑलिंम्पियाड स्पर्धा

## ३७.१ : मराठी ऑलिंपियाड

**प्रस्तावना :**

मराठी ऑलिंपियाड ही शालेय स्तरावर आयोजित करण्यात येणारी एक स्पर्धापरीक्षा असून ही मराठी भाषेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते. मराठी ऑलिंपियाडमध्ये विद्यार्थी मराठी भाषेचे ज्ञान आणि कौशल्य यावरील प्रश्नांवर आधारित परीक्षा देतात. मराठी ऑलिंपियाड विविध स्तरांवर आयोजित केल्या जातात. त्याच पद्धतीने राज्यातील मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या व मराठी विषयात रूची असणाऱ्या सर्वांसाठी मराठी ऑलिंपियाडचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.

**उद्दिष्टे :**

- मराठी विषयातील प्रावीण्य तपासण्यासाठी त्यांना परीक्षेच्या माध्यमातून आव्हान देणे.
- शिक्षकांची मराठी भाषा विषयातील गुणवत्ता तपासून विविध स्तरावर व राज्यस्तरावर त्यांचा सन्मान करणे.
- मराठी भाषा विषयाबाबत अभिरुची विकसित करणे.
- उत्कृष्ट मराठी भाषा शिक्षकांचे राज्यस्तरीय बेंचमार्क ठरविणे.

**स्पर्धेचे स्वरूप :**

प्राथमिक व माध्यमिक स्तरावर अध्यापन करणाऱ्या शिक्षक यांचेसाठी मराठी ऑलिंपियाडचे आयोजन करण्यात येईल. मराठी ऑलिंपियाड स्पर्धेचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.

१) **जिल्हा स्तर (प्राथमिक टप्पा) :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.

२) **विभागीय स्तर :** विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय स्तरावर आयोजन करण्यात येईल.

३) **राज्य स्तर (अंतिम टप्पा) :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने राज्य स्तरावर मराठी भाषा विषयाच्या ऑलिंपियाडचे आयोजन करण्यात येईल.

**आयोजन व अंमलबजावणी प्रक्रिया :**

**अ) राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन :** मराठी ऑलिंपियाड स्पर्धासाठी जिल्हा, विभाग आणि

राज्यस्तरावर होणाऱ्या प्रत्येक परीक्षेसाठी विषय तज्ज्ञांची विषयनिहाय समिती स्थापन करून प्रश्नपत्रिका निर्मिती व मूल्यमापन आराखडा तयार करण्यात येईल.

**ब) ऑनलाइन मार्गदर्शन वेबिनार :** मराठी ऑलिंपियाड स्पर्धेपूर्वी सदर प्रक्रियेविषयी ऑनलाइन मार्गदर्शनपर वेबिनार घेऊन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच नोंदणी लिंकबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**क) नोंदणी प्रक्रिया :** विहित नमुन्यात आणि दिलेल्या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करणे, सदर प्रक्रिया जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत नोंदणी लिंक तयार करण्यात येईल. लिंकद्वारे जिल्हयातील इच्छुक शिक्षकांची नोंदणी राज्यस्तरावर करण्यात येईल. राज्य स्तरावरून जिल्हानिहाय स्पर्धक यादी जिल्ह्यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

**ड) जिल्हा स्तर – बहुपर्यायी प्रश्नांची लेखी परीक्षा व जिल्हास्तरीय निकाल प्रक्रिया :** ऑलिंपियाडमध्ये बहुपर्यायी प्रश्नांची चाचणी ऑफलाइन पद्धतीने जिल्हास्तरावर घेण्यात येईल. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावरील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. राज्य स्तरावरून देण्यात आलेल्या संकल्पना आकलनावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरपत्रिका व गुणदान सूचीच्या आधारे जिल्ह्यातील सहभागी शिक्षकांचा निकाल तयार करण्यात येईल. सदर प्रक्रिया जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेमार्फत पूर्ण करण्यात येईल. जिल्ह्यातील प्रथम क्रमांक विभाग स्तरावर पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. या स्तरावर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येईल.

**इ) विभागस्तरीय बहुपर्यायी प्रश्नांची लेखी परीक्षा (ऑनलाइन) व निकाल प्रक्रिया :** विभाग स्तरावर जिल्ह्यातून पाठविण्यात आलेल्या प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकांसाठी स्पर्धा नियोजित करण्यात येईल. यामध्ये स्पर्धेची काठिण्यपातळी वाढविण्यात येईल. या स्तरावर प्रायोगिक कौशल्यावर आणि उपयोजन स्तरावरील उच्च दर्जाच्या बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात येईल. यासाठी राज्यस्तरावरुन प्राप्त बहुपर्यायी प्रश्नांची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व गुणदान सूचीच्या आधारे प्रक्रिया प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात येईल. या स्तरावर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येतील. या स्तरावरील प्रथम क्रमांक पुढील राज्य स्तरासाठी पाठविण्यात येतील.

**ई) राज्यस्तरीय स्पर्धा व निकाल प्रक्रिया :** राज्य स्तरावर विभागस्तरावरून पाठविण्यात आलेल्या प्रथम क्रमांक स्पर्धकासाठी स्पर्धा आयोजित करण्यात येईल. यामध्ये स्पर्धेची काठिण्यपातळी वाढविण्यात येईल. या स्तरावर प्रायोगिक कौशल्य, उपयोजन, विश्लेषण, मूल्यमापन, सर्जनशीलता

या शैक्षणिक उद्दिष्टे यांवर आधारित उच्च दर्जाच्या बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात येईल. यामध्ये भाषिक दृष्टिकोन तपासण्यासाठी सुद्धा प्रश्न समाविष्ट असतील. या स्तरावर स्पर्धकांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा प्रायोगिक परीक्षा, गटचर्चा प्रकल्प, सादरीकरण अशा विविध पद्धतीने मूल्यमापन करण्यात येईल. या स्पर्धकांमधून प्रथम तीन क्रमांक यांना विजेते म्हणून घोषित करून त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

**नियमावली :**

- प्रत्येक स्पर्धकास नोंदणी करणे आवश्यक राहील.
- नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करता येईल.
- जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर प्रशस्तिपत्रक व ट्रॉफी प्रदान करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी निश्चित वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.
- स्पर्धा संपल्यावर निकाल जाहीर केला जाईल व बक्षीस वितरण समारंभ होईल.

**अभ्यासक्रम :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार राज्य अभ्यासक्रम आराखडामध्ये नमूद करण्यात आलेला प्राथमिक व उच्च माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम गृहीत धरण्यात येईल. याबरोबरच मराठी भाषा साहित्याचे विविध प्रकार व वैशिष्ट्ये भाषिक समिक्षा, भाषेचा अध्यापकीय दृष्टिकोन, अभिरूप अध्यापन, नवीन भाषिक संशोधन व भाषिक नवप्रवाहावर आधारित प्रश्न इ.

**ऑलिम्पियाडचे स्पर्धेचे फायदे :**

- मराठी भाषेबद्दल आवड वाढते.
- मराठी संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजतात.
- चिकित्सक विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते.
- आत्मविश्वास वाढतो.
- शैक्षणिक संधी मिळतात.
- राज्य स्तरावर आपल्या प्रतिभेची ओळख होते.
- शिक्षकांमध्ये अभ्यास व संशोधन वृत्तीला चालना मिळेल.
- गुणवत्ता व कार्यक्षमता वाढेल.
- शिक्षण क्षेत्रात राज्याची उज्ज्वल प्रतिमा निर्माण होईल.

**अंदाजे खर्च विवरण.**

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १) | प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व गुणदान सूची विकसन | राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन<br>५ दिवस<br>२ कार्यशाळा<br>सहभागी व्यक्ती – ४५<br>प्रतिव्यक्ती रक्कम शासन नियमानुसार | |
| २) | जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजन बक्षिसे, प्रमाणपत्र व ट्रॉफी, बॅनर, नियोजन व व्यवस्थापन खर्च | ३६ जिल्हे<br>प्रति जिल्हा रक्कम शासन नियमानुसार | रक्कम<br>शासकीय नियमानुसार |
| ३) | विभाग स्तर स्पर्धा आयोजन बक्षिसे प्रमाणपत्र व ट्रॉफी, बॅनर, नियोजन व व्यवस्थापन | ५ प्रादेशिक विद्या प्राधिकरण<br>प्रति प्रादेशिक विद्या प्राधिकरण रक्कम शासन नियमानुसार | |
| ४) | जिल्हा स्तर स्पर्धा आयोजन बक्षिसे प्रमाणपत्र व ट्रॉफी, बॅनर, नियोजन व व्यवस्थापन | १ राज्यस्तरीय स्पर्धा रक्कम शासन नियमानुसार | |
| | **एकूण खर्च** | | |

## ३७.२ : गणित ऑलिंपियाड

**सदर स्पर्धेचे महत्त्व, गरज व आवश्यकता**

- शिक्षक व्यावसायिक क्षमतावृद्धीसाठी
- शिक्षक आशयज्ञान वृद्धीसाठी
- पोषक स्पर्धात्मक वातावरण तयार होणेसाठी
- गणित शिक्षकांना सकारात्मक प्रेरणा मिळण्यासाठी
- अध्ययन-अध्यापन पद्धतीमध्ये सुधारणा होणेसाठी
- गणित प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना मदत मिळण्यासाठी

**स्पर्धेचे स्वरूप** :

सदर स्पर्धा पायाभूत स्तर ते उच्च माध्यमिक स्तरावरील गणित शिक्षकांसाठी तसेच ज्यांना गणित विषयामध्ये रुची आहे अशा शिक्षकांसाठी आयोजित करण्यात यावी.

**पात्रता** :

सदर करीता स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, अनुदानित व विना अनुदानित शाळांमध्ये गणित विषय शिकविणारे व गणित विषयात रुची असणारे शिक्षक भाग घेऊ शकतील.

**अभ्यासक्रम – इयत्ता पहिली ते दहावी गणित**

- **प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :**

  सदर परीक्षा CENTA /CREST या परीक्षांच्या धर्तीवर घेण्यात यावी.

  बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न असावेत. त्यामध्ये एका विभागात उच्च विचारक्षमता प्रश्नांचा (HOTS) समावेश असावा.

  एकूण गुण – २१०

| Stages | Topic/Section | No. of Questions | Marks per Question | Total Marks |
|---|---|---|---|---|
| For Stages I-IV (Grades 1-10) | Practical Mathematics<br>Achiever's Section | ३० (प्रति प्रश्न गुण ३)<br>२० (प्रति प्रश्न गुण ६) | ३<br>६ | ९०<br>१२० |
| Grand Total | | ५० | | २१० |
| The total duration of the exam is 90 minutes. | | | | |

- **नकारात्मक गुणदान पद्धती लागू करण्यात यावी.**

  **नोंदणी** :

  याकरिता शिक्षक व गणित विषयामध्ये रूची असणारे नोंदणी करू शकतील.

  **स्पर्धा कार्यपद्धती**

  ➢ सदर संपूर्ण स्पर्धा स्तरनिहाय ऑनलाइन स्वरूपात घेता येईल.

  ➢ स्तरनिहाय पात्रता फेऱ्या घेण्यात येतील. प्रत्येक फेरी नुसार ठराविक शिक्षक ठरविलेल्या गुणांच्या निकषांनुसार पुढील फेरीसाठी पात्र होतील.

  - Level 1 - Easy (चाळणी परीक्षा)
  - Level 2 - Advanced,
  - Level 3 - Beyond Advanced (राज्य स्तर).

- ➢ राज्य स्तराची फेरी अंतिम असेल.
- ➢ सदर स्पर्धा घेण्यासाठी प्रश्न संचनिर्मिती करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करण्यात यावी. त्याद्वारे प्रश्नसंच राज्य स्तरावर निर्मित करण्यात यावेत.
- ➢ सदर परीक्षा घेण्यासाठी AI आधारित ऑनलाइन पोर्टल विकसित करणे किंवा यापूर्वी पोर्टल विकसित केलेल्या इतर संस्था उदा. MKCL किंवा स्वयंसेवी संस्था यांची निःशुल्क मदत घेता येईल. यामुळे परीक्षेची गुणवत्ता व गोपनीयता राखणे शक्य होईल.
- ➢ सदर स्पर्धा आयोजनाकरिता गणितविषयक काम करणाऱ्या राज्यातील किवा राष्ट्रीय पातळीवरील संस्थांचे सहकार्य घेता येईल.

**स्पर्धा वेळापत्रक** :

- सत्रनिहाय स्पर्धा जाहीर करणे.
- स्पर्धेचा अभ्यासक्रम जाहीर करणे.
- शिक्षक नोंदणी
- स्तर व पात्रता पातळीनिहाय प्रश्नसंच निर्मिती
- प्रत्यक्ष स्पर्धा आयोजन
- निकाल

**पारितोषिक स्वरूप :**

विजेत्यांना पारितोषिक सन्मानचिन्ह देता येईल. Cut Off Point नुसार विजेते अंतिम करावेत.

## ३७.३ : इंग्रजी ऑलिंपियाड

**राज्यातील इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी इंग्रजी ऑलिंपियाड स्पर्धा :**

प्राथमिक स्तरावरील (इयत्ता पहिली ते पाचवी) महाराष्ट्र राज्यातील इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी व या विषयाची आवड असणाऱ्यांसाठी विविध स्तरांवर इंग्रजी ऑलिंपियाड स्पर्धा आयोजित करणे हा एक अभिनव व स्तुत्य उपक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणेद्वारे हाती घेण्यात आलेला आहे. या उपक्रमातून शिक्षकांचे इंग्रजी भाषा–ज्ञान, आशयज्ञान अध्यापन कौशल्ये, आणि मूल्यांकन पद्धतींचे ज्ञान यांचा विकास होईल.

**उद्दिष्टे :**

- ➢ शिक्षकांच्या इंग्रजी भाषा विषय ज्ञानाची चाचणी घेणे.

- ➢ राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) नुसार शिक्षकांची इंग्रजी भाषिक सक्षमता आणि अध्यापन कौशल्ये वृद्धिंगत होण्यास प्रेरणा देणे.
- ➢ इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी CPD (Continuous Professional Development) ची संधी देणे.
- ➢ इंग्रजी भाषा विषय शिक्षकांना प्रोत्साहन देणे.
- ➢ विद्यार्थ्यांच्या अशा स्वरूपाच्या स्पर्धापरीक्षांचे आयोजन करण्यास मदत करणे.

**परीक्षा पातळी/स्तर :**

- ➢ खालील सर्व स्तरांवरील स्पर्धांचे आयोजन केंद्र, तालुका, जिल्हा आणि राज्य पातळ्यांवर केले जाईल.
- ➢ पायाभूत (इयत्ता पहिली व दुसरी)
- ➢ पूर्वतयारी (इयत्ता तिसरी ते पाचवी)
- ➢ पूर्वमाध्यमिक (इयत्ता सहावी ते आठवी)
- ➢ माध्यमिक (इयत्ता नववी ते दहावी)

**परीक्षा स्वरूप :**

**एकूण गुण :** १००

**कालावधी :** ९० मिनिटे

| भाग | घटक | गुण | स्वरूप |
|---|---|---|---|
| A | Grammar and Language Use | ३५ | MCQ's |
| B | Pedagogical Knowledge | ३५ | MCQ's |
| C | Comprehension | ३० | MCQ's |

**अभ्यासक्रम :**

**भाषिक ज्ञान (Language Proficiency)** :

- Parts of Speech
- Tenses and Verb Forms
- Articles, Prepositions
- Sentence Correction
- Vocabulary and Usage
- Synonyms/Antonyms

**अध्यापन कौशल्ये :**

- Language Teaching methods
- Context of Language Education in NEP 2020 and NCF 2023.
- Inclusive and activity-based language teaching
- Use of teaching-learning materials (TLM's)
- Assessment tools - formative, rubric-based
- Simple instructions
- Classroom conversation

**Comprehension :**

- Reading Comprehension
- Handling mixed-ability classrooms
- Dealing with errors positively

**परीक्षा पातळ्या (Levels of the Exam) :**

| अ. क्र. | पातळी | सहभागी | निवड |
|---|---|---|---|
| १) | केंद्र | केंद्रातील विविध शाळांतील शिक्षक | सर्व सहभागी |
| २) | तालुका | केंद्रातून विजेते शिक्षक | प्रत्येक केंद्रातून प्रथम तीन शिक्षक |
| ३) | जिल्हा | तालुक्यातून निवडलेले शिक्षक | प्रत्येक तालुक्यातून प्रथम तीन शिक्षक |
| ४) | राज्य | जिल्ह्यातून निवडलेले शिक्षक | प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम तीन शिक्षक |

**स्पर्धेचे वेळापत्रक : (अंदाजे)**

- स्पर्धेकरिता नोंदणी
- केंद्र स्तरावरील चाचणी
- वेळ
- केंद्र स्तरावरील निकाल जाहीर करणे
- तालुका व जिल्हा स्पर्धा नियोजन सभा मा. प्राचार्य

} शासनाकडून वेळापत्रक कळवण्यात येईल.

**एकूण अंदाजे खर्च : रक्कम शासकीय नियमानुसार**

**मूल्यमापन निकष**

- ६०% पेक्षा अधिक गुण – उत्तीर्ण
- ८०% पेक्षा अधिक गुण – विशेष प्रावीण्य
- राज्य स्तर विजेते – प्रशस्तिपत्र + विशेष गौरव

**पारितोषिके व सन्मान**

- प्रमाणपत्र सर्व सहभागी शिक्षकांना.
- प्रथम तीन क्रमांकाच्या शिक्षकांचा जिल्हा व राज्य पातळ्यांवर सन्मान.
- विशेष कार्यशाळांमध्ये सहभागासाठी संधी.

**आयोजनाची कार्यपद्धती (Implementation Plan) :**

१) नोंदणी फॉर्म वितरित करणे (शाळा/तालुका शिक्षणाधिकारी यांचेमार्फत)

२) ऑनलाइन/ऑफलाइन परीक्षा केंद्र निश्चित करणे

३) प्रश्नपत्रिका तयारी – शिक्षणतज्ज्ञांच्या समितीमार्फत

४) मूल्यमापन समिती – केंद्र, तालुका, जिल्हा आणि राज्य

५) पारितोषिक वितरण – केंद्र, तालुका, जिल्हा आणि राज्य

## ३६.४ : विज्ञान ऑलिंपियाड

**प्रस्तावना :**

विज्ञान ऑलिंपियाड ही शालेय स्तरावर आयोजित करण्यात येणारी एक स्पर्धा परीक्षा असून ही विज्ञानात आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते. विज्ञान ऑलिंपियाडमध्ये विद्यार्थी आपल्या वैज्ञानिक ज्ञान आणि कौशल्यांवर आधारित प्रश्नांची परीक्षा देतात. विज्ञान ऑलिंपियाड विविध स्तरांवर आयोजित केल्या जातात. त्याच पद्धतीने राज्यातील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षक व या विषयाची आवड असणारे यांचेसाठी विज्ञान ऑलिंपियाडचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.

**उद्दिष्टे :**

- विज्ञान विषयातील प्रावीण्य तपासण्यासाठी त्यांना परीक्षेच्या माध्यमातून आव्हान देणे आणि यशस्वी शिक्षकांचा सन्मान करणे.
- शिक्षकांचे विज्ञान विषयातील प्रावीण्य विज्ञान ऑलिंपियाडच्या माध्यमातून तपासणे.

- विज्ञान विषयातील प्रावीण्य व गुणवत्ता तपासून राज्य स्तरावर त्यांचा सन्मान करणे.
- विज्ञान विषयाबाबत अभिरुची विकसित करणे.
- उत्कृष्ट विज्ञान शिक्षकांचे राज्यस्तरीय बेंचमार्क ठरविणे.

**स्पर्धेचे स्वरूप** :

इयत्ता सहावी ते दहावीच्या वर्गाला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी विज्ञान ऑलिंपियाडचे आयोजन करण्यात येईल. विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.

१) **जिल्हा स्तर (प्राथमिक टप्पा) :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा स्तरावर आयोजन करण्यात येईल.

२) **विभागीय स्तर :** विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय स्तरावर आयोजन करण्यात येईल.

३) **राज्य स्तर (अंतिम टप्पा) :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने राज्य स्तरावर विज्ञान ऑलिंपियाडचे आयोजन करण्यात येईल.

**आयोजन व अंमलबजावणी प्रक्रिया** :

अ) **राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन :** विज्ञान ऑलिंपियाडसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर होणाऱ्या प्रत्येक परीक्षेसाठी विषयतज्ज्ञांची विषयनिहाय समिती स्थापन करून प्रश्नपत्रिका निर्मिती व मूल्यमापन आराखडा तयार करण्यात येईल.

ब) **ऑनलाइन मार्गदर्शन वेबिनार** : विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेपूर्वी सदर प्रक्रियेविषयी ऑनलाइन मार्गदर्शन वेबिनार घेऊन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच नोंदणी लिंकबाबत कार्यवाही करण्यात येईल.

क) **नोंदणी प्रक्रिया :** विहित नमुन्यात आणि दिलेल्या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करणे. सदर प्रक्रिया जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांचेमार्फत नोंदणी लिंक तयार करण्यात येईल. लिंकद्वारे जिल्ह्यातील इच्छुक शिक्षकांची नोंदणी राज्य स्तरावर करण्यात येईल. तदनंतर जिल्हानिहाय स्पर्धक यादी जिल्ह्यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

**जिल्हा स्तर – संकल्पना आकलनावर बहुपर्यायी प्रश्नांची लेखी परीक्षा (ऑनलाइन) व जिल्हा स्तरीय निकाल प्रक्रिया :**

राज्य स्तरावरून देण्यात आलेली संकल्पना आकलनावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची चाचणी ऑनलाइन पद्धतीने किंवा ऑफलाइन पद्धतीने जिल्हा स्तरावर घेण्यात येईल. यासाठी विज्ञान विषयाचे

कामकाज पाहणारे अधिव्याख्याता किंवा वरिष्ठ अधिव्याख्याता यांचेकडे या स्पर्धेच्या समन्वयकाची भूमिका देऊन मा. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावरील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

राज्य स्तरावरून देण्यात आलेल्या संकल्पना आकलनावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरपत्रिका व गुणदान सूचीच्या आधारे जिल्ह्यातील सहभागी शिक्षकांचा निकाल तयार करण्यात येईल. सदर प्रक्रिया जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेमार्फत पूर्ण करण्यात येईल. जिल्ह्यातील प्रथम क्रमांक विभाग स्तरावर पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. या स्तरावर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येतील.

**विभाग स्तरीय बहुपर्यायी प्रश्नांची लेखी परीक्षा (ऑनलाइन) व निकाल प्रक्रिया :**

विभाग स्तरावर जिल्हातून पाठविण्यात आलेल्या प्रथम क्रमांक स्पर्धकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात येईल. यामध्ये स्पर्धेची काठिण्यपातळी वाढविण्यात येईल. या स्तरावर प्रायोगिक कौशल्यावर आणि उपयोजन स्तरावरील उच्च दर्जाच्या बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात येईल. यासाठी राज्य स्तरावरून प्राप्त बहुपर्यायी प्रश्नांची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व गुणदान सूचीच्या आधारे प्रक्रिया प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात येईल. या स्तरावर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येतील.

**या स्तरावरील प्रथम क्रमांक राज्य स्तरासाठी पाठविण्यात येतील.**

**राज्यस्तरीय स्पर्धा व निकाल प्रक्रिया :**

राज्य स्तरावर विभाग स्तरावरून पाठविण्यात आलेल्या प्रथम क्रमांक स्पर्धकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात येईल. यामध्ये स्पर्धेची काठिण्यपातळी वाढविण्यात येईल. या स्तरावर प्रायोगिक कौशल्य, उपयोजन, विश्लेषण, मूल्यमापन व सर्जनशीलता या शैक्षणिक उद्दिष्टांवर आधारित उच्च दर्जाच्या बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेण्यात येईल. यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तपासण्यासाठी सुद्धा प्रश्न समाविष्ट असतील. या स्तरावर स्पर्धकांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा, प्रायोगिक परीक्षा, गटचर्चा, प्रकल्प सादरीकरण अशा विविध पद्धतीने मूल्यमापन करण्यात येईल. या स्पर्धकांमधून प्रथम तीन क्रमांक यांना विजेते म्हणून घोषित करून त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

**नियमावली** :

- प्रत्येक स्पर्धकास नोंदणी करणे आवश्यक राहील.
- नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करता येईल.
- जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी निश्चित वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

- स्पर्धा संपल्यानंतर निकाल जाहीर केला जाईल व बक्षीस वितरण समारंभ होईल.

**अभ्यासक्रम :**

'राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२०' नुसार 'राज्य अभ्यासक्रम आराखड्यांमध्ये व अभ्यासक्रमामध्ये' नमूद करण्यात आलेला इयत्ता सहावी ते बारावी स्तरावरील विज्ञान विषयाच्या निष्पत्ती अभ्यासक्रम व पाठ्यक्रम गृहीत धरण्यात येईल. याबरोबरच विज्ञान आणि सामान्य ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञान विषयातील चालू घडामोडी, भारतीय संशोधक, नवोपक्रम, समस्या निराकरण कौशल्यावर आधारित प्रश्न इ. चा समावेश राहील.

**विज्ञान ऑलिम्पियाडचे फायदे :**

- विज्ञानाबद्दल आवड वाढते.
- वैज्ञानिक संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजतात.
- चिकित्सक विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते.
- आत्मविश्वास वाढतो.
- शैक्षणिक संधी मिळतात.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रतिभेची ओळख होते.
- शिक्षकांमध्ये अभ्यास व संशोधन वृत्तीला चालना मिळेल.
- गुणवत्ता व कार्यक्षमता वाढेल.
- शिक्षण क्षेत्रात राज्याची उज्ज्वल प्रतिमा निर्माण होईल.

**अंदाजे खर्च विवरण**

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व गुणदान सूची विकसन | राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन ५ दिवस × २ कार्यशाळा सहभागी व्यक्ती | रक्कम शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजन बक्षिसे प्रमाणपत्र व ट्रॉफी बॅनर नियोजन व व्यवस्थापन खर्च | ३६ जिल्हे | |
| ३) | विभागीय स्तर स्पर्धा आयोजन बक्षिसे, प्रमाणपत्र व ट्रॉफी बॅनर, नियोजन व व्यवस्थापन खर्च | ५ प्रादेशिक विद्या प्राधिकरण प्रति प्रादेशिक विद्या प्राधिकरण | |

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ४) | राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन<br>बक्षिसे :<br>प्रमाणपत्र व ट्रॉफी,<br>बॅनर, नियोजन व व्यवस्थापन खर्च | ०१ राज्यस्तरीय स्पर्धा | रक्कम<br>शासकीय नियमानुसार |
| | **एकूण खर्च** | | |

## ३७.५ : सामाजिक शास्त्रे – भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांवर आधारित शालेय शिक्षक ऑलिंपियाड स्पर्धा आयोजन

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासावर भर देण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांवरील शिक्षकांचे विषयज्ञान, विश्लेषणात्मक क्षमता व सर्जनशील विचारसरणी विकसित करण्यासाठी राज्य स्तरावर शिक्षक ऑलिंपियाड स्पर्धा आयोजित करणे प्रस्तावित आहे. या स्पर्धेमुळे शिक्षकांचे शैक्षणिक कौशल्य वृद्धिंगत होईल आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करण्यासाठी शिक्षक अधिक प्रेरित होतील.

**उद्दिष्टे :**

१) शिक्षकांमध्ये भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विषयांचे सखोल ज्ञान व समज वाढविणे.

२) स्पर्धात्मक परिस्थितीत शिक्षकांचा आत्मविश्वास व व्यावसायिक कौशल्य वृद्धिंगत करणे.

३) गुणवत्ता तपासून कुशल शिक्षकांना राज्य स्तरावर सन्मानित करणे.

४) उत्कृष्ट शिक्षकांचे राज्यस्तरीय बेंचमार्क तयार करणे.

**स्पर्धेचे स्वरूप :**

- **प्रश्न प्रकार :** वस्तुनिष्ठ (MCQ's) व विश्लेषणात्मक प्रश्न.
- **अभ्यासक्रम :** इयत्ता सहावी ते बारावी संबंधित विषयांवरील अभ्यासक्रम व अद्ययावत घडामोडी.
- **माध्यम :** मराठी
- **पात्रता :** महाराष्ट्र राज्यातील शासकीय/अनुदानित/खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील कार्यरत भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांमध्ये अध्यापन करणारे शिक्षक.

**नियमावली :**

- प्रत्येक शिक्षकास नोंदणी करणे आवश्यक राहील.
- नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करता येईल.
- प्रत्येक स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात येतील.
- जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी निश्चित वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.
- स्पर्धा संपल्यानंतर निकाल जाहीर केला जाईल व बक्षीस वितरण समारंभ होईल.

**आयोजन व अंमलबजावणी प्रक्रिया :**

१) **जिल्हा स्तर :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांच्या नेतृत्वाखाली आयोजन.

२) **विभागीय स्तर :** विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन.

३) **राज्य स्तर :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**कार्यशाळा :**

- प्रत्येक स्तरावर स्पर्धेपूर्वी ऑनलाइन मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली जाईल.
- विषयतज्ज्ञ व सुलभकांमार्फत सत्रे घेतली जातील.

**प्रश्नपत्रिका निर्मिती व मूल्यमापन :**

विषयतज्ज्ञांची विषयनिहाय समिती स्थापन करून प्रश्नपत्रिका निर्मिती व मूल्यमापन आराखडा तयार करण्यात येईल.

**पुरस्कार व प्रोत्साहन :**

प्रत्येक स्तरावर प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येईल.

**अपेक्षित परिणाम :**

- शिक्षकांमध्ये अभ्यास व संशोधन वृत्तीला चालना मिळेल.
- गुणवत्ता व कार्यक्षमता वाढेल.
- शिक्षण क्षेत्रात राज्याची उज्ज्वल प्रतिमा निर्माण होईल.

**अंदाजे खर्च विवरण :**

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | प्रश्नपत्रिका निर्मिती व छपाई | राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजन<br>२० तज्ज्ञ | रक्कम<br>शासकीय नियमानुसार |
| २) | जिल्हा स्तरीय स्पर्धा आयोजन<br>• बक्षिसे (प्रथम, द्वितीय, तृतीय)<br>• प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह<br>• प्रचार साहित्य (बॅनर/फ्लेक्स)<br>• नियोजन व व्यवस्थापन खर्च | ३६ जिल्हे | |
| ३) | राज्य स्तरीय स्पर्धा आयोजन<br>• बक्षिसे (प्रथम, द्वितीय, तृतीय)<br>• प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह<br>• प्रचार साहित्य (बॅनर/फ्लेक्स)<br>• नियोजन व व्यवस्थापन खर्च | ३६ जिल्हे × १ व्यक्ती (प्रथम) × | रक्कम<br>शासकीय नियमानुसार |
| | **एकूण खर्च** | | |

## ३७.६ : बुद्धिमत्ता चाचणी ऑलिंपियाड

**स्पर्धेचे निकष**

- स्पर्धेचा हेतू : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विचारशक्ती, तार्किक बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता आणि वेगवान विचारक्षमतेचा विकास करणे.
- उमेदवार पात्रता : शासकीय (जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित, नगरपालिका, महानगरपालिका) तसेच सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात. तसेच प्रशासन व जि. शि. प्र. सं. मधील अधिकारी/कर्मचारीही स्पर्धेत भाग घेऊ शकतात.
- वयोगट : वयोमर्यादा नाही.

- बुद्धिमत्ता चाचणीचा प्रकार : तार्किक विचार, अंकगणितीय चातुर्य, दृश्यकल्पना, स्मरणशक्ती, सामान्यज्ञान.

**नियमावली :**

१) स्पर्धा ऑनलाइन किंवा ऑफलाइन स्वरूपात आयोजकांच्या निर्णयानुसार आयोजित करण्यात येईल.

२) प्रश्नपत्रिका बहुपर्यायी प्रश्नांची (MCQ) असेल.

३) स्पर्धेचा कालावधी : १ तास.

४) प्रत्येक योग्य उत्तरास १ गुण. नकारात्मक गुण नाहीत.

५) परीक्षेनंतर उत्तर तालिका व निकाल ७ दिवसात जाहीर केला जाईल.

६) सर्व सहभागींस प्रमाणपत्र, तर विजेत्यांस सन्मानचिन्ह व बक्षिसे दिली जातील.

७) निर्णय समितीचा निर्णय अंतिम राहील.

**खर्चाचे अंदाजपत्रक (५० सहभागी गृहीत धरून)**

| **खर्चाचा प्रकार** | **अंदाजे रक्कम** |
|---|---|
| प्रश्नपत्रिका छपाई/डिजिटल सिस्टम | रक्कम शासकीय नियमानुसार |
| परीक्षक मानधन | |
| प्रमाणपत्र व ट्रॉफी | |
| प्रचार साहित्य (बॅनर/फ्लेक्स) | |
| बक्षिसे (प्रथम, द्वितीय, तृतीय) | |
| नियोजन व व्यवस्थापन खर्च | |
| **एकूण** | |

❖❖❖

# श्रेयनामावली

| अ.क्र. | परिषदेतील विभाग |
|---|---|
| १) | मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २) | गणित विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३) | आय.टी. विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४) | जीवन शिक्षण विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ५) | कला व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ६) | मूल्यमापन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ७) | विज्ञान विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ८) | बालशिक्षण व सेवापूर्व विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ९) | संशोधन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १०) | आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ११) | इंग्रजी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १२) | सामाजिक शास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १३) | व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १४) | उर्दू विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १५) | बालशिक्षण विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |

| अ.क्र. | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
|---|---|
| १) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर |
| २) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती |
| ३) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बीड |
| ४) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव |
| ५) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलढाणा |
| ६) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव |
| ७) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली |
| ८) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना |

| अ.क्र. | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
|---|---|
| ९) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर |
| १०) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार |
| ११) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक |
| १२) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी |
| १३) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड |
| १४) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी |
| १५) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सांगली |
| १६) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग |
| १७) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर |
| १८) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा |
| १९) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| २०) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ |
| २१) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संभाजीनगर |
| २२) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली |
| २३) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम |
| २४) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे |
| २५) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला |
| २६) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर |
| २७) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे |
| २८) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर |
| २९) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुंबई |
| ३०) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुंबई |
| ३१) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड |
| ३२) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा |
| ३३) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गोंदिया |
| ३४) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघर |
| ३५) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सातारा |
| ३६) | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर |

◈◈◈


स्पर्धा